UNIVERSAL LIBRARY
OU_192294
UNIVERSAL LIBRARY

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : पुष्प ४५ वें

# गांधीजींचें मानस

संग्राहक

आर. के. प्रभु : यू. आर. राव

प्रस्तावनालेखक

डॉ. एस्. राधाकृष्णन्

★

अनुवादक

अण्णासाहेब सहस्रबुद्धे

माधव पुरुषोत्तम लिमये

विद्ययामृतमश्नुते

जानेवारी, १९४९ ]

[ मूल्य ४ रुपये

प्रकाशक
रघुनाथ गणेश जोशी,
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेच्या
विश्वस्त-मंडळाकरितां.
टिळक रोड, पुणें २

संपादक
आचार्य शं. द. जावडेकर
आचार्य स. ज. भागवत

★

[ नवजीवन ट्रस्ट, अहमदाबाद, यांच्या परवानगीनें
हें पुस्तक प्रकाशित केलें आहे. ]

मुद्रक
रा. ना. सरनाईक,
सुलभ मुद्रणालय,
२९१ शनवार, पुणें २

# प्रस्तावना

सामान्य जनतेपेक्षां श्रेष्ठ असे महात्मे वारंवार उदय पावत नाहींत. त्यांनीं ईश्वरासंबंधीं जास्त खोलवर विचार केलेला असल्यानें ईश्वरी हेतूविषयीं त्यांना अधिक स्पष्ट कल्पना असते आणि ईश्वरी आदेश ते धैर्यानें आचरणांत आणूं शकतात. अशा विभूतींच्या जीवनाच्या प्रकाशाचा निराशा आणि गोंधळ माजलेल्या जगाला दीपस्तंभासारखा उपयोग होतो. गांधीजी हे धैर्यशाली अंतःकरण, दयाशील आत्मा आणि निर्भय हास्य असणाऱ्या महापुरुषांच्या मालिकेंतील एक होत. आत्म्यावरील श्रद्धा, त्याच्या गूढतेबद्दल आदर, पावित्र्याचें सौंदर्य, जीवनांतील कर्तव्यांच्या जबाबदारीचा अंगीकार, शुद्ध नीतिमत्ता, या केवळ राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीयच नव्हेत, तर चिरंतन अशा नैतिक मूल्यासाठी आपला देश वर्षानुवर्षें झगडत आला आहे. गांधीजींचें आचरण व उपदेश हें त्याचेंच मूर्तिमंत उदाहरण होय.

कित्येक लोकांच्या दृष्टीनें गांधीजी हे ऐनवेळीं गोंधळ करून सोडणारे एक धंदेवाईक राजकारणी आहेत. एका अर्थानें राजकारण हा एक धंदाच आहे आणि राजकारणी पुरुष तो, कीं जो हा सार्वजनिक कार्याचा व्यापार मोठ्या कौशल्यानें पार पाडण्यांत तयार झालेला असतो. आणखी एका अर्थानेंहि राजकारण हा एक धंदा आहे असें म्हणतां येईल व त्या दृष्टीनें पाहतां आपल्या देशबांधवांचा बचाव करून त्यांच्यांत ईश्वराविषयीं निष्ठा आणि मानवजातीविषयीं प्रेम निर्माण करण्याच्या जबाबदारीची जाणीव राजकारणी पुरुषाला असते. अशा तऱ्हेचा राजकारणी पुरुष व्यावहारिक अशा सरकारी कामकाजांत कदाचित् अयशस्वी ठरेल; परंतु आपल्या बांधवांच्या मनांत आपल्या समान ध्येयाबद्दल दुर्दम्य अशी निष्ठा निर्माण करण्याच्या कामीं मात्र तो यशस्वी होईल. गांधीजी हे निश्चितपणें या दुसऱ्या वर्गांत मोडणारे राजकारणी पुरुष आहेत. त्यांचा असा दृढ विश्वास आहे, की जर आपल्याला आत्मिक अधिष्ठान लाभलें तर आपण दारिद्र्य व बेकारी आणि युद्ध व रक्तपात यांचें अस्तित्व नसलेल्या जगाची उभारणी करूं शकूं. ते म्हणतात: "उद्यांचें जग म्हणजे अहिंसेवर आधारलेला समाज असेल—असला पाहिजे. तें एक अत्यंत दूरचें ध्येय किंवा अव्यवहार्य मनोराज्य आहे असें वाटेल;

परंतु अगदीं आज या क्षणापासून त्याची उभारणी करतां येणें शक्य असल्यानें तें अप्राप्य आहे असें मुळींच म्हणतां येणार नाही. दुसऱ्या-करितां वाट पाहत न बसतां एकाद्याला भविष्यकालीन जीवनप्रणालीचा—अहिंसेचा—अंगीकार करतां येईल आणि जर एका व्यक्तीला तें करतां आले, तर व्यक्तीच्या सर्व समूहाला ते करतां येणार नाहीं का? सबंध राष्ट्राला करतां येणार नाहीं का? मानव नेहमीं कोठल्याहि गोष्टीची सुरुवात करण्यास कचरत असतो. कारण त्याला अशी धास्ती वाटते, कीं त्याचें उद्दिष्ट संपूर्णपणें सिद्धीस जाणार नाही. मनाची ही अवस्था हाच नेमका आपल्या प्रगतीच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा होय. मनांत आणल्यास हा अडथळा प्रत्येक माणसाला दूर करतां येईल.''[१]

गांधीजींची कल्पनाशक्ति त्यांच्या ग्रहणशक्तीच्याहि पुढें भरारी मारते. जग हें साधूंनी भरलेले आहे, या सोयिस्कर परंतु चुकीच्या समजुतीवर ते वावरत असतात, अशी टीका त्यांच्या संबंधानें नेहमी केली जाते. गांधीजीच्या दृष्टिकोनाचा हा विपर्यास आहे. गांधीजींना हें माहीत आहे, कीं आयुष्य म्हणजे ध्येयवाद आणि व्यवहार यांमधील नित्य अशी तडजोड आहे. ईश्वरी साम्राज्य कसलीहि तडजोड किंवा व्यवहार्य मर्यादा जाणीत नाहीं; परंतु या भूतलावर निसर्गाचे निर्घृण नियम लागू असतात. मानवी विकारांमधूनच आपल्याला सुव्यवस्थित अशी एकवाक्यता निर्माण करा-वयाची असते. दीर्घोद्योग व अडचणींचे निराकरण याच्या द्वाराच ध्येयें आपली सिद्धि प्राप्त करून घेतात. अहिंसा हा सुसंस्कृत समाजाचा आदर्श आहे असें गांधीजी मानीत असले, तरी ते पाशवी शक्तीचा उपयोग करण्यास अनुमति देतात. 'एकाद्यापाशीं जर धैर्य नसेल, तर संकटापासून भित्रेपणानें पळ काढण्यापेक्षां त्यानें मारण्याची व मरण्याची विद्या संपादन केलेली मला जास्त आवडेल.'[२] 'जग हें निव्वळ तर्कशास्त्रावर चालत नाहीं. जीवनांतच या ना त्या स्वरूपाची हिंसा अंतर्भूत असते; म्हणून आपण कमींत कमी हिंसेचा मार्ग शोधून काढला पाहिजे.'[३] समाज-

१ Liberty, लंडन, १९३१

२ Harijan, १५ जाने. १९३८, पृ. ४१८

३ Harijan, २८ सप्टें. १९३४, पृ. २५९

विकासांत तीन अवस्था आढळून येतात. पहिल्या अवस्थेंत सर्वत्र हिंसा व स्वार्थ भरलेला असून आडदांड न्यायाचें प्राबल्य असतें. दुसऱ्या अवस्थेंत न्यायालयें, पोलिस आणि तुरुंग असलेली निःपक्षपाती न्यायसंस्था व कायद्याचा अंमल आढळून येतो; आणि तिसऱ्या अवस्थेंत अहिंसा व निःस्वार्थीपणा पहावयास मिळतो. कायदा आणि प्रेम हीं त्या अवस्थेंत एकरूप असतात. ही तिसरी अवस्था हें सुसंस्कृत मानवजातीचें ध्येय असून गांधीजींसारख्या विभूतींच्या जीवनानें आणि कार्यानें तें नजीक येतें.

गांधीजींचीं मतें आणि त्यांची विचारप्रणाली यांविषयीं आज कमालीची गैरसमजूत पसरलेली आहे. या पुस्तकांत गांधीजींची तत्त्वप्रणाली व आचार यांसंबंधींचीं मुख्य तत्त्वें त्यांच्याच लिखाणांतून एकत्र ग्रथित केलेलीं असल्यामुळें गांधीजींची भूमिका आधुनिक विचारसरणीच्या लोकांना समजावून देण्यास याची मदत होईल.

बनारस,<br>४ एप्रिल, १९४४

—एस्. राधाकृष्णन्

# अनुक्रम


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | संतहि नव्हे, पापीहि नव्हे | ... | ... | १ |
| २ | माझें महात्मेपण | ... | ... | ९ |
| ३ | पथदर्शन | ... | ... | १६ |
| ४ | सत्याचा सिद्धान्त | ... | ... | २२ |
| ५ | सत्य तेंचि परब्रह्म | ... | ... | २७ |
| ६ | प्रार्थना : माझ्या आत्म्याचें अन्न | ... | ... | ३७ |
| ७ | अंतर्नाद | ... | ... | ४३ |
| ८ | सत्य व सौंदर्य | ... | ... | ४७ |
| ९ | माझ्यांतील विसंगती | ... | ... | ५१ |
| १० | अहिंसेचा सिद्धान्त | ... | ... | ५३ |
| ११ | जीवमात्राचें अद्वैत | ... | ... | ६५ |
| १२ | शांतिकालांतील व युद्धकालांतील अहिंसा | | ... | ७० |
| १३ | सत्याग्रहाचा सिद्धान्त | ... | ... | ८१ |
| १४ | प्रेमाचा सिद्धान्त | ... | ... | ९१ |
| १५ | धर्मसिद्धान्त | ... | ... | १०१ |
| १६ | माझा हिंदुधर्म संकुचित नाहीं | ... | ... | ११० |
| १७ | मंदिरें आणि मूर्तिपूजा | ... | ... | ११८ |
| १८ | माझे उपवास | ... | ... | १२२ |
| १९ | निर्भयतेचा धर्म | ... | ... | १२४ |
| २० | अपरिग्रहाचा सिद्धान्त | ... | ... | १२७ |
| २१ | ब्रह्मचर्याचा सिद्धान्त | ... | ... | १३३ |
| २२ | संतति-नियमन | ... | ... | १३६ |
| २३ | स्त्री ही अबला नाहीं | ... | ... | १४० |

२४ शरीरश्रमाचा सिद्धान्त ... ... १४३
२५ वर्गविरोध ... ... १४९
२६ मानव विरुद्ध यंत्र ... ... १५०
२७ ही पिशाच-संस्कृति ... ... १५६
२८ साम्यवाद व समाजवाद ... ... १५९
२९ स्वातंत्र्याचा सिद्धान्त ... ... १६३
३० राष्ट्रवाद विरुद्ध आंतरराष्ट्रवाद ... ... १६७
३१ स्वराज्याचा माझा अर्थ ... ... १७३
३२ हिंदुस्थानचें कार्य ... ... १७८
३३ मी ब्रिटिश-विरोधी नाहीं ... ... १८६
३४ आश्रमांतील व्रतें ... ... १८९
३५ स्फुट वचनें ... ... १९८

खरोखर ज्यांनीं या पुस्तकाचें संपादन
करावयास पाहिजे होतें, त्या

**महादेवभाई देसाईना**

**अ र्प ण**

# संतहि नव्हे, पापीहि नव्हे :: १

आजच्या आपल्या जीवनांतून 'संत' शब्द काढूनच टाकावा असें मला वाटतें. तो शब्द इतका पवित्र आहे की वाटेल त्याला सहजगत्या तो लावतां येणार नाहीं; मग माझ्यासारख्याची गोष्ट तर विचारावयासच नको. कारण, मी केवळ एक नम्र सत्यशोधक आहे. माझ्या सामर्थ्याची मजल कोठपर्यंत आहे याची मला जाणीव आहे. माझ्या हातून चुका होतात, पण त्या कबूल करण्याला मी कधीं मागेंपुढें पाहत नाहीं. एकाद्या शास्त्रज्ञाप्रमाणें जीवनाच्या कांहीं शाश्वत म्हटल्या जाणाऱ्या सिद्धांतांच्या बाबतींत मी प्रयोग करीत असतों, तरी मी स्वतःला शास्त्रज्ञ म्हणून म्हणवून घेऊं शकत नाहीं. कारण, आपल्या कार्यपद्धतींत शास्त्राला शोभेल असा रेखीवपणा असल्याचा प्रत्यक्ष पुरावा मला देतां येत नाहीं, किंवा आधुनिक विज्ञानांत दाखविले जातात तसे प्रत्यक्ष परिणामहि मला दाखवतां येत नाहींत, हें मी मोकळ्या मनानें कबूल करतों.

संतपणाचा वेष मला चढविणें हें जरी शक्य मानलें, तरी सुद्धां आज तें अकालींच ठरेल. मी कोणत्याहि प्रकारें संत आहें असें मला स्वतःला वाटत नाहीं; परंतु आवश्यक गोष्टी न केल्यामुळे व अनावश्यक केल्यामुळें माझ्या हातून नकळत कितीहि चुका झालेल्या असल्या तरी मी सत्याचा उपासक आहे अशी मला मनोमन खात्री आहे.

मी 'संताच्या बुरख्याखालीं दडलेला मुत्सद्दी'हि नाहीं; परंतु सत्य हेंच सर्वोत्तम शहाणपण असल्यामुळें कांहीं कांहीं वेळां माझें वर्तन सर्वोत्तम मुत्सद्देगिरीशीं सुसंगत असल्याचें दिसून येतें. तथापि सत्य–अहिंसेच्या धोरणाव्यतिरिक्त दुसरें कसलेहि धोरण मी अवलंबिलेलें नाहीं, अशी माझी समजूत आहे. माझ्या देशाच्या अथवा धर्माच्या मुक्तीसाठीं देखील मी सत्य आणि अहिंसा यांचा त्याग करणार नाहीं; किंवा 'त्यांचा त्याग करून देशाला किंवा धर्माला मुक्ति मिळणेंच शक्य नाहीं,' असें सुद्धां म्हणतां येईल.

मला माझ्या जीवनांत परस्पर–विरोधहि दिसत नाही किंवा वेडगळपणाहि आढळत नाही. हे खरे कीं मनुष्याला जशी आपली स्वतःची पाठ बघतां येत नाही, तशाच स्वतःच्या चुका किंवा स्वतःचा वेडेपणाहि त्याला दिसत नाही. परंतु ऋषींनी पुष्कळ वेळां धर्मप्रवण मनुष्याची वेड्या माणसाशीं तुलना केली आहे, त्यामुळें मी वेडा नसून खरोखरी धार्मिक वृत्तीचाच असलो पाहिजे असा विश्वास मी उराशी बाळगून आहे. वस्तुतः या दोहों-पैकी मी कोण आहे तें फक्त माझ्या मृत्यूनंतरच ठरवितां येईल.

मी स्वतःला संन्यासी असें कधींहि म्हणवून घेतलें नाही. संन्यास ही कांही न्यारीच गोष्ट आहे. सेवामय असें सामान्य आयुष्य कंठणारा आणि माझ्या सहकारी कार्यकर्त्यांच्या बरोबर मित्रांच्या दानावर जगणारा एक गृह-स्थाश्रमी मी स्वतःला समजतो. सुख आणि स्वास्थ्य ही जर मानसिक अवस्था असेल तर मी घालवीत असलेलें आयुष्य अगदी सुखस्वास्थ्याचें आहे. जरूर तें सर्व मला मिळतें. व्यक्तिगत परिग्रह करून ठेवण्याची यत्किंचितहि चिंता मला करावी लागत नाही.

मला ‘ जोगी ’ म्हणणेंहि चूक होईल. ज्या आदर्शांनी माझे जीवन नियंत्रित केलें आहे ते आदर्श सर्वसाधारण मानवसमाजानें स्वीकारण्याजोगे असेच आहेत. क्रमाक्रमानें विकास होत होत मी त्या आदर्शांप्रत पोचलो आहें. मी प्रत्येक पाऊल अगोदर पूर्ण विचार करून, त्याचा बरेवाईटपणा लक्षांत घेऊन आणि अत्यंत काळजीपूर्वक टाकलेलें आहे. माझे ब्रह्मचर्य आणि माझी अहिंसा दोन्ही स्वानुभवांतून उगम पावलेलीं असून माझ्या सामाजिक कर्तव्याच्या दृष्टीनें आवश्यक झाल्यामुळें तीं अंमलांत आलीं. गृहस्थ म्हणून, वकील म्हणून, समाजसेवक म्हणून किंवा राजकारणी म्हणून कोणत्याहि नात्यानें मला दक्षिण आफ्रिकेंत एकाकी जीवन कंठावें लागलें त्या वेळीं हीं कर्तव्यें नीट पार पाडण्याकरतां म्हणून, वैषयिक जीवनावर मला कडक नियंत्रण ठेवावें लागलें आणि मानवांशीं संबंध ठेवण्याच्या बाबतींत— मग ते मानव युरोपियन असोत वा माझे देशबांधव असोत— मला सत्याचें व अहिंसेचें कांटेकोर पालन करावें लागलें. सर्वसाधारण माणसाहून मी स्वतःला कोणी अधिक समजत नाहीं आणि माझ्यांतील कर्तृत्व तर सामान्य माणसा-हूनहि कमीच आहे. परिश्रमपूर्वक संशोधन करून अहिंसेप्रत व ब्रह्मचर्याप्रत

मी पोंचू शकलो, येवढ्याबद्दल मी शाबासकीला पात्र आहें असेंहि मी म्हणूं शकत नाहीं. कोणाहि स्त्रीनें अथवा पुरुषाने तसाच प्रयत्न केला आणि तितकीच आशा, तशीच तितकीच श्रद्धा बाळगली, तर मला जें प्राप्त झालें तें तिला अथवा त्यालाहि मिळेल याविषयीं माझ्या मनांत यत्किंचितहि शंका नाहीं. श्रद्धाविहीन कार्य हें अंत लागत नसलेल्या कुव्याचा तळ काढण्याचा प्रयत्न करण्यासारखेंच आहे.

जगाचें अस्तित्व नाकारणें एक वेळ मला सहज शक्य होईल; पण माझ्या ईश्वराचें अस्तित्व मी नाकारावें असा विचारहि माझ्या मनांत येणें शक्य नाहीं.

कोणाहि सामान्य मर्त्य मनुष्याप्रमाणें मी ... .. . असा साधासुधा मनुष्य आहे. मात्र माझ्याकडून झालेले प्रमाद कबूल करून, टाकलेलें पाऊल, मागे घेण्याइतकी लीनता माझ्या अंगीं आहे, हे मी सांगूं शकतों. ईश्वरावर आणि त्याच्या चांगुलपणावर माझी अचल श्रद्धा आहे, तशीच सत्य व प्रेम यांबद्दलहि निस्सीम उत्कटता माझ्यांत आहे असें मी सांगतों. परंतु त्या प्रत्येक मनुष्यातच सुप्तावस्थेत असत नाहीत काय ?

ज्या ज्या वेळी मला एकादा माणूस चूक करतांना आढळतो, त्या त्या वेळीं मी स्वतःला म्हणतों कीं तुझ्या हातूनहि चुका घडलेल्या आहेत; ज्या वेळी मला एकादा विषयलंपट मनुष्य दिसतो, त्या वेळीं माझ्या मनांत येतें कीं मीहि एके काळीं असाच नव्हतों काय ? आणि अशा रीतीनें जगांतील प्रत्येकाविषयीं माझ्या मनात आप्तभाव उत्पन्न होतो. आमच्यांतील क्षुद्रांत क्षुद्र जिवाला सुद्धां सुख झाल्यावांचून मला सुख होणार नाही असें मला वाटूं लागतें.

मी जर एकाद्याला वाजवीपेक्षां कमी दिलें तर माझ्या जन्मदात्या ईश्वरापुढे मला जाब द्यावा लागेल; पण जर मी वाजवीपेक्षां अधिक माप त्याच्या पदरांत टाकल्याचें ईश्वराला कळेल, तर तो मला आशीर्वाद देईल अशी माझी खात्री आहे.

हृदयांतील अत्यंत कळकळीची आणि शुद्ध इच्छा नेहमीं फलद्रूप होत असते या नियमाची सत्यता मीं स्वतः किती तरी वेळां अनुभविलेली आहे. कंगालांची सेवा करावी ही माझ्या अंतरांची इच्छा आहे. तिनें मला नेहमीं

कंगालांमध्यें नेऊन सोडलें आहे आणि त्यामुळें मला त्यांच्याशीं एकरूप होणें शक्य झालें आहे.

अखंड कामाच्या धामधुमींतहि माझें जीवन आनंदानें पूर्ण भरलेलें आहे. उद्यां माझ्यापुढें काय वाढून ठेवले आहे याचा विचार करण्याची गरज न पडल्यामुळे मी एकाद्या पक्ष्यासारखा स्वतंत्र आहे. ... शरीराच्या वासनांशीं मी अविश्रांतपणें व प्रामाणिकपणें झगडत आहें या विचारामुळेच शेवटपर्यंत टिकून राहण्याचे बळ माझ्या अंगीं आले आहे. कोणती कामें मी हातीं घ्यावी हे माझ्यासाठी भवितव्यता ठरवीत असते; मी तीं शोधावयाला जात नाहीं. जवळजवळ माझी इच्छा नसतांनाहि तीं माझ्याकडे चालून येतात. माझ्या आयुष्यभर असेंच घडत आलें आहे. दक्षिण आफ्रिकेंत तेंच झालें आणि हिंदुस्थानांत परत आल्यापासूनहि तेंच चालू आहे.

ज्या मानवजातींत मी जन्माला आलों आहे तिच्या दोषांचीं मला पुरेपूर जाणीव आहे, त्यामुळें कोणाहि व्यक्तीवर मी कधीं चिडत नाहीं. जेथें कोठें मला अन्याय दिसेल तेथें त्या अन्यायाशीं झगडावें, अन्याय करणाऱ्याला कधीं इजा पोंचवूं नये असा माझा उपाय असतो. कारण, माझ्या हातून देखील अन्याय सतत होत असतात व त्यांबद्दल मला कोणी इजा करावी असें मला वाटत नाहीं.

मतभेद म्हणजे वैर असा अर्थ कधीं करूं नये. तसें असतें तर मी आणि माझी पत्नी एकमेकांचे कट्टे शत्रु बनलों असतों. सबंध जगांत दोन व्यक्ती सुद्धां अशा सांपडणार नाहींत कीं ज्यांच्यांत कसलाहि मतभेद नाहीं. आणि मी गीतेचा अनुयायी असल्यामुळें माझ्या जवळच्या प्रेमाच्या माणसांशी मी जितक्या प्रेमानें वागतों तितक्याच प्रेमाने माझ्याशीं ज्यांचा मतभेद आहे, त्यांच्याशींहि वागण्याचा मी सतत प्रयत्न करीत आलों आहें.

ज्यांच्या तत्त्वांना आणि धोरणांना मी विरोध करतों त्याची ममता आणि त्याचा विश्वास मी सामान्यपणें टिकवून धरतों ही गोष्ट मला नित्य समाधानाची वाटते. दक्षिण आफ्रिकेंतील लोकांनीं माझ्यावर व्यक्तिगत विश्वास टाकला आणि मला आपला मित्र बनविलें. ब्रिटिश राज्यकार-भाराच्या धोरणाचा व पद्धतीचा मी निषेध करीत असतांना सुद्धां हजारों इंग्रज स्त्रीपुरुषांच्या प्रेमाचा लाभ मला झालेला आहे; आणि आधुनिक

भौतिक संस्कृतीचा मी अगदी निःसंदिग्ध शब्दांत धिक्कार करीत असूनहि माझे अमेरिकन आणि युरोपीय मित्रमंडळ एकसारखे वाढतच आहे. हा अहिंसेचाच विजय होय.

ईश्वराच्या इच्छेशिवाय गवताची काडी देखील हलत नाही या म्हण-ण्याच्या सत्यतेवर माझा निरपवाद विश्वास आहे. ईश्वराला जर या शरीरा-कडून आणखी सेवा करून घ्यावयाची असेल तर तो त्याचें संरक्षण करील. ईश्वराच्या इच्छेविरुद्ध कोणीहि त्याचे रक्षण करूं शकणार नाही.

लहानपणापासूनच मी सत्याचा उपासक आहें असें मी म्हणतों. माझ्या बाबतीत ती एक अत्यंत स्वाभाविक गोष्ट होती. ‘ईश्वर म्हणजेच सत्य’ या नेहमीच्या वचनाऐवजीं उपासनापूर्वक केलेल्या शोधांतून मला ‘सत्य म्हणजेच ईश्वर’ या वचनाचा साक्षात्कार झाला. या वचनामुळे मला ईश्वराचें जणूं प्रत्यक्ष दर्शन होऊं शकतें व माझ्या जीविताच्या अणुरेणूंत तो भरून राहिला आहे असें माझ्या प्रत्ययाला येतें.

माझे आयुष्य म्हणजे एक उघडे पुस्तकच आहे. माझ्या जीवनांत गुप्त असे कांहीच नाही आणि कसल्याहि प्रकारच्या गुप्ततेला मी उत्तेजन देत नाही.

माझ्या म्हणण्याचा विपर्यास व्हावा ही गोष्ट जन्मभर माझ्या अंगवळणीं पडली आहे. सर्वच सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या नशिबी हें असतें. सार्वजनिक कार्यकर्त्याचें मन हळवे असतां कामा नये. प्रत्येक वेळी विपर्यासाला उत्तर देत बसावयाचें आणि तो दूर करावयाचा म्हटलें तर आयुष्य दुःसह होऊन जाईल. अंगीकृत कार्याच्या दृष्टीनेच अवश्य असल्याखेरीज गैरसमज दूर करावयाच्या भानगडीत पडावयाचें नाही असा मीं माझ्या जीवनांत नियमच बांधून टाकला आहे. त्यामुळें माझा पुष्कळसा त्रास तसाच वेळहि वांचला आहे.

विक्षिप्त, छांदिष्ट आणि वेडपट म्हणून माझी प्रसिद्धि आहे. अर्थातच माझी ही कीर्ति अगदीं सार्थ आहे. कारण, जेथें जेथें मी जातों तेथें तेथें अशा तऱ्हेचे छांदिष्ट, तऱ्हेवाईक आणि वेडपट लोक मी माझ्याभोंवती गोळा करीत असतों.

खरोखर मी एक व्यवहारी स्वप्नद्रष्टा आहें. पण माझी स्वप्नें नुसते हवें-तील मनोरे मात्र नसतात. शक्य तितकीं तीं व्यवहारांत उतरविण्याची माझी इच्छा असते.

अजून मला अवघड रस्ता चालून जावयाचा आहे याची जाणीव मला आहे. मला शून्यवत् झालें पाहिजे. जोंपर्यंत आपण आपल्या मानवबंधूंत आपखुषीनें अगदी कनिष्ठपद स्वीकारीत नाहीं, तोंपर्यंत आपल्याला मुक्तीची आशा नाही. अहिंसा ही शालीनतेची अगदीं पराकाष्ठा आहे.

अहिंसेच्या आदर्शापेक्षां सत्याचा आदर्श मला जास्त चांगला समजतो असें मला दिसतें आणि माझा अनुभव असा आहे की सत्यावरील माझी पकड जर ढिली झाली, तर अहिंसेचें कोडें उलगडणें मला कधींच शक्य होणार नाही. ... वेगळ्या शब्दांत सांगावयाचें तर सरळ मार्गाचा अवलंब करण्याचे धैर्य कदाचित् माझ्यात नसावें. दोहोंचा अर्थ मुळांत एकच आहे. कारण संशयितपणा हा नेहमी श्रद्धा नसल्याचा किंवा ती दुर्बल असल्याचाच परिणाम असतो. म्हणून ' भगवन्, मला श्रद्धा दे ' अशी प्रार्थना मी अहोरात्र करीत असतों.

मी सदोदित आशावादी राहिलों आहें याचे कारण न्यायाचा उत्कर्ष होणारच असें दाखविण्याजोगा पुरावा मजपाशीं आहे हें नव्हे, तर अंतीं न्यायाचा विजय झालाच पाहिजे असा माझा दुर्दम्य विश्वास असतो हेंच आहे. ... अखेरीस सत्याचाच जय होणें अपरिहार्य आहे, या आमच्या श्रद्धेतूनच आमच्या स्फूर्तीचा उगम होऊं शकतो.

व्यक्तीच्या कर्तृत्वाला मर्यादा असतात. सर्वच कामें आपल्याला अंगावर घेतां येतील अशी शेखी जर कोणी मारील तर त्याचा गर्व उतरविण्याला ईश्वर तयारच असतो. माझ्यापुरतें बोलावयाचें तर लहानलहान अर्भकें आणि दूध-पिती तान्ही मुलें यांच्याकडून देखील मदतीची अपेक्षा करण्याइतकी नम्रता मला लाभली आहे.

समुद्रांतील बिंदूला जरी त्याची जाणीव नसली, तरीहि तो समुद्राच्या विशालतेचा अंशभागी असतो; परंतु समुद्राव्यतिरिक्त असें त्याचें स्वतंत्र जीवन सुरू होतांच तो सुकून जातो. आयुष्य म्हणजे एक बुडबुडा आहे असें आपण म्हणतों तेव्हां त्यांत अतिशयोक्ति नसते.

सत्यशोधकाला अहंमन्य असून भागणार नाही. जो दुसऱ्यासाठी आत्म-त्याग करतो त्याला स्वतःसाठी पृथ्वीतलावर जागा राखून ठेवण्याला सवड कोठून सांपडणार ?

धर्म, राजकारण, अर्थकारण इत्यादींतून जर 'मी' आणि 'माझें' हे शब्द आपण पुसून टाकूं शकलों, तर आपण लवकर स्वतंत्र होऊं आणि पृथ्वीवर स्वर्ग आणूं.

आपण स्वतःच स्वतःला फसवितों हें किती विचित्र आहे ! हें नश्वर शरीर अभेद्य करतां येतें अशी कल्पना आपण करतो; पण आत्म्याच्या सुप्त शक्ती जागृत करणें मात्र आपल्याला अशक्य वाटतें. तेव्हां हें दाखवून देण्याच्या प्रयत्नांत मी आहें, कीं जर माझ्यांत अशा कांहीं शक्ती नसतील तर मीहि इतरांसारखाच एक दुर्बळ मर्त्य आहें आणि माझ्यांत विलक्षण असें कांहीं कधींच नव्हतें व आजहि नाहीं.

माझ्या अनेक पापांची मी अगदीं मोकळ्या मनानें कबुली दिलेली आहे; पण त्याचें ओझें मात्र मी कधींच डोक्यावर वागवीत नाहीं. ईश्वराकडे जाण्याची जर माझी गति असेल—व तशी ती आहे असें मला वाटतें—तर मी सुरक्षित आहे. कारण, त्याच्या निकटत्वाच्या उन्हाची ऊब मी अनुभवतों. स्वतःची सुधारणा करण्याकरतां व्रतें, उपवास आणि प्रार्थना यांवर जर मी विसंबून राहिलों, तर त्यांचा कांहींहि उपयोग होणार नाहीं, याची जाणीव मला आहे. परंतु आपलें श्रांत मस्तक जगज्जनकाच्या मांडीवर टेकण्याची धडपड करणाऱ्या एका जिवाची तळमळ जर त्यांतून प्रकट होत असेल—आणि ती तशी होते अशी माझी समजूत आहे—तर मात्र या व्रतांचें मोल अमर्याद आहे.

मी माझ्या मर्यादा कबूल करतों. मला म्हणण्यासारखें विश्वविद्यालयीन शिक्षण मिळालेलें नाहीं. हायस्कुलांत सामान्य विद्यार्थ्यांपेक्षां जास्त मी कधींच चमकलों नाहीं. परीक्षा पास झालों म्हणजे मिळविली असें मला वाटे. शाळेंत नांव मिळविण्याची आकांक्षाच मी कधीं धरली नाहीं.

माझें शिक्षण चालू असतांना पाठ्य पुस्तकांपलीकडे मी जवळजवळ कांहींच वाचलें नव्हतें आणि ज्या वेळीं मी प्रत्यक्ष कार्यांत पडलों त्या वेळीं

वाचनासाठीं मला मुळींच सवड मिळेनाशी झाली. त्यामुळें ग्रंथज्ञान मला फारसें आहे असें म्हणतां येणार नाही. तथापि या सक्तीच्या संयमानें माझा कांही तोटा झाला आहे असें मात्र मला वाटत नाही. या मर्यादित वाचनामुळेंच मी जें कांही वाचलें ते पुरतेपणी पचविणें मला शक्य झाले. मी वाचलेल्या पुस्तकांपैकीं ज्या एका पुस्तकाने माझ्या जीवनांत एकदम पालट घडवून आणला आणि तो प्रत्यक्ष आचारात उतरला तें पुस्तक म्हणजे 'अन्टु धिस् लास्ट' हें होय. पुढे 'सर्वोदय' या नांवानें मी त्याचें गुजरातीत भाषांतर केलें. रस्किनच्या या थोर पुस्तकांत माझ्या अंतरात खोलवर असलेल्या निष्ठाच उमटलेल्या मला दिसून आल्या आणि त्यामुळेंच त्या पुस्तकाची माझ्यावर येवढी मोहनी पडली आणि माझ्या जीवनांत त्यानें केवढा तरी पालट घडवून आणला !

मी त्या वेळी दक्षिण आफ्रिकेत राहत होतों. १९०४मध्यें ३५ वर्षांचा असतांना दरबानला जातेवेळी आगगाडीच्या प्रवासांत 'अन्टु धिस् लास्ट' हें पुस्तक मी वाचलें आणि त्याचा मजवर येवढा परिणाम झाला कीं मी ताबडतोब माझें सबंध बाह्य जीवन बदलून टाकण्याचे ठरविलें. त्याला दुसरा शब्दच नाहीं, इतके रस्किनच्या शब्दानी मला 'मुग्ध' करून टाकले. मी एका खेपेंतच तें पुस्तक वाचून संपविलें आणि मग पुढची सबंध रात्र मला झोपच आली नाही. ताबडतोब व तेथल्या तेथें सबंध जीवनक्रम बदलण्याचे मी ठरविले. त्याआधी बरेच दिवस मी टॉल्स्टॉयचे ग्रंथ वाचले होते. टॉल्स्टॉयमुळें माझ्या अंतर्जीवनावर परिणाम झाला होता.

*

# माझें महात्मेपण : : १

महात्मेपणापेक्षां सत्य हे मला अनंत पटींनीं प्रिय आहे. महात्मेपण हें निव्वळ ओझें आहे. माझ्या उणिवांची आणि क्षुद्रतेची मला जाणीव असल्यामुळेंच महात्मेपणाच्या काचांतून मी आतांपर्यंत वांचलो आहे.

पुष्कळदां या पदवीने मला अत्यत दु:ख झालें आहे आणि असा एकहि क्षण मला आठवत नाहीं की ज्या वेळीं मला तीमुळे गुदगुल्या झाल्या आहेत.

मी महात्मा आहे असे मला वाटत नाहीं. परंतु ईश्वरानें निर्माण केलेल्या प्राण्यांपैकी मी एक अत्यंत क्षुद्र प्राणी आहे याची मात्र मला निश्चित जाणीव आहे.

माझ्या महात्मेपणांत कांही अर्थ नाहीं. माझ्या बाह्य चळवळीमुळें व माझ्या आयुष्यांत ज्याला अत्यंत गौण स्थान आहे त्या माझ्या राजकारणामुळे ते मला चिकटले आहे; त्यामुळेंच ते क्षणभंगुर आहे. चिरमूल्य जर कशाला असेल तर ते सत्य, अहिंसा आणि ब्रह्मचर्य यासंबंधीच्या माझ्या आग्रहाला आहे आणि तोच माझ्या जीवनांतील प्रधान भाग आहे. तो कितीहि लहान असला तरी त्याची अवहेलना करतां येण्यासारखी नाहीं. तो माझें सर्वस्व आहे. त्यांत वारंवार येणारे अपयश आणि पुष्कळ वेळां होणारा भ्रमनिरास हीं देखील मी मोलाची समजतो; कारण, त्याच यशोमंदिराच्या पायऱ्या होत.

मला श्रीकृष्णाप्रमाणे मानणें ही कुचेष्टा आहे असे मी समजतों. महाध्येयासाठी काम करणाऱ्या अनेकांपैकी मी स्वत:ला एक क्षुद्र कार्यकर्ता समजतों आणि महत्कार्यांत असलेल्या अनेकांहून माझी किंमत अधिक नाही असे मी मानतो. एखाद्या कार्याचें नेतृत्व करणाऱ्यांना विभूतिपदाला चढविल्याने त्याची प्रगति होण्याऐवजी हानि मात्र होते. कार्याची त्याच्या अंगभूत गुणांच्या जोरावर पारख झाली आणि गुणांच्या कसोटीवरच त्याची कांस धरण्यांत आली तर ते यशस्वी होण्याचा जास्तींत जास्त संभव असतो. प्रगतिपर समाजांत माणसांपेक्षां त्यांनी अंमलांत आणलेल्या उपाय-

योजनाच श्रेष्ठ समजल्या पाहिजेत. कारण, मनुष्यप्राणी म्हणजे शेवटी त्या योजनांच्या सिद्धीसाठी उपयोगांत येणारी अपूर्ण अवजारेंच की नाही ?

विचार नसलेल्या जनसमुदायाकडून होणाऱ्या पूजेचा मला अक्षरशः वीट आला आहे. तो जर माझ्यावर थुंकले असता, तर मला माझ्या भूमिकेबद्दल जास्त निश्चितता वाटली असती. मग हिमालयायेवढया आणि अशाच इतर चुकीच्या अंदाजांची कबुली देण्याची, पाऊल मागे घेण्याची अथवा नव्या योजना आंखण्याची कांहीच जरुरी पडली नसती.

माझा म्हणून म्हटला जाणारा मोठेपणा प्रसिद्धिपराङ्मुख, निष्ठावंत, कार्यक्षम आणि शुद्ध अशा स्त्रीपुरुष कार्यकर्त्यांच्या अविश्रांतपणे होत असलेल्या कष्टावर व दैनंदिन किचकट कामावर किती अवलंबून आहे, याची जगाला फारच थोडी जाणीव असेल.

मी ज्या कार्यक्रमाचा पुरस्कार करतो तो एक तर आपल्या जीवनांत उतरविणे किंवा त्यावर आपला विश्वास नसेल तर त्याबाबत मला अगदी कसून विरोध करणे हाच माझ्या मित्रांना माझा मोठ्यांत मोटा सन्मान करतां येईल.

अगदी अद्वितीय असे कांहीं दिव्यत्व माझ्यांत आहे असे मी तरी समजत नाहीं. मी प्रेषित आहे असेंहि मी म्हणत नाहीं. मी फक्त सत्याचा एक नम्र शोधक आहे आणि ते मिळविण्याचा माझा निर्धार आहे. ईश्वराचें प्रत्यक्ष दर्शन घडण्यासाठी कितीहि स्वार्थत्याग करावा लागला तरी तो मला जास्त वाटत नाहीं. माझी सर्व प्रवृत्ति—मग ती सामाजिक असो, राजकीय असो, मानवसेवेची असो अथवा नीतिधर्मविषयक असो—हेच उद्दिष्ट मनांत ठेवून केलेली असते. आणि ईश्वराचे स्थान त्याने निर्माण केलेल्या उच्च आणि बलाढ्य प्राण्यात नसून सर्वांत कनिष्ठ अशा प्राण्यांतच तो बहुधा भेटतो, हे मला माहीत असल्यामुळे माझी त्या कनिष्ठांच्या दर्जापर्यंत पोचण्याची धडपड चालू असते. त्यांची सेवा केल्याशिवाय मला ते साधणें शक्य नाहीं. याचकरितां मला दलित वर्गाच्या सेवेची तळमळ वाटते आणि राजकारणांत शिरल्यावांचून ही सेवा करणें शक्य नसल्यानेच मला राजकारणांत भाग घ्यावा लागतो. म्हणून मी कोणी स्वामी नाहीं. मी फक्त एक धडपडणारा व चुका करणारा हिंदुस्थानचा आणि त्याच्या द्वारा मानवजातीचा नम्र सेवक आहें.

मला माझ्या उणिवांची जाणीव आहे व ती जाणीव हेंच एक माझें बल आहे. आयुष्यांत जें कांहीं मला करतां आलें आहे तें इतर कोणत्याहि गोष्टीपेक्षां माझ्या मर्यादांच्या या जाणिवेमुळेंच होय.

कोठेंहि प्रतिष्ठा मिळवावी अशी इच्छा मला नाहीं. प्रतिष्ठा म्हणजे राजेलोकांच्या दरबारांत लागणारें जणूं शोभेचें सामानच ! मी जसा हिंदूंचा, तसाच मुसलमान, ख्रिस्ती, पारशी व यहुदी यांचाहि सेवक आहें. सेवकाला प्रतिष्ठेची नव्हे, तर प्रेमाची गरज असते आणि मी जोपर्यंत इमानी सेवक आहें तोंपर्यंत तें मला खात्रीनें मिळणारच.

मला मिळालेल्या बहुतेक मानपत्रांतून मला न पेलणारी विशेषणें समाविष्ट केलेली असतात. त्यांच्यामुळें तीं देणाऱ्यांचे भलें होत नाहीं कीं माझेंहि होत नाहीं. त्यांमुळें विनाकारण माझी मानखंडना मात्र होते; कारण, माझी तितकी पात्रता नाहीं असें मला कबूल करावें लागतें. पात्रता असेल तर विशेषणें अनावश्यक होतात. त्यांमुळें कांहीं माझ्या अंगीं असलेल्या गुणांची संख्या वाढणें शक्य नाहीं. मी जागरूक नसेन, तर या विशेषणांच्या योगानें माझें डोकें फिरून जाण्याचाहि संभव आहे. पुष्कळ वेळां मनुष्यानें केलेल्या सत्कृत्याचा उच्चार न करणेंच श्रेयस्कर असतें. अनुकरण हीच मनापासून केलेली स्तुति होय.

हुतात्मा होण्यासाठीं मी हपापलेला नाहीं; परंतु ज्याला मी माझें सर्वश्रेष्ठ कर्तव्य मानतों ते पार पाडीत असतांना मी बाळगीत असलेल्या श्रद्धेच्या रक्षणार्थ जर हुतात्मा होण्याची पाळी आली...तर ते मिळविल्यावांचूनहि मी राहणार नाहीं.

यापूर्वी माझ्यावर अनेकदां प्राणघातक हल्ले झाले आहेत; परंतु आतांपर्यंत ईश्वरानें मला त्यांतून वांचविलें आहे आणि हल्ला करणारांना आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झालेला आहे. पण आपण एका पाजी माणसाचा कांटा काढीत आहों, या भावनेनें जर एकाद्यानें मला गोळी घालून ठार केलें, तर त्यानें खऱ्या गांधीला ठार केलें असें होणार नाहीं, तर त्याला जो पाजी वाटला त्यालाच ठार केल्यासारखें होईल.

माझ्यांत जर विनोदवृत्ति नसती, तर मी फार पूर्वीच आत्महत्या केली असती.

अशाहि कांही गोष्टी असतात की ज्या टाळण्याचा तुम्ही प्रयत्न करीत असूनहि त्या तुम्हांला एकदम टाळतां येत नाहीत. ज्या मृण्मय पिंजऱ्यांत मी अडकून पडलो आहे, तो माझ्या जीवनाचा शाप आहे. तथापि तो मला चालवून घ्यावा लागतो; इतकेंच नव्हे, तर मला त्याचे लाडहि पुरवावे लागतात.

माझ्या ठिकाणीं अहंकार नाही असें मी समजतों. माझ्या दौर्बल्याची मला पुरती जाणीव आहे असें मला वाटते. परंतु ईश्वरावरील आणि त्याच्या सामर्थ्यावरील व प्रेमावरील माझी श्रद्धा अढळ आहे. मी त्या कुंभाराच्या हातांतील चिखलाच्या गोळ्यासारखा आहे.

लोक जेव्हा जेव्हा चुका करतील त्या त्या वेळीं मी त्या कबूल करीत राहीन. या जगात फक्त एकाचाच जाच मी मानतो आणि तो एक म्हणजे माझ्या हृदयातील 'अत्यंत सूक्ष्म आवाज' होय. आणि माझ्या बाजूला जरी फक्त मी एकटाच राहण्याचा संभव असला तरी देखील तसल्या यःकश्चित् अल्पसंख्येत राहण्याचें धैर्यहि माझ्यापाशी आहे असें मी नम्रपणें मानतो.

माझ्या मानवबंधूंचे दोष मला चटकन दिसत नाहीत, हे मी प्राजळपणें सांगतो. कारण, माझ्या स्वतःमध्येच ते भरपूर आहेत आणि लोकांनी त्यांकडे उदार बुद्धीनें पाहावें अशी मला स्वतःलाच गरज वाटते. कोणा-विषयींहि कठोर होऊन मत बनवूं नये आणि जे दोष दृष्टोत्पत्तीस येतील ते पोटात घालावे असें मी शिकलो आहे.

'सत्य आणि अहिंसा' हाच एक सद्गुण माझ्यामध्ये आहे असा माझा दावा आहे. अतिमानुष शक्ती माझ्यामध्यें मुळीच नाहीत व मला त्या नकोतहि. माझ्या मानवबंधूंपैकीं दुर्बलात दुर्बल माणूस जितका बिघडण्यास पात्र आहे, तितकाच मीहि आहे आणि म्हणून त्याच्याइतकाच मीहि चुकीला पात्र आहें. मी सेवा करतो तींत अनेक उणिवा आहेत. परंतु ती अपूर्ण असताहि ईश्वरानें आतांपर्यंत तिला आशीर्वाद दिला आहे.

मी स्वतःला शहाणा कार्यकर्ता समजतो आणि माझें शहाणपण म्हणजे दुसरें तिसरें कांही नसून माझ्या उणिवांचे मला असलेलें सूक्ष्म ज्ञानच होय.

माझ्या मर्यादांच्या बाहेर मी कधींहि आक्रमण करीत नाहीं, निदान जाणून-बुजून तरी मी तसें कधी केलेलें नाहीं, अशी माझी समजूत आहे.

जनतेचें अमर्याद प्रेम जरी मी बहुमोल मानीत असलों, तरी तिनें हें ओळखावें की माझे प्राण वांचविण्याच्या चिंतेमुळें राष्ट्राचें लक्ष मुख्य मुद्द्या-पासून जर विचलित होत असेल, तर माझे प्राण वांचविण्यांत कांहींच अर्थ नाहीं.

मानवी स्वभावाचा माझा अभ्यास बराच अचूक आहे आणि मी स्वतःच्या उणिवांचें विश्लेषण चांगल्या प्रकारें करूं शकतों असा माझा दावा आहे. मला असें आढळून आलें आहे कीं, मनुष्य ज्या पद्धतीचा पुरस्कार करतो तिच्याहून तो श्रेष्ठ असतो.

मी दुर्दम्य आशावादी आहें; कारण; माझा स्वतःवर विश्वास आहे. ही भाषा अहंकाराची वाटते, नाहीं ? पण मी हें अत्यंत नम्र होऊन म्हणतों. ईश्वराच्या सर्वश्रेष्ठ सत्तेवर माझा विश्वास आहे. माझा सत्यावर विश्वास आहे आणि म्हणून या देशाच्या किंवा मानवजातीच्या भवितव्याविषयीं मला शंका नाहीं.

मी आशावादी आहें; कारण, मी स्वतःकडून पुष्कळ गोष्टींची अपेक्षा करतों; पण मी अजून पूर्ण नसल्यामुळें त्या गोष्टी मला साध्य झालेल्या नाहींत हेंहि मी जाणतों. मी जर पूर्ण असतों तर तुमच्याशीं वाद करण्याचीहि जरुरी मला पडली नसती. जेव्हां मी पूर्ण होईन तेव्हां फक्त तोंडांतून शब्द उच्चारावयाचा अवकाश की सारें राष्ट्र त्याकडे आपले कान लावील. तें पूर्णत्व मला सेवेनें मला करून घ्यावयाचें आहे.

मानखंडना आणि ज्याला पराभव म्हणतात तशी स्थिति व खळबळीचें जीवन असतांहि मला माझी शांति टिकवून धरतां येते, ती मुळांत माझी ईश्वरावर श्रद्धा आहे त्यामुळेंच. त्याचेंच दुसरें नांव सत्य असें आहे. ‘ अमुक म्हणजे ईश्वर ’ असें असंख्य नांवांनीं ईश्वराचें वर्णन आपल्याला करतां येईल. परंतु मी ‘ सत्य हाच ईश्वर ’ ही व्याख्या माझ्यापुरती स्वीका-रली आहे. माझें जीवन हें अविभाज्य आहे, माझ्या प्रवृत्ती एकमेकींत गुंतलेल्या आहेत आणि त्या सर्वांचा उगम मानवजातीविषयीं मला जें अलोट प्रेम वाटतें त्यांत आहे.

पुष्कळ वेळां माझ्यावर हटवादीपणाचा आरोप केला जातो. 'बहुमताच्या निर्णयापुढे तुम्ही मान वाकविणार नाही' असे मला लोकांनी सांगितले आहे. मी अरेराव आहे असा दोषारोप माझ्यावर करण्यांत आलेला आहे. ... हेकेडपणा किंवा अरेरावी हे आरोप मान्य होणे मला कधीहि शक्य वाटलें नाही. उलट बिनमहत्त्वाच्या बाबींत माघार घेण्याचा माझा स्वभाव असल्या-बद्दल मी अभिमान बाळगतो. अरेरावीचा मला तिरस्कार आहे. मला स्वतःच्या स्वातंत्र्याची किंमत असल्यामुळे दुसऱ्यांच्या स्वातंत्र्यालाहि मी तितकाच मान देतो. कोणाच्या बुद्धीची मला खात्री पटवितां येत नसेल, तर एकालाहि माझा साथी करण्याची माझी इच्छा नाही. शास्त्र अगदी पुरातन असली तरी सुद्धां माझ्या बुद्धीची खात्री जर त्यांनी पटविली नाही, तर त्यांचेंहि प्रामाण्य न मानण्याइतकी मजल माझा रूढी न मानणारा स्वभाव गांठूं शकतो. पण अनुभवानें माझ्या प्रत्ययाला असें आलें आहे की, मला समाजांत राहूनहि माझें स्वातंत्र्य टिकवावयाचें असेल, तर बुद्धीच्या पूर्ण स्वातंत्र्याचे मुद्दे पहिल्या प्रतीच्या बाबींपुरतेच मर्यादित ठेवणें अवश्य आहे. इतर बाबतींत जेथे आपल्या व्यक्तिगत धर्माला किंवा नीतितत्त्वांना बाध येणार नसेल तेथे मात्र आपण बहुमताला मान देणेंच अवश्य आहे.

कटु अनुभवानें एक श्रेष्ठ धडा मी शिकलों तो हा की, आपला क्रोध राखून ठेवावा; राखून ठेवलेल्या उष्णतेंतून जशी शक्ति निर्माण होते, तशीच काबूंत ठेवलेल्या क्रोधांतून देखील सारें जग हलवून सोडणारी शक्ति निर्माण होऊं शकते. मला कधीं राग येत नाही असें नाहीं. मी तो व्यक्त करीत नाही इतकेंच. अक्रोधाप्रमाणेंच तितिक्षा हा गुणहि अंगी आणण्याचा मी प्रयत्न करतो आणि साधारणपणें मला तें साध्य होतें. पण ज्या वेळी मला राग येतो त्या वेळीच मी तो ताब्यात ठेवतो. तो ताब्यांत ठेवणें मला कसें जमतें हा प्रश्न निरर्थक आहे; कारण, तो एक अभ्यास आहे आणि प्रत्येकानें तो अंगीं बाणवून घेऊन त्याचा नित्य आचार केला पाहिजे.

नीतिधर्माला सोडून कांही करण्याचा प्रश्न असेल त्या वेळीं मी शत्रूची किंवा मित्राची गय करीत नाही.

विशेष अधिकार आणि मक्तेबाजी यांचा मला तिटकारा आहे. सर्वसाधारण जनसमुदायाबरोबर जें घेतां येणार नाही तें मला निषिद्ध आहे.

जन्मभर माझ्या ठिकाणी गरिबांविषयीं अत्यंत प्रेमभाव वसत आला आहे आणि तो अगदी भरपूर प्रमाणांत आहे. तो माझा स्वभावधर्मच आहे, असें दाखविणारी माझ्या गतायुष्यांतील किती तरी उदाहरणें मी देऊं शकेन. माझ्यांत आणि गरिबात कांही फरक आहे असें मला कधीच वाटलें नाही. 'ते माझे अगदी भाईबंद' अशीच भावना त्यांच्याविषयीं माझ्या मनांत नेहमी राहिलेली आहे.

मी वापरीत असलेला पंचा हा माझ्या जीवनविकासाचाच एक भाग आहे. त्याची सुरुवात सहज, विनायास, कसलाहि पूर्वविचार न करतां झाली.

गेल्या पन्नास वर्षांत कोणाहि व्यक्तीला किंवा जातीला विरोधी ठरेल असें एकहि कृत्य माझ्या हातून घडल्याचें कोणीहि दाखवूं शकणार नाही. मी कोणालाहि माझा शत्रु म्हणून कधीहि लेखलें नाही. कोणालाहि शत्रु समजूं नये असें माझा धर्म मला सांगतो. कोणत्याहि प्राणिमात्राविषयीं माझ्या मनात दुष्ट भाव असता कामा नये.

माझें म्हणून कांही तत्त्वज्ञान म्हणतां येत असेल, तर त्या तत्त्वज्ञानांत 'बाहेरून कोणाकडून आपल्या कार्याला धक्का पोचण्याचा संभव मानला जात नाही.' जेव्हां तें कार्यच मुळात वाईट असतें किंवा तें चांगलें असलें तरी त्याचे पुरस्कर्ते अप्रामाणिक, दुर्बल अंतःकरणाचे किंवा अशुद्ध असतात, तेव्हांच त्याला धक्का पोचतो आणि तसें होणे योग्यच आहे.

कशी कोण जाणे, पण मानवांतील उदात्तता जागृत करण्याची शक्ति माझ्यात आहे. त्यामुळेंच ईश्वरावरील आणि मनुष्य–स्वभावावरील माझी श्रद्धा टिकवून धरणें मला शक्य होतें.

जसा मी असावें असें मला वाटतें, तसा मी जर असतों तर कोणा-बरोबरहि युक्तिवाद करण्याची जरुरी मला पडली नसती. माझा शब्द एकदम हृदयालाच जाऊन भिडला असता—नव्हे, तो शब्द उच्चारण्याची देखील गरज मला पडली नसती. केवळ इच्छा करण्याचा अवकाश कीं इष्ट तो परिणाम घडून आला असता. परंतु माझ्या उणिवांची दुःखपूर्ण जाणीव मला आहे.

# पथदर्शन :: ३

मला तो मार्ग ठाऊक आहे. तो निकट व सांकडा मार्ग आहे. तो तलवारीच्या धारेसारखा आहे. त्यावरून चालण्यांत मला आनंद वाटतो. मी घसरतो तेव्हां मला दुःख होते. ईश्वराचे वचन आहे की, 'प्रयत्न करणारा कधांहि नाश पावत नाही.' या आश्वासनावर माझा गाढ विश्वास आहे. म्हणून माझ्या कमकुवतपणामुळें हजार वेळा जरी मी अयशस्वी झालों तरी देखील माझा विश्वास ढळणार नाही; उलट, शरीर जेव्हां संपूर्णपणें ताब्यांत येईल—आणि केव्हां ना केव्हां ते येईलच—तेव्हा मला प्रकाश दिसेल अशी मला आशा आहे.

जगांत एकहि अन्याय अथवा दैन्य जोंपर्यंत मला निमुटपणे पाहावें लागत आहे तोंपर्यंत माझ्या आत्म्याला समाधान मिळणे शक्य नाही. परंतु माझ्यासारख्या अशक्त, स्खलनशील, क्षुद्र जीवाला प्रत्येक अन्यायाचें परिमार्जन करणे किंवा दृष्टीस पडणाऱ्या सर्व अन्यायांच्या दोषांतून स्वतःला सोडविणें शक्य नाही. माझ्यांतील आत्मिक शक्ति मला एका बाजूला खेचते, तर शरीर दुसऱ्या बाजूला खेचते. या दोन्ही शक्तींच्या तावडीतून सुटका होऊं शकेल, पण ती आस्ते आस्ते व दुःखदायक अशा टप्प्यांटप्प्यांनीच. केवळ यंत्रवत् जडपणे अकर्मी राहण्यानें मला मुक्ति मिळणार नाही; अनासक्त होऊन बुद्धियुक्त कर्म करण्यानेच ती मला मिळवितां येईल. या झगड्याचें स्वरूप अंती आत्मा पूर्णपणे मुक्त व्हावा म्हणून देहाचें सतत दमन करीत राहणे हेंच ठरतें.

मी केवळ सत्याचा शोधक आहे. त्याचा एक मार्ग मला मिळाला आहे असा माझा दावा आहे. ते सत्य सांपडावें म्हणून माझे प्रयत्न अविरत सुरू आहेत असें माझें म्हणणे आहे. परंतु तें अजून मला सांपडलेले नाही हे मी कबूल करतों. सत्याचा संपूर्णपणें शोध लावावयाचा म्हणजे स्वतःची आणि स्वतःच्या साध्याची ओळख करून घ्यावयाची, म्हणजेच आपण पूर्ण व्हावयाचें. माझ्या अपूर्णतेची दुःखपूर्ण जाणीव मला आहे आणि त्यांतच

माझें सर्व बळ आहे. कारण, स्वतःच्या उणिवा जाणणें ही गोष्ट माणसाला क्वचितच साधते.

शेजाऱ्यांच्या हालअपेष्टांबद्दल आज मला जें दुःख वाटतें तें मी पूर्णत्वास पोंचलों असतों तर वाटलें नसतें, हें मी कबूल करतों. मी पूर्ण असतों तर त्यांची दखल मी घेतली असती, त्यांवर उपाय सांगितला असता आणि माझ्यामध्यें असलेल्या निर्विवाद सत्याच्या जोरावर त्या उपायांचा स्वीकार करावयास मी भाग पाडलें असतें. परंतु एकाद्या भिंगांतून पाहावें तसें माझ्या दृष्टीला अंधुक दिसत आहे, त्यामुळें मला मंद गतीनें आणि परिश्रमपूर्वक खात्री पटवून द्यावी लागत आहे; आणि तरीहि त्यांत नेहमीच यश येतें असें नाहीं. असें असल्यामुळें देशभर पसरलेल्या दैन्याची मला जाणीव असतांना व तें टाळतां येण्याजोगें आहे हें माहीत असतांना जगन्नायकाच्या प्रत्यक्ष डोळ्यांदेखत निव्वळ हाडांच्या सांगाड्यासारखी माणसें वावरत असलेली बघूनहि जर मला हिंदुस्थानांतील असंख्य पीडित पण मूक जनतेशी एकरूप होऊन तिच्याबद्दल सहानुभूति वाटली नाही, तर माझ्यांत माणुसकीच नाहीं असें होईल.

पराभवानें मी खिन्न होणार नाहीं. त्यानें मला अधिक चांगलें वळणच लागेल. ईश्वर मला मार्ग दाखवील हें मला माहीत आहे. माणसाच्या शहाणपणापेक्षां सत्य हेंच श्रेष्ठ असतें.

सभोंवतालीं पसरलेल्या अंधारांतून प्रकाशाकडे नेणाऱ्या वाटेनें मी या जगांत चांचपडत जात आहें. पुष्कळ वेळां मी चुका करतों आणि चुकीचे अंदाज बांधतों. ... माझा भरिभार एका ईश्वरावरच काय तो आहे. आणि मी माणसावर विश्वास ठेवतों तो देखील माझा ईश्वरावर विश्वास आहे म्हणूनच. जर माझा ईश्वरावर विश्वास नसता तर माझी अवस्था मानव–जातीचा तिरस्कार करणाऱ्या टिमनसारखी झाली असती.

माझ्यापाशीं गुप्त मार्ग नाहींत. सत्यापरती दुसरी मुत्सद्देगिरी मी जाणत नाहीं. अजाणतेपणें मी कांहीं काळ वांकड्या मार्गाला लागलों असेन, पण तें फार काळ नाही.

भविष्यांत काय आहे ते समजून घेण्याची मला इच्छा नाहीं. वर्तमानाची चिंता वाहणे येवढेंच माझें काम आहे. पुढच्या क्षणावर काबू ठेवण्याची सत्ता सुद्धां ईश्वरानें मला दिलेली नाही. ... पुष्कळ वेळां ऐन प्रसंगी मी एकटा पडलो आहें हे खरे आहे. पुष्कळांनी मला फसविले आहे आणि पुष्कळजण माझ्या अपेक्षेला उतरलेले नाहीत. परतु त्यांच्याशीं असलेल्या माझ्या संबंधाबद्दल मला पश्चात्ताप होत नाहीं. कारण, सहकार्य कसें करावयाचें हें जसें मला माहीत आहे तसाच असहकार कसा करावयाचा हेंहि मला माहीत आहे. जगांत वागण्याचा सर्वात व्यवहार्य आणि सर्वात थोर मार्ग म्हणजे प्रत्यक्ष विरुद्ध प्रमाण मिळाले नसेल, तेव्हां लोक जे म्हणतात तेच खरें धरून चालावें हा होय.

माझ्या आठवणीप्रमाणे सबंध सार्वजनिक व खासगी आयुष्यांत दिलेलें वचन मी कधींहि मोडलेले नाहीं.

वचनभग म्हटलें की माझा अतरात्मा खळबळून उठतो. विशेषतः वचन-भंग करणाऱ्याशीं जेव्हा माझा कोणत्याहि प्रकारचा सबंध असतो, तेव्हा तर माझ्या हृदयाला कसालीच्या वेदना होतात. पवित्र आणि गंभीरपणे दिलेलें वचन योग्य रीतीने पाळावयाला लावण्याकरता माझ्या जिवाचेंहि मोल द्यावें लागत असेल तरी ते मी मोठ्या आनंदानें देईन—नाहीं तरी आतां वयाच्या सत्तरींत त्याची काय शाश्वती आहे ?

पूर्णांशाने सत्यप्रवृत्त—म्हणजे विचार, उच्चार व आचार यांमध्ये पूर्णपणें सत्यनिष्ठ व अहिंसक—होण्याची तळमळ बाळगणारा मी एक धडपडणारा जीव आहें इतकेंच; परन्तु हें ध्येय सत्य आहे असें माहीत असूनहि त्याप्रत पोंच-ण्यांत मला नेहमीं अपयश येतें. हा चढ फार कष्टदायक आहे; परंतु ते कष्टच मला खरोखर सुखदायक वाटतात. वरवर पडत जाणाऱ्या प्रत्येक पावला-गणिक मला अधिक बळ वाटतें आणि पुढचें पाऊल टाकण्याचें सामर्थ्य माझ्यांत येतें.

एका बाजूला माझ्या अल्पतेचा आणि माझ्यांतील उणिवांचा विचार व दुसऱ्या बाजूला माझ्याविषयीं बाळगल्या जाणाऱ्या अपेक्षांचा विचार, दोन्ही जेव्हां माझ्या मनांत येतात, तेव्हां मी क्षणभर थक्कच होऊन जातों. परंतु मजविषयीं बाळगल्या जाणाऱ्या या अपेक्षा हा माझा गौरव नव्हे; कारण,

मी तर एक सुष्ट व दुष्ट प्रवृत्तींचें कडबोळे आहे; हा गौरव माझ्यांत अपूर्ण असलेल्या पण त्या मानानें महान् अशा सत्य व अहिंसा या दोन बहुमोल गुणांचाच आहे याची जाणीव होतांक्षणींच मी भानावर येतों. म्हणून पाश्चात्य देशातील सत्यशोधक बंधूंना माझ्याकडून होईल ती मदत देण्याची जबाबदारी मीं अंगाबाहेर टाकतां कामा नये.

अगदीं बिनचूक मार्गदर्शन अथवा प्रेरणा देण्याचें सामर्थ्य माझ्यांत आहे असें मी म्हणत नाहीं. मला जो कांहीं अनुभव आहे त्यावरून आपण कधीं चूक करीत नाहीं असें मानवानें छातीठोकपणें सांगणें असमर्थनीय ठरेल; कारण, प्रेरणा देखील जो द्वंद्वातीत झाला असेल त्यालाच स्फुरूं शकते; आणि एकाद्या विवक्षित प्रसंगीं द्वंद्वातीत असल्याचा दावा योग्य आहे किंवा नाहीं हें ठरविणें कठिण जातें. म्हणून, आपल्या हातून कधीं चूक होणारच नाहीं असा निर्वाळा देणें हें नेहमीच अतिशय धोक्याचें असतें. तथापि त्यामुळें आपल्याला कसलेंहि मार्गदर्शन मिळत नाहीं असें मात्र नाहीं. जगांतील ऋषिमुनींच्या अनुभवाचें सार आपल्याला लाभण्यासारखें असत आणि तें पुढें देखील सतत मिळत राहीलच. शिवाय मूलभूत अशीं सत्यें फार नसतात: तसें सत्य एकच असतें व तें म्हणजे साक्षात् 'सत्' हेंच होय. त्यालाच 'अहिंसा' असें दुसरें नांव आहे. सत्य आणि प्रेम हें मुळांत अनंत आहे. मर्यादाबद्ध मानवाला त्याच्या पूर्ण स्वरूपाचें आकलन कधींहि होणार नाहीं; परंतु आपल्या मार्गदर्शनापुरतें त्याचें ज्ञान आपल्याला खास होतें. त्याचा व्यवहारांत उपयोग करतांना आपण चुका करूं व कित्येकदां त्या चुका गंभीरहि असतील; परंतु मनुष्य हा स्वयंशासित प्राणी आहे. आणि स्वयंशासनांत चुका करण्याची सत्ता जशी अभिप्रेत असते तशीच जितक्या वेळां त्या होतील तितक्या वेळां त्या दुरुस्त करण्याचीहि सत्ता अवश्यमेव अभिप्रेत असते.

मी माझा आशावाद कधींहि सोडलेला नाहीं. अत्यंत निराशामय भासणाऱ्या प्रसंगींहि माझ्या अंतःकरणांत आशेची ज्योत तेजस्वीपणें तेवत असते. मला स्वतःला ती आशा मारतां येत नाहीं. त्या आशेचें समर्थन करण्याइतकें दृश्य प्रत्यंतर मला देतां येणार नाहीं हे मला कबूल केलें पाहिजे. परंतु

माझी मनोवृत्ति कधींहि पराभूत होत नाही. सबंध जगाला खुष करण्यासाठींहि मी ईश्वराशी द्रोह करणार नाही.

माझ्यापुढें असलेलें कार्य करण्यांत मी संतुष्ट आहें. 'कां' व 'कशासाठीं' यांची चिंता मी करीत बसत नाही. ज्या गोष्टीचा अंत आपल्याला लावतां येत नाही त्या बाबतींत आपण लुडबूड करूं नये हें बुद्धीच्या योगानें आपल्याला समजते.

ज्या वेळीं माझे डोळे मिटतील आणि माझा हा क्षणभंगुर देह अग्नीच्या स्वाधीन होईल, त्या वेळीच माझ्या कार्याच्या बरेवाईटपणासंबंधी निर्णय जाहीर करण्याला पुरेसा वेळ मिळेल.

ज्याला चांगले काम करतां येत नाही तो आपल्या हत्यारांत खोडी काढतो. कामगिरी चांगली न बजावल्याबद्दल आपल्या सैनिकांना दोष लावणारा सेनापति हा सेनापतीच नव्हे. मी तसा वाईट सेनापति नाही, हें मला माहीत आहे. माझ्या उणिवांची जाणीव असण्याइतके शहाणपण माझ्यांत आहे. दिवाळेच निघावयाचें माझ्या नशिबांत असेल तर ते जाहीर करण्याइतकें धैर्यबल ईश्वर मला देईल. गेलीं जवळजवळ पन्नास वर्षें जे काम करण्याची मुभा मला मिळाली आहे, त्याकरतां यापुढें जर माझी गरज नसेल तर ईश्वर कदाचित् मला घेऊनहि जाईल; परंतु अजूनहि माझ्याकरतां नेमलेले काम आहे, आज माझ्या सभोंवार पसरल्यासारखा वाटणारा अंधार नाहींसा होईल आणि दांडी–कूचपेक्षांहि अधिक प्रखर लढा देऊन अथवा न देतांहि हिंदुस्थान हा अहिंसेच्या साधनानें खात्रीपूर्वक स्वतंत्र होईल अशी आशा मी जरूर बाळगतों. 'अंधकार नाहींसा करणारा प्रकाश मिळो!' अशी प्रार्थना मी करीत आहें. अहिंसेवर ज्यांची ज्वलंत श्रद्धा आहे त्यांनीं माझ्या या प्रार्थनेत सामील व्हावें.

माझ्याकडून जगाला आश्चर्याचे धक्के मिळाले आहेत हें माझें दुर्दैव म्हणा अगर सुदैव म्हणा. नव्या पद्धतीनें नवीन प्रयोग केले कीं अपरिहार्यपणें केव्हां केव्हां गैरसमज हे निर्माण होणारच.

मी 'शेख महंमद' आहें हें म्हणणें मला कबूल नाहीं. मी 'संत' असल्याचा दावाहि मला मान्य नाही. मी या पृथ्वीवरचाच एक पार्थिव मनुष्य आहें.

ज्या ज्या दुर्बलतेला तुम्ही पात्र आहां तिला मीहि तितकाच पात्र आहें. परंतु मीं जग पाहिलें आहे. डोळे उघडे ठेवून मी जगांत वावरलों आहें. मनुष्याच्या वांट्याला येणाऱ्या जास्तीत जास्त प्रखर अग्निदिव्यांतून मी पार पडलों आहें, त्या तालमींत तयार होऊन मी निघालों आहें.

दुसऱ्या कोणत्याहि वचनाचा आधार न घेतां आत्मबलिदानाच्या वचनाचा आधार घेऊन त्याचें अनुकरण करावें असें माझें हिंदुस्थानांतील माझ्या देशबांधवांना सांगणें आहे; कोणत्याहि लढाईच्या पूर्वी तिची तयारी असावी लागते. तुम्ही हिंसामार्गी असा वा अहिंसामार्गी असा, तुम्हांला त्यागाच्या आणि शिरतीच्या दिव्यांतून जावेंच लागणार आहे.

माझ्या पुढारीपणाबद्दल बोलावयाचें झाल्यास——माझ्या अंगी तें असलेंच तर——त्याच्या मागें लागून मला ते प्राप्त झालेलें नसून ते निष्ठायुक्त सेवेचा उमटलेला ठसा आहे. जसा एकाद्याला आपल्या कातडीचा रंग काढून टाकतां येणार नाहीं, तसेंच अशा तऱ्हेचें पुढारीपणहि त्याला सोडतां येणार नाहीं. आणि मी राष्ट्राचा एक अविभाज्य घटक झालों असल्यानें माझ्या सर्व उणिवा व दोष लक्षांत घेऊन सुद्धां राष्ट्राला मला संभाळून घेणें प्राप्त आहे. माझ्यांतील कांहीं दोषांची आणि उणिवांची मलाहि दुःखपूर्ण जाणीव आहे. आणि इतर अनेक दोषांची आणि उणिवांची जाणीव मला करून देण्याला माझे प्रांजल टीकाकार कधींहि चुकत नाहींत, याबद्दल मी त्याचा ऋणी आहें.

मला अंतरांतील आदेशाला——त्याला तुम्ही विवेकबुद्धीची प्रेरणा म्हणा किंवा माझ्या अंतरांतील मूळ प्रवृत्तीची प्रेरणा म्हणा——मुळींच दडपून टाकतां येणार नाहीं हें मी जगापुढें जाहीर करूं इच्छितों; मग याच्याविरुद्ध कोणी कांहीहि म्हणो ! पाश्चात्य देशांतील अनेकांचा आदर आणि विश्वास जरी मी गमावून बसलें तरी सुद्धां चालेल. त्यांच्यापुढें माझें मस्तक मी लववितों; पण त्यांच्या मैत्रीकरतां किंवा प्रेमाकरतां सुद्धां मीं तसें करतां कामा नये. माझ्या अंतरांत असें कांही तरी आहे कीं जें मला माझ्या वेदना ओरडून सांगण्यास भाग पाडीत आहे. तें काय आहे हें मला निश्चित समजलें आहे. तें ‘ माझ्यांतील कांहीं तरी ’ मला कधींहि फसवीत नाहीं.. तें मला आतां सांगत आहे, “ तुला एकाकी राहावें लागलें तरी देखील

साऱ्या जगाविरुद्ध तुला उभें राहिलें पाहिजे. जग इंगळासारखे लाल डोळे करून तुझ्याकडे रोखून पाहूं लागले तरी देखील तूं त्याच्या डोळ्याला डोळा भिडविला पाहिजे. भिऊं नकोस. तुझ्या हृदयांत वास करणाऱ्या त्या लहानशा आवाजावर विश्वास ठेव.” ते म्हणत आहे, “ मित्रांना, पत्नीला, सर्वांना सोड; पण ज्याच्यासाठी तुझें हें जीवन आहे आणि ज्याच्यासाठीं तुला मरावयाचें आहे त्याला मात्र जाग.”

# सत्याचा सिद्धांत : : ४

सत्य म्हणजे काय ? प्रश्न अवघड तर खराच; पण तो मी माझ्यापुरता सोडविला आहे. तो असा की अंतरांतील आवाज तुला जे सांगतो ते सत्य समज. तुम्ही विचाराल कीं, मग निरनिराळे लोक निरनिराळीं आणि परस्पर-विरोधी सत्यें मानतात हे कसे ? ते असे कीं, मानवी मन असंख्य साधनांच्या द्वारा काम करीत असतें आणि सर्वांच्या बाबतींत मानवी मनाचा विकास सारखाच असतो असें नाहीं; हें लक्षांत घेतां एकाला जें सत्य भासतें, ते दुसऱ्याला असत्य वाटूं शकतें, हें ओघानेंच येतें. आणि म्हणून ज्यांनी अशा तऱ्हेचे प्रयोग केले आहेत ते या निर्णयाला आले आहेत की हे प्रयोग करतांना कांही विशिष्ट अटी पाळल्या पाहिजेत. कसल्याहि प्रकारच्या शिस्तीतून पार न पडतां आज प्रत्येकजण ‘ मलाच बरें-वाईट कळतें ’ असें सांगूं लागल्यामुळें या भांबावलेल्या जगांत इतकें असत्य पसरविलें जात आहे ! ज्यांच्यामध्यें पुरेपूर नम्रता नाहीं अशा कोणालाहि सत्य सांपडणार नाही येवढेंच मी तुम्हांला खरोखर नम्र भावानें सांगूं शकेन. सत्यसागराच्या पृष्ठ-भागावर तुम्हांला तरंगत राहावयाचें असेल तर तुम्हांला शून्यवत् झालें पाहिजे.

मला सत्य हे सर्वश्रेष्ठ तत्त्व वाटतें. त्यांतच इतर अनेक तत्त्वांचा अंतर्भाव होतो. हें सत्य म्हणजे केवळ वाचेंतीलच नव्हे, तर विचारांतील सुद्धां सत्य होय. आणि केवळ आमच्या कल्पनेंतील सापेक्ष सत्यच नव्हे, तर पूर्ण सत्य किंवा चिरंतन तत्त्व होय. तोच ईश्वर होय. ईश्वराची रूपें अनंत असल्यामुळें त्याच्या व्याख्याहि अनंत आहेत. त्यामुळें माझ्या मनांत

आश्चर्य तशीच आदरयुक्त भीति उत्पन्न होते आणि क्षणभर माझी मति गुंग होते! परंतु मी सत्य या रूपानेच फक्त ईश्वराची उपासना करतों. मला अजून त्याचें दर्शन झालेलें नाहीं. परंतु मी त्याचा शोध घेत आहे. या शोधाप्रीत्यर्थ मला अत्यंत प्रिय असलेल्या वस्तूंचा देखील त्याग करावयाला मी तयार आहे. त्यासाठीं जरी प्राण देण्याचा प्रसंग आला तरी त्याला देखील मी तयार होईन अशी मला आशा आहे. परंतु जोपर्यंत मला या संपूर्ण सत्याची अनुभूति झालेली नाहीं, तोपर्यंत माझ्या कल्पनेंत येणाऱ्या सापेक्ष सत्यालाच मला चिकटून राहिलें पाहिजे. तें सापेक्ष सत्यच तोंवर माझा दीपस्तंभ, माझी ढाल, माझें कवच झालें पाहिजे. हा मार्ग जरी दुर्घट, सांकडा आणि वस्तऱ्याच्या धारेसारखा तीक्ष्ण असला तरी मला तो अत्यंत सोपा आणि अत्यंत जवळचा झाला आहे. या मार्गालाच निक्षून धरून राहिल्यामुळें माझ्या हिमालयाएवढाल्या चुका देखील मला क्षुल्लक वाटल्या; कारण, या मार्गामुळें शोक करण्याचा प्रसंगच माझ्यावर आला नाहीं आणि माझ्या बुद्धीला अनुसरून मी पुढें गेलो. प्रगतिपथावर असतांना पुष्कळ वेळां मला संपूर्ण सत्याचें—ईश्वराचें—ओझरतें व अंधुक दर्शन झालें आहे आणि ईश्वरच तेवढा सत्य आहे बाकी सर्व माया आहे, ही माझी निष्ठा रोजच्या रोज वाढत जात आहे. . . . आणखी अशी एक श्रद्धा माझ्यांत दृढ होत आहे कीं मला जें शक्य आहे तें एकाद्या बालकालाहि शक्य आहे आणि असें म्हणण्याला सबळ कारणें मला आढळली आहेत. सत्याच्या शोधाचीं साधनें जितकीं कठिण तितकींच तीं साधीं व सोपीं आहेत. अहमन्य माणसाला तीं अगदीं अशक्यप्राय वाटतील तर एकाद्या निर्व्याज बालकाला तीं सहज शक्य भासतील. सत्याच्या शोधकानें रजःकणाहूनहि लीन झालें पाहिजे. जग आपल्या पायांखालीं माती तुडवीत असतें; परंतु सत्याच्या शोधकानें इतकें नम्र बनलें पाहिजे कीं ती माती देखील त्याला पायदळीं तुडवूं शकेल. असें झालें तरच त्याला सत्याचें दर्शन होईल, तोंपर्यंत नाहीं.

माझ्यासारखे शेकडो नष्ट होवोत, पण सत्याचा विजय होवो! माझ्यासारख्या प्रमादशील मर्त्य जीवाचें गुणदोष-विवेचन करण्यासाठीं आपण सत्याचा दर्जा रेसभरहि खालीं आणतां कामा नये.

स्वतःसंबंधींचा निवाडा करतांना मी सत्याइतकेंच कठोर बनण्याचा यत्न केला पाहिजे; कारण, दुसऱ्यानेंहि तसेंच असावें असे मला वाटतें. त्या ( सत्याच्या ) पट्टीनें स्वतःला मोजतांना सूरदासाप्रमाणे माझ्या तोंडून उद्गार निघाले पाहिजेत :

" मोसम कौन कुटिल खल कामी ?
जिन तनु दियो, ताहि बिसरायो !
ऐसो निमकहरामी ! "

कारण, माझ्या जीविताच्या श्वासोच्छ्वासावर ज्याची सत्ता आहे आणि ज्याचें मी अपत्य आहे हें मला पूर्णपणे माहीत आहे, त्या ईश्वरापासून मी अजूनहि इतका दूर आहे हे मला एकसारखें टोंचणारे शल्य आहे. त्याच्यापासून मला इतके दूर ठेवण्यास माझ्यांतील दुष्ट विकारच कारण आहेत याची मला जाणीव आहे आणि तरीहि त्यांच्या तावडीतून माझी सुटका होऊं शकत नाही !

' त्या महान् कुंभाराच्या हातातील चिखलाचा केवळ एक गोळा ' याहून मला कांहीच किंमत नाही. सत्य आणि प्रेम--अहिंसा हेच फक्त महत्त्वाचे आहे. जेथे त्याचे वास्तव्य असेल तेथे अखेरीस सर्व कांही सुधारून जाईल. हा कायदा असा आहे की त्याला कसलाहि अपवाद नाही.

सर्वत्र मिळालेल्या एकाच अनुभवानें माझी खात्री पटली आहे की सत्यापरता दुसरा ईश्वर नाही, ... सत्याचे जे ओझरते दर्शन मधूनमधून मला लाभूं शकले तेवढ्यावरून कांही सत्याच्या अवर्णनीय तेजाची कल्पना देणें शक्य होणार नाही. ते तेज आपण आपल्या डोळ्यांनी नित्य पाहत असलेल्या सूर्याच्या तेजाहूनहि लाखोपटींनी प्रखर आहे. खरोखर, मला जे अकस्मात् दिसून गेले ते त्या प्रचंड तेजोमयाचे अगदी अंधुक स्वरूप होय; परंतु माझ्या सर्व प्रयोगांचा निष्कर्ष म्हणून येवढें मात्र मी खात्रीपूर्वक सांगूं शकतो की सत्याचे संपूर्ण दर्शन अहिंसेच्या पूर्णानुभूतीनंतरच होणे शक्य आहे.

सर्वत्र सामान्य आणि सर्वव्यापी अशा सत्याचें साक्षात् दर्शन होण्याकरतां आपल्याला अगदी क्षुद्रांत क्षुद्र प्राणिमात्रावर देखील स्वतःइतकेंच प्रेम करतां आलें पाहिजे. आणि ज्याला तें साध्य करावयाचें असेल, त्याला

जीवनाच्या कोठल्याहि क्षेत्रांतून बाजूला राहून भागणार नाही. यामुळेच सत्यावर असलेल्या माझ्या भक्तीच्या योगाने मी राजकारणाच्या क्षेत्रांत खेचला गेलों आहे. आणि धर्माचा राजकारणाशी कांहीहि संबंध नाही असे जे म्हणतात त्यांना धर्माचा अर्थच समजलेला नसतो असे मी अगदी निःशंकपणें पण तितक्याच नम्रतेने म्हणू शकतो.

संपूर्ण सत्याचें आकलन करणे मनुष्याला शक्य नाही. त्याला सत्याचे जसे दर्शन झाले असेल तदनुसार आपल्या जीवनाला वळण लावणे व तसे करीत असताना अत्यंत शुद्ध साधनाचा म्हणजेच अहिंसेचा अवलंब करणे हे त्याचे कर्तव्य ठरते.

सत्य प्रत्येक मानवी हृदयात वसत असते व तेथेच प्रत्येकाने त्याचा शोध केला पाहिजे आणि आपल्याला सत्याचे जसे दर्शन होईल त्याप्रमाणे आपले आचरण ठेवले पाहिजे. परंतु सत्यासंबंधीच्या आपल्या कल्पनेप्रमाणेच दुसऱ्याने वागले पाहिजे अशी जबरदस्ती करण्याचा कोणालाहि हक्क पोचत नाही.

जीवन म्हणजे एक साधना आहे. पूर्णत्वासाठी म्हणजेच आत्मानुभूती साठी धडपड करणे हे मानवाचे कार्य आहे. आपल्यात दुर्बळता आहे किंवा दोष आहेत म्हणून हे ध्येय खाली ओढता कामा नये. माझ्यामध्ये दोन्ही आहेत याची मला दुःखपूर्ण जाणीव आहे. ‘ माझ्यातील ही दुर्बलता आणि ही अपूर्णता काढून टाकण्यास मला साह्य कर ’ अशी मी रोज मूकपणे सत्याची आळवणी करीत असतो.

माझ्या मनांत नसलेल्या गोष्टी बोलण्याचे पाप माझ्या हातून आयुष्यात कधी घडलेले नाही. सरळ हृदयाला जाऊन भिडणे हा माझा स्वभाव आहे आणि तसे करण्यांत पुष्कळ वेळां मला तात्पुरते अपयश आले असले, तरी मला अनेक वेळा अनुभवास आल्याप्रमाणे, अखेरीस खुद्द सत्यच कानांच्या द्वारा हृदयाला जाऊन भिडेल हे मी जाणतो.

मी सत्याचा एक नम्र परंतु अत्यंत कळकळीचा शोधक आहे आणि माझ्या शोधात माझ्यासारखेच जे इतर सत्यशोधक आहेत त्यांना मी माझ्या पूर्ण विश्वासांत घेतो, त्यामुळे मला माझ्या चुका समजून येऊन त्या दुरुस्त करतां येतात. अंदाज करतांना व मत बांधताना मी पुष्कळ वेळा चुका केल्या आहेत हे मी कबूल करतो. ... आणि अशा प्रत्येक वेळी मी माझे

पाऊल मागें घेतलें असल्यामुळें माझें कायम स्वरूपाचें असें कोणतेंच नुकसान झालेले नाही. उलट, अहिंसेतील मूलभूत सत्य त्यामुळें पूर्वीपेक्षां अनंत पट जास्त व्यक्त झाले आहे आणि कोणत्याहि प्रकारे देशाची कायमची हानि झालेली नाही. मी स्वतः एक विद्यार्थी आहे व मला कमलाहि स्वार्थ साधावयाचा नाही. जेथें जेथे मला सत्य आढळतें तेथे तेथे मी त्याचा स्वीकार करून तदनुसार वर्तन ठेवण्याचा प्रयत्न करतों.

अत्यंत सद्धेतु असूनहि जर एकाद्याच्या हातून चुका घडल्या तर त्यामुळे वस्तुतः जगाला, इतकेंच नव्हे, तर कोणत्याहि व्यक्तीला इजा पोंचत नाही असा माझा विश्वास आहे. ईश्वराला भिऊन वागणाऱ्या माणसाकडून अहेतुकपणे झालेल्या चुकांच्या परिणामापासून ईश्वर नेहमी जगाचें संरक्षण करतो. माझ्या उदाहरणामुळे ज्यांची दिशाभूल होण्याचा संभव आहे ते माझें वर्तन त्यांना माहीत नसते, तरी सुद्धा त्याच मार्गानें गेले असते. कारण, विचार करतां करतां शेवटीं असें आढळून येतें कीं दुसऱ्याच्या उदाहरणानें केव्हां केव्हां वाट दाखविली असें जरी माणसाला वाटलें, तरी सरतेशेवटीं तो आपल्या स्वतःच्या अंतःप्रेरणांना अनुसरूनच जात असतो. पण तें कांहीं असो. माझ्या चुकीमुळें जगाला कधींहि पीडा सहन करावी लागलेली नाहीं हें मला माहीत आहे. कारण, त्या चुका अज्ञानामुळें माझ्या हातून घडल्या. माझ्या हातून घडलेल्या प्रसिद्ध चुकांपैकीं एकहि मी जाणूनबुजून केलेली नाहीं असा माझा दृढ विश्वास आहे.

खरोखर एकाला जे अगदी उघडउघड चूक वाटतें, तेंच दुसऱ्याला शुद्ध शहाणपणाचें वाटण्याचा संभव आहे. त्याच्या बुद्धीला भ्रम झालेला असला तरी सुद्धा त्याचा कांहीं इलाज चालत नाहीं. तुलसीदासांनी समर्पकपणें म्हटलें आहे :

> " शिंपल्यामध्यें कधींहि रुपें नसतें किंवा सूर्यकिरणांत कधींहि पाणी नसतें. परंतु चमकणाऱ्या शिंपल्यांत रुप्याचा आणि किरणांत पाण्याचा आभास जोपर्यंत टिकून आहे, तोंपर्यंत भ्रमित मनुष्याच्या मनावरील मोहनी झाडून टाकण्याची ताकद जगांतील कोणत्याहि शक्तींत नाहीं."

संभव आहे कीं जी माणसें माझ्याप्रमाणें एका मोठ्या भ्रमात सापडलेली आहेत त्यांचीहि अशीच अवस्था असली पाहिजे. ईश्वर त्यांना खात्रीनें क्षमा

करील आणि जगहि त्यांना निभावून घेईल, व सत्य हेच अंतीं सुप्रतिष्ठित होईल.

माझ्या लिखाणांत असत्याला मुळीच जागा नाही; कारण, सत्याखेरीज दुसरा धर्म नाही असा माझा अढळ विश्वास आहे आणि सत्याचें मोल देऊन मिळविलेली कोणतीहि वस्तु नाकारण्याची शक्ति माझ्यामध्ये आहे. कोणत्याहि व्यक्तीविषयींच्या द्वेषापासून अलिप्त असेंच माझें लिखाण असणार. कारण, प्रेमामुळेच जग टिकून राहिले आहे असा माझा दृढ विश्वास आहे. जेथें प्रेम आहे तेथेंच जीवन असावयाचें; प्रेमावांचून जीवन म्हणजे मृत्यु होय. ज्या नाण्याच्या एका बाजूला सत्य आहे त्याची मागची बाजू प्रेम हीच आहे. माझा असा दृढ विश्वास आहे की सत्य आणि प्रेम यांच्या बळावर आपल्याला सारें जग जिंकतां येईल.

# सत्य तेंचि परब्रह्म : : ९

सर्व चराचराला व्यापून टाकणारी अवर्णनीय अशी एक गूढ शक्ति आहे. मला ती दिसत नसली तरी जाणवते. स्वतःचें अस्तित्व जाणवीत असूनहि जी कोणत्याहि साधनांनीं सिद्ध करतां येत नाहीं अशी ती अदृश्य शक्ति आहे; कारण, माझ्या इंद्रियांच्या साह्यानें मला कळणाऱ्या कोणत्याहि गोष्टीपेक्षां ती अगदीं भिन्न आहे. ती इंद्रियातीत आहे. तथापि, कांहीं मर्यादेपर्यंत ईश्वराचें अस्तित्व बुद्धिवादानें पटवून देणें शक्य आहे.

मजभोंवतालची प्रत्येक वस्तु सतत परिवर्तन पावणारी, सतत नाश पावणारी आहे. तरी सुद्धां त्या सर्व परिवर्तनाच्या मुळाशीं अशी एक चैतन्यमय शक्ति आहे की ती अपरिवर्तनीय आहे, सर्व वस्तुजाताला एकत्र ठेवते व उत्पत्ति, संहार आणि पुनरुत्पत्ति करते. ती स्फूर्तिदायक शक्ति किंवा तें स्फूर्तिप्रद तत्त्व म्हणजेच ईश्वर. आणि ज्याअर्थी फक्त इंद्रियांच्या द्वाराच दिसणारें दुसरें कांहींहि टिकूं शकत नाहीं अथवा टिकणार नाहीं त्याअर्थी ईश्वराचेंच तेवढें अस्तित्व राहतें.

ही शक्ति उपकारी आहे की अपकारी ? मला ती अगदी शुद्ध उपकारी वाटते; कारण, भोंवतालीं मृत्यु नांदत असतांहि जीवन टिकून राहतें, असत्य असतांहि सत्य टिकून राहते आणि अंधार पसरलेला असतांहि प्रकाश टिकून राहतो असें मला दिसतें. यावरून मला कळून येतें की ईश्वर म्हणजे जीवन, सत्य, प्रकाश. ईश्वर म्हणजे प्रेम, ईश्वर म्हणजेच सर्वश्रेष्ठ शिव.

बुद्धीला पटवून देण्याजोगा युक्तिवाद माझ्यापाशीं नाहीं हे मी कबूल करतों. श्रद्धा ही बुद्धीच्या अतीत असते. अशक्याच्या मागें लागूं नये इतकेंच मी सांगेन. पापाचें अस्तित्व कां आहे हे कोणत्याहि बुद्धिवादाच्या पद्धतीनें मला दाखवून देतां येणार नाहीं. तसें करण्याची इच्छा बाळगणें म्हणजे ईश्वराची बरोबरी करणें होय. म्हणून पाप आहे येवढें मान्य करण्याइतकी लीनता माझ्या अंगीं आहे; आणि मी ईश्वराला चिरसहिष्णु व क्षमावान् म्हणतों त्याचें कारण हेंच की तो जगांत पाप चालूं देतो. ईश्वराचे ठायीं पाप नाहीं हे मी जाणतो. आणि जरी जगांत पाप असलें, तरी ईश्वरानेंच ते निर्माण केलें आहे; मात्र त्याला त्याचा स्पर्श झालेला नाही.

मला हेंहि माहीत आहे की जिवाचें मोल देऊनहि मी पापाशीं झगडा केला नाहीं तर मला कधींहि ईश्वराची ओळख होणार नाहीं. माझ्या स्वतःच्या यःकश्चित् आणि मर्यादित अनुभवानें माझी ही समजूत दृढ झाली आहे. मी शुद्ध बनण्याचा जितका जितका प्रयत्न करतों, तितका तितका मी ईश्वराच्या जवळ जात आहे असें मला वाटतें. आज जसें माझ्या श्रद्धेचें समर्थन मला करावें लागत आहे, तसें तें करावें न लागतां ती जेव्हां हिमालयासारखी अचल आणि त्याच्या शिरावरील बर्फाइतकी धवल आणि उज्ज्वल होईल तेव्हा मी आजच्यापेक्षां ईश्वराच्या किती बरें निकट जाईन !

ईश्वरावरील हा विश्वास बुद्धीच्या अतीत असलेल्या श्रद्धेवर अधिष्ठित झाला पाहिजे. ज्याला साक्षात्कार म्हणतात त्याच्या मुळाशी देखील खरोखर श्रद्धेचाच भाग असतो. त्याशिवाय तो टिकणारच नाही. स्वभावतःच मुळीं तसें असलें पाहिजे. आपल्या अस्तित्वाच्या मर्यादा कोण ओलांडूं शकेल ? देह असेपर्यंत संपूर्ण साक्षात्कार अशक्य आहे आणि त्याची आवश्यकताहि नाहीं, असें मला वाटते. जे अत्युच्च आध्यात्मिक पद माणसाला गांठणें शक्य आहे, ते गांठण्यासाठी जर कशाची जरुरी असेल तर ती फक्त अविचल

अशा जिवंत श्रद्धेचीच. ईश्वर हा कांहीं आपल्या या पार्थिव देहाच्या बाहेर असत नाहीं. म्हणून पुराव्याचीच गरज असेल तर तो बाहेरचा घेऊन फारसा उपयोग नाहीं. इंद्रियांच्या साह्याने ईश्वराला पाहूं म्हटलें तर त्यांत कधींहि यश येणार नाहीं; कारण, तो त्यांच्या अतीत आहे. इंद्रियांतून आपण आपलें चित्त काढून घेतलें तरच तो आपल्याला भासमान होऊं शकेल. आपल्या अंतरांत दैवी संगीत अखंडपणें सुरू आहे. परंतु इंद्रियांच्या गोंगाटांत ते कोमल संगीत बुडून जातें. इंद्रियांच्या साह्यानें दिसणाऱ्या किंवा ऐकूं येणाऱ्या कोणत्याहि गोष्टीपेक्षां हें संगीत अगदीं वेगळें आणि अनंत पटींनीं श्रेष्ठ आहे.

मनुष्याचें भय सोडून देऊन जर आपण फक्त दैवी सत्याचीच साधना करूं, तर आपण सर्वजण देवाचे दूत बनूं, असा माझा विश्वास आहे. मी फक्त दैवी सत्याचाच शोध करीत आहें आणि मनुष्याची सारी भीति मी टाकून दिली आहे असें मी निश्चित मानतो.

ईश्वराच्या इच्छेचा मला कांहीं विशेष साक्षात्कार झालेला नाहीं. माझा असा ठाम विश्वास आहे कीं ईश्वर प्रत्येक मानवाला रोजच्या रोज स्वतःचा साक्षात्कार घडवीत असतो; परंतु आपण तो 'अत्यंत सूक्ष्म ध्वनि' आपल्या कानांत शिरूंच देत नाहीं. आपल्या समोर असणाऱ्या महान् 'अग्निस्तंभा'कडे आपण डोळेझांक करतो. मला मात्र त्याच्या सर्वव्यापित्वाचा साक्षात्कार होतो.

मला ईश्वराचें प्रत्यक्ष दर्शन घ्यावयाचें आहे. सत्य हाच ईश्वर हें मला निश्चित माहीत आहे. माझ्या बाबतींत ईश्वराला जाणण्याचें एकमेव खात्रीचें साधन अहिंसा—प्रेम हेंच आहे.

ज्याची सेवा करावी असा सत्याव्यतिरिक्त दुसरा ईश्वर मी मानीत नाहीं.

सत्याखेरीज दुसऱ्या कशावरहि माझी भक्ति नाहीं आणि सत्याशिवाय दुसऱ्या कोणाचीहि शिस्त मी मानीत नाहीं.

मी एक क्षुद्र मनुष्य असेन; परंतु ज्या वेळीं सत्याचा आदेश माझ्या द्वारा व्यक्त होतो, त्या वेळीं मी अजिंक्य बनतो.

कांहींहि करण्याची शक्ति माझ्यांत नाहीं, याची मला जाणीव आहे. ईश्वर सर्व कांहीं करूं शकतो. हे भगवन्, तूं मला तुझ्या लायक असें हत्यार बनव आणि तुझ्या इच्छेनुरूप माझा उपयोग करून घे.

मला वाटते, सत्य आणि प्रेम हाच ईश्वर, नीति आणि सदाचार हाच ईश्वर, निर्भयता हाच ईश्वर होय. ईश्वर हा प्रकाश आणि जीवन यांचे उगमस्थान आहे आणि तरीहि तो या सर्वांच्या पलीकडे आणि सर्वांहून आगळा आहे. ईश्वर म्हणजे विवेक–बुद्धि. नास्तिकांची नास्तिकता देखील तोच आहे. कारण, अमर्याद अशा प्रेमामुळेच तो नास्तिकांना राहूं देतो. तो सर्वांच्या हृदयांचा निरीक्षक आहे. तो वाणीच्या आणि बुद्धीच्या अतीत आहे. तो आम्हांला आणि आमच्या हृदयांना आमच्यापेक्षां अधिक चांगल्या प्रकारें ओळखतो. आम्ही जें बोलतो ते तो खरें धरून चालत नाही; कारण, पुष्कळच वेळां ते खरोखर आमच्या मनांत नसतें, हें तो जाणतो. कांहींच्या बाबतीत हें कळत घडते, कांहींच्या बाबतीत नकळत घडते. ज्याना त्याच्या व्यक्तिगत सहवासाची गरज भासते, त्यांना तो व्यक्तिगत होतो. ज्यांना त्याचा स्पर्श पाहिजे असतो, त्यांच्यासाठीं तो शरीरधारी बनतो. ईश्वर म्हणजे विशुद्ध सत्य होय. ज्यांच्यामध्ये श्रद्धा आहे त्यांना तो केवळ अस्तित्वरूपानें भासतो. तो सर्वांना सर्व कांहीं आहे. तो आमच्यात असूनहि आम्हांहून वेगळा आणि आमच्या पलीकडे आहे. त्याच्या नांवावर हीन व अनैतिक कृत्यें आणि अमानुष अत्याचार केले जातात, म्हणून कांहीं तो नाहीं असें होत नाहीं. तो चिरसहिष्णु आहे. तो शांत असला तरी तितकाच भयानकहि आहे. आजच्या आणि उद्यांच्याहि जगांत त्याच्यापेक्षा चोपून काम घेणारा दुसरा कोणीहि नाहीं. आमच्या मानव व मानवेतर शेजाऱ्यांशीं आम्ही ज्या रीतीनें वागतो, बरोबर त्याच रीतीनें तो आमच्याशीं वागतो. अज्ञानाचो सबब त्याच्यापुढें चालत नाही. असें जरी असलें, तरी तो नित्य क्षमाशील आहे. कारण, तो आम्हाला नेहमी पश्चात्तापाची संधि देतो. जगांत सर्वांत मोठा लोकसत्तावादी तो आहे; कारण, बरें आणि वाईट यांच्यामध्ये आमची आम्हीं निवड करावी म्हणून तो आम्हांला मोकळें सोडतो. आजपर्यंत झालेल्या सर्व जुलूमशहांत तो मोठा जुलूमशहा आहे; कारण, पुष्कळ वेळां ओठांपर्यंत आलेला पेला तो खालीं पाडतो. निरंकुश इच्छाशक्तीच्या बुरख्याखालीं सर्वस्वीं इतकें अपुरें क्रियास्वातंत्र्य तो आम्हाला ठेवतो, कीं त्यामुळें त्याची केवळ क्रीडाच होते, पण आमचा मात्र तींत जीव जातो. यालाच हिंदुधर्मांत त्याची ‘ लीला ’ किंवा ‘ माया ’ म्हणतात. आम्ही वास्तविक नाहींचः तोच फक्त

आहे. आणि आम्ही जर असूं तर आम्ही सदोदित त्याची स्तुतिस्तोत्रें गायिली पाहिजेत आणि त्याची इच्छा अंमलांत आणली पाहिजे. चला, आपण त्याच्या बन्सीच्या सुरावर नाचूं या, की सर्व कांही मंगल होईल.

माझ्या अन्तरात जर मला ईश्वराचें आस्तित्व जाणवलें नाही, तर प्रतिदिनी माझी इतकी दुर्दशा होईल व वाढेल, की मी एखाद्या भ्रमिष्ठा-सारखा बडबडूं लागेन आणि शेवटीं मला हुगळी नदीचाच आश्रय करावा लागेल!

मानवाच्या सेवेच्या द्वारा मी ईश्वराचें दर्शन घेण्याचा यत्न करीत आहे. कारण, ईश्वर स्वर्गात नाही किंवा खाली पातळांतहि नाही· तर तो मानव-मात्रांत भरलेला आहे हे मी जाणतो.

मला ईश्वराचें दर्शन झालेले नाही किंवा त्याचें ज्ञानहि झालेलें नाही. जगाची ईश्वरावरील जी श्रद्धा तीच मी आपलीशी केली आहे आणि माझी श्रद्धा वज्रलेप असल्यामुळे मी तिला अनुभवाचीच किंमत देतो. तथापि, श्रद्धेला अनुभव म्हणणे म्हणजे सत्याचा अपलाप करणें होय असें कोणी म्हणतील; म्हणून ईश्वरावरील माझ्या श्रद्धेचें स्वरूप सांगण्याला माझ्यापाशीं शब्दच नाहीत असें म्हणणें कदाचित् अधिक बरोबर होईल.

ईश्वरालाच फक्त माझा मार्गदर्शक मानून मला पुढें गेलें पाहिजे. तो मत्सरी स्वामी आहे. आपल्या सत्तेत तो कोणालाहि भागीदार होऊं देणार नाही. त्यामुळे त्याच्यापुढे जाताना आपल्यातील सारी दुर्बलता कबूल करून रिकाम्या हातांनी आणि पूर्णपणे आत्मार्पणाच्या भावनेनेच आपण गेलें पाहिजे, तरच तो साऱ्या जगापुढे उभें राहण्याची शक्ति आपल्याला देईल आणि सर्व संकटांपासून आपलें रक्षण करील.

ईश्वराइतका जबरदस्त काम करून घेणारा या पृथ्वीतलावर मला दुसरा कोणी माहीत नाही. तो आमची पुरेपूर कसोटी पाहत असतो. जेव्हा आपली श्रद्धा ढळत आहे किंवा शरीर ढासळत आहे आणि आपण खचत आहों असें आपल्याला वाटूं लागतें, तेव्हा तो कोणत्या ना कोणत्या रूपानें आपल्या मदतीला धावून येतो आणि असें सिद्ध करतो, की आपण आपली श्रद्धा गमावता कामा नये; तो आमच्या हांकेसरशी उडी घ्यायला सदोदित सिद्ध आहे, मात्र त्याच्या मनाप्रमाणें वागलो तर, आमच्या मनाप्रमाणे नव्हे, असें

मला समजून आलें आहे. मला खरोखरीं असें एकहि उदाहरण आठवत नाहीं की अगदी ऐन वेळी त्याने मला दगा दिला आहे.

माझ्या लहानपणीं माझ्याकडून देवाची सहस्रनामावलि पाठ करून घेण्यांत आली होती. परंतु ही सहस्रच तेवढी देवाची नांवे असें मुळीच नव्हे. जितके प्राणी तितकी त्याचीं नांवे, असें आम्ही मानतो आणि ते खरें आहे असें मला वाटते; आणि म्हणून आपण असेंहि म्हणतों की ईश्वर नामरहित आहे; आणि त्याचीं रूपें अनेक असल्यामुळें आपण त्याला रूपरहितहि म्हणतों. तसेंच तो अनेक भाषाप्रकारांनी आपल्याशीं बोलत असल्यानें आपण त्याला वाचारहित म्हणतों. असेंच प्रत्येक बाबतीत समजावयाचें. म्हणून ज्या वेळी मी इस्लाम धर्माचा अभ्यास करूं लागलों, त्या वेळी मला असें आढळून आलें, की त्या धर्मांतहि ईश्वराला अनेक नांवे आहेत. ईश्वर म्हणजे प्रेम असे जें म्हणतात त्यांच्याशीं सहमत होऊन मीहि तसेंच म्हणत असें. परंतु हृदयाच्या अगदीं खोल गाभाऱ्यांत मी स्वतःशीच म्हणे, " ईश्वर म्हणजे प्रेम हें खरें असले, तरी त्यापेक्षांहि ईश्वर म्हणजे सत्य हेंच अधिक खरें." मानवी वाणीला ईश्वराचे संपूर्ण वर्णन करणे जर शक्य असेल, तर मी या निर्णयावर आलों आहे, की ईश्वर म्हणजे सत्य हे वर्णन मला पुरेसें आहे. परंतु दोन वर्षांपूर्वी याच्याहि पुढे एक पाऊल जाऊन मी म्हटलें, की सत्य हाच ईश्वर होय. ईश्वर म्हणजे सत्य आणि सत्य हाच ईश्वर या दोन विधानांतील सूक्ष्म फरक तुमच्या लक्षांत येईलच. जवळजवळ पन्नास वर्षांपूर्वी सुरू झालेल्या सत्याच्या अखंड आणि कठोर अशा साधनेनंतर मी या निर्णयावर आलों. त्या वेळी मला असें आढळून आले की सत्याला पोंचण्याचा अगदी जवळचा मार्ग म्हणजे प्रेमाचा होय; परंतु मला असेंहि आढळून आले की प्रेम या शब्दाला निदान इंग्रजी भाषेत तरी अनेक अर्थ आहेत आणि विकार या अर्थानें मनुष्याचें प्रेम हें अवनतिकारक देखील असूं शकेल. त्याचबरोबर मला आणखी असेंहि आढळून आले की अहिंसा असा प्रेमाचा अर्थ घेतला, तर त्या प्रेमाचे उपासक जगांत फारच थोडे आहेत. परंतु सत्याच्या बाबतीत मात्र दोन अर्थ मला कधीं आढळले नाहीत आणि नास्तिकांकडूनहि सत्याच्या आवश्यकतेविषयीं अथवा सामर्थ्याविषयीं शंका घेण्यांत आलेली नाहीं. परंतु सत्य शोधून काढण्याच्या भरांत नास्तिक

हे प्रत्यक्ष ईश्वराचें अस्तित्वहि अमान्य करण्यास कचरले नाहीत! अर्थात् त्यांच्या दृष्टीनें तें बरोबरच आहे. या विचारसरणीमुळेंच मला असे वाटते की ‘ ईश्वर म्हणजे सत्य ’ असे म्हणण्यापेक्षां ‘ सत्य हाच ईश्वर ’ असे म्हणणें अधिक बरें.

ईश्वराचे सर्व कायदे किंवा त्यांचे कार्य आपल्याला ठाऊक नाही. जगांतील सर्वांत मोठा विज्ञानवेत्ता किंवा सर्वश्रेष्ठ अध्यात्मवादी झाला, तरी त्याचें ज्ञान देखील रजःकणाप्रमाणेंच असते. “मला जन्म देणाऱ्या माझ्या वडिलांप्रमाणे ईश्वर ही कोणी साकार अशी माझ्या निकटची व्यक्ति नव्हे” असें म्हटले, तर तो त्याहूनहि अनंतपट निकटचा आहे असा त्याचा अर्थ आहे. माझ्या जीवनाच्या अगदी बारीकसारीक गोष्टींत देखील त्याची सत्ता चालते. त्याच्या इच्छेखेरीज एक पान देखील हलत नाहीं असा माझा अगदी अक्षरशः विश्वास आहे. तो चालूं देतो म्हणूनच माझा श्वासोच्छ्वासहि चालतो.

ईश्वर आणि ईश्वरी शासन या भिन्न गोष्टी नाहीत. ईश्वरी शासन म्हणजेच ईश्वर. त्याला तुम्हीं कोणत्याहि नावानें संबोधिलें तरी तो त्याचा केवळ गुणच ठरत नाहीं; तो गुण नसून प्रत्यक्ष ईश्वरच आहे. तोच सत्य आहे, प्रेम आहे. विश्वशासनहि तोच आहे. आणखी माणसाच्या प्रतिभेनें असंख्य नांवें निघालीं तरी तीं सर्व म्हणजेहि तोच आहे.

या अफाट जगांत कोणी साह्यकर्ता नाहीं, कसलेंहि समाधान नाहीं, असल्या घोर निराशेच्या वेळीं त्याचे नाम सामर्थ्य देते आणि साऱ्या शंका-कुशंका व निराशा कोठच्या कोठें पळून जातात! आकाश आज ढगांनीं व्यापून टाकलेलें असलें, तरी अंतःकरणापासून त्याची प्रार्थना केली की ते सर्व ढग भराभर वितळून जातात! प्रार्थनेमुळेंच मला निराशा कधींहि शिवली नाहीं. ... मला हिरमोड कधीं माहीत नाहीं. मग त्याच्यापुढे मान का वाकवा? “संकुचितता, क्षुद्रता आणि वंचना हीं आमच्या अंतःकरणांतून नाहींशीं करून तें स्वच्छ कर” अशी आपण ईश्वराची प्रार्थना करूं या. तो ती खात्रीनें ऐकेल. कधींहि दगा न देणाऱ्या सामर्थ्याच्या या उगमाकडे अनेकजण नेहमीं धाव घेत आले आहेत.

मी पूर्णाचाच एक अविभाज्य घटक आहे आणि तो पूर्ण ईश्वर मला इतर मानवांपासून वेगळा दिसत नाहीं. माझे देशबांधव हे माझे अगदी जवळचे शेजारी आहेत. ते इतके असहाय, इतके अगतिक आणि इतके निश्चेष्ट झाले आहेत, की त्यांच्या सेवेवरच मला माझे लक्ष एकवटलें पाहिजे. हिमालयां-तील एखाद्या गुहेत ईश्वर आढळेल असें जर माझ्या मनाला पटलें, तर मी तत्काळ तिकडे धांवेन. परतु मानवाला सोडून तो इतरत्र आढळेल असें मला मुळीच वाटत नाहीं.

पूर्णत्व हा गुण सर्वशक्तिमान् ईश्वराचा आहे आणि तरीहि तो किती मोठा लोकसत्तावादी आहे पाहा ! आमच्या हातून घडणारे किती अन्याय, आमची किती भोंदूगिरी तो चालूं देतो ! आमच्या जवळच्या, आमच्या भोंवतालच्या आणि आमच्या अन्तरातील अणुअणूंत तो भरून राहिला आहे; तरीहि त्यानेंच निर्माण केलेले आम्ही क्षुद्र जीव त्याच्या अस्तित्वाचीच शंका घेतो आणि हें देखील तो चालूं देतो. परंतु त्याच्या मनात येईल त्यालाच दर्शन देण्याचा अधिकार त्यानें आपल्यापाशीं राखून ठेवला आहे. हात, पाय किंवा कोणतेहि अवयव नाहींत असा जरी तो असला, तरी त्यानें ज्याला साक्षात्कार द्यावयाचें मनांत आणलें असेल तो ईश्वराला पाहण्याला समर्थ होतो.

अगदी काटेकोर शास्त्रीय दृष्टीनें ईश्वर हाच चांगलें आणि वाईट या दोहोंच्याहि मुळाशीं आहे. शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टराच्या हातांतील सुरीवर जशी त्याची सत्ता चालते, तशीच मारेकऱ्याच्या सुऱ्यावरहि त्याचीच सत्ता असते; पण असें असूनहि माणसांच्या बाबतींत बरें आणि वाईट हीं एक-मेकापासून अगदी भिन्न आणि विरुद्ध-धर्मी आहेत. प्रकाश आणि अंधार, देव आणि असुर हीं त्याचीं प्रतीकें आहेत.

निसर्गाचे नियम हे अपरिवर्तनशील असतात, त्यांत बदल करतां येत नाहीं आणि या नियमांचें उल्लंघन होणें अथवा त्यांना अडथळा येणे या अर्थानें कसलेहि चमत्कार घडून येत नाहींत. परंतु आपण तोटके जीव नाना प्रकारच्या कल्पना चालवितो आणि आपल्या उणिवा ईश्वरावर लादतों. ईश्वराचे अनुकरण आम्ही करूं, तो आमचे अनुकरण करणार नाही. त्याच्या बाबतींत काळाची विभागणी आम्हांला कशी करतां येईल ? त्याचा काळ

म्हणजे अनंतता. भूत, वर्तमान व भविष्य हे भेद आम्हांला आहेत. आणि काळाच्या अनंतत्वात शभर वर्षांचे मानवी आयुष्य म्हणजे बिंदुमात्रच नव्हे काय ?

तुम्ही आणि मी या खोलीत बसलो आहो हे जितके खरे त्याहूनहि अधिक खात्री 'ईश्वर आहे' याबद्दल मला वाटते. हवा आणि पाणी याच्यावाचून मी कदाचित् जगूं शकेन, पण ईश्वरावांचून जगणें मला अशक्यच आहे याचीहि मी ग्वाही देऊं शकेन. तुम्ही माझे डोळे काढून टाकले तरी त्यामुळे मी मरणार नाहीं, तुम्ही माझें नाक उडविलें तरी त्यामुळें मी मरणार नाहीं; पण ईश्वरावरील माझा विश्वास तुम्ही उडवून लावला कीं मी मेलोच म्हणून समजा. तुम्ही याला कदाचित् माझी भोळसट समजूत म्हणाल; परंतु लहानपणीं संकट येतेंसें वाटलें, किंवा भीति वाटली, कीं मी जसा रामनाम घेई, तशीच ही भोळी समजूत मी आजहि उराशीं धरली आहे हें मी कबूल करतो. एका म्हाताऱ्या गायीनें तें मला लहानपणीं शिकविलें होतें.

मी चमत्कार करूं शकतो अशी मला पत्र लिहिणाऱ्या काहीं मंडळींची समजूत झालेली दिसते.

सत्याचा उपासक म्हणून मला हें सांगितलें पाहिजे, कीं माझ्यापाशीं तसली कोणतीहि शक्ति नाहीं. जी काहीं शक्ति माझ्याजवळ असेल ती सर्व ईश्वरदत्त आहे. परंतु तो कधींहि प्रत्यक्ष काम करीत नाहीं, आपल्या असंख्य हस्तकाच्या मार्फतच तें करीत असतो.

ईश्वराचें प्रत्यक्ष साकार स्वरूपांत दर्शन कधींच होत नाहीं, तें क्रियेच्या रूपानें होतें, असें मला दिसून आलें आहे आणि असाच माझा विश्वास आहे. एरव्हीं अत्यंत निराशामय परिस्थिति असताना तीतून अचानक सुटका कशी होते याचा यावाचून दुसरा खुलासा मिळत नाहीं.

वैयक्तिक उपासना शब्दांनीं वर्णन करून सांगणें शक्य नाहीं. ती सतत अगदीं नकळत सुद्धा चालू असते. ज्याच्या नजरेतून काहींहि चुकत नाहीं त्या 'सर्वसाक्षी'चें अस्तित्व मला भासत नाहीं असा एक क्षणहि नाहीं; त्याच्या सुरांत सूर मिसळून राहण्याची माझी धडपड नेहमीं चाललेली असते.

त्यानें प्रत्युत्तर दिलें नाहीं असें मला कधींच आढळलें नाहीं. तुरुंगात असतांना जेव्हा सर्व काहीं सुरळीत चाललेलें नसे, अशा वेळीं मला जी

दिव्यें करावीं लागली त्या दिव्यांत पुढे काळाकुट्ट अंधार पसरला असतांना 'ईश्वर माझ्या अगदीं सांगातीं आहे' असें मला आढळून आलें आहे. त्याने मला सोडलें अशी जाणीव माझ्या आयुष्यांत झाल्याचा एक क्षणहि मला आठवत नाहीं.

माझ्या असंख्य देशबांधवांना मी ओळखतों असा माझा दावा आहे. दिवसाचे आठहि प्रहर मी त्याच्यांतच असतों. माझी पहिली आणि शेवटची जबाबदारी म्हणजे ते आहेत; कारण, असंख्य मूक जनतेच्या हृदयांत आढळणाऱ्या परमेश्वराव्यतिरिक्त दुसरा परमेश्वर मी ओळखतच नाहीं. त्याना ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव नाहीं, पण मला आहे. आणि या मूक जनतेच्या सेवेच्या द्वारा ईश्वररूप असलेल्या सत्याची किंवा सत्यरूप असलेल्या ईश्वराची उपासना मी करतो.

हिंदुस्थानांतील क्षुद्रांतल्या क्षुद्र माणसाच्या दुःखाशीं—आणि हिंदुस्थानांतल्याच काय, पण माझी कुवत असेल तर जगांतल्या कोठल्याहि अत्यंत क्षुद्र माणसाच्या दुःखाशींहि मला एकरूप व्हावयाचें असेल, तर ज्याचें संगोपन मी करीत आहे त्या अर्भकांच्या पापाशीं मला एकरूप होऊं द्या. आणि अत्यंत नम्रभावाने ती एकरूपता साधीत असतांनाच केव्हा तरी एके दिवशी ईश्वराचे—सत्याचे प्रत्यक्ष दर्शन मला होईल अशी मला आशा आहे.

## रामनाम

ईश्वराचा सर्वश्रेष्ठ गुण आणि त्याचें नाम सत्य हेंच असल्याचें माझ्या बुद्धीने आणि हृदयाने जरी पुष्कळ काळापूर्वी जाणलें होतें, तरीहि त्या सत्याला मी 'राम' या नावाने ओळखतो. माझ्या कसोटीच्या अत्यंत निराशेच्या वेळीं त्याच एका नामानें मला वांचविलें आहे आणि अजूनहि तेंच वांचवीत आहे. कदाचित् तें लहानपणचे मनावरचे संस्कार असतील किंवा कदाचित् ती तुलसीदासांची माझ्यावर पडलेली मोहनी असेल; परंतु तो प्रभाव आहे खरा; आणि हे लिहीत असताना आमच्या वाडवडिलांच्या घरालगतच असलेल्या 'रामजी'च्या मंदिरांत मी लहानपणीं दररोज जात असे तें दृश्य माझ्या डोळ्यांपुढे उभें राहत आहे! माझा राम त्या वेळीं त्या मंदिरांत होता. त्यानें मला अनेक भयांपासून व पापांपासून वांचविलें आहे. मला त्या वेळीं तो

भोळसटपणा वाटत नव्हता. त्या मूर्तीचा पुजारी कदाचित् वाईट माणूसहि असेल. त्याच्या बाबतींत विरुद्ध अशी कसलीहि माहिती मला नाहीं. त्या देवळांत कदाचित् अनाचारहि घडले असतील; पण त्याविषयींहि मला कांहीं माहिती नाही. त्यामुळे त्यांचा माझ्यावर कसलाहि परिणाम होणार नाहीं. माझ्या बाबतींत जे झालें आणि आज आहे, तेच लाखो हिंदूनाहि लागू आहे.

मी लहान असतांना माझ्या दाईनें मला शिकविलें होतें, कीं ज्या ज्या वेळीं तुला भय किंवा त्रास वाटेल त्या त्या वेळीं रामनाम घेत जा; आणि मी जसजसा मोठा होत गेलो आणि जसजसें मला समजूं लागलें, तसतसा तो माझा स्वभावधर्मच होऊन बसला. मी असेंहि म्हणेन, कीं तें नाम प्रत्यक्ष माझ्या मुखात नसलें तरी अष्टौप्रहर माझ्या हृदयात असतेंच. तें माझा त्राता बनलें आहे आणि माझा सदोदित त्याच्यावरच भरवसा आहे. आध्यात्मिक वाङ्मयांत तुलसीदासांच्या रामायणाचें स्थान अत्यंत वरचें आहे. त्याच्यात जी जादू आहे, ती मला महाभारतांतच नव्हे, तर वाल्मीकि–रामायणात देखील आढळत नाहीं.

# प्रार्थना : माझ्या आत्म्याचें अन्न : : ६

प्रार्थनेशिवाय माझी एकहि गोष्ट होत नाहीं. मनुष्यप्राणी स्खलनशील आहे. आपल्या कृतीबद्दल त्याला कधीहि खात्री देता येणार नाहीं. तो ज्याला प्रार्थनेचें फळ म्हणतो, तो कदाचित् त्याच्या अहंकाराचा पडसादहि असू शकेल. अचूक मार्गदर्शन हवे असेल, तर माणसाचें अंतःकरण त्यांत दुष्ट-प्रवृत्तीचा प्रादुर्भाव देखील होऊं शकणार नाहीं इतकें निष्पाप राहिलें पाहिजे. मला तसे छातीठोकपणे सांगतां येणार नाही. मी एक झगडणारा, धडपडणारा, चुका करणारा, अपूर्ण असा जीव आहें. परंतु स्वतःवर आणि इतरावर प्रयोग करूनच मला माझा विकास करतां येईल. ईश्वराच्या एकत्वावर माझा

विश्वास असल्यामुळें मानवांतील एकत्वावरहि माझा विश्वास आहे. आमचीं शरीरें अनेक असली म्हणून काय झालें ? आमच्या सर्वांच्या ठायींचा आत्मा एकच आहे. परावर्तनानें सूर्याचे किरण अनेक होतात, परंतु त्यांचे उगम-स्थान एकच असतें. म्हणून अगदीं दुष्ट माणसापासूनदेखील मी स्वतःला अलग करूं शकत नाहीं. ( तशीच अत्यंत सद्गुणी माणसाशीं असलेली माझी एकरूपताहि कोणी नाकारणार नाहीं. ) त्यामुळे माझी इच्छा असो वा नसो, मला माझ्या प्रयोगांत सर्व मानवबंधूंना गोवले पाहिजे. प्रयोग सोडूनहि माझें चालणार नाही; आयुष्य म्हणजे प्रयोगांची एक अनंत मालिकाच नव्हे काय ?

ईश्वरानें प्रत्येक कसोटीच्या प्रसंगांतून मला वांचविलें आहे. ' देवाने खैर केली ! ' या वाक्प्रचारांत आज मला फार खोल अर्थ भरलेला वाटतो. याची मला जाणीव आहे. आणि तरीहि मला असें वाटतें, की त्याचा संपूर्ण अर्थ अजून माझ्या ध्यानांत आलेला नाहीं. अनुभव अधिक समृद्ध झाला म्हणजेच मला त्याचे संपूर्ण आकलन होण्याला मदत होईल. परंतु आध्यात्मिक स्वरूपाच्या, वकील म्हणून संस्था चालवीत असतांना आणि राजकारणांत मला जेव्हां जेव्हां कसोट्या लावण्यांत आल्या त्या त्या वेळीं ईश्वरानेच माझा बचाव केला असें म्हणता येईल. ज्या वेळीं सर्व आशा नष्ट होते, साहाय्यक हात टेकतात आणि सुखस्वास्थ्य नाहीसें होतें, त्या वेळीं अचानक कोठून तरी मदत आली आहे असा माझा अनुभव आहे; कोठून तें मात्र समजत नाही. आळवणी, पूजा, प्रार्थना या भोळसटपणाच्या गोष्टी नव्हेत; खाणें–पिणें, बसणे, या क्रियांहूनहि अधिक वास्तव अशा या क्रिया आहेत. त्याच तेवढ्या सत्य आहेत, बाकीच्या सर्व मिथ्या आहेत, असें म्हटलें तर ती अतिशयोक्ति होणार नाहीं.

अशा तऱ्हेची पूजा अथवा प्रार्थना म्हणजे नुसते पल्लेदार वक्तृत्व नव्हे, किंवा नुसती पोपटपंची नव्हे. ती अंतःकरणापासून उमटते. म्हणून ' प्रेम ठेवुनी रिक्त जहाले ' अशा प्रकारची हृदयाची शुद्धि जर आपल्याला लाभली, हृदयाच्या सर्व तारा जर आपण सुसंवादी राखल्या, तर त्यांच्या संगीतांत हृदयांतील मलिन वृत्ति थरथर कांपत बाहेर पडून अदृश्य होतात. प्रार्थनेला शब्दांची जरुरी नाहीं. इंद्रियांची कसलीहि

हालचाल न करतां सुद्धां तिचे अस्तित्व असतें. विकारापासून हृदयाला स्वच्छ करण्याचे यशस्वी साधन प्रार्थना हेच आहे, याविषयीं माझ्या मनांत तरी यत्किंचितहि संशय नाहीं. परंतु प्रार्थनेला पराकाष्ठेच्या नम्रतेची जोड मात्र दिली पाहिजे.

कोणत्याहि बाह्य क्रियेपेक्षां पुष्कळ वेळां मूक प्रार्थना हीच अधिक बलशाली असते असा माझा विश्वास असल्यानें मी असहाय होतों त्या वेळीं एकसारखी प्रार्थना करतों; कारण, शुद्ध अंतःकरणानें केलेली प्रार्थना कधींहि विफल होत नाहीं अशी माझी श्रद्धा आहे.

शरीराला जशी अन्नाची, तशी आत्म्याला प्रार्थनेची गरज असते. अन्नावाचून माणसाचें अनेक दिवसपर्यंत चालूं शकेल— मॅक्स्वनीनें नाहीं का ७० दिवस अन्न न घेतां काढले? परंतु ईश्वरावर विश्वास असतांना मनुष्य एक क्षणभरहि प्रार्थनेशिवाय राहूं शकणार नाहीं, त्यानें राहूं नये.

मी माझें स्वतःचें उदाहरण देऊन असें म्हणेन, कीं भ्याडपणा आणि अंगवळणीं पडलेल्या वाईट संवयी यावर मात करण्याकरितां मनापासून केलेली प्रार्थना हें मनुष्याजवळचें निःसंशय एक अत्यंत प्रभावी शस्त्र आहे. हृदयस्थ ईश्वराच्या अस्तित्वावर जिवंत श्रद्धा असल्याखेरीज प्रार्थना संभवतच नाहीं.

आपण शून्यवत् बनलों नाहीं तोंवर आपल्या दुष्प्रवृत्ती आपल्याला जिंकतां येणार नाहींत. खरीखुरी मुक्ति हीच एक प्राप्त करून घेण्याजोगी वस्तु आहे. तिची किंमत म्हणून संपूर्ण स्वात्मार्पणच झालें पाहिजे अशी ईश्वराची मागणी असते. जेव्हां मनुष्य अशा रीतीनें शून्य बनतो तेव्हां त्याला जीवमात्राच्या सेवेंत स्वतः रत झाल्याचें तत्काळ आढळून येतें. तोच त्याचा आनंद व विनोद बनतो. ईश्वरनिर्मित सृष्टीच्या सेवेंत झिजण्याचा त्याला कधीं कंटाळाच येत नाहीं, जणूं त्याचें रूपच पालटून जातें!

पवित्र कार्यांत कधींहि हार मानूं नका आणि इतःपर मनाशीं असा निश्चय करा, कीं आपण शुद्ध होऊं. आपल्याला ईश्वराकडून प्रत्युत्तर मिळेलच; परंतु अहंकारी माणसाच्या— त्याच्याशीं सौदा करणाऱ्याच्या— प्रार्थनेला ईश्वर कधींहि प्रत्युत्तर देत नाहीं....तुम्हाला त्याची मदत मागावयाची असेल तर तुम्ही अगदीं उघडे होऊन, मनांत कांहींहि किंतु न

ठेवतां व माझ्यासारख्या पतिताला तो हात देईल का, अशा तऱ्हेची भीति किंवा शंका न बाळगतां त्याच्यापाशीं जा. त्याला जे शरण गेले त्या असंख्य लोकांना त्याने साह्य केलें आहे. तो काय तुम्हांला सोडील? तो कोणाचाहि अपवाद करीत नाहीं आणि तुमच्या प्रत्येक प्रार्थनेला प्रत्युत्तर मिळल्याचा अनुभव तुम्हांला येईलच. अत्यंत अशुद्ध माणसाच्या प्रार्थनेला देखील ईश्वराकडून जबाब मिळतो. मी हें माझ्या स्वतःच्या अनुभवानें सांगत आहें. त्या शुद्धीकरणांतून मी स्वतः गेलों आहे. प्रथम देवाचें राज्य शोधा, म्हणजे मग इतर सर्व गोष्टी तुम्हांला आपोआप साध्य होतील.

प्रार्थना ही दिवस उघडण्याची किल्ली आणि दिवस बंद करण्याचा अडसर आहे.

प्रार्थनेंत हृदयशून्य शब्दांपेक्षां शब्दशून्य हृदय असलेले बरे.

ज्याने प्रार्थनेची मोहनी अनुभवली आहे त्याचें अन्नावांचून कित्येक दिवस चालूं शकेल, परंतु प्रार्थनेशिवाय क्षणभरहि चालणार नाही, असें मी तुम्हांला सांगतो, ते माझा आणि माझ्या सोबत्यांचा थोडासा अनुभव म्हणूनच सांगत आहे. कारण, प्रार्थनेशिवाय आंतरिक शान्ति मुळीच लाभणार नाही.

प्रार्थना ही माझ्या जीवनाचें त्राण आहे. प्रार्थनेचा आधार नसता, तर यापूर्वीच मला वेड लागले असतें. माझ्या आत्मकथेवरून तुम्हांला आढळून येईल, की सार्वजनिक आणि खासगी जीवनात मला भरपूर कटु अनुभव आले आहेत! त्यामुळे मला कांहीं काळ निराशेनें ग्रासून टाकले, परतु तिच्या तावडीतून जर मी कशानें सुटलो असेन तर ते प्रार्थनेमुळेच. अर्थात् सत्य हें जितकें माझ्या जीवनाचा अविभाज्य घटक बनले आहे तितकी प्रार्थना बनलेली नाही, हें मी तुम्हांला मोकळेपणें सांगतो. गरज भासली म्हणूनच ती बाहेर पडली; प्रार्थनेवांचून मला आनंदच मिळणे शक्य नाहीं अशा अडचणींत सांपडल्याचा अनुभव आल्यामुळे मी प्रार्थना आरंभिली. आणि ईश्वरावरील माझी श्रद्धा जितकी वाढत गेली, तितकी प्रार्थनेविषयींची माझी तळमळहि बलवत्तर झाली. प्रार्थनेशिवाय आयुष्य कंटाळवाणे आणि भकास वाटूं लागलें! दक्षिण आफ्रिकेंत मी ख्रिस्ती धर्मातील उपासनेला हजर राहत असें, परंतु माझ्या मनावर तिचा पगडा बसूं शकला नाहीं.

त्यांच्या प्रार्थनेत मला सहभागी होतां आलें नाही. ते देवाची आळवणी करीत, परंतु मला तसे करतां येत नसे. मला त्यांत सपशेल अपयश आलें. सुरुवातीला ईश्वरावर आणि प्रार्थनेवर माझा विश्वास नव्हता आणि आयुष्याचा बराच काळ लोटेपर्यंत मला जीवनांत शून्य असल्यासारखें कांहीहि भासले नाही. परंतु त्यानंतर मात्र मला असे वाटू लागले, की अन्न हें जसें शरीराला अत्यावश्यक तशीच प्रार्थना ही आत्म्याला अत्यावश्यक आहे. खरोखर आत्म्याला जितकी प्रार्थनेची गरज आहे, तितकी शरीराला अन्नाची गरज नाही. कारण, शरीर निरोगी राखण्यासाठी पुष्कळ वेळां उपवास आवश्यक असतो. परंतु प्रार्थनेचा उपवास अशी वस्तूच मुळी नाही.... राजकीय क्षेत्रांत मला निराशा ग्रासून टाकीत असतांहि माझी शान्ति कधींहि ढळलेली नाही. नव्हे, माझ्या शान्तीचा हेवा करणारे लोकसुद्धां मला आढळले आहेत. ती शान्ति प्रार्थनेमुळे प्राप्त होते; मी विद्याव्यासंगी नाही; पण मी प्रार्थनेला वाहिलेला आहे असे मात्र मी म्हणतो. प्रार्थनेच्या स्वरूपा विषयी माझा आग्रह नाही. त्या बाबतीत प्रत्येकानें आपले आपण ठरवावें. परंतु चांगल्या खाणाखुणा असलेले कांही मार्ग आहेत आणि प्राचीन आचार्यांच्या पायांनी मळलेल्या वाटांनी चालणें अधिक सुरक्षित होय. मी माझा स्वतःचा पुरावा दिला आहे. प्रत्येकानें प्रयत्न करावा म्हणजे त्याला आढळून येईल, की दररोज प्रार्थना केल्यामुळे आपल्या जीवनांत कांही तरी नवीन भर पडत आहे. त्याची दुसऱ्या कशाचीच तुलना होऊं शकणार नाही.

## मौनाची गुणकारिता

पुष्कळ वेळां माझ्या मनात असे येतें, की सत्याच्या शोधकानें मौन राखणे अवश्य आहे. मौनाच्या आश्चर्यकारक गुणकारितेची मला चांगलीच जाणीव आहे. मी दक्षिण आफ्रिकेतील ट्रॅपिस्ट मठाला एकदां भेट दिली. तें ठिकाण नितान्त रम्य होतें. त्या ठिकाणी राहणाऱ्या बहुतेक मंडळींनी मौन-व्रत घेतलें होते. मी तेथील मठाधिपतीला त्याचा उद्देश विचारला, तेव्हां तो म्हणाला, की कारण उघड आहे; 'आपण दुर्बळ माणसें आहोत. पुष्कळदा आपण काय बोलतो त्याची जाणीव आपल्याला असत नाही. आपल्या अंतरांत जो अत्यंत सूक्ष्म आवाज नित्य बोलत असतो, त्याचें बोलणें जर

आपल्याला ऐकावयाचें असेल, तर आपणच एकसारखें बोलत राहिल्यास तें आपल्याला ऐकूं येणार नाही. हा बहुमोल धडा मला पटला व मौनाचें रहस्य माझ्या ध्यानांत आलें.

सत्याच्या उपासकाला जी आध्यात्मिक तालीम घ्यावी लागते तिचा मौन हा एक भाग आहे असें मी अनुभवानें शिकलों आहे. जाणतां जाणतां अतिशयोक्ति करण्याची, सत्य दडपून ठेवण्याची अथवा त्यांत फेरफार करण्याची प्रवृत्ति हा मनुष्यांतील नैसर्गिक दोष आहे व तो दूर करण्यासाठी मौनाची आवश्यकता आहे. मितभाषी मनुष्य आपल्या बोलण्यांत फार करून अविचार करणार नाही. तो प्रत्येक शब्द तोलूनच वापरील.

ओठ शिवून टाकून जे मौन पाळण्यांत येते ते खरें मौनच नव्हे. जीभ कापून टाकूनहि ते एकाद्याला साधता येईल; पण ते देखील मौन होणार नाही. बोलण्याची शक्ति असूनहि जो वायफळ शब्द उच्चारीत नाहीं, तोच खरा मौनी.

मौन ही माझ्या बाबतीत आतां शारीरिक आणि आध्यात्मिक गरज होऊन बसली आहे. प्रथमतः ताण कमी करण्यासाठी म्हणून ते मी घेतले. त्या वेळी लेखनासाठी मला फुरसत हवी होती; परंतु कांहीं काळ त्याचा अभ्यास झाल्यानतर मला त्याची आध्यात्मिक किंमत कळली. याच वेळांत मला ईश्वराशी उत्तम अनुसंधान ठेवतां येईल, ही गोष्ट माझ्या मनांत एकदम चमकून गेली ! आणि आतां तर मौन हीच माझी प्रकृति असल्या-सारखे मला वाटूं लागले आहे.

माझ्यासारख्या सत्याच्या शोधकाला मौनाची अतिशय मदत होते. मौनावस्थेत आत्म्याला मार्गाचे जास्त स्पष्ट दर्शन होते आणि जे मायावी आणि फसवे आहे त्याचे स्वरूप स्फटिकासारखे स्वच्छ होते. आपले जीवन म्हणजे सत्याकरितां चाललेली दीर्घ आणि दुष्कर अशी साधना असून आत्म्याला आपली पूर्णता गांठण्याकरितां आंतरिक विसांव्याची जरुरी असते.

## अंतर्नाद :: ७

आपल्या आयुष्यांत असे कांहीं क्षण येतात, की ज्या वेळीं कांहीं गोष्टी बाह्य साधनांनी सिद्ध करण्याची मुळींच गरज नसते. आपल्या अंतरात्म्यांतील सूक्ष्म आवाज आपणाला असे सांगतो की, ' तुझा मार्ग अगदीं बरोबर आहे. इकडे तिकडे न वळतां बिकट आणि सांकड्या वाटेवरूनच तुझी चाल चालू ठेव.'

आपल्या आयुष्यांत कांहीं वेळा अशा येतात, की जेव्हां आपले जिवलग मित्र आपल्याबरोबर राहूं शकत नाहींत व तरीहि आपल्याला कार्यतत्पर राहावेंच लागतें. जेव्हां कर्तव्याचा झगडा उत्पन्न होतो तेव्हा आपल्यामधील 'अत्यंत सूक्ष्म अंतस्थ आवाजा'चा निर्णयच अखेरचा मानला पाहिजे.

आत्मशुद्धि साधण्याचा अविरत प्रयत्न केल्यानंतर अंतरांतील तो ' अत्यंत सूक्ष्म आवाज ' बिनचूक आणि स्पष्टपणें जाणण्याचें थोडेफार सामर्थ्य माझ्यांत आलें आहे.

' अंतरातील तो अत्यंत सूक्ष्म आवाज ' ज्या क्षणीं मी आंतल्या आंत दाबून टाकीन, त्याच क्षणीं माझी उपयुक्तता नष्ट होईल.

आतला आवाज कांहींजणांशीं बोलतो असा संभव आहे, याबद्दल माझ्या माहितीप्रमाणें कोणींहि शंका घेतलेली नाहीं आणि अंतर्नादाच्या अधिकारावर आपण बोलत आहों असा एका माणसाचा दावा जरी खरोखर सिद्ध होऊं शकला, तरी त्यांत जगाचा फायदाच आहे. तसा दावा पुष्कळजण करतील; पण सर्वांनाच तो पुराव्यानें सिद्ध करतां येणार नाहीं; परंतु अंतर्नादाचा अधिकार खोटेपणानें सांगणारे पुढे येतील त्याना प्रतिबंध करावा म्हणून मात्र अंतर्नादाला दडपून टाकणें योग्य नव्हे आणि तें शक्यहि नाहीं. पुष्कळ लोक प्रामाणिकपणे आंतल्या आवाजाला धरून वागतील तर त्यांत कसलाच धोका नाहीं; परंतु दुर्दैवानें दांभिकपणावर मात्र कांहींच तोडगा नाहीं ! अनेक लोक सद्‌गुणी असल्याचा बहाणा करतील म्हणून कांहीं सद्‌गुणांना दडपून टाकतां कामा नये. अंतर्नादाच्या वतीनें आपण बोलत असल्याचा दावा सांगणारे लोक जगांत नेहमीच आढळतात; परंतु त्यांच्या अल्पजीवी

प्रवृत्तींनीं आजपर्यंत जगाचें कसलेंहि नुकसान झालेलें नाहीं. तो आवाज ऐकण्याची शक्ति येण्यापूर्वी माणसाला दीर्घ काल बऱ्याच कडक तपस्येतून पार पडावें लागतें व मग जेव्हां तो अंतर्नाद खरोखर बोलूं लागतो, तेव्हां तो तोच आहे हें चटदिशी समजून येतें. जगाला झुलविण्यांत सर्व काळ यश येणें कांहीं शक्य नाहीं व म्हणून बेबंदशाही माजण्याची भीति नाहीं; कारण, माझ्यासारखा गरीब माणूस दडपला तर जाणार नाहींच, पण उलट आपण तो आवाज ऐकला आहे असा त्याचा विश्वास असेल, तेव्हां अधिकारपूर्वक तो तसें छातीठोकपणें सांगेल.

माझ्या दृष्टीनें ईश्वराचा, विवेकबुद्धीचा, सत्याचा आवाज, अंतर्नाद किंवा 'अनाहृत ध्वनि' या सर्वांचा अर्थ एकच आहे. मला त्याचें रूप दिसलेलें नाहीं व तें पाहण्याचा प्रयत्नहि मी कधीं केलेला नाहीं; कारण, ईश्वर निराकार आहे असेंच मी मानीत आलों आहे. परंतु मी आवाज मात्र ऐकला खरा व तो दुरून आल्यासारखा आणि तरीहि अगदीं निकट असल्यासारखा भासला. एकाद्या माणसानें निश्चित शब्दांत बोलावें आणि तें ऐकण्यावांचून सुटकाच नसावी, तसाच—अगदीं तसाच तो होता यांत काडीमात्र संशय नाहीं. मला तो ध्वनि ऐकूं आला त्या वेळीं मी स्वप्नांत नव्हतों. तो ऐकूं येण्यापूर्वीं माझ्या अंतःकरणांत भयंकर झगडा सुरू होता. आणि मग एकाएकीं तो आवाज माझ्या कानांवर पडला. मीं कान तीक्ष्ण केले, तो अंतर्नादच असल्याची खात्री करून घेतली आणि मनांतील द्वंद्व एकदम थांबलें. मन शान्त झालें. त्या आवाजाच्या आदेशानुसार मी निश्चय केला व उपावसाची तारीख तशीच वेळ ठरवून टाकली....

मी ऐकला तो खरोखरी अंतर्नादच होता, माझ्याच संतप्त मेंदूंतील कल्पनांचा तो खेळ नव्हता, याचा यापेक्षां जास्त पुरावा मी कसा देऊं? संशयात्म्यांची खात्री पटवून देण्यासाठीं याहून जास्त पुरावा माझ्यापाशीं नाहीं. ही सर्व आत्मवंचना होती अथवा भ्रम होता असें ते खुशाल म्हणोत! कोणी सांगावें? कदाचित् असेलहि तसें! व तसें नाहीं हें सिद्ध करण्याकरितां मला कांहीं पुरावाहि देतां येणार नाहीं. परंतु मी एवढें मात्र म्हणूं शकतों कीं, सबंध जगानें जरी माझ्या विरुद्ध निकाल दिला, तरी मीं जो ऐकला तो खराखुरा ईश्वरी आवाज होता हा माझा विश्वास त्यामुळें

मुळीसुद्धां ढळणार नाही....परंतु ईश्वर हा सुद्धां आपल्या कल्पनांचाच खेळ आहे असे कांहीजण समजतात; हे मत जर खरे असेल, तर 'कांहीच सत्य नाही' असें म्हणावे लागेल. मग 'सर्व काही आपल्या कल्पनेमधूनच निर्माण झाले आहे' असे होईल. तसे म्हटले तरी, माझ्या कल्पनेचा ज्या वेळी माझ्यावर पगडा असतो त्या वेळीं मला तिच्या प्रभावाच्या पकडीतच वागावें लागणार. अगदी सत्य म्हणून मानलेल्या गोष्टी सुद्धा सापेक्षपणेच सत्य असतात. मला तो अंतर्नाद माझ्या स्वतःच्या अस्तित्वापेक्षांहि अधिक वास्तव वाटत आला आहे. त्याने मला—नव्हे, कोणालाच—दगा दिलेला नाही आणि इच्छा असेल त्या सर्वांना तो ऐकूं येऊं शकेल. तो प्रत्येकाच्या अतरांत आहे; परतु इतर गोष्टीप्रमाणेच त्यालाहि आधीची कांही निश्चित तयारी लागते.

ईश्वराचा आवाज मला ऐकूं येतो हा माझा दावा कांही नवा नाही. दुर्दैवाने माझा हा दावा खरा आहे असे दाखवून देण्याचा प्रत्यक्ष प्रत्यतरा-वांचून अन्य मार्ग माझ्या माहितीत नाही. ईश्वरानेच निर्माण केलेल्या प्राणि-मात्रांनी त्याचेच अस्तित्व सिद्ध करून देण्याजोगी परिस्थिति त्याने ठेवूं दिली, तर ईश्वर हा ईश्वरच होणार नाही; परंतु जो खुषीने ईश्वराचा बंदा झाला त्याला अत्यत प्रखर अग्निदिव्यातून पार पडण्याची शक्ति तो देतो. मी गेली पन्नासावर वर्षे या अत्यंत कडक धन्याचा खुषीने गुलाम होऊन राहिलो आहे. जसजशी वर्षे लोटत गेली, तसतसा त्याचा आवाज मला वाढत्या प्रमाणात ऐकू येऊं लागला. मी अगदी घोर सकटात असतांना सुद्धां त्याने मला अंतर दिलेले नाही. पुष्कळ वेळा त्याने माझ्या स्वतः-पासूनच माझा बचाव केला आहे आणि स्वातंत्र्याचा मागमूसहि माझ्यामागीं ठेवलेला नाही. जितका जितका अधिक मी त्याला शरण जातो, तितका तितका माझा आनदहि वृद्धिंगत होत जातो.

यात भ्रमाचा प्रश्नच उद्भवत नाही. मी साधे शास्त्रीय सत्य कथन केले आहे. ज्याना इच्छा आहे आणि त्यासाठी अवश्य ती लायकी संपादन करून घेण्याइतका धीर ज्यांना आहे, त्यांनी त्याचा याप्रकारें पडताळा पाहावा. हे लायकीचे गुण सुद्धा समजावयाला अगदी साधे आणि संपादन करायला अगदी सोपे असे आहेत; निश्चय मात्र पाहिजे. मी फक्त एवढेच म्हणेन :

'स्वतःव्यतिरिक्त दुसऱ्या कोणावरहि विश्वास ठेवण्याचें कारण नाही. आंतला आवाज काय म्हणतो ते ऐकण्याचा प्रयत्न तुम्हीं केला पाहिजे; परतु तुम्हांला त्याला "आंतला आवाज" म्हणावयाचें नसेल तर त्याला तुम्ही "बुद्धीचा आदेश" असें म्हणूं शकतां. तो तुम्ही मानला पाहिजे. आणि मग ईश्वर म्हणून जर त्याचें प्रदर्शन तुम्हीं केलें नाहीं तर दुसरें कांही तरी म्हणून तुम्ही त्याचें प्रदर्शन करा म्हणजे तें अंतीं ईश्वर म्हणूनच ठरेल या-विषयीं मला बिलकुल शंका नाहीं. कारण, सुदैवानें या विश्वात ईश्वरावाचून अन्य व्यक्ति अथवा वस्तूच नाहीं. मी असेंहि म्हणेन, कीं आपण अंतर्नादाच्या प्रेरणेप्रमाणें वर्तन करतो असें म्हणणाऱ्या सर्वांना तशी प्रेरणा असतेच असें नाहीं. कांहीं म्हटलें तरी अखेर माणसातील इतर सर्व शक्तींना लागते त्या-प्रमाणेच अंतरांतील तो अत्यंत सूक्ष्म आवाज ऐकण्याची शक्ति प्राप्त करून घेण्याला सुद्धा अगोदर कांहीं प्रयत्न, तशीच थोडी तालीम लागते;—नव्हे, इतर शक्तींपेक्षां सुद्धा ही शक्ति संपादन करण्याला ती कदाचित् अधिकच लागते; आणि आपल्याला ही शक्ति प्राप्त झाली आहे असें सांगणाऱ्या हजारो लोकांपैकीं कांहीं थोड्यांनाच जरी आपला तो दावा प्रस्थापित करण्यांत यश आलें, तरीहि असे संशयास्पद दावा सांगणारे लोक होऊं देणें किंवा त्यांना निभावून घेणें हा धोका सुद्धां पत्करण्यासारखा आहे. एकादा मनुष्य ईश्वरी प्रेरणा अथवा अंतर्नाद नसतांना सुद्धां आपण तदनुसार चालत आहों असा बहाणा करीत असेल, तर त्याला या पृथ्वीवरच्या एकाद्या सम्राटाचें अधिकारपत्र घेऊन चालत असण्याचा बहाणा करणाऱ्यापेक्षाहि अधिक दुःख सोसावें लागेल. दुसऱ्या प्रकारच्या मनुष्याचें ढोंग उघडकीला आलें तर शारीरिक दंडावरच तो सुटेल; परंतु ईश्वरी प्रेरणेचें ढोंग करणाऱ्याला मात्र देह व आत्मा या दोहोंसहि मुकावें लागेल. उदार वृत्तीचे टीकाकार माझ्यावर ढोंगाचा आरोप करीत नाहीत; परंतु कसल्या तरी भ्रांतीचा परिणाम माझ्यावर झाला असण्याचा फार संभव आहे असें ते सूचित करतात. तरी सुद्धां मी जर खोटाच दावा करीत असतो, तर माझ्यावर जो परिणाम झाला असता त्यापेक्षां भ्रांतीमुळे होणारा परिणाम कांहीं फारसा निराळा असणार नाहीं. मी स्वतःला एक नम्र शोधक समजतो. अर्थात् मला अत्यंत जागरूक राहिलें पाहिजे आणि मनाचा समतोलपणा ठेवण्याकरितां

ईश्वराचे मार्गदर्शन मिळेपर्यंत, मला शून्य बनले पाहिजे. हा मुद्दा अधिक न वाढविणे बरे.

बरोबर असो वा चूक असो; परंतु सत्याग्रही म्हणून प्रत्येक संभाव्य अडचणीच्या वेळी ईश्वराच्या साह्याखेरीज दुसरा कोणताहि मार्ग माझ्यापुढे नाही हे मी जाणतो आणि माझ्या ज्या कृतीचा अर्थबोध होत नाहीसे वाटते त्या वस्तुतः अंतःप्रेरणेमुळे माझ्या हातून घडल्या आहेत, यावर लोकांनी विश्वास ठेवला तर बरे असे मला वाटते.

माझ्या तप्त कल्पनांचाहि कदाचित् तो परिणाम असेल व तसे असेल तर माझ्या कल्पनाशक्तीला मी दुवा देतो. कारण, आज पन्नासांवर वर्षांच्या माझ्या वैचित्र्यपूर्ण आयुष्यांत मला ती उपयोगी पडली आहे. मी पधरा वर्षांचाहि झालो नव्हतो तेव्हांपासूनच ईश्वरावर मुद्दाम विसबून राहण्यास मी शिकलो आहे.

# सत्य व सौंदर्य : : ८

प्रत्येक गोष्टीला आतील व बाहेरील अशी दोन अंगे असतात. अंतरंगाला बाह्यांगाची जेवढी मदत होत असेल तेवढाच बाह्याला अर्थ, तद्व्यतिरिक्त त्याला अर्थ नाही. ... या दृष्टीने खरी कला म्हणून जे कांही आहे ते सर्व आत्म्याचे प्रकटीकरणच आहे. बाहेरचे स्वरूप माणसाच्या आत्म्याचे जेवढे प्रकटीकरण करीत असेल, तेवढीच त्या स्वरूपाला किंमत आहे.

मला माहीत आहे, की पुष्कळजण स्वतःला कलावंत म्हणवून घेतात व लोकहि त्यांना तसे मानतात, तरी त्यांच्या कृतींत आत्म्याला उन्नतीविषयीं जी ओढ किंवा अस्वस्थता वाटते तिचा लवलेशहि नसतो.

खऱ्या कलेच्या योगाने आत्मानुभूति प्राप्त करून घेण्यास साह्य झालें पाहिजे. माझ्या स्वतःच्या बाबतीत आत्म्याच्या अनुभूतीसाठीं मला कोणत्याहि प्रकारच्या बाह्य स्वरूपाची कसलीहि जरुरी पडत नाही असे दिसून येतें. म्हणून तुम्ही ज्याला कलाकृति म्हणता अशा गोष्टी माझ्या आजूबाजूला आढळल्या नाहीत, तरी माझ्या जीवनात खरीखुरी कार्यक्षम अशी कला

भरून राहिली आहे असें मी म्हणूं शकतों. माझ्या खोलीच्या भिंतीवर चित्रें काढलेली नसतील; आणि मी वरचे छप्परहि कदाचित् काढून टाकीन; कारण, त्यायोगें वर नक्षत्रांनी खचलेल्या सौंदर्याच्या अनंत पसाऱ्याकडे मला टक लावून पाहावयाला मिळतें, वर ताऱ्यांनी चमकणाऱ्या आकाशाकडे पाहत असतांना माझ्यापुढें जीं रमणीय दृश्यें खुली होतात, तशीं दृश्यें कोणती बुद्धिगम्य मानवी कला मला दाखविणार आहे ? मात्र याचा अर्थ असा नव्हे, कीं सर्वसाधारणपणें लोक ज्यांना कलाकृति म्हणतात त्यांची किंमत मी कमी लेखतों; परंतु निसर्गातील सौंदर्याच्या अमर प्रतीकांशीं तुलना करतां या कलाकृती मला स्वतःला अत्यंत अपूर्ण वाटतात इतकेंच. मनुष्याच्या या कलावस्तू जीवाला ज्या मानानें आत्मसाक्षात्काराच्या दिशेनें पुढें नेण्याला मदत करतील तेवढीच त्यांची किंमत.

मी सत्यामध्यें अथवा त्याच्या द्वारा सौंदर्य पाहतों व शोधतो. सर्व सत्यें—केवळ सत्य कल्पनाच नव्हेत तर सत्यपूर्ण मुद्रा, चित्रे किंवा गाणीं हीं सुद्धां—अत्यंत सुंदर असतात. सामान्यतः मनुष्याला सत्यांतील सौंदर्य आकलन होत नाही. सामान्य माणूस त्यांत असलेल्या सौंदर्यापासून दूर पळतो आणि डोळे झांकून घेतो. ज्या वेळीं लोक सत्यांत सौंदर्य पाहूं लागतील, त्या वेळींच खऱ्या कलेचा उदय होईल.

बाह्य स्वरूप कसेंहि असले, तरी जो चेहरा आत्मिक सत्याने झळकतो तोच खऱ्या कलावंताच्या दृष्टीनें सुंदर असतो. सत्यापरतें दुसरें सौंदर्य नाही. उलट, बाह्यतः मुळीं देखील सुंदर न दिसणाऱ्या रूपांत सत्याचा आविष्कार होण्याचा संभव आहे. असे म्हणतात की, सॉक्रेटीस हा त्याच्या काळांतील सर्वांत सत्यनिष्ठ मनुष्य होता; पण सबंध ग्रीस देशांत त्याच्याइतका कुरूप कोणीच नव्हता. माझ्या मनाला तो सुंदरच वाटतो. कारण, त्याचें सबंध आयुष्य सत्यासाठीं अविरत धडपडण्यांत गेलें. कलावंत म्हणून फिडियसला बाह्य स्वरूपातील सौंदर्य पाहण्याची संवय असतांना देखील सॉक्रेटिसांतील सत्याच्या सौंदर्याचें रसग्रहण करण्यांत त्याला त्याच्या बाह्य स्वरूपाचा कांहीहि प्रतिबंध झाला नाही, हे लक्षांत घेण्यासारखे आहे.

सत्य आणि असत्य पुष्कळ वेळां एकत्र राहतात. चांगले आणि वाईट ही सुद्धां पुष्कळ वेळां एकत्र आढळतात. एकाद्या कलावंतात देखील कित्येक

वेळां वस्तूंचें यथार्थ तसेंच अयथार्थ दर्शन करण्याच्या दोन्ही शक्ति असू शकतात. ज्या वेळी यथार्थ दर्शनाची शक्ति काम करते त्या वेळी सुंदर कलाकृती निर्माण होतात. जीवनात जर असे क्षण विरळा आले, तर त्यांच्या हातून निर्माण होणाऱ्या सुंदर कलाकृतीहि विरळाच असणार.

सूर्यास्ताची शोभा व रात्रीं तारका-मंडळांत शोभणारी चंद्रकोर हे सौंदर्य-पूर्ण देखावे तितक्याच अर्थी सत्यपूर्ण होत, जितक्या प्रमाणात त्यांच्यामागे असलेल्या विधात्याचा विचार ते मला करावयाला लावतील. सृष्टीच्या केंद्रस्थानी असलेले सत्य जर त्याच्यांत नसते, तर अन्यथा त्यांना सौंदर्य कसे प्राप्त झाले असतें? सूर्यास्ताचा चमत्कार किंवा चंद्राचें सौंदर्य यांनी जेव्हां माझें मन प्रसन्न होतें, तेव्हां माझा अंतरात्मा सृष्टिकर्त्याच्या उपासनेत लीन होऊन विशाल बनतो. या सर्व सृष्टीत मी त्याला आणि त्याच्या कृपेला पाहण्याचा प्रयत्न करतो; पण ईश्वराची आठवण करून देण्याला जर या सूर्यास्तांची आणि सूर्योदयांची मदत होत नसेल, तर ते मुद्धां केवळ विघ्नरूपच होतील. आत्म्याच्या ऊर्ध्व गमनाला प्रतिबंध करणाऱ्या सर्व गोष्टी मायारूप आहेत, पाश आहेत. हे शरीर मुद्धा मुक्तीच्या मार्गात पुष्कळ वेळा प्रत्यक्ष विघ्नच नाहीं का होऊन बसत?

जिच्या मागे लागावें अशी पहिली कोणती गोष्ट असेल, तर ती सत्य हीच होय. सौंदर्य आणि सज्जनता याची भर मागाहून आपोआप पडेल. बायबलांतील गिरि-प्रवचनामध्ये ख्रिस्तानें खरोखरी हीच शिकवण दिली आहे. ख्रिस्त हा माझ्या मतें अत्यंत श्रेष्ठ कलावंत होता; कारण, त्याला सत्याचें दर्शन झालें व ते त्यानें व्यक्त केलें. तसाच महमद; कारण साऱ्या अरबी साहित्यात कुराण हा अत्यंत निर्दोष असा ग्रंथ आहे— निदान विद्वान् लोक तसे मानतात खरे. त्या दोघांचीहि सारी धडपड मुख्यतः सत्यासाठीं झाली असल्यामुळे भाषेचें सौंदर्य आपोआपच त्याच्यात उतरलें आणि तरी देखील ख्रिस्त किंवा महमद याच्यापैकी कोणीहि कलेवर ग्रंथ लिहिले नाहीत. मला ज्याची भूक आहे, ज्याच्यासाठीं माझें हें आयुष्य आहे आणि ज्यासाठीं मी मरण्याची इच्छा करीन ते सत्य आणि ते सौंदर्य, हे होय.

इतर बाबतींप्रमाणेच या बाबतींतहि मला जनसमुदाय लक्षांत घेऊनच विचार केला पाहिजे. बहुजनसमाजाला सौंदर्यांतच सत्य दिसावें अशा रीतीनें सौंदर्याची दृष्टि संपादन करण्याचें शिक्षण देणें आपणांला शक्य नाहीं. प्रथम त्याना सत्य दाखवा म्हणजे मग ते सौंदर्य पाहूं लागतील....कोट्यवधि भुकेकंगालांना जे कांहीं उपयुक्त असेल, ते माझ्या मनाला सुंदर वाटतें. आज प्रथम जीवनाला अत्यंत जरूर असलेल्या वस्तू आपण त्यांना देऊं; म्हणजे जीवनाची सर्व लक्ष्मी आणि जीवनाचे अलंकार त्याच्या मागोमाग येतील.

संगीत आणि इतर सर्व कला मला प्रिय आहेत; परंतु सर्वसाधारणपणें त्यांना जितकी किंमत देण्यांत येते, तितकी मी देत नाहीं. उदाहरणार्थ, ज्या प्रवृत्तींचें आकलन होण्यासाठीं तात्त्विक ज्ञानाची जरुरी असते अशा प्रवृत्तींना मी किंमत देत नाहीं. तान्यांनीं खचलेल्या आकाशाकडे आणि त्याच्यामुळें माझ्या डोळ्यांना लाभणाऱ्या अमर्याद सौंदर्याकडे जेव्हां मी पाहतों, तेव्हां मानवी कला जे कांहीं मला देऊं शकेल त्या सर्वांहून त्याची किंमत मला अधिक वाटते. याचा अर्थ असा नव्हे, कीं सामान्यपणें कला-त्मक म्हटल्या जाणाऱ्या कृतींचें महत्त्व मी कमी लेखतों. परंतु व्यक्तिशः मला निसर्गांतील अमर्याद सौंदर्याच्या मानानें या कृतींची अवास्तवता अतिशय उत्कटतेनें जाणवते...जीवन हे सर्व कलांपेक्षां श्रेष्ठ आहे. याहिपुढें जाऊन मी असें म्हणेन, कीं ज्याचें जीवन पूर्णत्वाच्या जास्तींत जास्त सन्निध पोचतें तोच सर्वांत मोठा कलावंत; कारण उदात्त जीवनाच्या भक्कम पाया-वांचून आणि भिंतींवांचून कला तरी काय होत ?

अखेर, खरी कला ही स्त्री-पुरुषांच्या हाताच्या नाजुक, चैतन्यदायी स्पर्शांतूनच प्रकट होऊं शकते; प्रचंड प्रमाणावर उत्पादन करण्यासाठीं योजलेल्या मोठ्या शक्तीच्या साह्यानें चालणाऱ्या अचेतन यंत्राच्या द्वारा ती मुळींच प्रकट होऊं शकत नाहीं.

शेवटीं खरें सौंदर्य हे हृदयाच्या शुद्धतेंतच असतें.

कला ही जर कला व्हावयाची असेल, तर तिनें शांति दिली पाहिजे.

मला कला आणि साहित्य अशीं पाहिजेत, कीं जी सर्वसामान्य जनतेशीं बोलूं शकतील.

# माझ्यांतील विसंगती : : ९

नैतिक भूमिकेवरून जे मला पटत नाहींत किंवा ज्याचें समर्थन मला करतां येत नाहीं, असे जुने दाखले किंवा अशा रूढी याची गुलामगिरी मी पत्करणार नाहीं.

राजकारणात कांहीं फायदा करून घेण्यासाठीं मी कोणत्याहि तत्त्वाचा बळी दिलेला नाहीं.

मला माझ्यांतील अनेक विसंगती कबूल करणें भाग आहे. परंतु ज्या अर्थी मला 'महात्मा' म्हणतात, त्या अर्थी 'सुसंगतींत असलेला मूर्खपणा हा क्षुद्र मनांना बागुलबोवा वाटतो' हें इमर्सनचें वचन उचलून धरण्यास मला मुळींच हरकत वाटत नाहीं. माझ्या विसंगतींत कांहीं पद्धति असते, असें मला वाटतें. ज्याप्रमाणें निसर्गांत वरवर भिन्नत्व दिसत असूनहि त्यांत एक अभिन्नत्व अनुस्यूतपणें वावरत असतें, त्याप्रमाणें माझ्या वरवर दिसणाऱ्या विसंगतींतहि एक प्रकारची सुसंगतता असते, असें मला वाटतें.

मला जाणणाऱ्या मित्रांनीं मला असें प्रशस्तिपत्र दिलें आहे, कीं मी जितका जहाल तितकाच मवाळ आहे आणि जितका सनातनी तितकाच आमूलाग्र सुधारणावादी आहे. म्हणूनच बहुधा मला दोन्ही टोकाच्या विचार-सरणींच्या मंडळींमध्यें मित्र असण्याचें सद्भाग्य लाभलें आहे. अहिंसेची दृष्टि माझ्यांत असल्यामुळेंच माझ्यामध्यें हा संयोग घडून आला असावा असें मला वाटतें.

विसंगति ही फक्त वरवरची आहे. अनेकांना विसंगति वाटते याचें कारण वेगवेगळ्या परिस्थितींशीं जुळवून घेण्याचा माझा स्वभाव हेंच होय. वरवर सुसंगति दिसली, तरी तो खरोखर निव्वळ हट्टवादीपणाहि असू शकेल.

माझ्याकडून जगाला आश्चर्याचे धक्के मिळाले हें माझें सुदैव म्हणा अथवा दुर्दैव म्हणा. नव्या प्रयोगांनीं किंवा जुनेच प्रयोग नव्या पद्धतीनें केल्यानें केव्हां केव्हां गैरसमज उत्पन्न होतात खरे.

माझा यःकश्चित् जीवनक्रम जे पहिल्यापासून स्थूल दृष्टीनें कां होईना पाहत आले आहेत, त्यांना माझ्या जीवनांतील एकाहि कृतीनें कोणाहि व्यक्तीची अथवा कोणत्याहि राष्ट्राची हानि झालेली नाहीं हें दिसून आल्यावांचून राहिले नसेल ... मी प्रमादातीत आहें असें मी म्हणत नाही; माझ्या हातून हिमालयाएवढ्या चुका झाल्या असल्याची जाणीव मलाहि आहे; परतु त्या जाणूनबुजून केल्याची, किंवा एकाद्या व्यक्तीच्या, राष्ट्राच्या अथवा मानव वा मानवेतर जीवाच्याविषयीं मनांत वैरभावाला थारा देऊन केल्याची मला जाणीव नाही.

मी सुसंगत दिसावे याच्याशी मला मुळीं मुद्धां कर्तव्य नाही. माझ्या सत्याच्या साधनेत मी अनेक विचार टाकून दिले आहेत आणि मी अनेक नव्या गोष्टी शिकलो आहे. वयाने मी म्हातारा झालों असलो तरी माझी आंतरिक वाढ खुटली आहे किंवा माझें शरीर नष्ट झाले तर ती थांबणार आहे असें मला वाटत नाही. क्षणाक्षणाला सत्याचा—माझ्या परमेश्वराचा—आदेश मानण्याला मी कसा तयार राहीन इकडेच माझे सर्व लक्ष आहे.

सुसंगततेचे स्तोम मी केव्हांहि माजविलेले नाही. मी सत्याचा उपासक आहे आणि विवक्षित प्रसगीं अमुक प्रश्नासंबंधीं मी पूर्वी काय बोललो असेन इकडे लक्ष न देतां अमुक क्षणाला मला त्यासंबंधीं काय वाटते तेच मी सांगितले पाहिजे. ... जसजशी माझी दृष्टि साफ होत जाईल, तसतसे रोजच्या अभ्यासाने माझे विचार अधिकाधिक स्पष्ट होणे भाग आहे. जेथे मी माझें एकादे मत मुद्दाम बदलले असेल तेथे तो बदल स्पष्टच असेल. मात्र हळूहळू होत जाणारा आणि वरवर कळून न येणारा विकास बारकाईने पाहणाऱ्याच्याच ध्यानात येईल.

फक्त काम साधण्याकरितां म्हणून एकहि गोष्ट सबंध आयुष्यांत केल्याचे मला आठवत नाही. सर्वोच्च आचारधर्माच्या पालनातच उत्कृष्ट कार्यसाधकता असते, असेच मी सदोदित मानीत आलो आहे.

माझ्या आयुष्यभर सत्याचा आग्रह धरल्यामुळेच तडजोडीत असणाऱ्या सौंदर्याची गोडी चाखावयाला मी शिकलों आहें. अशी वृत्ति असणें हा सत्याग्रहाचाच एक आवश्यक भाग आहे असें मला उत्तर आयुष्यांत दिसून

आले. त्यामुळे पुष्कळ वेळां माझा जीव धोक्यांत आला आहे आणि मीं पुष्कळ मित्रांचा रागहि ओढवून घेतला आहे. परतु सत्य हे वज्रासारखें कठोर आणि कुसुमासारखें कोमल असते.

मानवी जीवन म्हणजे तडजोडींची मालिकाच होय आणि जी गोष्ट सिद्धान्तरूपानें सत्य असल्याचे आढळून येतें, ती व्यवहारांत साध्य करणे नेहमी सुलभ असतेच असे नाहीं.

ज्यांत तडजोड होऊंच शकत नाहीं अशीं कांहीं शाश्वत तत्त्वे आहेत आणि तीं आचारांत आणतांना प्राणहि वेचण्याची तयारी ठेविली पाहिजे.

# अहिंसेचा सिद्धान्त : : १०

पन्नासांहून अधिक वर्षेपर्यंत अखंडपणे शास्त्रीय काटेकोरपणानें अहिंसेचा आणि तिच्या शक्यतेचा मी आचार करीत आलो आहे. कौटुंबिक, संस्थांतर्गत, आर्थिक आणि राजकीय अशा जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत मी ती लागू करून पाहिली आहे व तिला अपयश आलें असे एकहि उदाहरण मला माहीत नाहीं. जेथे तिला कांहीं वेळा अपयश आलेसें वाटलें, तेथेंहि त्या अपयशाचें कारण माझी अपूर्णता असे मी मानलें आहे. मी स्वतः पूर्ण असल्याचा दावा करीत नाहीं; परंतु मी असे मात्र मानतो, कीं मी सत्याचा एक उत्कट शोधक आहे आणि सत्य हे ईश्वराचेंच निराळे नाव आहे. सत्याच्या त्या उपासनेतूनच मला अहिंसेचा शोध लागला. तिचा प्रसार करणें हें माझे जीवितकार्य आहे. ते बजावण्याव्यतिरिक्त मला जगून दुसरें कांहींहि साधावयाचें नाहीं.

मी मनोराज्यांत रंगून जाणारा नाहीं. मी स्वतःला व्यवहारी ध्येयवादी म्हणवितो. अहिंसाधर्म हा फक्त ऋषिमुनींच्या करतांच नाहीं, तो सामान्य जनतेसाठी देखील आहे. हिंसा हा जसा जंगली पशूंचा निसर्गधर्म, तसा अहिंसा हा आपल्या मानवजातीचा निसर्गधर्म आहे. पशूंमध्ये आत्मतत्त्व

निद्रित असतें आणि त्याला शरीरबळाव्यतिरिक्त दुसरा कायदा माहीत नसतो. मनुष्य हा त्याच्याहून उच्च आहे; म्हणून त्यानें त्याहून उच्चतर धर्माचें— आत्मबळाच्या धर्माचें— पालन केले पाहिजे.

म्हणून हिंदुस्थानपुढे मी त्यागाचा पुरातन धर्म मांडण्याचें धाडस केलें आहे. कारण, सत्याग्रह आणि असहकार व सविनय प्रतिकार ही त्याचीं उपांगें म्हणजे आत्मक्लेशाच्या धर्माचींच नवी नांवें आहेत. ज्या ऋषींनीं भोवतालीं हिंसा चालू असतांना अहिंसेचा धर्म शोधून काढला ते न्यूटनहूनहि अलौकिक बुद्धीचे पुरुष होते, वेलिंग्टनपेक्षांहि फार मोठे योद्धे होते. त्यांना स्वतःला शस्त्रास्त्रविद्या अवगत असूनहि तिचें वैयर्थ्य त्यांच्या लक्षांत आलें आणि संत्रस्त जगाला त्यांनीं अशी शिकवण दिली, कीं जगाची मुक्ति हिंसेच्या मार्गानें होणार नाहीं, तर अहिंसेच्या द्वाराच होईल.

माझी अशी इच्छा आहे, कीं ‘ आपला आत्मा कधींहि मरणार नाहीं, शारीरिक दुर्बळता कसलीहि असली तरी त्यावर विजय मिळवून साऱ्या जगाच्या एकवटलेल्या शरीरबळाला तोंड देण्याची ताकद आपल्यांत आहे ’ हें हिंदुस्थाननें ओळखावें.

हिंदुस्थाननें जर ‘हिंसा’तत्त्वाचा आश्रय केला तर त्याला कदाचित् क्षणिक यश मिळेल; पण मग हिंदुस्थानविषयीं माझ्या अंतःकरणांत असलेला अभिमान नाहींसा होईल ! मी हिंदुस्थानशीं संलग्न आहें; कारण, त्याच्यापासूनच मला सर्व कांहीं मिळालें आहे. जगासाठीं त्याचें कांहीं विशिष्ट कार्य नेमलेलें आहे असा माझा निखालस विश्वास आहे. त्याला युरोपचें अंधानुकरण करावयाचें नाहीं. हिंदुस्थान जेव्हां ‘हिंसा’तत्त्वाचा स्वीकार करील, तेव्हां तो माझ्या कसोटीचा काळ असेल. मला आशा आहे, कीं त्या वेळीं मी त्या कसोटीला उतरेन. माझ्या धर्माला भौगोलिक मर्यादा नाहींत. जर त्यावर माझी जिवंत श्रद्धा असेल, तर खुद्द हिंदुस्थानवरील माझ्या प्रेमापेक्षां देखील ती प्रभावी ठरेल. माझें आयुष्य हिंदुस्थानच्या सेवेला अर्पण झालें आहे, मात्र ती सेवा अहिंसाधर्माच्या द्वाराच होईल.

माझ्या सार्वजनिक आयुष्यांत असे अनेक प्रसंग घडले आहेत, कीं ज्या वेळीं बदला घेण्याचें सामर्थ्य असूनहि मी त्यापासून स्वतःला परावृत्त केलें

आहे व मित्रांनाहि तसाच सल्ला दिला आहे. त्या तत्त्वाच्या प्रसारार्थ माझें जीवन वाहिलेले आहे. झरतुष्ट्र, महावीर, डॅनिअल, येशू, महमद, नानक आणि जगांतील अशाच इतर सर्व महात्म्यांच्या शिकवणुकीत मला हेच तत्त्व आढळून येते.

अहिंसेला माझ्या जीवननिष्ठेत सर्वोच्च स्थान आहे. माझ्या तत्त्वप्रणालीतील अंतिम सूत्र देखील तीच आहे.

शूर आणि आत्मत्यागी क्रांतिकारकापुढे मान ताठ करून उभे राहण्यास मला मुळीच संकोच वाटणार नाही· कारण, अहिंसक माणसांचे शौर्य तद्वत् बलिदान तितक्याच तोडीनें त्यांच्यापुढे उभे करण्याचे सामर्थ्य माझ्यात आहे; हे शौर्य अथवा बलिदान निरपराधी माणसाच्या रक्तानें माखलेलें तरी नाही! दुसऱ्यांना ठार करीत मरणाऱ्या लाखो लोकांच्या त्यागापेक्षा एका निरपराधी व्यक्तीचा आत्मत्याग अनंतपटींनी अधिक सामर्थ्यवान असतो. निरपराध व्यक्तींनी स्वखुषीनें केलेला त्याग म्हणजे ईश्वराच्या किंवा मानवाच्या कल्पनेंत सुद्धा आजपर्यंत न आलेल्या उन्मत्त जुल्माला दिलेले बलवत्तर असे प्रत्युत्तरच होय.

अत्यंत दडपणाखाली असताना सत्याग्रहाच्या अप्रतिम शस्त्राचा उपयोग करण्याचे शिक्षण आचारानें व उपदेशानें देणें हे माझें जीवितकार्य आहे. अहिंसा आणि सत्य यातूनच आपोआप सत्याग्रहाची उत्पत्ति होते. जीवनांत येणाऱ्या अनेक अरिष्टावर अहिंसेव्यतिरिक्त अन्य उपाय नाही हे दाखवून देण्याला मी उत्सुक आहे— नव्हे, मी त्यासाठी अधीर झालो आहें.... दुष्प्रवृत्ति ज्या वेळी माझ्यात उत्पन्नच होऊं शकणार नाही आणि माझ्या विचारक्षेत्रात कठोरतेला अथवा मग्रुरीला अवकाश राहणार नाही अशी स्थिति तात्पुरती कां होईना ज्या वेळी येईल, त्या वेळी— आणि खरोखर त्याच वेळी माझी अहिंसा जगातील सर्व हृदयांना हालवून सोडील. मी हे माझ्यापुढे अथवा वाचकांच्यापुढे अशक्य असे ध्येय अथवा दिव्य ठेवले आहे असे मुळीच नाही. माणसाचाच हा अधिकार आणि जन्मसिद्ध हक्क आहे. आपण नंदनवनाला मुकलों आहो आणि ते आपल्याला परत मिळवावयाचे आहे. त्याला विलंब लागला तरी काय झाले? तो विलंब

म्हणजे सबंध कालचक्रामध्यें केवळ एक क्षणमात्र आहे. आमचे लाखों दिवस म्हणजे ब्रह्माचा एक दिवस असे सांगतांना गीता सांगणाऱ्या भगवंताला याची जाणीव होती.

रोजच्या रोज दृढ आणि समृद्ध होत जाणारा माझा अनुभव मला असें सांगतो, कीं माणसानें शक्य त्या कमाल मर्यादेपर्यंत सत्य व अहिंसा यांचें पालन केल्याखेरीज व्यक्तींना काय अथवा राष्ट्रांना काय शांतता लाभणार नाहीं. जशास तसें हें धोरण कधींहि यशस्वी झालेले नाहीं.

माझी शिकवण अथवा माझा उपदेश हा केवळ भावनेवर आधारलेला किंवा अव्यवहार्य नाहीं; कारण, पूर्वापार चालत आलेले तेंच मी शिकवतों आणि जें सांगतो तें स्वतः आचरण्याचा प्रयत्न करतों; आणि ज्याचा आचार मी करतों तें सर्वांना आचरतां येण्याजोगें आहे असें मी मानतों; कारण, मी एक अगदीं साधारण मर्त्य मनुष्य असून आपल्यांतील सर्वोत्तम मनुष्याला जे मोह आणि ज्या दुर्बलता असणें शक्य आहे, त्यांना मीहि बळी पडण्यास पात्र आहें.

सबंध आयुष्यभर मी एक 'जुगारी' बनलो आहें. सत्य शोधण्याच्या माझ्या उत्कटतेपुढें आणि अहिंसेवरील माझ्या निष्ठेचा कठोरपणें पाठपुरावा करीत असतांना मला कशाची मातब्बरी वाटली नाहीं. असें करीत असतांना, मी चुकलोंच असेन, तर तशा चुका कोणत्याहि युगांतील आणि कोणत्याहि देशांतील अत्यंत नाणावलेल्या शास्त्रज्ञांनीहि केल्या आहेत.

माझें अहिंसेबद्दलचें प्रेम हें कोणत्याहि ऐहिक अथवा पारमार्थिक गोष्टी-पेक्षां श्रेष्ठ प्रतीचें आहे. त्याची तुलना सत्यावरील माझ्या प्रेमाशींच काय ती होऊं शकेल आणि सत्य हें अहिंसेचेंच दुसरें नांव आहे असें मी समजतों. कारण, फक्त तिच्याच द्वारा मला सत्याचें दर्शन आणि निकटत्व लाभणें शक्य आहे. माझ्या जीवनयोजनेत जसा हिंदुस्थानांतील भिन्नभिन्न धर्मीयांत भेदभाव नाहीं, तसाच भिन्नभिन्न मानववंशांतहि तो नाहीं. मला मनुष्य हा सर्वत्र सारखाच वाटतो.

जीवमात्राला दुखापत करणें जाणूनबुजून तरी माझ्या हातून होणार नाहीं; अर्थात् मानवबंधूंच्या बाबतीत— मग ते माझ्या अथवा जे माझे म्हणून

आहेत त्यांच्या बाबतीत किती का अन्याय करीनात ? तर तें अशक्यच आहे.

मी एक दुर्बळ साधक आहें. मी पुनः पडतों, पुनः उठतो. मला अपयश आले तर त्याने मी पूर्वापेक्षां अधिक जागरूक बनतों आणि माझ्या श्रद्धेला धार देतो. श्रद्धेच्या नेत्रांनी मला दिसून येत आहे, की सत्य आणि अहिंसा या जोडतत्त्वाच्या आचारांत ज्या काही शक्यता आहेत, त्यांची आपल्याला फारच थोडी कल्पना आहे.

मानवजातीला अहिंसेचा संदेश पोंचविणे हे भारताचें विधिलिखित आहे असा माझा अढळ विश्वास आहे. मग ते सफळ होण्याला कितीहि काळ लागो ! पण मला दिसत आहे त्याप्रमाणे या कार्याची पूर्ति करण्याच्या बाबतीत दुसरा कोणताहि देश भारताच्या पुढे जाणार नाही.

'गांधीवाद' म्हणून काहीहि नाही. आणि माझ्यामागे कोणताहि संप्रदाय चालू ठेवण्याची माझी इच्छा नाही. एकाद्या नव्या तत्त्वाला किंवा सिद्धांताला मी जन्म दिला आहे असे मी सांगत नाही. मी फक्त माझ्या पद्धतीला अनुसरून आपल्या दैनंदिन जीवनाला आणि त्यांत उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांना शाश्वत सत्ये लागू करण्याचा प्रयत्न केला आहे....जगाला शिकविण्यासारखे नवीन माझ्यापाशी काहीहि नाही. सत्य आणि अहिंसा ही या पृथ्वीइतकीच जुनी आहेत. मी केले आहे ते एवढेच की, जितक्या व्यापक प्रमाणावर या दोहोंचे प्रयोग करण्याचा प्रयत्न करतां येईल तितका करावयास प्रारंभ केला आहे. असे करीत असताना कित्येक वेळा मी चुकाहि केल्या आहेत आणि त्या चुकांपासून धडे शिकलो आहे. जीवन आणि त्यांतील प्रश्न हे अशा रीतीने मला सत्य-अहिंसेच्या आचरणाचे जगं प्रयोगच झाले आहेत ! स्वभावतः मी सत्यनिष्ठ असलों, तरी अहिंसक मात्र झालेलो नाही. एकदा एका जैन मुनींनी म्हटले, 'तुम्ही सत्याचे जितके उपासक आहा तितके अहिंसेचे नाही; सत्याला तुम्ही पहिले आणि अहिंसेला त्यानंतरचे स्थान देता.' आणि ते त्याचे म्हणणे बरोबर आहे. कारण, त्यांनी म्हटल्याप्रमाणे सत्यासाठी मी अहिंसेचा बळी देणे मुद्धां शक्य आहे. खरोखर म्हणजे, सत्याची साधना करीत असतानाच मला अहिंसेचा शोध लागला.

ईश्वरावर जिवंत श्रद्धा असल्याखेरीज अहिंसेवर जिवंत श्रद्धा राहणें अशक्य आहे. अहिंसक मनुष्य ईश्वराच्या शक्तीवांचून आणि कृपेवांचून कांहींहि करूं शकणार नाहीं. ती नसेल तर क्रोधाला, भीतीला आणि सूड-भावनेला मनांत थारा न देतां मरण्याचें धैर्य त्याला प्राप्त होणार नाहीं. ‘सर्वांच्या हृदयांत ईश्वर वसत असतो आणि ईश्वरासमोर भीति बाळगण्याचें कारण नाहीं’ या विश्वासामधूनच अशा तऱ्हेचें धैर्य प्राप्त होत असतें. ईश्वराच्या सर्वव्यापित्वाचें ज्ञान होणें याचा अर्थ जे विरोधक-म्हणून म्हटले जातील त्यांच्याहि प्राणांबद्दल कदर बाळगणे असा आहे.

माझी आकांक्षा मर्यादित आहे. जगाला अहिंसेच्या मार्गाने नेण्याची शक्ति ईश्वराने मला दिलेली नाहीं. परंतु मी अशी कल्पना करून घेतलेली आहे, कीं आपल्या अनेक दुःखावर इलाज करण्यासाठीं हिंदुस्थानपुढे अहिंसा ठेवण्याकरितां आपलें साधन म्हणून त्यानें मला निवडलें आहे. आतांपर्यंत झालेली प्रगति मोठी आहे; परंतु अजून पुष्कळच व्हावयाचें राहिलें आहे.

अहिंसा ही अत्यंत श्रेष्ठ दर्जाची क्रियावान् अशी शक्ति आहे. अहिंसा म्हणजे आपल्यातील आत्मबल किंवा ईश्वरत्वाची शक्ति होय. अपूर्ण असणाऱ्या मानवाला त्या सारभूत तत्त्वाचें संपूर्ण आकलन होणार नाहीं. त्या तत्त्वाची पुरेपूर जाज्वल्यता त्याला सहनच होणार नाहीं; परंतु त्याचा अगदीं सूक्ष्म अंश कां होईना जेव्हां आपल्यात क्रियाशील बनतो, तेव्हां मोठे चमत्कार करूं शकतो. अंतरिक्षांतील सूर्य आपल्या जीवनदायी उष्णतेने सबंध विश्व भरून टाकतो. परंतु जर कोणी त्याच्या फार जवळ गेला, तर तो त्याला जाळून भस्म करून टाकील. तीच स्थिति ईश्वरत्वाची आहे. ज्या प्रमाणांत आपण अहिंसा अंगीं बाणवून घेऊं त्या प्रमाणांत आपण ईश्वरसदृश बनतो; परंतु पूर्णपणें ईश्वर बनणे आपणाला कधींहि शक्य नाहीं. अहिंसा ही उपयोगांत येणाऱ्या रेडियमसारखी आहे. रेडियमचा अतिसूक्ष्म कण घातुक रोगांत घातला तर तेवढा संबंध दूषित भाग रोगमुक्त करीपर्यंत तो एकसारखा न कळत आपले कार्य अखंड करीत राहतो. त्याचप्रमाणे खरी अहिंसा थोडी असली तरी ती न कळत, सूक्ष्मपणे व अदृश्य रूपानें आपले काम करीत राहते आणि दुधांतील मुरवणाप्रमाणे सबंध समाजाचे स्वरूप पालटून टाकते.

अहिंसक लढा कोणता? जो संपला असतां मागें शल्य उरत नाही आणि शत्रूंचे मित्रांत रूपांतर होतें. तो, हीच अहिंसेची खरी कसोटी आहे. दक्षिण आफ्रिकेत जनरल स्मट्स् यांच्या बाबतीत मला असाच अनुभव आला. सुरुवातीला ते माझे कट्टे विरोधक व टीकाकार होते. आज ते माझे अत्यंत प्रिय मित्र आहेत.

माझ्या मतानें अहिंसा ही कोणत्याहि प्रकारें निष्क्रियता नव्हे. अहिंसा ही माझ्या समजुतीप्रमाणें जगातील एक अत्यंत कार्यप्रवण शक्ति आहे... अहिंसा हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे असा माझा पन्नास वर्षांचा अनुभव आहे: या काळात 'मी असहाय झालो, आतां अहिंसक उपाय मला सापडत नाहींत,' असे म्हणण्याचा प्रसंग माझ्यावर कधींहि आलेला नाहीं.

माझ्या इच्छेपुढें माझ्या पत्नीनें मान वांकवावी असा प्रयत्न मी करीत असतांना तिच्याकडून मी अहिंसेचा धडा शिकलो. एका बाजूला माझ्या इच्छेला तिनें दृढपणें केलेला प्रतिकार आणि दुसऱ्या बाजूला माझ्या मूर्खपणामुळें तिला नाहक सोसावे लागणारे मूक कष्ट, यांमुळें अखेर माझी मलाच लाज वाटू लागली आणि तिच्यावर अधिकार गाजविण्याचा मला जन्मसिद्ध हक्क आहे ही माझी मूर्खपणाची कल्पना नाहींशी होऊन शेवटीं माझी पत्नीच अहिंसेच्या बाबतींत माझा गुरु बनली.

मी दुर्दम्य आशावादी आहे. 'व्यक्तीला अहिंसेचा विकास करण्याला अमर्याद वाव आहे,' या श्रद्धेवर माझा आशावाद उभा आहे. आपण स्वतःच्या जीवनांत तिचा जितका जितका विकास करीत जाऊं तितकी तितकी ती इतकी संसर्गजन्य बनते, कीं आपल्या भोवतालच्या परिस्थितीवर तिचा ताबा बसतो आणि अशा रीतीनें हळहळू ती सारें जग सुद्धां व्यापून टाकूं शकते.

जगभर अहिंसा पसरावी असें जरी मी बडबडत असलो, तरी माझा प्रयोग हिंदुस्थानपुरताच मर्यादित आहे. जर तो यशस्वी झाला तर जग आपो-आपच त्याचा स्वीकार करील. तथापि, एक मोठा 'पण' बाटेत आहेच; पण त्या 'पण'ची चिंता मला वाटत नाहीं. अंधकार जितका घनदाट, तितकी माझी श्रद्धा जास्त तळपते.

## भित्रेपणा कीं हिंसा ?

सबंध मानवजात पौरुषहीन होण्यापेक्षां मी हिंसेचा धोका हजार वेळां पत्करीन.

माझा असा दृढ विश्वास आहे, कीं जेथे भ्याडपणा व हिंसा या दोहोंतच निवड करावयाची असेल तेथें मी हिंसेचा सल्ला देईन... भ्याड बनून आपली अप्रतिष्ठा होत असलेली निमुटपणे पाहत बसण्यापेक्षां हिंदुस्थानने आपल्या प्रतिष्ठेच्या बचाव करण्यासाठीं शस्त्राचा अवलंब केलेलाहि मला पत्करेल; मात्र माझा असा विश्वास आहे, कीं हिंसेपेक्षा अहिंसा ही अनंतपटींनी श्रेष्ठ आहे. 'चोर, दरोडेखोर किंवा हिंदुस्थानवर स्वारी करणारीं राष्ट्रें यांना सामना देतांना हिंसा टाळा' असे मी म्हणत नाहीं. पण तो सामना अधिक चांगल्या रीतीनें देतां यावा म्हणून आपल्यावर नियंत्रण ठेवण्यास शिकलें पाहिजे. जरा कांहीं झाले की पिस्तूल घेतलें, हे सामर्थ्याचें द्योतक नसून दुर्बलतेचें द्योतक आहे. आपसांतील गुद्दागुद्दी ही हिंसेची तालीम नसून पौरुषहीन करण्याची तालीम आहे. माझ्या अहिंसामार्गाने शक्तीचा ऱ्हास कधींहि होणार नाहीं; उलट, राष्ट्राची तशी इच्छा असेल तर संकटकाळीं शिस्तबद्ध आणि एकजुटीच्या हिंसेचा उपयोग करणे केवळ त्याच मार्गामुळें शक्य होईल.

प्रियजनांना वाऱ्यावर सोडून व संकटाला पाठ दाखवून पळून जाणें हे माझ्या अहिंसेत बसत नाहीं. हिंसा किंवा भ्याडपणे पळ काढणे या दोहोंत मी हिंसाच पसंत करीन. एकाद्या आंधळ्याला सुरेख दृश्यांचा आनंद लुटण्याला जसा मी प्रवृत्त करूं शकणार नाहीं, तसाच भ्याडालाहि अहिंसेचा उपदेश मी करूं शकणार नाहीं. अहिंसा ही शौर्याची पराकाष्ठा आहे आणि माझा स्वतःचा अनुभव असा आहे, कीं हिंसेच्या तालमीत तयार झालेल्या लोकांना अहिंसेचे श्रेष्ठत्व सिद्ध करून दाखविण्याला मला मुळीच अडचण पडली नाहीं. मी बरीच वर्षें भित्रा होतों; त्या वेळी माझ्या अंतःकरणांत हिंसा नांदत होती. जेव्हां मी भित्रेपणा टाकून देऊं लागलों, तेव्हांच मला अहिंसेची किंमत कळून येऊं लागली.

अहिंसा-शास्त्राचा मी फक्त एक नम्र संशोधक आहे. अज्ञात अशा तिच्या अगाधतेमुळें माझ्या सहकारी सोबत्यांप्रमाणेच मीहि कित्येक वेळां गडबडून जातों.

माझी वैयक्तिक श्रद्धा मी इतरांवर लादूं शकत नाहीं; राष्ट्रव्यापी संघटनेवर तर नाहीच नाहीं. अहिंसेचे सौंदर्य आणि तिची उपयुक्तता राष्ट्राला पटवून देण्याचाच प्रयत्न फक्त मला करतां येईल....जोंपर्यंत अहिंसेतर साधने प्रत्यक्षपणें अपायकारक किंवा घातुक ठरत नाहींत, तोंपर्यंत इतर साधनांनी राष्ट्राच्या होत असलेल्या प्रगतींत मी जर माझ्या हेकेखोरपणामुळे धोंड झालों, तर ते एक संकटच होऊन बसेल.

> उदाहरणार्थ, अगदी एकटा पडलों, तरी प्रत्यक्ष हिंसेच्या पद्धतींना विरोध करण्यासाठी मी उभें राहिले पाहिजे. परंतु राष्ट्राची अशी इच्छा असेल, तर राष्ट्राला आपलें स्वातंत्र्य प्रत्यक्ष हिंसा करूनहि प्रस्थापित करण्याचा हक्क आहे हें मी मान्य केलें आहे. मात्र मग हिंदुस्थान ही माझी जन्मभूमि असली तरी माझी भक्तिभूमि राहणार नाहीं; माझ्या आईचें पाऊल जर वाकडें पडलें, तर त्यांत मला अभिमान कसा वाटणार ?

हिंदू आणि मुसलमान दोघांनीहि डोकीं थंड ठेवून न मारतां मरण्याची हिम्मत अंगीं आणावी असें मला वाटतें; परंतु जर एकाद्याला तशी हिम्मत नसेल, तर संकटापासून भ्याडासारखें पळून जाण्यापेक्षां मारतां मारतां मरून जाण्याची कला त्यानें हस्तगत केलेली बरी. कारण, भित्रा माणूस पळून गेला तरी मानसिक हिंसा करतोच. तो पळून जातो याचें कारण मारतां मारतां मरण्याचें धैर्य त्याच्यापाशीं नसतें.

माझा अहिंसा-धर्म ही एक पराकाष्ठेची कार्यक्षम शक्ति आहे. त्यांत भित्रेपणाला अथवा दुबळेपणाला देखील वाव नाहीं. हिंसक मनुष्य कधीं ना कधीं अहिंसक बनण्याची आशा आहे; परंतु भ्याडाच्या बाबतींत ती मुळींच नाहीं. म्हणून मी पुष्कळ वेळां म्हटलें आहे, कीं जर आपणाला स्वतःचें, आपल्या स्त्रियांचें आणि पूजास्थानांचें आत्मक्लेशाच्या जोरावर म्हणजेच अहिंसेनें संरक्षण कसें करावें याचें ज्ञान नसेल, तर आपण मनुष्यप्राणी

असल्यास निदान लढाई करून तरी आपल्याला या सर्वांचें रक्षण करतां आलेंच पाहिजे.

जग हे कांहीं संपूर्णतया तर्कशास्त्राने चालत नाहीं. जीवनांत या ना त्या स्वरूपाची हिंसा येतेच; त्यांतून आपणांला कमीत कमी हिंसेचा मार्ग निवडावयाचा असतो.

स्वसंरक्षणाकरितां मारण्याचें बळ असण्याची आवश्यकता नाही; मरण्याचें बळ मात्र असले पाहिजे. जेव्हां मनुष्य मरण्याकरितां पूर्णपणें तयार होतो, तेव्हां त्याला हिंसा अंमलांत आणण्याची इच्छा देखील होत नाहीं. नव्हे, 'मारण्याची इच्छा आणि मरण्याची इच्छा याचे प्रमाण नेहमी व्यस्त असतें' असा स्वयंप्रकाशित सिद्धांतहि मला मांडतां येईल. अंतःकरणात धैर्य आणि मुखांत कळवळ्याचे उद्गार ठेवून मरण पत्करल्यामुळे आपल्या अत्याचारी प्रतिपक्ष्यांचाहि हृदयपालट करणाऱ्या माणसाच्या उदाहरणानी इतिहास भरला आहे.

मरणाला भिणाऱ्या आणि प्रतिकाराची शक्ति नसलेल्या माणसाला अहिंसा शिकविता येणार नाहीं. मांजर नेहमी उंदराला खाते म्हणून कांहीं असहाय असणारा उंदीर अहिंसक होत नाहीं. उंदराला शक्य असतं तर आपला जीव घेणाऱ्या मांजराला त्याने आनंदाने खाऊन टाकले असते; परंतु त्याची नेहमी मांजरापासून पळून जाण्याचीच धडपड चाललेली असते. त्याला आपण भ्याड म्हणत नाहीं. कारण, तो वागतो त्याहून निराळे वागण्याची निसर्गाची योजनाच नाहीं. परंतु समोर संकट ठाकलें असतां जो माणूस उंदराप्रमाणें वागतो त्याला मात्र भेकड ही यथार्थ संज्ञा मिळते. त्याच्या हृदयांत हिंसा व द्वेष भरलेली असतात आणि स्वतःला न लागतां शत्रूला ठार करणे शक्य झाले, तर तो त्याला ठार करूं इच्छितो. त्याला अहिंसेची ओळखच नसते. त्याच्यापुढें वाचलेली गीता सर्व फुकटच जाणार! शौर्य त्याच्या स्वभावाला पारखे असतं. अहिंसा त्याला समजूं लागण्यापूर्वी आपल्यावर मात करण्यास टपलेल्या आक्रमकापासून स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न करताना दृढ राहून मरणसुद्धां पत्करण्यास त्याला शिकविलें पाहिजे. असें न करणे म्हणजे त्याचा भित्रेपणा कायम ठेवण्यासारखे आणि अहिंसे-

पासून त्याला आणखी दूर नेण्यासारखे आहे. प्रत्याघात करण्याला माझी प्रत्यक्ष मदत जरी मी दिली नाही, तरी एकाद्या भेकडाला अहिंसेच्या नावाआड मी दडूंहि देणार नाही. अहिंसेत काय दम आहे तो माहीत नसल्यामुळे पुष्कळांची अशी प्रामाणिक समजूत असते, की धोका आला की त्याला प्रतिकार करण्यापेक्षा— विशेषतः त्यांत जेव्हां प्राणावर बेतण्याचा प्रसंग असतो तेव्हां— तो प्रत्येक वेळी टाळणे हा एक सद्‌गुणच आहे. अहिंसेचा शिक्षक या नात्यानें मला शक्य तोंवर या प्रकारच्या पौरुषहीन समजुतीपासून सावध राहण्याचा इषारा दिला पाहिजे.

मानवजातीच्या हातीं असलेली अहिंसा ही सर्वांत मोठी शक्ति आहे. माणसाच्या बुद्धीनें शोधून काढलेल्या संहाराच्या अत्यंत सामर्थ्यशाली अस्त्राहूनहि ती अधिक बलवान् आहे. संहार हा मानवाचा धर्म नव्हे. मनुष्य प्रसंगीं आपल्या भावाच्या हातून मरण आलें तर त्यासाठीं तयार राहूनच मोकळेपणानें जगतो, त्याला मारून नव्हे. दुसऱ्याचा केलेला खून किंवा दुखापत दुसऱ्याला केलेली कोणत्याहि कारणाकरितां कां असेना, तो मानवजातीचा गुन्हा आहे.

आत्मबलिदानाची तयारी नसेल तेथें आत्मसंरक्षण हाच एक सन्माननीय मार्ग असतो.

माणूस शरीरानें कितीहि दुबळा असो, पळून जाणें हें लाच्छनास्पद असल्यामुळे जर तो आपल्या जागीं स्थिर राहील व आपलें कर्तव्य बजावीत असताना मरण पत्करील, तर ती खरी अहिंसा व तें खरें शौर्य. माणूस कितीं का दुबळा असेना, आपल्या प्रतिपक्ष्याला जायबंदी करण्यासाठीं आपल्या अंगीं असेल नसेल तें बळ तो वापरील आणि त्यात मरून जाईल, तर त्याचें तें शौर्य खरेंच, पण ती अहिंसा नव्हे. संकटाला तोंड देणें हें कर्तव्य असतांना जर एकादा पळून जाईल, तर तो भित्रेपणा होय. पहिल्या उदाहरणात माणसाच्या अंतःकरणात प्रेम अथवा औदार्य असेल; दुसऱ्या आणि तिसऱ्या उदाहरणात अप्रीति किंवा अविश्वास आणि भय यांचा भाग असेल.

जगांतील अत्यंत थोर मनाच्या लोकांनीं जर अहिंसेचें तत्त्व अंगीं बाणवून घेतलें नाही, तर त्यांना गुंडगिरीला जुन्या मार्गानेंच तोंड द्यावें लागेल.

पण त्यामुळें एवढेंच सिद्ध होईल, कीं आपण अजून आडदांड न्यायाच्या फारसें पुढें गेलेलों नाहीं, ईश्वरानें जो वारसा आपल्याकडे दिला आहे त्याची किंमत समजून घेण्याला आपण अजून शिकलो नाही. १९०० वर्षांची खिस्त धर्माची आणि त्याहूनहि पुरातन असलेल्या हिंदु धर्माची व बौद्ध धर्माची, तशीच इस्लाम धर्माची मुद्धां शिकवण असतांनाहि माणूस म्हणून आपण कांहीं फारसें पुढें गेलेलों नाही. ज्यांची अहिंसेची वृत्तीच नाही, त्यांनी शरीरबळाचा उपयोग केला तर मी समजू शकतों. पण ज्यांना अहिंसा समजली आहे, त्यांनीं गुंडगिरीला मुद्धां अहिंसेनें तोंड दिले पाहिजे, हें दाखवून देण्याच्या बाजूने आपली सर्व शक्ति पणाला लावावी, असें माझ्या मनाला वाटतें.

जे लोक अहिंसक होऊं शकत नाहीत किंवा होऊं इच्छीत नाहीत अशांनी हाती शस्त्र घेतले आणि त्याचा प्रभावीपणे उपयोग केला, तर ते माझ्या अहिंसेंत अवश्य बसतें. मी जे हजारदां सांगितले आहे तेच पुनः सांगतो, की अहिंसा ही अत्यंत बलवानांकरितां आहे, दुर्बलांकरिता नाही.

समाज हा कांहीं अहिंसक पद्धतीवर संघटित करतां येणार नाही किंवा चालवितां येणार नाही, असें म्हणण्याचा आजकाल जो परिपाठ पडला आहे, त्याला माझा विरोध आहे. कुटुंबांत बाप अपराधी मुलाच्या थोबाडीत मारतो तेव्हां मुलाच्या मनांत उलट बापाच्या थोबाडीत मारावी असें येत नाही. तो बापाचें ऐकतों. तें कांहीं थोबाडीत मारल्याचा परिणाम म्हणून नव्हे, तर त्या मारामागे प्रेमाची भावना दुखावली गेल्याचे त्याला जाणवते म्हणून. समाजशासन कोणत्या पद्धतीने चालते हे माझ्या मते या उदाहरणांत संक्षेपाने आले. जे कुटुंबाला लागू तेंच समाजालाहि अवश्य लागू आहे; कारण, समाज म्हणजे मोठें कुटुंबच होय.

# जीवमात्राचें अद्वैत : : ११

माझें नीतिशास्त्र, फक्त वानरांशीच नव्हे, तर घोडा आणि शेळी, सिंह आणि वाघ, साप आणि विंचू यांच्याशींहि माझी स्वकीयता आहे, असा दावा करण्याला मला मुभा देतें व नुसती मुभाच देत नाहीं तर त्यांच्याशीं स्वकीयता कबूल करण्याला मला भाग पाडतें (या आप्तवर्गानें तसें मानलेंच पाहिजे असेंहि नाहीं). माझ्या जीवनावर सत्ता चालविणारें — आणि माझ्या मतें ज्याची प्रत्येक स्त्री-पुरुषावर सत्ता चालली पाहिजे असें — हें कठोर नीतिशास्त्र आमच्यावर हें एकतर्फी बंधन लादीत असतें. आणि अशा तऱ्हेचें बंधन लादण्यात आलें आहे याचें कारण मनुष्यप्राणी हाच फक्त ईश्वराची प्रतिकृति आहे. आपणांपैकीं कांहीं जणांना आपल्या या दर्ज्याची जाणीव नसते. यामुळें विशेष कांहीं फरक पडत नाहीं; फक्त एवढेंच होतें, कीं मग त्या दर्ज्याचा जो लाभ मिळावयाचा तो मिळत नाहीं. उदाहरणार्थ, मेंढ्यांच्या कळपांत वाढविलेल्या सिंहाला आपला दर्जा माहीत नसतो, त्यामुळे त्याचे फायदे त्याला मिळत नाहींत; पण कांहीं म्हटलें तरी तो दर्जा त्याचा आहे आणि ज्या क्षणीं तो आपला दर्जा ओळखतो त्याच क्षणीं तो मेंढ्यांवर आपलें राज्य चालवूं लागतो. तथापि, सिंहाचें सोंग घेतलेल्या शेळीला मात्र हा सिंहाचा दर्जा केव्हांहि प्राप्त होणें शक्य नाहीं. आणि मनुष्य हा ईश्वराची प्रतिकृति आहे हें प्रमेय सिद्ध करण्यासाठीं हरएक माणसाच्या ठिकाणीं ईश्वराचें प्रतिबिंब निर्व्याजपणें प्रकट होतें हें दाखविण्याची वस्तुतः गरज नाहीं. एका माणसाच्या बाबतींत तरी निदान तें तसें व्यक्त झालें आहे, इतकें दाखवून दिलें तरी पुरेसें आहे. आणि मानवजातींतील महान् धर्मोपदेशकांनीं स्वतःचे ठायीं ईश्वराचें रूप असल्याचें दाखवून दिलें आहे, ही गोष्ट कोणी नाकबूल करील काय?

माझ्यांत अहिंसा ओतप्रोत भरून राहिली आहे असें मी मानतों. अहिंसा आणि सत्य म्हणजे जणूं माझीं दोन फुप्फुसेंच! त्यांच्या शिवाय जगणें मला अशक्य आहे. परंतु अहिंसेचें अमर्याद सामर्थ्य आणि मानवाची अल्पता

मला प्रतिक्षणीं अधिकाधिक स्पष्टपणे दिसत आहेत. रानावनांत जाऊन राहणारा निवृत्त मनुष्य देखील अत्यंत दयाशील असला, तरी हिंसेपासून संपूर्णपणें अलिप्त राहू शकत नाही. प्रत्येक श्वासागणिक तो कांही ना कांही हिंसा करतोच. शरीर हाच मुळी एक कत्तलखाना असल्यामुळे शरीरापासून पूर्णपणे सुटण्यांतच मोक्ष व परमानंद असतो; म्हणून मोक्षाच्या आनंदाव्यतिरिक्त इतर सर्व सुखे क्षणिक व अपूर्ण असतात. अशी स्थिति असल्यामुळे रोजच्या आयुष्यांत आपल्याला हिंसेचे अनेक कडू घोट गिळावे लागतात.

एकादा कुत्रा, नव्हे, कोणताहि जिवंत प्राणी सावकाश येणाऱ्या मरणाच्या वेदना असहायपणे सहन करीत असतांना मला क्षणभरहि पाहवत नाहीं. अशाच परिस्थितीत असलेल्या मनुष्यप्राण्याला मी मारून टाकीत नाही; कारण, माझ्याजवळ त्याच्या बाबतीत अधिक गुणकारी उपाय असतात. पण तशाच परिस्थितीत सांपडलेल्या कुत्र्याला मात्र मी ठार मारलें पाहिजे. कारण, त्याच्या बाबतीत माझ्यापाशीं कांहीच उपाय नसतो. माझ्या मुलाला पिसाळलेले कुत्रे चावले व त्याला होणाऱ्या वेदना नाहीशा करण्याचे गुणकारी इलाज उपलब्ध नसतील, तर त्याचा जीव घेणें हे मी माझे कर्तव्य मानलें पाहिजे. दैववादाला देखील मर्यादा आहेत. सर्व उपाय थकल्यानंतरच आपण दैवावर हवाला ठेवतो. वेदनांनी तडफडणाऱ्या मुलाच्या यातना कमी करण्याच्या उपायांपैकीं एक आणि शेवटचा उपाय म्हणजे त्याचा जीव घेणें हा होय.

सापाच्या देखील जिवावर गदा आणून माझा जीव जगविण्याची मला इच्छा नाही. त्याला मारण्यापेक्षां तो मला चावला आणि मी मेलो तरी चालेल; परंतु असेहि होणे शक्य आहे, कीं ईश्वरानें माझी कठोर कसोटी बघण्याचे ठरवून सापाला माझ्यावर हल्ला करावयास लावला, तर मरण पत्करण्याचे धैर्य कदाचित् माझ्यांत येणार नाहीं. माझ्यांतील पशुता आपला प्रभाव गाजवील आणि या नश्वर देहाचा बचाव करण्याकरितां त्या सापाला मारावयाचाहि प्रयत्न माझ्या हातून होईल! सापांना मित्र बनविण्याची शक्ति माझ्या अंगीं यावी अशी इच्छा मला असली, तरी तसे करण्याकरितां सापाची भीति मीं पूर्णपणे सोडून दिली आहे असे छातीठोकपणे सांगण्याइतकी माझी निष्ठा माझ्यात मूर्तिमंत उतरलेली नाही. आपण विषारी, दुष्ट व पापमय

विचाराना मनांत जो थारा देतो त्यांना साप, वाघ इत्यादींच्या रूपानें ईश्वराने उत्तर दिले आहे असा माझा गाढ विश्वास आहे.... जीव तेवढे सर्व एक असा माझा विश्वास आहे. विचार हे विशिष्ट रूपांनी साकार होतात. वाघ आणि सर्प यांचे देखील आपणाशी नाते आहे. आमच्या मनात आम्ही पापी, दुष्ट व कामी विचारांना थारा देऊं नये अशी त्यांच्या रूपाने आम्हाला सूचनाच आहे म्हणाना! पृथ्वीतलावरून हिंस्र पशू व सर्प नाहीसे करावे अशी जर माझी इच्छा असेल, तर मी माझ्या मनातील विषारी विचार काढून टाकले पाहिजेत. उतावीळपणा करून अज्ञानाने आणि शरीराचे अस्तित्व वाढविण्याच्या लोभाने मी जर हिंस्र म्हटल्या जाणाऱ्या पशूंना आणि सर्पांना मारण्यास उद्युक्त होईन, तर ती माझी इच्छा पूर्ण होणार नाही. अशा हिंस्र प्राण्यांपासून स्वतःचे रक्षण करण्याचा मी प्रयत्न केला नाही आणि त्यामुळे मला मरण आले, तर पुढील जन्मी मी अधिक चागला व अधिक पूर्ण मनुष्य निपजेन. तसा विश्वास असल्यावर सर्पाच्या रूपात असणाऱ्या माझ्या बांधवाला मारण्यास मी कसा उद्युक्त होईन?

सभोवार पसरलेल्या मृत्यूंतच आपण जगत आहों आणि सत्याकडे जाणाऱ्या आपल्या मार्गावरून चाचपडत जात आहों. आमच्या आयुष्यात पावलागणिक संकटें ठेवलेली आहेत हें कदाचित् योग्यच म्हणावयाचे; कारण संकटांचे आणि आपल्या जीविताच्या अनिश्चिततेचे ज्ञान असूनहि सर्व जीवांच्या उगमस्थानाविषयी आम्ही इतके उदासीन आहों, की त्या उदासीनतेला आमच्यातील आश्चर्यकारक अहंकारच फक्त मागे टाकील.

कोणत्याहि रूपात असलेल्या कोणत्याहि जीवाची हत्या करण्याच्या बाब-तीत माझी बुद्धि बंड करून उठते; परंतु अनुभवाने मला दिसून आले, की हे प्राणी हिंस्र आहेत, यामुळे त्याना आपलेसे करण्याइतकी ताकद माझ्या हृदयात नाही. मनाला विश्वास पटविणारी भाषा प्रत्यक्ष अनुभवातूनच येते. ती माझ्या तोंडून निघत नाही; आणि जोपर्यंत साप, वाघ इत्यादींना घाबरण्या-इतका भित्रेपणा माझ्या ठिकाणी आहे, तोपर्यंत हे असेच चालणार.

शरीरातील प्राण सर्वत्र काही ना कांही हिंसेनेच जगतो व त्यामुळेंच अत्यंत श्रेष्ठ धर्माची व्याख्या 'अहिंसा' या नकारात्मक शब्दाने केलेली आहे. विनाशाच्या परंपरेनें हे जग बांधलेले आहे. किंवा हेच निराळ्या

शब्दांत सांगावयाचें, तर शरीरांत प्राण टिकण्याकरितां हिंसा ही मूलतःच आवश्यक आहे. म्हणूनच अहिंसेचा उपासक देहाच्या बंधनांतून अंतीं मुक्ति मिळावी, अशी सतत प्रार्थना करीत असतो.

या शरीरांतील जीवन टिकून राहावें या माझ्या इच्छेमुळें मी हिंसेंत सतत गुरफटला जातों, या गोष्टीची खेदकारक जाणीव मला आहे. त्यामुळेंच माझ्या या पार्थिव शरीराबद्दल मी जास्त जास्त बेफिकीर बनत चाललों आहें. उदाहरणार्थ, श्वासोच्छ्वास करीत असतांना हवेंत तरंगणाऱ्या असंख्य सूक्ष्म जंतूंची मी हत्या करीत असतो हे मला माहीत आहे; पण म्हणून कांहीं मी श्वासोच्छ्वास करणें थांबवीत नाहीं. भाजीपाला खाण्यांतहि हिंसा आहेच. परंतु तो मला सोडून देतां येत नाहीं, असें मला दिसून येतें. त्याचप्रमाणें जंतुविनाशक द्रव्यांच्या उपयोगांतहि हिंसा आहेच, तरी देखील डांस वगैरेंच्या संसर्गामुळें पसरणाऱ्या रोगांपासून मुक्त होण्याकरितां घासलेट वगैरे सारख्या रोगप्रतिबंधक द्रव्यांचा उपयोग वर्ज्य करण्याला माझें मन घेत नाहीं. आश्रमांत साप दिसले की ते पकडून दूर सोडून देणें जेव्हां अशक्य असेल, तेव्हां त्यांना मारून टाकणेंहि मी खपवून घेतों. आश्रमांत बैलांना हांकण्यां-साठी काठीचा केलेला उपयोग देखील मी सहन करतों. अशा तऱ्हेनें मी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष करीत असलेल्या हिंसेला अंतच नाहीं! अत्यंत नम्रपणे हे मी कबूल करतों. त्यामुळें मी बिघडलों असे समजून मित्र जर माझा त्याग करण्याचे ठरवितील तर त्याबद्दल मला दुःख होईल; परतु म्हणून अहिंसेच्या आचरणांतील माझ्या उणिवा दडवून ठेवण्यास मात्र मी कधीहि प्रवृत्त होणार नाहीं. मी माझ्या बाबतीत एवढेंच म्हणतों, कीं अहिंसेसारख्या महान् आदर्शाचा अभिप्रेत अर्थ समजून घेण्याचा आणि ते आदर्श विचार, उच्चार व आचार यांमध्यें उतरविण्याचा माझा अखंड प्रयत्न आहे आणि माझ्या समजुतीप्रमाणें त्यांत मला थोडेंफार यशहि मिळत आहे. परंतु या मार्गावरील फार मोठा टप्पा मला अजून गांठावयाचा आहे, याचीहि जाणीव मला आहे.

मानवी जीव कितीहि मूल्यवान् असला तरी तो वांचविण्यासाठी जशी मी गायीची हत्या करणार नाहीं, तशीच गायीचें संरक्षण करण्यासाठी मी मानवी जीवाचीहि हत्या करणार नाहीं.

माझें खरोखर असें मत आहे, की क्षुल्लक कारणावरून माणसाला ठार मारण्याच्या माणसाच्या संवयीमुळे त्याच्या बुद्धीवर पटल आले आहे; तो दुसऱ्याच्या जिवाशीं वाटेल तसा खेळ खेळतो; पण ईश्वर हा प्रेमाने आणि दयेने भरलेला आहे असे जर तो खरोखर समजत असता, तर कोणाचाहि जीव घेतांना त्याच्या अंगावर शहारेच आले असते! कसेहि असो, जरी मरणाच्या भयानें मी वाघ, सर्प, माश्या, डांस वगैरे प्राणी मारीत असलों, तरी मृत्यूचे सर्व भय झडून जावे आणि अशा तऱ्हेने हत्या करणे टळून अधिक चांगल्या मार्गाचे ज्ञान देणारा प्रकाश मला दिसावा अशी प्रार्थना मी सतत करीत असतों. कारण,

दयेचा दाता सर्वशक्तिमंत ।
शिकवण देत दया द्याया ॥

## विच्छेदन

सर्वसाधारणपणे विज्ञानाच्या प्रगतीला माझा विरोध नाहीं. उलट, पाश्चात्यांची शास्त्रीय वृत्ति मला गौरवास्पदच वाटते. पण जर त्या गौरवाला कशाने गालबोट लागत असेल, तर ते पाश्चात्य शास्त्रज्ञ ईश्वराने निर्मिलेल्या मानवेतर प्राण्याना खिसगणतीतच धरीत नाहीत यामुळे. विच्छेदनाचा मला अगदी मनापासून तिटकारा आहे. विज्ञानाच्या आणि जिला मानवता म्हणतात तिच्या नांवावर निरपराधी जीवांची अक्षम्य हत्या करण्याची मला शिसारी येते! आणि निरपराधी रक्ताने दूषित झालेले सर्व शास्त्रीय शोध मला कवडीमोलाचे वाटतात. विच्छेदनाखेरीज रुधिराभिसरणाच्या सिद्धाताचा शोध लागला नसता, तर मानवजातीचे काही अडले असंत असे नाही. उदारवृत्तीचे पाश्चात्य शास्त्रज्ञ ज्ञानसंशोधनाच्या हल्लीच्या पद्धतीवर बंधन घालतील असा दिवस उजाडत असलेला मला स्पष्ट दिसत आहे. भविष्यकालीन आदर्श फक्त मानवी कुटुंबाचाच विचार करतील असे नव्हे; तर ते जीवमात्राकडे लक्ष पुरवितील. आम्हांला आज हळूहळू कां होईना पण निश्चितपणें अशी प्रतीति येत आहे, की आपल्यांतीलच ! लोकांना कायमचे हीन ठेवून हिंदूंची भरभराट होईल ही समजूत, तशीच पूर्वेकडील व आफ्रिकेतील राष्ट्रांची पिळवणूक करून व त्यांना हीन ठेवून पाश्चात्यांचा उत्कर्ष होईल

अथवा ते जगूं शकतील हीहि समजूत, चुकीची आहे. हें जसें आज आढळून येत आहे, तसेंच वेळ आली म्हणजे आम्हांला हेंहि समजून येईल, कीं सृष्टीमधील तिर्यग् योनींतील जीवांवर असलेली आपली सत्ता त्यांच्या हत्येसाठीं नसून आम्ही आपल्या बरोबरीनें त्यांचेंहि कल्याण साधावें यासाठीं आहे. कारण, मला जसा आत्मा आहे, तसा त्यांनाहि आहे याविषयीं माझी खात्री आहे.

## शांतिकालांतील व युद्धकालांतील अहिंसा : ११

अहिंसक माणसाला हिंसेवर आधारलेल्या पद्धतींत समाविष्ट होण्याखेरीज गत्यंतरच नसेल, तर तो त्यांत अप्रत्यक्षपणें सहभागी होण्यापेक्षां प्रत्यक्ष सहभागी होणें स्वभावतःच पसंत करील. अंशतः हिंसेवर आधारलेल्या जगाचा मी एक भाग आहे. माझ्या शेजाऱ्यांना मारण्याकरितां लष्करांतील सैनिकांना पैसे देणें अथवा स्वतः सैनिक म्हणून दाखल होणें हे दोनच पर्याय माझ्यापुढें असतील, तर मी सैनिक म्हणून नांव दाखल करीन. त्यायोगें हिंसेच्या शक्तीवर मला नियंत्रण ठेवतां येईल आणि माझ्या सोबत्याच्या अंतःकरणांत मला पालटहि घडवून आणतां येईल, ही आशा मला राहील. हें माझ्या तत्त्वप्रणालीस सुसंगत असेंच आहे, आणि तेंच मीं केलें पाहिजे.

राष्ट्रीय स्वातंत्र्य ही एक नुसतीच कल्पना नाही. व्यक्तीच्या स्वातंत्र्याइतकेंच तेंहि आवश्यक आहे; परंतु दोन्ही स्वातंत्र्यें जर अहिंसेवर आधारलेलीं असतील, तर त्यांतील कोणत्याहि स्वातंत्र्यानें राष्ट्राच्या अथवा व्यक्तीच्या, जशी परिस्थिति असेल त्या प्रकारच्या स्वातंत्र्याला कधी धोका येण्याचें कारणच नाही. जे व्यक्तिगत आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याबद्दल म्हटलें, तेंच आंतरराष्ट्रीय स्वातंत्र्यालाहि लागू आहे. 'आपल्या मालमत्तेचा अशा रीतीनें

उपभोग घ्या, की त्यायोगें दुसऱ्यांच्या हक्कांना धक्का पोचणार नाहीं' हें कायद्याचें वचन नीतिलाहि तितकेंच धरून आहे. 'जे पिंडीं ते ब्रह्मांडीं' असे म्हटले आहे ते योग्य आहे. पिंडासाठीं एक आणि ब्रह्मांडासाठीं वेगळा असा नियम नाहीं.

लष्करी नोकरी नाकारणे एवढेंच पुरेसे नाहीं. विशिष्ट वेळ आली म्हणजे लष्करी नोकरी करण्याला नाहीं म्हणणें म्हणजे दुष्प्रवृत्तींशीं झगडा करण्याची वेळ जवळजवळ निघून गेल्यानंतर जागे होण्यासारखें आहे. लष्करी नोकरी हें खोलवर रुजलेल्या रोगाचें नुसतें बाह्य लक्षण आहे. माझे असे सांगणें आहे, की लष्करांत दाखल न झालेले लोक देखील, जर ते अन्य प्रकारें सरकारला पाठिंबा देत असतील, तर तितकेच गुन्ह्यात सामील आहेत. लष्करी पद्धतीनें संघटित झालेल्या राज्यसंस्थेला जो पुरुष अथवा स्त्री आपला पाठिंबा प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे देतो किंवा देते तो अथवा ती त्या पापांत भागीदार होतो अगर होते. कर देऊन राज्य टिकविण्याला हातभार लावण्यानें प्रत्येक आबालवृद्ध स्त्री-पुरुष या पापात सहभागी होत असतात. म्हणूनच युद्ध चालू असताना मी स्वतःशीं असा विचार केला, की जोपर्यंत मी स्वतः सैनिक होण्याव्यतिरिक्त इतर कांहींहि करण्याचें बाकी ठेवीत नाहीं आणि लष्करानें संरक्षण केलेला गहूं खातों, तोपर्यंत सैन्यात भरती व्हावें आणि गोळी खाऊन मरून जावें हे माझ्या बाबतींत उत्तम; नाहीं तर मी गिरिकंदरांत जाऊन निसर्गानें निर्माण केलेलें अन्न तरी खाऊन राहिलें पाहिजे. म्हणून ज्यांना लष्करी खातें बंद पाडावयाचें आहे त्यांना सरकारशीं असलेले आपले सर्व सहकार्य काढून घेऊनच तसें करता येईल. राज्यसंस्थेला आधार देणाऱ्या सबंध राज्यपद्धतीशीं असहकार करण्याच्या मानानें लष्करांत काम करण्यास नकार देणे हा अगदीं वरवरचा उपाय आहे. पण मग असा हा आपला विरोध इतका तडकाफडकीचा आणि प्रभावी होतो, की आपल्या-वर तुरुगांत जाण्याची पाळी येते; इतकेंच नव्हे, तर घरादाराला मुकण्याचा देखील धोका आपल्याला पत्करावा लागतो.

जेव्हा दोन राष्ट्रें लढत असतील तेव्हा अहिंसेच्या उपासकांचें कर्तव्य ती लढाई थांबविणें हें आहे. जो हें कर्तव्य पार पाडण्याला पुरा पडत नाहीं, लढाईला प्रतिरोध करण्याची ज्याच्यांत शक्ति नाहीं, लढाई बंद पाडण्याची

ज्याची लॅयकी नाहीं, त्यानें खुशाल लढाईत भाग घ्यावा ! आणि तरीहि लढाईपासून स्वतःची, आपल्या राष्ट्राची आणि जगाची सुटका करण्याचा मनापासून प्रयत्न करावा.

'रेडक्रॉस'चें ( जखमी शिपायांच्या सेवाशुश्रूषेचे ) काम करणारे आणि संहाराच्या शस्त्रास्त्रांचा उपयोग करणारे यांत मी कसलाच भेद करीत नाहीं. दोघेहि लढाईतच भाग घेतात आणि लढाईचेच कार्य पुढे चालवितात. युद्ध करण्याच्या गुन्ह्याचे दोघेहि धनी आहेत. परंतु इतक्या वर्षांच्या आत्म-निरीक्षणानंतर देखील मला असें वाटतें, की ज्या परिस्थितीत मी सांपडलों त्या परिस्थितीत जो मार्ग मीं बोअर-युद्धाच्या आणि पहिल्या युरोपीय महायुद्धाच्या वेळी, इतकेच नव्हे, तर १९०६ साली नाताळ येथें झालेल्या झुलू 'बंडा'च्या वेळीहि पत्करला होता, तोच पत्करणें मला भाग होतें.

जीवनाचे नियंत्रण अनेक शक्तींच्या समुच्चयानें होत असतें. ज्या सिद्धान्ताचा अवलंब अमुक एका विवक्षित प्रसंगी करावा की न करावा याला एका क्षणाचाहि विचार करण्याची जरुरी पडणार नाही, अशा एकाद्या सर्वसामान्य सिद्धान्तालाच धरून जर आपल्या वागणुकीची दिशा आपल्याला ठरवितां आली तर किती तरी सुरळीत चालेल; परंतु इतक्या सहज रीतीनें ठरवितां आली आहे, अशी एकहि प्रवृत्ति माझ्या लक्षांत येत नाही.

मी निष्ठावंत युद्धविरोधक असल्याने संहारक शस्त्रास्त्रें वापरण्याचे शिक्षण घेण्याची संधि प्राप्त झालेली असतांनाहि मी ते शिक्षण कधींहि घेतले नाही. कदाचित् त्यायोगानेंच मी प्रत्यक्ष मानवी जीवांच्या संहारापासून अलिप्त राहूं शकलों असेन; परंतु जोंपर्यंत मी पाशवी सामर्थ्यावर आधारलेल्या राज्यपद्धतीत राहतो आणि त्या पद्धतीमुळें मिळणारे अनेक हक्क व लाभणाऱ्या नाना सुखसोयी यांचा स्वखुषीनें उपभोग घेतों, तोंपर्यंत ते सरकार युद्धांत गुंतलें असतांना माझ्या शक्तीप्रमाणे मी त्याला मदत करणे हेच माझे कर्तव्य. त्या सरकारशी मी असहकार केला आणि त्याच्याकडून मिळणारे हक्क सोडतां येतील तितके सोडले, तर मात्र गोष्ट वेगळी.

आपण एक उदाहरण घेऊं. मी एका संस्थेचा सभासद आहें. त्या संस्थेची कांहीं एकर जमीन आहे. त्या जमिनीत येणाऱ्या पिकांना माकडां-

पासून फार मोठा धोका उत्पन्न झाला आहे. जीवमात्र पवित्र असे मी मानतों, त्यामुळे माकडांना दुखापत करणें हा मी अहिंसेचा भंग समजतो. परंतु पिकांचे संरक्षण करण्यासाठी माकडांवर हल्ला करण्यास प्रवृत्त करण्याला अथवा त्या हल्ल्याचे मार्गदर्शन करण्याला मी कचरणार नाही. ही अनिष्ट गोष्ट टळली तर बरें असे मला वाटेल. ती संस्था सोडून जाण्याने अथवा ती मोडून टाकण्याने मला तें टाळता येईल. परतु मी तसे करीत नाही. कारण, 'शेती नाही आणि म्हणून कोणत्याहि स्वरूपाची जीवहत्याहि नाही' अशा तऱ्हेचा समाज आढळण्याची शक्यता मला दिसत नाही. म्हणून भयविह्वल होऊन विनम्र भावाने व प्रायश्चित्तयुक्त अंतःकरणाने माकडाना करावयाच्या दुखापतीत मी सहभागी होतो. पण तसे करीत असतांनाहि एक दिवस यातून मार्ग सांपडेल अशी आशा मी बाळगीत असतो.

तीनहि युद्धांत मी याच भावनेने सामील झालो. मी ज्या समाजाचा घटक आहे त्या समाजाशी असलेले माझे सबंध तोडून टाकणे मला शक्य नव्हतें; तसे करणे वेडेपणाचे ठरले असते. आणि वरील तिन्ही प्रसंगी ब्रिटिश सरकारबरोबर असहकार करण्याचा विचार माझ्या मनात नव्हताच. आज त्या सरकारबद्दलची माझी भूमिका सर्वस्वी भिन्न आहे; म्हणून मी स्वखुषीने या सरकारच्या युद्धात भाग घेता कामा नये आणि माझ्यावर सैन्यांत दाखल होण्याची अथवा अन्य प्रकारे युद्धकार्यात मदत करण्याची सक्ती करण्यात आली, तर कारावासाचाच नव्हे, तर फाशी जाण्याचाहि धोका मी पत्करला पाहिजे.

परंतु त्यामुळे कोडे सुटत नाहीच. राष्ट्रीय सरकार अस्तित्वात असते तर व्यक्तिशः मी कोणत्याहि युद्धांत प्रत्यक्ष भाग घेणारा नसलो, तरी ज्याना लष्करी शिक्षण घेण्याची इच्छा असेल त्याना ते देण्याच्या बाजूने मत देणे, हें माझे कर्तव्य ठरले असते. अशा परिस्थितीची कल्पना मी करू शकतो. कारण, माझा अहिंसेवर जितका विश्वास आहे तितका समाजांतील सर्वच व्यक्तीचा असणार नाही हे मला माहीत आहे. एकाद्या व्यक्तीला अथवा समाजाला सक्तीने अहिंसक बनविणे शक्य नाही.

अहिंसा अत्यंत गूढपणे आपले कार्य करीत असते. पुष्कळ वेळां माणसाच्या कृतीचे अहिंसेच्या संबंधांत पृथक्करण करणें शक्यच होत नाहीं;

त्याचप्रमाणें कित्येक वेळां तो अगदी पूर्णांशाने अहिंसक असतांना आणि कालांतरानें त्याचें वर्तन अहिंसक असल्याचें सिद्ध झालें, तरी त्याचीं कृत्यें मात्र पुष्कळ वेळां हिंसक स्वरूपाचीं असल्यासारखीं भासतात. तेव्हां माझ्या वागणुकीबद्दल मी इतकेंच म्हणूं शकेन, कीं ज्या उदाहरणांचा मी वर उल्लेख केला त्या त्या बाबतींत त्यामुळें अहिंसेचाच पुरस्कार होईल असें मला वाटलें, म्हणूनच मी तसा वागलों. दुसऱ्या कोणत्या तरी हिताचा बळी देऊन क्षुद्र असा राष्ट्रीय वा अन्य कसला तरी स्वार्थ साधून घेण्याचा विचार त्या माझ्या वर्तनाच्या बुडाशीं नव्हता.

अहिंसेकडे केवळ एक दार्शनिक सिद्धान्त म्हणून मी पहात नाहीं. ती माझ्या जीवनाचा धर्म बनली आहे. अनेक वेळां माझ्याकडून चुका होतात हे मी जाणतों. कांहीं वेळां त्या जाणून होतात, पुष्कळ वेळां अजाणतां होतात. हा विषय बुद्धीचा नसून भावनेचा आहे. ईश्वरावर सतत विसंबून राहून अतिशय नम्रतापूर्वक आत्मसंयमन करून व आत्मत्यागाची सतत सिद्धता ठेवूनच खरें मार्गदर्शन लाभतें. अहिंसेचा आचार करावयाचा म्हणजे निर्भय झालें पाहिजे, अत्यंत श्रेष्ठ प्रतीचें धैर्य अंगीं असलें पाहिजे. माझ्यांतील उणिवाची मला खेदकारक जाणीव आहे.

परंतु अंतरातील प्रकाशज्योति संथ आहे, स्पष्ट आहे. ‘ सत्य आणि अहिंसा ’ या मार्गाखेरीज आपल्यापैकीं कोणालाच तरणोपाय नाहीं. युद्ध अयोग्य आहे, तें एक भयंकर संकट आहे, हे मी जाणतों. तें नाहींसें झालें पाहिजे याचीहि मला जाणीव आहे. माझा असा दृढ विश्वास आहे, कीं रक्तपात अथवा कपट करून मिळविलेलें स्वातंत्र्य हें खरें स्वातंत्र्यच नव्हे. ... हिंसा नव्हे, असत्यहि नव्हे, तर अहिंसा व सत्य हीच आपली प्रकृति आहे.

युद्ध हे एक निव्वळ पाप आहे अशी माझी ठाम समजूत आहे. युद्धाचा तिटकारा वाटण्यांत मी कोणालाहि हार जाणार नाहीं; परंतु एखाद्या गोष्टी-बद्दल निष्ठा असणें निराळें आणि तिचें बिनचूक आचरण करणें निराळें. एखादा युद्धविरोधक आपल्या कार्याच्या सिद्ध्यर्थ जी गोष्ट करील, ती दुसऱ्या युद्धविरोधकाला कदाचित् तिरस्करणीय वाटेल; तो बरोबर तिच्या विरुद्ध गोष्ट करील आणि तरी देखील त्या दोघांचेंहि युद्धाबाबतचे मत एकच असूं शकेल. मनुष्यस्वभावांत गोंधळ उत्पन्न करणारी जी एक गुंतागुंत आहे,

तिच्यामुळें ही विसंगति निर्माण होते. म्हणून एकच तत्त्वप्रणाली मानणाऱ्यांमध्यें-सुद्धां परस्परांविषयी सहिष्णुता असावी एवढेच मी कळकळीनें सांगू शकेन.

अहिंसा ही कांही समजण्याला सोपी गोष्ट नाही आणि आपण दुर्बल असल्यामुळे ती अंमलांत आणणे तर अधिकच कठिण आहे. आपण सर्वांनी प्रार्थनायुक्त अतःकरणानें, नम्रभावाने आणि आपल्या बुद्धीचे डोळे उघडण्याविषयी सदोदित ईश्वराची करुणा भाकीत वागले पाहिजे आणि रोज जो प्रकाश मिळेल त्याला अनुसरून वर्तन ठेवण्याची तयारी केली पाहिजे. म्हणून शांततेचा भक्त व पुरस्कर्ता या नात्याने माझे काम हेच आहे, की आपलें स्वातंत्र्य मिळविण्याची मोहीम चालवीत असताना मी अहिंसेवर अढळ श्रद्धा ठेवली पाहिजे आणि अशा रीतीने आपले स्वातंत्र्य संपादन करण्यात जर हिंदुस्थानला यश आले, तर जागतिक शांततेच्या प्रस्थापनेला फार मोठा लाभ होईल.

व्यक्तिशः मला असे वाटते, की महाभारतांतील कल्पित युद्धाचा अंत जसा झाला, तसाच या विराट् युद्धाचाहि शेवट होणार आहे. ' मानवाचा शाश्वत इतिहास ' असे महाभारताचे यथार्थ वर्णन त्रावणकोरच्या एका गृहस्थाने केले आहे. त्या महाकाव्यांत जे वर्णिले आहे तेच आज आपल्या डोळ्यासमोर घडत आहे. युद्धयमान राष्ट्रे अशा कांही त्वेषाने आणि क्रौर्यानें एकमेकाचा संहार करीत आहेत, की अती ती परस्पराना खलास करतील. उरलेल्या पांडवांच्या नशिबी जे आले तेच या युद्धातील जेत्याच्याहि वाट्याला येणार आहे. अर्जुनासारख्या पराक्रमी योद्धयाला एका सामान्य चोराने दिवसा ढवळ्या लुटले ! या प्रचंड प्राणयज्ञामधूनच पिळल्या जाणाऱ्या व रखणाऱ्या कोट्यवधि लोकांना फार काळापासूनच्या ज्या नवयुगाची तहान लागलेली आहे ते नवयुग निर्माण होणार आहे. शांतिप्रेमी लोकांची प्रार्थना वायां जाणार नाही. सत्याग्रह ही व्यथित हृदयाची मूक प्रार्थनाच आहे, यात काडीमात्र शंका नाही.

## शांततेचें रहस्य

आतरराष्ट्रीय घडामोडींत प्रेमाच्या सिद्धांताला मान्यता मिळण्यास कदाचित् बराच काळ लोटावा लागेल. सरकारी राज्ययंत्रे मध्ये पडून एका राष्ट्रां-

तील जनतेचीं अंतःकरणें दुसऱ्या राष्ट्रांतील जनतेच्या अंतःकरणांपासून छपवून ठेवतांत, तरी देखील व्यक्तीव्यक्तींतल्याप्रमाणेंच राष्ट्राराष्ट्रांतीलहि प्रश्न सोडविण्याच्या कामीं पाशवी सामर्थ्य कसे अयशस्वी ठरले आहे आणि असहकारांत प्रतिपक्षाला आर्थिक बाबतींत वांकविण्याचें जें सामर्थ्य आहे तें लष्करें आणि आरमारें यांच्याहून किती तरी पटींनी कसें बलवत्तर आहे, हें जगाला हळूहळू पटत चालल्याचें आपल्याला दिसत आहे.

जोंपर्यंत नवीन शक्ति आपल्या सर्व सामग्रीसह सज्ज होऊन रुळाला लागलेली नाहीं, तोंपर्यंत जुन्या शक्तीचे अध्वर्यू नवीन गोष्टीला तात्त्विक, अव्यवहार्य, ध्येयवादी वगैरे समजूनच वागविणार ! राष्ट्राराष्ट्रांमध्यें प्रेमाचे संबंध जोडणाऱ्या तारा उभ्या करण्यास कदाचित् बराच काळ लागण्याचा संभव आहे, परंतु एकसारखे पाशवी सामर्थ्य वापरून बळजोरी करण्यापेक्षां आंतरराष्ट्रीय असहकारातून निर्माण होणारें बळ अधिक पसंत केलें जात आहे, ही गोष्ट शेवटच्या न्याय्य निकाल लागण्याच्या दिशेनें निश्चित प्रगतिकारक आहे, हे स्पष्ट आहे.

शाश्वत शांतीच्या शक्यतेवर अविश्वास दाखविणें म्हणजे मनुष्यस्वभावातील धर्मबुद्धीवरच अविश्वास दाखविणें होय—आजपर्यंत अवलंबिण्यांत आलेले मार्ग अयशस्वी झाले याचें कारण हें की, ज्यांनी त्यासाठीं धडपड केली त्यांच्यांतच मुळीं अविचल श्रद्धेचा अभाव होता ! तथापि, त्यांना या अभावाची जाणीव झालेली आहे असे मात्र नाहीं. ज्याप्रमाणें एकादें रासायनिक मिश्रण सिद्ध होण्यासाठीं अवश्य असणाऱ्या सर्व अटी पुऱ्या केल्याखेरीज ते पूर्ण होत नाहीं, त्याचप्रमाणें केवळ कांहीं अटी पूर्ण केल्यानें शांतता प्रस्थापित होऊं शकत नाहीं. विनाशाच्या साधनांवर ज्यांचा ताबा आहे असे मानवजातीचे मान्यता पावलेले पुढारी जर त्या साधनांचा सर्वस्वी त्याग करतील आणि तोहि त्यांत अभिप्रेत असणारा अर्थ पूर्णपणे लक्षांत घेऊन करतील, तरच शाश्वत शांति साध्य करून घेतां येईल. अर्थातच हें जगांतील बड्या राष्ट्रांनीं आपल्या साम्राज्यवादी हेतूंचा त्याग केल्याखेरीज शक्य होणार नाहीं, हें उघड आहे. आणि बड्या राष्ट्रांनीं माणुसकी नष्ट करणाऱ्या चढाओढीवर असलेला आपला विश्वास सोडून दिला नाहीं आणि गरजा वाढविण्याच्या व त्यासाठीं आपली भौतिक मालमत्ता वाढविण्याच्या लोभाला आळा घातला

नाहीं, तर ही गोष्टहि शक्य होईल असे वाटत नाही. माझी अशी पक्की खात्री आहे, की या साऱ्या अनर्थांचें मूळ ईश्वराच्या अस्तित्वाबाबत असलेला जिवंत श्रद्धेचा अभाव हेंच आहे. येशूच्या संदेशावर आपला विश्वास आहे; 'खिस्त' म्हणजे 'शांतिसम्राट्' असे जे लोक म्हणतात तेच प्रत्यक्ष आचरणांत मात्र तो विश्वास यत्किंचितहि दाखवीत नाहीत हें मनुष्यजातीचें मोठ्यांत मोठें दुर्दैव होय! निष्ठावंत खिस्ती धर्माधिकारी येशूच्या संदेशाची व्याप्ति कांहीं निवडक व्यक्तीपुरतीच मर्यादित करतात हे पाहून दुःख होतें. क्षुद्रांतल्या क्षुद्र मानवाला देखील मानवजातीचे प्राथमिक सद्गुण अंगीं बाणवून घेणें शक्य आहे, ही गोष्ट मला लहानपणापासून शिकवण्यांत आली आहे आणि अनुभवानें मी तिची सत्यताहि पारखली आहे. हीच सर्वत्र लागू होणारी निःशंक शक्यता आहे म्हणूनच ईश्वराच्या इतर सृष्टीहून मनुष्यप्राणी वेगळा म्हणून ओळखला जातो. एका राष्ट्रानें का होईना जर त्यागाचें हें श्रेष्ठ कर्म मनांत कांहीं न ठेवता केलें, तर आपण पुष्कळ जण 'याच देहीं याच डोळा' शांतता दृश्य स्वरूपांत प्रस्थापित झालेली पाहूं.

बडीं राष्ट्रें हिंमत धरून आपल्या शस्त्रांचा त्याग करण्याचें ठरवीत नाहींत, तोंपर्यंत शांततेचा उदय कधींहि होणार नाही. मला असें वाटतें कीं, अलीकडील घटनांमुळे ही गोष्ट बड्या राष्ट्रांना मान्य करण्याखेरीज गत्यंतर राहणार नाहीं. अहिंसेमुळेच काय तो मानवजातीचा विनाश टळेल अशी माझी दृढ श्रद्धा आहे. ही श्रद्धा अहिंसेचें जें मी पन्नास वर्षे अखंड पालन केलें त्याच्या अनुभवानें आज पूर्वीपेक्षांहि अधिक उजळ झाली आहे.

## निःशस्त्रीकरण

राष्ट्रांराष्ट्रांच्या संबंधांत देखील अहिंसेचें तत्त्व लागू पडतें असें मी खात्रीपूर्वक सांगतों. गेल्या महायुद्धाचा उल्लेख जर मी केला, तर एका नाजूक गोष्टीला हात घातल्यासारखें होईल, याची मला जाणीव आहे. परंतु भूमिका काय आहे हे स्पष्ट करण्याकरितां हे अवश्य आहे असें मला वाटतें. मागचें महायुद्ध हे 'तूं मोठा की मी मोठा?' याबद्दलचेंच युद्ध होतें अशी माझी समजूत आहे. दुबळ्या लोकांना पिळून मिळविलेल्या

लुटीच्या वांट्यासाठी ते युद्ध होते. यालाच 'जागतिक व्यापार' असें गोंडस नांव दिलेलें होतें. युरोपांतील कोणत्या तरी राष्ट्राने छाती करून अगोदर स्वतः निःशस्त्र झाले पाहिजे आणि मोठ्या धोक्याचा संभव पत्करला पाहिजे, तरच युरोपांत सार्वत्रिक निःशस्त्रीकरणाला सुरवात होते असें दिसून येईल. युरोपला आत्मनाश करून घ्यावयाचा नसेल तर निःशस्त्रीकरण हे केव्हां ना केव्हां झालेंच पाहिजे. जर सुदैवाने एकाद्या राष्ट्राने स्वतःचें निःशस्त्रीकरण केलें, तर त्या राष्ट्रांतील अहिंसेची पातळी साहजिकपणेंच इतकी वाढलेली असेल, कीं तें राष्ट्र सर्वच जगाच्या आदराला पात्र झालेलें असेल. त्या राष्ट्राची निर्णयबुद्धि बिनचूक असेल, निर्णय ठाम असतील, त्या राष्ट्राची शौर्यपूर्ण आत्मत्यागाची कुवत मोठी असेल आणि जितकी स्वतःकरितां तितकीच इतर राष्ट्रांकरिताहि जगण्याची त्याची इच्छा असेल.

अफूच्या उत्पादनाप्रमाणेंच जगातील शस्त्रास्त्राच्या उत्पादनावरहि नियंत्रण ठेवण्याची जरुरी आहे. जगात अफूपेक्षां शस्त्रास्त्रेंच दुःखाला अधिक कारण असण्याचा संभव आहे. युद्धामध्ये जर इतर भरपाई करणारे गुण नसते, त्यांत जर शौर्य, धैर्य, कांही नसते, तर युद्ध ही वस्तु तिरस्करणीय ठरली असती आणि ते नाहीसे करण्यासाठी व्याख्यानांची जरुरीच पडली नसती; परंतु मी जे कांही तुम्हांला सुचविणार आहे, ते युद्धाची जेवढी म्हणून अंगें आहेत— यांत रेडक्रॉस-संघटनाहि येते— त्या सर्वांपेक्षां अनंत पटींनीं उदात्त असे आहे. जगांत कोट्यवधि लोक कैदी आहेत, स्वतःच्या विकारांचे आणि जीवनाच्या परिस्थितीचे गुलाम बनलेले आहेत, स्वतःच्या मूर्खपणामुळें घायाळ झालेलेहि कोडो लोक आहेत आणि धूळधाण उडलेली लाखो घरें आहेत, हे मी तुम्हांला सांगतो त्यावर विश्वास ठेवा. म्हणून उद्यांच्या शांति-प्रस्थापक संस्था जेव्हां आंतरराष्ट्रीय सेवाकार्य अंगावर घेतील तेव्हां त्यांच्याकरितां फार मोठे कार्य वाढून ठेवलेलें असेल.

एका स्विस् गृहस्थानें प्रश्न विचारला:—निःशस्त्रीकरण हे प्राधान्येंकरून बड्या राष्ट्रांवर अवलंबून असल्याकारणानें स्वित्झर्लंडसारख्या छोट्या व तटस्थ राष्ट्राला निःशस्त्र होण्यास सांगण्याचे कारण काय?

उत्तर:—तुमच्या राष्ट्राची भूमिका तटस्थाची आहे हें गृहित धरूनच मी इतर सर्व राष्ट्रांना उद्देशून बोलत आहे— फक्त स्वित्झर्लंडलाच नव्हे. युरोपां-

तील इतर भागांत जर हा संदेश तुम्ही नेला नाही, तर माझ्याकडे काही दोष राहणार नाही. स्वित्झर्लंड हे तटस्थ आणि आक्रमण न करणारे राष्ट्र असल्यामुळे त्याला तर सैन्याची जरूर भासू नये हे जास्तच सयुक्तिक आहे. दुसरे असे की, तुमची आतिथ्यशीलता आणि तुमचा देश वसला आहे ती मोक्याची जागा यामुळे निरनिराळ्या राष्ट्रांतील लोक तुमच्याकडे येतात. जगाला निःशस्त्रीकरणाचा धडा देणे तुम्हाला शक्य झाले पाहिजे आणि तुम्ही दाखवून दिले पाहिजे, की सैन्यावाचूनहि कारभार चालविण्याइतके शूर आम्ही आहो.

प्रश्न:—निःशस्त्र असलेल्या एकाद्या तटस्थ राष्ट्राने इतर राष्ट्राचा नाश कसा होऊं द्यावा? गेल्या युद्धाच्या वेळी जय्यत तयारीनिशी सरहद्दीवर खडी असणारी सैन्ये आमच्यापाशी नसती, तर आमची धूळधाण झाली नसती का?

उत्तर:—मला कोणी शेख महंमद किंवा मूर्ख म्हटले तरी ते पत्करूनहि मला माहीत आहे त्या पद्धतीनेच या प्रश्नाचे उत्तर मला दिले पाहिजे. तटस्थ राष्ट्र जर एकाद्या सैन्याला शेजारच्या राष्ट्राची नासधूस करू देईल, तर तो भ्याडपणा होईल. परंतु सशस्त्र सैनिक आणि अहिंसेचे सैनिक यांच्यांत दोन मार्ग समान आहेत. मी जर स्वित्झर्लंडचा नागरिक आणि फेडरल स्टेटचा अध्यक्ष असतो, तर आक्रमक सैन्याला कसल्याहि प्रकारचा पुरवठा करण्याचे नाकारून मी त्या सैन्याला प्रवेशबंदी केली असती; दुसरे म्हणजे स्वित्झर्लंडमध्ये दुसरी थर्मापिली करून तुम्हांला स्त्रिया, पुरुष व मुले यांची जिवंत भिंत उभी करता आली असती व आक्रमक फौजांना ‘आमच्या प्रेतावरून जा’ असे आव्हान देता आले असते. ही गोष्ट मानवी अनुभवाच्या व सहनशक्तीच्या पलीकडची आहे असे तुम्ही म्हणाल; पण ती तशी नाहीं असे मी सांगतो. ते सहज शक्य झाले असते. गेल्या वर्षी गुजरातमध्यें स्त्रियांनी न डगमगतां लाठीहल्ल्याला तोंड दिले आणि पेशावरमध्ये हजारों लोकांनी हिंसेचा अवलंब न करतां गोळ्यांचा वर्षाव सहन केला. दुसऱ्या देशात जाण्यासाठी सुरक्षित मार्ग हवा असलेल्या सैन्यापुढे हे स्त्री-पुरुष उभे आहेत अशी कल्पना करा. तुम्ही म्हणाल की त्यांना तुडवून वा ठार मारून जाण्याइतके जंगलीपण त्या सैन्याच्या ठिकाणी असू शकेल; पण मग मी

म्हणेन की तुम्ही स्वतःचा निःपात होऊं दिल्यानें आपलें कर्तव्य पार पाडल्यासारखेंच होईल. निरपराधी स्त्री-पुरुषांच्या प्रेतांचा खच तुडवून जाण्याचें धाडस करणाऱ्या सैन्याला तो प्रयोग पुनः करणें शक्य होणार नाहीं. तुम्ही वाटल्यास सर्वसामान्य स्त्री-पुरुषांच्या अंगी असें धैर्य नसतें असें म्हणा; पण मग तुम्हांला हें कबूल करावें लागेल, कीं अहिंसेचें पाणी कांहीं न्यारेंच असते. दुर्बलांचें शस्त्र म्हणून ती कधींच कल्पिलेली नाही. खंबीर मनाच्या माणसांचेंच तें शस्त्र आहे.

मोठ्या राष्ट्रांनी अहिंसेचा स्वीकार करावा आणि स्वतःकडे गौरव घेऊन पुढील पिढ्यांची कायमची कृतज्ञता संपादन करावी. सर्व बडी राष्ट्रें ( किंवा त्यांच्यापैकीं कोणतेंहि एकादें राष्ट्र ) आत्मनाशाची भीति सोडून देतील व जर तीं स्वतः निःशस्त्र होतील, तर इतर राष्ट्रांनाहि आपलें डोकें ताळ्यावर आणण्यालाहि तीं आपोआप साह्यरूप होतील. पण मग या बड्या राष्ट्रांना आपल्या साम्राज्याच्या महत्त्वाकांक्षा सोडून द्याव्या लागतील, जगांतील असंस्कृत व अर्धसंस्कृत म्हटल्या जाणाऱ्या राष्ट्रांची पिळवणूक थांबवून आपल्या जीवनाला नवीन वळण लावावें लागेल; म्हणजेच संपूर्ण क्रांति घडून यावी लागेल. साधारणपणे बडी राष्ट्रें आजपर्यंत ज्या दिशेनें त्यांच्या मूल्याच्या कल्पनेप्रमाणें विजयामागून विजय मिळवीत चालली, ती दिशा सोडून तीं आतां स्वयंस्फूर्तीने विरुद्ध दिशेकडे चालूं लागतील अशी अपेक्षा करणें कठिणच आहे. परंतु चमत्कार पूर्वी घडले आहेत आणि आजच्या रुक्ष जमान्यांत सुद्धां ते घडून येतील. अन्यायाचे परिमार्जन करण्याच्या ईश्वरी सामर्थ्यावर मर्यादा घालण्याची कोणाची छाती आहे? एक गोष्ट मात्र निश्चित आहे. शस्त्रास्त्रांसाठी पिसाटासारखी चाललेली चढाओढ जर अशीच चालू राहिली, तर तिची परिणति इतिहासकालांत आजपर्यंत झाली नाही एवढी भयंकर कत्तल होण्यांत झाल्याखेरीज राहणार नाही. जर कोणी जेता मागें उरला तर जे राष्ट्र विजयी होईल, त्याचा विजयच त्याला जिवंत मृत्यूप्रमाणे होईल. अहिंसक पद्धतीचा तिच्या उज्ज्वल अशा सर्व अभिप्रेत अर्थासह धैर्यानें आणि बिनशर्त स्वीकार केल्यावांचून डोक्यावर लटकणाऱ्या नाशांतून सुटण्याचा अन्य मार्ग नाही.

लोभ नसता तर शस्त्रास्त्रांचें कारणच पडलें नसतें. अहिंसा-तत्त्वाच्या

पूर्तीसाठीं कोणत्याहि स्वरूपाच्या पिळवणुकीपासून पूर्णपणें अलिप्त राहणें जरूर असतें.

एकदां पिळवणुकीची वृत्ति नाहींशी झाली कीं लगेच शस्त्रास्त्रें हें मोठें ओझेंच वाटूं लागेल. जगांतील राष्ट्रांनी एकमेकांची पिळवणूक करणें थांबविल्याखेरीज खरेंखुरें निःशस्त्रीकरण अस्तित्वांत येऊं शकणार नाहीं.

# सत्याग्रहाचा सिद्धान्त : : १३

निःशस्त्र प्रतिकार ही सर्व बाजूंनीं धार असलेली तलवार आहे; ती कशीहि वापरतां येईल; जो तिचा उपयोग करतो त्याला, तशीच ज्याच्या विरुद्ध ती वापरली जाते त्यालाहि ती कल्याणप्रद होते. रक्ताचा एक थेंबहि न सांडतां ती अत्यंत दूरगामी परिणाम घडवून आणते. ती कधीं गंजत नाहीं, कोणाला चोरतांहि येत नाहीं.

हेंच सत्याग्रहाचें सौंदर्य आहे. तो आपणहून आपल्याकडे येतो, आपल्याला त्याचा शोध करीत फिरावें लागत नाहीं. हा त्या तत्त्वाचा अंगभूत असाच गुण आहे. धर्मयुद्धांत कसल्याहि गोप्याचें रक्षण करावें लागत नाहीं. त्यांत लबाडीला आणि असत्याला वावच नसतो. असलें धर्मयुद्ध आपणहून चालत येतें; आणि धर्मप्रवण मनुष्य त्यासाठीं सदैव तयार असतो. ज्या लढ्याची पूर्वयोजना करावी लागते तो धर्माचा लढा नव्हे. धर्मयुद्धांत स्वतः ईश्वरच मोहीम आंखतो आणि लढाया चालवितो. धर्मयुद्ध हें फक्त ईश्वराच्या नावानेंच चालू करतां येतें आणि ज्या वेळीं सत्याग्रह्याला निर्बळ झालोंसें वाटतें, गाडें ढकलत नाहींसें वाटतें आणि सभोंवार सर्वत्र दाट अंधकार पसरला आहेसें दिसतें, त्याच वेळीं ईश्वर त्याच्या मदतीस धावून येतो.

सत्याग्रही भीतीला कायमचा रामराम ठोकतो. त्यामुळें प्रतिपक्ष्यावर विश्वास टाकण्याला त्याला केव्हांहि भय वाटत नाहीं. प्रतिपक्ष्यानें जरी वीस वेळा त्याच्यांशी असत्य वर्तन केलें, तरी पुनः एकविसाव्या वेळीं त्याच्यावर

विश्वास ठेवण्याची सत्याग्रह्याची तयारी असते. कारण, मनुष्यस्वभावावर अढळ विश्वास हें त्याच्या तत्त्वप्रणालींचें मुख्य सारच आहे.

सत्याग्रह्याची नैसर्गिक प्रेरणा जर कायदे मानण्याची नसेल, तर तो सत्याग्रहीच नव्हे. आणि कायदे पाळण्याच्या त्याच्या या स्वभावामुळेंच त्या सर्वश्रेष्ठ कायद्याचें म्हणजेच इतर सर्व कायद्यांवर प्रभुत्व चालविणाऱ्या विवेकबुद्धीच्या आवाजाचें निखालसपणें पालन करणें त्यास भाग पडतें.

सत्य व अहिंसा यांच्या संयोगानें सबंध जग तुम्हांला आपल्या पायांशीं आणतां येईल. सत्याग्रह म्हणजे मुख्यतः दुसरें कांहीच नसून ( राजकीय म्हणजेच ) राष्ट्रीय जीवनांत सत्य आणि सौजन्य यांचा प्रवेश होय.

कायदेभंग सविनय व्हावयाचा तर तो मनापासून, आदरयुक्त व संयमपूर्ण असला पाहिजे; त्यात कधींहि मुद्दामपणा असतां कामा नये. त्याची उभारणी कोणत्या तरी चांगल्या रीतीनें समजलेल्या तत्त्वावर झालेली असली पाहिजे, त्यांत चंचलता असतां कामा नये; आणि मुख्य म्हणजे त्याच्यामागें असद्भाव अथवा द्वेष असतां कामा नये.

जोपर्यंत अंतःकरणांत असद्भाव अस्तित्वांत असेल, तोपर्यंत सत्याग्रहाला निर्विवाद यश मिळणें अशक्य आहे. परंतु जे स्वतःला दुर्बळ समजतात, त्यांच्याच्यानें दुसऱ्यावर प्रेम होणें शक्य नाहीं. म्हणून आपलें दररोजचें पहिलें प्रातःकर्म सबंध दिवसांत पुढील निश्चय अंमलांत आणणें हें होवो. " या जगांत मी कोणालाहि भिणार नाहीं. मी ईश्वराचेंच तेवढें भय बाळगीन. कोणाविषयींहि असद्भाव मनांत बाळगणार नाहीं. कोणाकडूनहि होणाऱ्या अन्यायापुढें मी मान वांकवणार नाहीं. मी सत्यानें असत्यावर विजय मिळवीन आणि असत्याचा प्रतिकार करतांना सर्व हाल-अपेष्टा सहन करीन."

खरोखर न्याय विरुद्ध अन्याय यांच्यांतील लढा जिंकण्यासाठीं पूर्ण सत्याग्रही एकटाहि पुरेसा आहे.

सविनय कायदेभंग ही अत्यंत शुद्ध प्रकारची सनदशीर चळवळ आहे असें माझें ठाम मत आहे. अर्थात् त्याचें सविनय म्हणजेच अहिंसक स्वरूप हें जर निव्वळ ढोंग असेल, तर मात्र तो अवनतिकारक आणि तिरस्करणीय ठरतो. एकदां अहिंसा प्रामाणिक आहे हें मान्य केलें म्हणजे मग अत्यंत भीषण

अशा कायदेभंगांतून पुढे हिंसा निर्माण होण्याचा संभव आहे. म्हणून त्याचा निषेध करण्याचें कारणच उरत नाहीं. मोठे धोके पत्करल्याखेरीज कोणतीहि महान् वा शीघ्रगामी चळवळ चालवितां येणार नाहीं. आणि आयुष्यांत जर मोठाले धोके नसतील, तर ते निःसार होऊन जाईल. जर संकटे नसती तर आयुष्यांत कसल्याहि प्रकारची आतुरता आढळली नसती असें जगाच्या इतिहासावरून दिसत नाहीं काय ?

माणसांतील पशुता आपल्याला जरूर घालवून द्यावयाची आहे; परंतु तेवढ्यासाठीं त्याला खची करावयाचें नाहीं. आपला स्वतःचा उच्च दर्जा शोधीत असताना त्याच्यातील पशुता पुनः पुनः आपलें ओंगळ रूप दाखवीत राहणारच.

सविनय कायदेभंग हा प्रत्येक नागरिकाचा जन्मसिद्ध हक्क आहे. मनुष्यत्व सोडल्याखेरीज तो हक्क सोडून देण्याचें साहस तो करणार नाहीं. सविनय कायदेभंगानें अराजकता कधींहि निर्माण होत नाहीं. गुन्हेगारीच्या स्वरूपाच्या कायदेभंगानें मात्र अराजकता निर्माण होऊं शकते. प्रत्येक सरकार गुन्हेगारीच्या स्वरूपाचा कायदेभंग सक्तीनें दडपून टाकतें. तसें जर त्यानें केलें नाहीं, तर तें सरकारच नष्ट होऊन जाईल. परंतु सविनय कायदे-भंग दडपून टाकणें म्हणजे विवेकबुद्धीलाच बंदींत टाकण्याचा प्रयत्न करण्यासारखें होय.

सत्याग्रहाला कालमर्यादा नसते किंवा त्याच्या क्लेश सहन करण्याच्या शक्तीलाहि सीमा नसते. म्हणून सत्याग्रहात पराभव अशी काहीं वस्तूच नाहीं.

क्रोधाला अथवा द्वेषाला थारा न देतां सहन केलेल्या क्लेशरूपी सूर्याच्या उदयापुढे पाषाणासारखें कठोर हृदय, तसेंच अगदीं पराकाष्ठेचें अज्ञान देखील विरघळलेंच पाहिजे.

सत्याग्रह म्हणजे स्वतःविषयींचा पराकाष्ठेचा शून्यभाव, पराकोटीची नम्रता आणि सहनशीलता व अत्यंत प्रखर निष्ठा होत. सत्याग्रह हेंच सत्या-ग्रहाचें बक्षीस आहे.

सत्याग्रह म्हणजे सत्याची कठोर साधना आणि सत्याप्रत पोंचण्याचा पक्का निर्धार.

सत्याग्रह ही मूकपणें आणि वरवर पाहतां मंदपणें कार्य करणारी शक्ति

आहे. पण वस्तुतः त्याच्याइतकी सरळ किंवा शीघ्र कार्य करणारी शक्ति जगांत दुसरी कोणतीहि नाही.

कसल्याहि कुटिलतेला माझ्याकडून प्रोत्साहन मिळणार नाही. सत्याग्रहाचा प्रेमाचा कायदा हा माझ्या बाबतीत शाश्वत असा सिद्धान्त आहे. जें जे म्हणून शिव असेल त्या सर्वांशी मी सहकार करतो. जें जे अशिव असेल त्या सर्वांशी मी असहकार करूं इच्छितो.

मी जीवनाचें मूल्य कमी लेखतो म्हणून सत्याग्रहात स्वेच्छेने हजारो लोक प्राणार्पण करीत असलेले पाहून मला आनंद होतो असें नव्हे, तर अखेरीला त्यांच्यांत प्राणहानि कमीत कमी होते आणि त्याहूनहि ज्यांनी प्राणार्पण केले ते थोर पदवीस पोंचतात आणि त्यांच्या बलिदानानें जग नैतिक दृष्ट्या तितके समृद्ध होतें हे मी जाणतो व म्हणून मला आनंद होतो.

आणि जेव्हां एकदा सत्याग्रहाला गति मिळते, तेव्हां तो पुरेसा तीव्र स्वरूपाचा असेल तर त्याचा परिणाम साऱ्या जगावर होऊं शकतो. त्यांत आत्मा आपल्या सर्वोच्च स्वरूपांत प्रकट होत असल्यामुळे ती फारच मोटी शक्ति आहे.

सत्याग्रह हा प्रत्यक्ष प्रतिकाराचा सर्वांत शक्तिशाली असा मार्ग असल्यामुळे त्याचा अवलंब करणारा सत्याग्रही हा इतर सर्व उपाय योजून पाहतो. याकरितां तो सतत पुनः पुनः कायदेशीर अधिकाऱ्यांकडे जाईल, लोकांना आपली बाजू समजावून देऊन लोकमत वळवून घेईल. ज्यांना ज्यांना म्हणून त्याचे म्हणणे ऐकून घ्यावयाचें असेल, त्या सर्वांपुढे तो शांतपणे आपली बाजू मांडील आणि ही सर्व क्षेत्रे व्यापून झाल्यानंतर मगच तो सत्याग्रहाला प्रवृत्त होईल. परंतु जेव्हां त्याला आतील आवाजाचा कार्यप्रवृत्त करणारा आदेश मिळेल आणि तो सत्याग्रहाची मोहीम सुरू करील, तेव्हां मात्र त्याने आपले सर्वस्व पणाला लावलेले असेल आणि मग त्याला माघार घेतां येणार नाही.

व्यक्तीला त्याचप्रमाणे व्यक्तिसमूहाला देखील वापरतां येण्याजोगी अशी ही सत्याग्रहाची शक्ति आहे. तो कौटुंबिक बाबतीत जसा वापरतां येतो तसाच राजकीय बाबतींतहि वापरतां येतो. तो सर्वत्र उपयोगी पडूं शकतो, ही गोष्टच त्याच्या चिरंतनतेची आणि अजिक्यपणाची द्योतक आहे.

त्याचा उपयोग स्त्रिया, पुरुष व मुले या सर्वांनाहि सारखाच करता येतो. ठोशास ठोसा देण्याची कुवत दुबळ्यात नाहीं तोवर त्यांनी याच शक्तीचा उपयोग करावा असें म्हणणें सर्वस्वी असत्य आहे. अंधकारापुढे जसा प्रकाश, तशी हिंसेपुढें आणि म्हणून सर्व प्रकारच्या जुलमापुढे आणि अन्यायांपुढें सत्याग्रह ही शक्ति आहे. 'जोपर्यंत जनता जाणता-अजाणतां आपल्यावर शासन करू देते तोपर्यंतच जनतेवर राज्य चालविणे शक्य आहे' या अचल सिद्धान्तावरच राजकारणांत सत्याग्रहाचा उपयोग आधारलेला आहे.

क्लेश सहन करण्याच्या मर्यादा योग्य रीतीने निश्चित झाल्या आहेत. आत्मक्लेश हे योग्य व अयोग्य दोन्ही प्रकारचे असू शकतील आणि त्याची मर्यादा गाठल्यानंतरहि ते सोशीत राहणे यात शहाणपणा नाहीं. इतकेच नव्हे, तर तो पराकाष्ठेचा मूर्खपणा होईल.

सत्याग्रही लढण्याकरितां सदोदित तयार असला, तरी समेट करण्याकरताहि त्याने तितकेच उत्सुक असले पाहिजे. समेटाची सन्मानपूर्वक मिळालेली कोणतीहि संधि त्याने दवडूं नये.

स्वेच्छेनें पत्करलेले आत्मक्लेश जाणवत नाहीत आणि त्यात नफानुकसानीचाहि विचार असत नाहीं. इतर सर्व आनंदाना मागे टाकणारा असाच एक अपूर्व आनंद त्यातून मिळत असतो.

सत्याग्रह्याच्या वागणुकीच्या नियमावलीत पाशवी शक्तीपुढे शरणागति ही वस्तूच मुळी नाहीं; शरणागति असलीच तर ती क्लेश भोगण्याच्या रूपाने असेल; आघात करणाऱ्यापुढे शरणागति असणार नाहीं.

माझी अशी अधिकाधिक खात्री होत चालली आहे, की लोकाना मूलभूत महत्त्वाचा वाटणाऱ्या गोष्टी केवळ बुद्धिवादाने प्राप्त होत नाहीत, तर त्यांसाठी लोकांनी आत्मक्लेशाची किंमत देणे भाग असतं. मनुष्यप्राण्याचा धर्म क्लेश सहणे हा आहे. मारामारी हा जंगलांतील कायदा आहे. परंतु विरोधकाच्या अंतःकरणात पालट घडवून आणण्याकरितां आणि त्याचे कान जे इतर कोणत्याहि साधनाने उघडत नाहीत, ते बुद्धीचा आवाज आंत पोंचविण्याच्या दृष्टीने उघडण्याकरितां जंगली कायद्यापेक्षां आत्मक्लेशाचा धर्म हा अनंतपटीनीं अधिक बलशाली आहे.

सत्याग्रह सौजन्यपूर्ण असतो, तो कधीं इजा करीत नाहीं. सत्याग्रहाच्या

मागें क्रोधाची अथवा द्वेषाची भावना असतां कामा नये. सत्याग्रहांत पोकळ अवडंबर, उतावीळपणा अथवा उगीच बडबड या गोष्टी कधींहि असतां कामा नयेत. सत्याग्रह हा जबरदस्तीच्या अगदीं विरुद्ध आहे. हिंसा निःशेष काढून टाकून तिच्या जागीं सत्याग्रह उपयोगांत आणावयाचा असतो.

सत्याग्रही म्हणून माझी बाजू मी कोणत्याहि वेळीं तपासू-पारखूं देण्याची मुभा सदैव ठेवली पाहिजे आणि जर तींत कांही चूक आढळली, तर तिची भरपाई केली पाहिजे.

सत्याग्रह्याने स्वर्गसंपादनासाठीं सुद्धां सैतानाच्या मदतीचा उपयोग करून घेतां कामा नये.

सत्य आणि अहिंसा हें आपलें ब्रीद समजून त्यावर त्यानें विश्वास ठेवला पाहिजे आणि म्हणून मनुष्यस्वभावांतच मूलतः असणाऱ्या सज्जनतेवर त्यानें श्रद्धा ठेवली पाहिजे; ही सज्जनता स्वतः क्लेश सहन करून त्यांतून व्यक्त होणाऱ्या सत्याच्या आणि प्रेमाच्या योगाने जागृत करण्याची अपेक्षा त्यानें ठेवावी.

सत्याग्रहांत कपटाला, फसवेगिरीला अथवा कोणत्याहि प्रकारच्या असत्याला स्थान नाहीं. फसवेगिरी आणि खोटेपणा ही आज जगांत थैमान घालीत आहेत! ही परिस्थिति निमूटपणे पहात बसणें मला शक्य नाहीं... जर मी आज स्वस्थ आणि निष्क्रिय राहिलों, तर सबंध जग आगीच्या डोंबांत सांपडलें असतांहि ईश्वराने मला दिलेल्या बहुमोल ठेव्याचा उपयोग मी न केल्याबद्दल तो मला दोष देईल.

सन्मान्य अटीवर तडजोड घडून येण्याची संधि सत्याग्रही कधींहि दवडीत नाहीं — दवडणें त्याला शक्य नसते; पण ते न जमले तर मात्र लढा देण्यासहि तो सदैव तयार राहतो हें यांत नेहमीच गृहीत आहे. त्याला पूर्वतयारीची गरज नसते; त्याची बाजू नेहमीच उघडी असते.

कोणत्याहि प्रकारचा सविनय प्रतिकार सुरू करण्यापूर्वी पहिली अनिवार्य अट ही आहे, की ज्यांचा या प्रतिकाराशीं संबंध आहे त्यांच्याकडून किंवा सर्वसामान्य जनतेकडून कसल्याहि प्रकारच्या हिंसेचा प्रादुर्भाव होणार नाहीं अशी खात्री असली पाहिजे. तशी हिंसा जर सुरू झाली, तर ती सरकारच्या किंवा सत्याग्रह्यांना विरोधी असणाऱ्यांच्या चिथावणीमुळे झाली

ही कांही सबब होणार नाही. हिंसेच्या वातावरणांत सविनय प्रतिकार जोर धरणार नाही हे सहज समजण्याजोगे आहे. मात्र याचा अर्थ असा मुळीच नव्हे, की सत्याग्रह्याच्या उपाययोजना संपुष्टांत आल्या. अशा परिस्थितीत सविनय कायदेभंगाहून वेगळे मार्ग शोधून काढले पाहिजेत.

अन्याय करणाराला अडचणींत घालण्याचा सत्याग्रह्याचा हेतु कधीच नसतो, हे पुष्कळ वेळां विसरले जाते. त्याच्या भीतीच्या भावनेला डिवचावयाचे नसून त्याच्या हृदयाची आळवणी करावयाची असते – केली पाहिजे. सत्याग्रह्याचा हेतु अन्याय करणारावर दडपण आणणे हा नसून त्याचे मतपरिवर्तन करणें हा असतो. आपल्या कोणत्याहि आचरणात त्यानें कृत्रिमता येऊं देतां कामा नये. कारण, त्याचे वर्तन सहज आणि आंतरिक निष्ठेने होत असते.

अहिंसक प्रतिकाराची पद्धति ही सर्वांत शुद्ध आणि सर्वांत सुरक्षित अशी पद्धति आहे, असे माझे म्हणणे आहे; कारण, ज्या कारणाकरिता प्रतिकार केला असेल ते कारण जर सत्य नसेल, तर प्रतिकार करणारानाच क्लेशाची झळ लागते.

येशू ख्रिस्त, डॅनिअल आणि सॉक्रेटीस यांनी अहिंसक प्रतिकाराचे किंवा आत्मबळाचे शुद्धांत शुद्ध रूप दाखविले. या सर्व जगद्गुरूंना आपल्या आत्म्यापुढे शरीराची यत्किंचितहि मातब्बरी वाटत नसे. टॉल्स्टाय हा या सिद्धान्ताचा ( अलीकडच्या काळातील ) सर्वोत्तम व अत्यंत बुद्धिमान् आचार्य होता. तो सिद्धान्त त्यानें नीट मांडला; इतकेंच नव्हे तर, तदनुसार त्याने आचरणहि ठेवले. युरोपात या सिद्धान्ताचा प्रसार झाला त्याच्या पुष्कळ पूर्वी हिंदुस्थानांत तो लोकांना समजला होता आणि सर्रास त्याचे आचरण सुरू होते. शरीरबळापेक्षां आत्मबळ हे अनंतपटींनी श्रेष्ठ आहे हे सहज दिसून येते. अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी जर लोक आत्मबळाचा अवलंब करतील, तर आजकाल भोगावे लागणारे पुष्कळ दुःख टाळता येईल.

परिस्थिति कोणतीहि असो, सत्याग्रहाची शक्ति वापरल्यानें दुसऱ्याला हालअपेष्टा कधीच सहन कराव्या लागत नाहीत. यामुळे ज्या ज्या वेळी ती अयोग्य रीतीनें वापरली जाते त्या त्या वेळीं ज्याच्या विरुद्ध ती वापरली असेल त्याला कांहीहि हानि न पोचता ती वापरणारालाच पोचते.

सद्गुणाच्याप्रमाणेंच सत्याग्रहाचेंहि बक्षीस सत्याग्रह हेंच आहे. या प्रकारच्या शक्तीचा वापर करतांना अपयश अशी वस्तूच मुळी नाहीं.

बुद्धानें प्रतिपक्ष्यावर जोराचा हल्ला चढविला आणि अहंकारी पुरोहित-वर्गाला नमावयास लावलें. ख्रिस्तानें पैशाची देवघेव करणाऱ्या दलालाना जेरुसलेमच्या मंदिरांतून घालवून दिलें आणि दांभिक लोकांना व सोवळे-पणाचा अभिमान बाळगणाऱ्या फारिसींना ईश्वरी शापाचे धनी बनविलें. बुद्ध आणि ख्रिस्त हे दोघेहि पराकाष्ठेचा तीव्र लढा देण्याच्या बाजूचे होते; परंतु त्यांनीं जरी असे फटकारे मारले, तरी त्यांच्या प्रत्येक कृतीमागें, सौजन्य आणि प्रेम स्पष्टपणें दिसून येतील. ते आपल्या शत्रूवर बोट देखील उगारावयाचे नाहींत. परंतु ज्या सत्याप्रीत्यर्थ त्यांनीं आपला जन्म घालविला, त्या सत्याचा त्याग करण्यापेक्षां आत्मार्पण करण्यांतच त्यांना आनद वाटेल. पुरोहित-वर्गाला वांकविण्याच्या कामीं त्याचें प्रतापशाली प्रेमबळ जर पुरें पडलें नसतें, तर त्या वर्गाचा प्रतिकार करतां करतां बुद्धानें आपला देह ठेवला असता. ख्रिस्तानें एका महान् साम्राज्यशक्तीशीं झुंज देत असतां आपल्या डोक्यावर कांटेरी मुकुट चढवून घेऊन क्रूसावर प्राणार्पण केलें. तेव्हां मी जर अहिंसक स्वरूपाचे प्रतिकारात्मक लढे उभे केले असले, तर या महान् जगद्गुरुंच्या पावलांचा मागोवा घेतच मी नम्रपणें जात आहें; दुसरें कांहीं नाहीं.

मी स्वतःला कधींहि 'आद्य सत्याग्रही' म्हणवून घेतलेलें नाहीं. मी स्वतःकडे फक्त एवढेंच श्रेय घेतो, कीं जवळजवळ सर्व क्षेत्रांत मी त्या तत्त्वाची अंमलबजावणी सुरू केली आणि सर्व काळीं व सर्व देशांत हजारों – लाखों लोकांनीं आत्मसात् करण्याजोगें हें तत्त्व आहे, असें अजून दाखवावयाचें व सिद्ध करावयाचें आहे.

## माझी असहकारिता

असहकार म्हणजे न जाणतां आणि इच्छा नसतां दुष्कृत्यांत सहभागी होण्याला केलेला विरोध होय. सद्वस्तूशीं सहकार हें जितकें कर्तव्य, तितकेंच असत् वस्तूशीं असहकार हेंहि कर्तव्यच आहे.

माझा असहकार हा जरी माझ्या ब्रीदाचाच भाग असला, तरी

सहकाराची ती प्रस्तावनाच असते. माझा असहकार पद्धति आणि व्यवस्था यांच्याशी असतो, व्यक्तीविरुद्ध कधीहि असत नाही. एकाद्या डायरबद्दल देखील मी द्वेषभावनेला माझ्या मनांत थारा देणार नाही. द्वेषभाव हा माणसाच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणणारा आहे असें मी मानतों.

माझ्या असहकारामागे अगदी कट्टर विरोधकाशी देखील अगदी थोडक्या निमित्तानेहि सहकार करण्याची तीव्र इच्छा असते. मी एक अतिशय अपूर्ण असा मर्त्य मानव आहें व ईश्वराच्या कृपेची गरज मला सदोदित भासते. असें असता अमुक मनुष्य सुधारणेच्या पलीकडे आहे, असे मी कसें मानूं ?

माझ्या असहकाराचें मूळ द्वेषांत नसून प्रेमभावनेत आहे. माझा वैयक्तिक धर्म कोणाचाहि द्वेष करण्यास मला निक्षून मनाई करतो. हे साधे परंतु महान् तत्त्व मी बारा वर्षांचा असतांना शाळेत लाविलेल्या एका पुस्तकावरून शिकलो आणि ती माझी श्रद्धा आजतागायत टिकून राहिली आहे. नव्हे ती प्रतिदिनी वाढतच आहे. माझ्या बाबतीत ती एक ज्वलंत तळमळ बनून राहिली आहे.

कोणत्याहि गोष्टीबद्दल माझ्या मनात द्रोहाला थारा नाही असे नाही, परंतु तो द्रोह मी जे जे काही असत्य असेल, अन्याय्य असेल किंवा पापमय असेल त्याचा करतो. जोपर्यंत एकादी संस्था माझ्या तशाच राष्ट्राच्या विकासाला साहाय्यभूत होते, तोपर्यंत मी त्या संस्थेशी एकनिष्ठ असतो. परंतु ती संस्था विकासाला मदत करण्याऐवजी त्याच्या आड येत आहे असे मला आढळून येते, त्या क्षणीच तिचा द्रोह करणे हे मी आपलें परम कर्तव्य मानतो.

स्वभावतः मी सहकारवादी आहे; माझा असहकार सुद्धा सहकारांतील क्षुद्र वृत्ति आणि खोटेपणा काढून टाकून तो शुद्ध करण्याकरितां असतो. कारण क्षुद्र वृत्तीचा व खोटा सहकार म्हणजे सहकारच नव्हे, असे माझे मत आहे.

धर्म-स्वरूपानें अहसकारिता मी पुढे ठेवली आहे. कारण ज्या मानानें राजकारण हें माझ्यामधील धर्मबुद्धीची वाढ करतें, तेवढ्यापुरताच फक्त राजकारणात मी पदार्पण करतों.

# राजकारणांत धर्म

माझ्या जीवनांतील अत्यंत जिव्हाळ्याच्या व गंभीर गोष्टीपासून मी राजकारण हें अलग करूं शकत नाही. त्याचें अगदी साधे कारण असें कीं माझे राजकारण विकृत नाहीं; सत्य व अहिंसा यांच्याशीं ते इतके निगडित आहे की त्यापासून त्याला अलग करतांच येणार नाहीं.

धर्माशिवाय जगणें मला क्षणमात्रहि शक्य नाहीं. माझे अनेक राजकारणी मित्र माझ्या बाबतीत निराश होतात. कारण, ते म्हणतात की तुमचे राजकारण सुद्धां धर्मातूनच निघते. आणि त्याचे हे म्हणणे खरें आहे. माझे राजकारण आणि माझ्या इतर प्रवृत्ती माझ्या धर्मातूनच निर्माण होतात. मी पुढे जाऊन असेंहि म्हणेन, की धार्मिक प्रकृतीच्या माणसाची प्रत्येक प्रवृत्ति त्याच्या धर्मातूनच उदित झाली पाहिजे. कारण, धर्म म्हणजे ईश्वराशी निगडित होणे होय. म्हणजेच आपल्या श्वासोच्छ्वासावर सुद्धां ईश्वराचें प्रभुत्व आहे अशी श्रद्धा राखणे होय.

धर्मविहीन राजकारण हें मला घाणीसारखे वाटते. त्यापासून सदैव दूर राहिले पाहिजे. राजकारणाचा राष्ट्राशीं संबंध असतो आणि ज्याचा राष्ट्राच्या सुस्थितीशीं संबंध पोचतो त्याच्याशीं धार्मिक प्रवृत्तीच्या व्यक्तींचा म्हणजेच ईश्वर आणि सत्य यांच्या उपासकांचाहि संबंध असला पाहिजे. ईश्वर आणि सत्य ही नांवें अदलाबदल करण्याजोगी मला वाटतात. आणि जर कोणी मला असे पटविले, की ईश्वर हा असत्याचा अथवा छळणुकीचा ईश्वर आहे, तर त्याची आराधना करण्याचें मी सोडून देईन. म्हणून राजकारणांत देखील आपणाला 'रामराज्य' प्रस्थापित करणे अवश्य आहे.

मी जर सबंध मानवजातीशीं एकरूप झालो नसतो, तर मला धार्मिक जीवन घालवितां आले नसतें आणि राजकारणांत भाग घेतल्याशिवाय मला मानवजातीशीं एकरूप होणें शक्य नव्हते. मानवी व्यवहारांचे सबंध क्षेत्र म्हणजे आज एक अविभाज्य घटक बनला आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि शुद्ध धार्मिक असे कामांचे अगदीं आखबंद कप्पे आपल्याला करतां येणार नाहींत. मनुष्याच्या नित्याच्या प्रवृत्तींपासून अलग असा कोणताहि धर्म मी जाणत नाहीं. धर्मामुळें इतर सर्व प्रवृत्तींना एक नैतिक अधिष्ठान प्राप्त

होतें, एरवी ते त्यांना मिळणार नाहीं आणि त्यामुळें जीवन म्हणजे कांहीं अर्थबोध न होणाऱ्या गोंगाटाचा गलकाच होऊन जाईल !

इतर राष्ट्रीय प्रवृत्तींहून पॉलिटिक्स म्हणजे राजनीति ही कांहीं निराळ्या जातीची आहे असें मी मानीत नाहीं. 'पॉलिटिक्स' या इंग्रजी शब्दाचा धात्वर्थ "नागरिकत्वाचें शास्त्र" असा आहे, व त्याचा सुसंस्कृत शिष्टाचाराशीहि दूरचा संबंध पोंहोचतो. आणि नागरिकत्वाच्या क्षेत्राची व्याप्ति त्रिखंडाचाहि समावेश होण्याइतकी वाढली असल्यामुळें राजनीतिशास्त्रांत मानवजातीची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अशी सर्वांगीण प्रगति गांठण्याचाहि समावेश होतो; येथें "राजकीय" हा शब्द ज्या अर्थानें आपण नेहमीं वापरतो, त्याच मर्यादित अर्थानें वापरला आहे.

खरोखर, आपल्या प्रत्येक हालचालींमध्यें धर्म व्यापून राहिला असला पाहिजे. या ठिकाणीं धर्माचा अर्थ विशिष्ट संप्रदाय असा नव्हे; त्याचा अर्थ विश्वाच्या सुव्यवस्थित नैतिक शासनावरील विश्वास असा आहे. तें शासन अदृश्य आहे म्हणून कांहीं त्याला अस्तित्व नाहीं असें नाहीं. हा धर्म हिंदुधर्म, इस्लाम, खिस्तिधर्म इत्यादींच्या अतीत आहे. तो या धर्मांना उखडून टाकीत नाहीं, तर त्यांच्यांत सुसंवादित्व निर्माण करतो आणि त्याना वास्तवरूप देतो.

# प्रेमाचा सिद्धान्त : : १४

शास्त्रज्ञ सांगतात, कीं ज्या परमाणूंनीं हा आमचा भूगोल बनला आहे त्यांच्यामध्यें जर एकमेकांना सलग्न ठेवणारी शक्ति नसेल, तर त्याचे तुकडे तुकडे होतील आणि आपलें अस्तित्वच राहणार नाहीं; आणि ज्याप्रमाणें जाणिवकळाविहीन अशा जड वस्तूंमध्यें ही सलग्न ठेवणारी शक्ति असते, त्याचप्रमाणें सर्व सचेतन वस्तूंतहि ती असली पाहिजे. सजीव प्राण्यांमधील त्या सलग्न करणाऱ्या शक्तीला प्रेम असें नांव आहे. पिता-पुत्र, बहीण-भाऊ, मित्र-मित्र यांमध्यें आपणाला ती आढळून येते. परतु आपल्याला सर्व जीवमात्राच्या ठिकाणीं ती शक्ति वापरावयाला शिकावयाचें आहे

आणि अशा वापरांतच आपल्याला ईश्वराचे ज्ञान मिळणार आहे. जेथे प्रेम आहे तेथें जीवन आहे; द्वेषाचा मार्ग विनाशाकडे नेतो.

सभोंवार संहार चालू असला तरी जीवन टिकून रहात असलेलें मला दिसतें, आणि म्हणूनच संहाराहूनहि श्रेष्ठ असा एकादा शासन-नियम अस्तित्वांत असला पाहिजे असें वाटतें. तशा प्रकारचा शासन-नियम असेल, तरच सुव्यवस्थित समाज कल्पनेत येऊं शकतो आणि जीवन जगण्यालायक बनते. आणि जर जीवनाचाहि धर्म तोच असला, तर रोजच्या रोज त्याचा आचार करून आपण त्याचा पडताळा पाहिला पाहिजे. जेथे जेथें बेबनाव होतील किंवा विरोधकांशी सामना होईल तेथे तेथें त्याला प्रेमाने जिंकावयाचें, अशा टोकळ पद्धतीनें मी माझ्या जीवनांत त्याचा पडताळा पाहिला आहे. त्यामुळे माझ्या सर्व अडचणी दूर झाल्या आहेत, असा कांहीं याचा अर्थ नाहीं. मला एवढेच आढळून आले आहे की प्रेम-धर्म जितके यश देतो, तितकें संहार-धर्माने कधींहि दिलेलें नाहीं.

मानवजातीची जी कांहीं एकंदर शक्ति आहे ती आम्हांला खालीं ओढण्यासाठी नसून आमच्या उद्धारासाठीं आहे, आणि प्रेम-धर्माचे कार्य जे कदाचित् न कळत पण निश्चितपणे सुरू आहे त्याचा हा परिणाम आहे, असा माझा विश्वास आहे. मानवजात टिकून राहिली आहे ही गोष्टच असें दाखविते, की फूट पाडणाऱ्या शक्तीपेक्षा जोडणारी शक्ति अधिक महान् आहे; केंद्रपरावर्तीशक्तिपेक्षां केंद्रगामी शक्ति प्रभावी आहे.

प्रेम अथवा अहिंसा हा जर आपला जीवनधर्म नसेल, तर मधूनमधून वरचेवर युद्धाचा डोंबाळा उसळल्यावांचून सुटकाच नाहीं आणि प्रत्येक पुढच्या युद्धानें मागच्या युद्धाला क्रूरतेंत मागेच टाकले पाहिजे असे होईल.

आजपर्यंत होऊन गेलेल्या सर्व जगद्गुरूंनी याच प्रेमधर्माची शिकवणूक कमीअधिक जोर देऊन दिलेली आहे. प्रेम हा जर जीवनधर्म नसता तर मृत्यूच्या साम्राज्यांतहि जीवित टिकून राहिलें नसतें. जीवन म्हणजे मृत्यूवर एकसारखा मिळणारा विजय होय. मानव आणि पशू याच्यांत जर कोणता मूलभूत फरक असेल, तर तो म्हणजे माणसाला या धर्माची उत्तरोत्तर जास्त ज़ास्त ओळख होत जाते आणि स्वतःच्या जीवनांत प्रत्यक्ष आचारांत तो त्याचा अवलंब करतो. जगांतील प्राचीन आणि अर्वाचीन सर्व साधुसंत

याच सर्वश्रेष्ठ जीवनधर्माची, आपल्या ज्ञानाप्रमाणे व शक्तीप्रमाणे, चालती-बोलती उदाहरणे होती. आपल्यांतील पाशवी वृत्ति कित्येकदां आपल्यावर सहजासहजीं मात करते हे अगदीं खरें आहे. परंतु तेवढ्याने तो धर्म नाही असे होत नाही. तो आचरणात आणणे कठिण एवढेच त्यावरून दिसते. प्रत्यक्ष सत्याइतका जो धर्म श्रेष्ठ आहे तो आचरणाला सोपा असणें कसे शक्य आहे? या धर्माचा आचार जेव्हां सार्वत्रिक होईल, तेव्हां ईश्वराचे राज्य स्वर्गातल्याप्रमाणे येथेहि होईल. पृथ्वी आणि स्वर्ग दोन्ही आपल्या-मध्येच आहेत याची मला जाणीव करून देण्याचे कारण नाही. पृथ्वीची आपल्याला चांगली ओळख आहे, परंतु आपल्यामधील स्वर्गाशी मात्र आपण अपरिचित आहोत. कांही लोकांना प्रेमाचा आचार शक्य आहे असे एकदां मानले, तर बाकीच्या इतरांना त्याचे आचरण करणे अशक्य आहे असे मानणे हा उद्धटपणा आहे. आमचे पूर्वज नरमांसभक्षण आणि असेच इतर अनेक आचार करीत होते त्याला कांही फार काळ लोटलेला नाही; हे सर्व आचार आज आपण तिरस्करणीय म्हणतो. हे खरे, की डिक शेपर्ड हा जसा आजच्या काळांत शांतीचा उपदेश आणि कसून प्रचार करणारा व त्यासाठी कष्ट भोगणारा शांतिदूत होऊन गेला, तसे त्या काळी देखील अनेक डिक् शेपर्ड झाले असतील आणि आपल्या मनुष्यबंधूंचे मास खाऊ नये असा विचित्र उपदेश केल्याबद्दल त्यांना उपहासास पात्र व्हावे लागले असेल, प्रसंगी त्यांची छळणूकहि झाली असेल.

ज्या वेळी आपल्याला सेवा करावयाची असेल त्या वेळी बंधुत्वाचे नाते जोडणे आणि ज्या वेळी एकादा हक्क बजवायचा असेल त्या वेळी त्या नात्याचा आग्रह न धरणे, हा आचरणाचा बिनधोक नियम समजावा. इतकेच काय, ज्याला मी आचरणाचा सुवर्णसिद्धान्त म्हणतो, असा हा जीवन-सिद्धान्त मी हिंदुस्थानांतील आंतरप्रांतीय संबंधांच्या बाबतीत सुद्धां लागू केला आहे. मानवी व्यवहारांतील प्रेमाचे संबंध कायम टिकविण्याची दुसरी कोणतीहि पद्धति मला माहीत नाही. आणि अनेक वर्षांच्या अनुभवाने माझी अशी ठाम खात्री झाली आहे, की ज्या ज्या ठिकाणी हा सुवर्ण-सिद्धान्त दूर सारला गेला तेथें तेथे कुरबुरी, भांडणे आणि मारामाऱ्यांचे सुद्धां प्रसंग ओढवले आहेत.

नातेवाईक आणि तिऱ्हाईत, देशबांधव आणि परदेशस्थ, गोरे आणि गोरेतर, हिंदू आणि मुसलमान, पारशी, ख्रिश्चन, ज्यू असे कोणत्याहि धर्माचे लोक असोत, त्यांच्यांत मला कधीं भेदभाव वाटला नाही. अशा तऱ्हेचे भेद करण्याची कुवतच माझ्या ठिकाणी नाहीं म्हटले तरी चालेल. हा कांहीं मी विशेष रीतीनें कमाविलेला सद्‌गुण आहे असें मी म्हणत नाहीं; कारण तो मुळीं माझ्या स्वभावातच आहे, त्याच्याकरितां मला कसलेहि परिश्रम करावे लागलेले नाहीत; पण अहिंसा, ब्रह्मचर्य, अपरिग्रह आणि इतर श्रेष्ठ गुणांची जोपासना करण्याकरितां मात्र मला सतत धडपड करावी लागत आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे.

पाशवी शक्ति ही हजारों वर्षे जगावर सत्ता गाजवीत आली आहे, आणि मानवाला त्याची कटु फळे एकसारखीं भोगावीं लागत आहेत हें प्रत्येकाला अनुभवानें कळले आहे. भविष्यकालींहि यांतून कांहीं चांगलें निघेल अशी आशा नाहीं. अंधारांतून जर प्रकाश निघत असेल, तरच द्वेषामधून प्रेम निर्माण होणें शक्य आहे.

पाशवी शक्तीऐवजी आत्मिक शक्तीचा म्हणजेच प्रेमशक्तीचा उपयोग जर मला लोकप्रिय करतां आला, तर सबंध जगानें काय वाटेल ते जरी केलें तरी त्या सर्वांना तोंड देणारा असा हिंदुस्थान मी तुमच्यापुढे उभा करूं शकेन, अशी माझी खात्री आहे. त्याकरिता वेळीअवेळी आत्मक्लेशाचा हा सनातन धर्म माझ्या आयुष्यांत प्रकट करण्यासाठी मी स्वतःला तसेंच वळण लावीन आणि ज्यांना आस्था आहे त्यांनी तो · ˆ · · · म्हणून त्यांच्यापुढे ठेवीन; मी कोणत्याहि चळवळींत भाग घेतला तरी त्याचा हेतु त्या धर्माचे अद्वितीय श्रेष्ठत्व दाखवावें हाच असेल.

ईश्वर माझी कसोटी पहात आहे याची प्रत्येक क्षणीं मला प्रचीति येत आहे.

तलवारीचा मी त्याग केला असल्यामुळें मला जे विरोध करतात त्यांच्यापुढे प्रेमानें भरलेला पेला धरण्यावांचून माझ्याजवळ दुसरें काहीच साधन नाहीं. हा पेला पुढे करूनच मी त्यांना जवळ आणीन अशी मला आशा आहे. माणसांमाणसांत कायमचे वैर ही कल्पनाच माझ्या डोक्यांत येऊं शकत नाहीं, आणि पुनर्जन्माचा सिद्धान्त मी मानीत असल्याकारणानें

ह्या जन्मांत नाहीं तरी पुढच्या कोणत्या तरी जन्मांत मित्रत्वाचे बाहू पसरून सबंध मानवजातीला मी प्रेमानें आपल्या हृदयाशीं धरीन या आशेवर मी जगत आहे.

माझें रक्षण करण्याचा प्रयत्न करूं नका. आपणा सर्वांचें रक्षण करण्याला ती सर्वश्रेष्ठ शक्ति सदैव सिद्ध आहेच. ज्या वेळीं माझी घटका भरेल त्या वेळीं जगांतील कितीहि प्रख्यात व्यक्ति असो, ती माझ्या आणि ईश्वराच्या आड उभी राहू शकणार नाहीं.

तुम्हाला माझी सेवा पाहिजे असेल, तर मला परका मानूं नका. या, आणि सर्व कांहीं माझ्यापासून समजावून घ्या. खुनी, चोर किंवा दरोडेखोर यांना देखील शिक्षा करणें माझ्या ब्रीदाच्या विरुद्ध आहे हे तुम्हांला माहीत असणें अवश्य आहे.

मी निरनिराळीं तपें करतों, त्या माझ्या यांत्रिक क्रिया नसतात. आंतील आवाजाच्या आदेशाला मान देऊन मी तीं करतों. ज्यानें मला निर्माण केलें त्या ईश्वराशीं मला इमानी राहिलें पाहिजे, आणि ज्या क्षणीं जीवन दुःसह आहे असें मला वाटेल त्या क्षणीं तें टाकून देण्याला माझ्याकडून कुचराई होणार नाहीं अशी मला आशा आहे. योग्य तो जबाब ज्याच्याकडून मिळेनासा झाला आणि खऱ्या मार्गाच्या शोधांत जें बाधारूप होण्याचा संभव आहे असें हें शरीर आनंदानें अर्पण करण्यापेक्षां अधिक भरपाई मी काय करूं शकणार ?

माझ्या रोमरोमांतून प्रेम प्रकट व्हावें असा मी प्रयत्न करतों. या प्रयत्नांत कितीहि हयगय होत असली तरी ती गोष्ट अगदीं खरी आहे; मला अत्यंत नम्रपणें ती कबूल केली पाहिजे. मला निर्माण करणाऱ्या ईश्वराचा साक्षात्कार व्हावा यासाठीं मी उतावीळ झालों आहे. सत्य हें त्याचें रूप आहे असें मला वाटतें. आणि पूर्वायुष्यातच मला आढळून आलें, कीं जर मला सत्याचें दर्शन पाहिजे असेल तर प्राणाचें मोल देऊनहि मी प्रेमधर्माचें पालन करणें अवश्य आहे. ईश्वरकृपेनें मला मुलें असल्यामुळें प्रेमाचा धर्म लहान बालकांच्या द्वारा सर्वांत चांगल्या रीतीनें समजून घेतां येतो व शिकतां येतो असें मला आढळून आलें. आम्ही आईबाप अडाणी नसूं, तर आमचीं मुलें पूर्णपणें निष्पाप राहतील. मुलें जन्मतःच अवगुणी नसतात असा माझा दृढ विश्वास

आहे. जन्मापूर्वी आणि जन्मानंतर मुलाची वाढ होत असतांना जर आई-बापांनीं योग्य वर्तन ठेवलें तर स्वभावतःच मूल सत्याचा व प्रेमाचा धर्म पालन करतें हे सर्वांना माहीत आहे. माझ्या पूर्वायुष्यांत जेव्हां मला हा धडा समजला, तेव्हां माझ्या जीवनांत हळूहळू परंतु स्पष्टपणे पालट करण्याला मी सुरुवात केली.

माझे हे खळबळींचें आयुष्य ज्या निरनिराळ्या अवस्थांमधून गेलें आहे त्यांचें तुम्हांला वर्णन करून सांगण्याचा माझा हेतु नाही; परंतु खरें तें अगदी नम्रपणे सांगावयाचे, तर मी इतकाच निर्वाळा देऊं शकतों की जितक्या प्रमाणांत मीं माझ्या आयुष्यांत विचार, उच्चार आणि आचारांच्या बाबतींत प्रेम उतरविलें आहे, तितक्या प्रमाणांत मला बुद्धीच्यावर असलेल्या शांतीचा अनुभव लाभला आहे. माझ्या अनेक मित्रांना हेवा वाटण्यासारखी शांति माझ्या ठिकाणी आढळून आल्यामुळे आश्चर्यचकित होऊन त्यांनी मला त्या अमूल्य ठेव्याचें कारण विचारलें. मला त्याचा खुलासा करतां आलेला नाही; पण मी त्यांना एवढेच म्हटले, की जर त्यांना माझ्या ठायीं तशी शांति दिसत असेल, तर त्याचे कारण जीवनाच्या या सर्वश्रेष्ठ धर्माचें पालन करण्याचा मी प्रयत्न करीत आहे हेच आहे.

मला आलेल्या शेकडो – हजारो म्हणा ना – मुलांच्या अनुभवांवरून मी जाणतों, की तुम्हांआम्हांला आहे त्याहूनहि कदाचित् स्वाभिमानाची अधिक सूक्ष्म जाणीव मुलांना असते. जीवनांतील अत्यंत मोठे धडे आपल्याला वयोवृद्धांकडून आणि ज्ञानवृद्धांकडून मिळणार नाहीत; तर ज्यांना आपण अजाण म्हणतो अशा मुलांकडूनच मिळतील; मात्र आपण अभिमान सोडून नम्र झालें पाहिजे. "अर्भकांच्या मुखांतून शहाणपण बाहेर पडते," हे जेव्हां येशू बोलला, तेव्हां त्यानें एक फार उच्च व भव्य सत्य उच्चारलें. माझी त्यावर श्रद्धा आहे. स्वतःच्या अनुभवावरून मला दिसून आलें आहे, की लहान मुलांकडे जर आपण नम्र भावाने आणि निष्पाप बुद्धीने पाहूं लागलों, तर आपण त्यांच्याकडून शहाणपण शिकूं.

मानवाला जी गोष्ट अशक्य ती ईश्वर सहज लीलेने करतो, हा एक धडा मी शिकलों आहें, आणि आपण निर्माण केलेल्या क्षुद्रांतल्या क्षुद्र अशा प्राण्याच्या देखील भवितव्यावर नजर ठेवणाऱ्या त्या दैवी शक्तीवर जर आपली श्रद्धा

असेल तर सर्व गोष्टी शक्य होतील यांत मला शंका वाटत नाहीं; या अंतिम आशेवर मी आयुष्य कंठीत आहे आणि त्याची इच्छा प्रमाण मानण्याचा प्रयत्न करीत आहे.

या जगांत आपल्याला खरीखुरी शांतता प्रस्थापित करावयाची असेल आणि युद्धाविरुद्ध मोहीम चालवावयाची असेल तर आपल्याला लहान मुलांपासून सुरुवात केली पाहिजे; आपली जन्मजात निष्पापता कायम राखून जर ही मुले वाढली तर आपल्याला लढाच करावा लागणार नाही किंवा निरर्थक, निष्क्रिय ठराव करीत बसावें लागणार नाही, तर उत्तरोत्तर आपण प्रेमाचें आणि शक्तीचें क्षेत्र व्यापक करीत जाऊं, इतकें की शेवटी ज्या शांतीप्रीत्यर्थ आणि प्रेमाप्रीत्यर्थ कळत अथवा न कळत सारें जग व्याकुळ झालें आहे, ती शांति व तें प्रेम यांनी जगाचा कोनाकोपरा भरून जाईल.

जीवनांतील प्रत्येक क्षणीं मी अहिंसेच्या, प्रेमाच्या वाटेनें जाण्याचा यत्न करीत आहे. मी स्वभावतः शांतिप्रिय माणूस आहे. तटेबखेडे निर्माण करण्याची माझी इच्छा नाही. आणि मला विरोध करणाऱ्यांना मी असें आश्वासन देतो, की सत्य आणि प्रेम याना विरोधी होण्याजोगी एकहि गोष्ट मी करणार नाही.

माझें जीवितकार्य जर सफळ झालें– तें सफळ होणार, त्याला सफळ होणें भागच आहे– तर ही चळवळ जगांतील सर्व लोकांना परस्पराचे शत्रु म्हणून नव्हे, तर एकाच पूर्णाचे घटक म्हणून एकत्र गोवण्याकरितां योजलेली होती असें इतिहास नमूद करील, इतकी माझ्या जीवितकार्यावर माझी अढळ श्रद्धा आहे.

आपण अशा काळांत रहात आहोत, की ज्या वेळीं मूल्यामध्ये भराभर बदल होत आहेत. हळूहळू घडून येणाऱ्या परिणामांनीं आपलें समाधान होत नाही. केवळ आपल्याच ज्ञातिबांधवांचें, नव्हे, फक्त आपल्या देशाचें सुद्धां मंगल होण्यानें आपल्याला संतोष वाटत नाही. सबंध मानवजातीबद्दल आपल्याला जिव्हाळा वाटतो किंवा तसा तो वाटावा अशी आपली इच्छा असते. मानवजातीनें आपल्या ध्येयाची जी साधना चालविली आहे त्यांतील हा एक फार मोठा टप्पा गांठला म्हणावयाचा.

मानवांबद्दल किंवा मानवजातीबद्दल माझ्या मनांत अविश्वास नाहीं. ईश्वरापुढे ते जाब देतील, तेव्हां मी त्याची चिंता कशाला करूं? पण ज्या ठिकाणी माझ्या स्वतःच्या कार्याचा संबंध पोहोंचतो त्या ठिकाणी माझा विचार गतिमान् होतो, आणि शंकाकुशंका व गैरविश्वास असतांना देखील सर्वांचे मंगल चिंतण्याचा मी प्रयत्न करतों. माझ्या नशिबीं यातना असतील तर मी त्या सहन करीन. परंतु अन्यायाविरुद्ध झगडणें शक्य असतांना मी हतबुद्ध होतां कामा नये.

आपल्या प्रेमाचे क्षेत्र आपण अशा तऱ्हेने वाढवीत गेलें पाहिजे, कीं प्रथम सबंध खेडें, सबंध खेड्यानें जिल्हा, आणि जिल्ह्यानें प्रांत असें करीत करीत सारें जग त्यानें आपल्या पोटांत घेतलें पाहिजे.

कोणावरहि अधिकार चालविण्याला प्रेमाखेरीज माझ्याजवळ अन्य शस्त्र नाहीं.

सबंध जगाशीं सख्य जोडणे हे माझे ध्येय आहे, आणि अन्यायाला अत्यंत कसून विरोध करीत असतांनाहि अत्यंत गाढ प्रेम माझ्या अंतः-करणात राहूं शकतें.

मनुष्यस्वभावाविषयी साशंक रहाणे मला पसंत नाही. कोणत्याहि उदात्त व मित्रत्वाच्या कृतीला मानवांकडून तसेंच प्रत्युत्तर मिळेल— मिळालेंच पाहिजे.

जेथें मी मदत करूं शकणार नाही तेथें अडथळा करण्याला मी निश्चय-पूर्वक 'नाही' म्हटलें पाहिजे.

प्रेमाजवळ कधी हक्काची भाषा नसते, ते नेहमी देतें; प्रेम नेहमी सहन करते, कधी त्रासत नाही, कधी सूड उगवीत नाहीं.

प्रेम असेल तेथे ईश्वरहि वास करतो.

## मानवप्राण्याचा धर्म : सहकार

मानवाचा धर्म मारक चढाओढ हा नसून जीवनदायी सहकार्य हा आहे. भावनाकडे दुर्लक्ष करणें म्हणजे मनुष्याला संवेदना आहेत हे विसरणें होय. ईश्वराचें प्रतिरूप म्हणून जर आपण बनलेलो असूं तर मूठभर लोकाचें भलें नव्हे, पुष्कळांचेहि भले नव्हे, तर यच्चयावत् लोकांचे भले आम्हीं साधलें पाहिजे.

माझे मुख्य ध्येय सबंध मानवजातीला सारखी वागणूक देणे हें आहे, आणि सारखी वागणूक म्हटली की समानसेवा आलीच.

कारण, सगळी माणसे वयाने, उंचीने, वर्णाने आणि बुद्धीने सारखी नसली तरी ही असमानता तात्पुरती आणि वरवरची आहे; या पार्थिव झिरझिरीत पडद्याच्या आड जो आत्मा दडलेला आहे तो सर्व देशातील सर्व स्त्री-पुरुषाच्चे बाबतीत एकच आहे. आपल्या भोवताली जे वैचित्र्य पसरले आहे त्या सगळ्या वैचित्र्यांत वास्तविक मूर्तिमंत ऐक्य नांदत आहे. "असमानता" या शब्दाला एक वाईट वास लागलेला आहे आणि त्याने पाश्चात्य व पौर्वात्य या दोन्ही देशांत वृथाभिमान आणि अमानुषता माजविलेली आहे. जे माणसांना लागू तेच राष्ट्रानाहि. कारण, राष्ट्रे म्हणजे तरी मानवसमूहच. असमानतेच्या खोट्या आणि ताठर सिद्धातानेच आशिया व आफ्रिका खंडांतील राष्ट्राची अपमानास्पद पिळवणूक होत आहे. पौर्वात्य देशांना भक्ष्य बनविण्याचे पाश्चात्याचे आजचे सामर्थ्य हे पाश्चात्यांच्या श्रेष्ठत्वाचे आणि पौर्वात्याच्या कनिष्ठपणाचे द्योतक आहे असे कोणाला वाटते?

आकार अनेक असले तरी त्यातील प्रेरक तत्त्व एकच आहे. बाह्य भिन्नतेच्या मुळाशी हे सर्वव्यापी मूलभूत ऐक्य असताना श्रेष्ठ आणि कनिष्ठ असल्या भेदांना वाव तरी कसा रहातो? कारण दैनंदिन जीवनात आपल्याला या गोष्टींचे प्रत्यंतर येत असते. ही मूलभूत एकता अनुभविणे हेच सर्व धर्माचे साध्य आहे.

## परस्पर-सहिष्णुता

आपले सर्वांचे विचार कधीहि एकसारखे असणार नाहीत. आणि सत्याचे दर्शन आपल्याला नेहमी अशाअंशानीच व तेहि निरनिराळ्या दृष्टिकोनांतून होणार; असे असल्यामुळे परस्पर-सहिष्णुता हाच आचाराचा उत्कृष्ट नियम समजावा. विवेकबुद्धि ही सर्वांची सारखी नाही. व्यक्तिगत आचरणाच्या बाबतीत जरी ती योग्य मार्गदर्शक असली, तरी ते आचरण सर्वांवर लादणे हें प्रत्येकाच्या विवेकबुद्धीच्या स्वातंत्र्यावर असह्य घाला घालण्यासारखे होईल. अगदी विवेकबुद्धीला जागून वागणाऱ्या लोकात सुद्धा प्रामाणिक मतभेदाना भरपूर वाव राहील. म्हणून कोणत्याहि सुसंस्कृत समाजात परस्पर-सहिष्णुता हाच एक आचारनियम असू शकतो.

आपलीं अंतःकरणें स्वच्छ करा आणि उदारता ठेवा असें माझें तुम्हांला कळकळीचें सांगणें आहे. तुमचीं अंतःकरणें सागरासारखीं विशाल होऊं देत. दुसऱ्यांचे दोष काढून त्यावर टीका करूं नका, नाहीं तर तुमचीहि स्थिति तशीच होईल. वर तो सर्वश्रेष्ठ न्यायाधीश बसला आहे, तो तुम्हांला फांसावर-हि चढवूं शकेल, पण तो तुम्हांला जिवंत सोडतो. तुमच्या अंतरांत आवतीं-भोवतीं अनेक शत्रु आहेत, परंतु तो तुमचें रक्षण करीत आहे आणि तुमच्या-कडे मायेच्या दृष्टीनें पहात आहे.

क्षमाशीलता हा आत्म्याचा गुण आहे, आणि म्हणून त्याला भावरूप गुण म्हणतां येईल. तो अभावात्मक नाहीं. बुद्ध भगवान् म्हणतात : "अक्रोधानें क्रोधाला जिंका." पण तो "अक्रोध" म्हणजे काय? तो भावरूप गुण आहे आणि त्याचा अर्थ उदारतेचा अथवा प्रेमाचा सर्वश्रेष्ठ गुण असा आहे. या सर्वश्रेष्ठ गुणाची जाणीव तुमच्यांत जागृत झाली पाहिजे. मग तो बाहेर व्यक्त कसा होईल? तर तुम्ही त्या रागावलेल्या माणसाकडे जाऊन त्याच्या रागाचें कारण समजावून घेतलें पाहिजे; तुमच्याकडून कांहीं आगळीक घडली असेल तर त्याची तुम्ही भरपाई केली पाहिजे. आणि नंतर त्यानें पत्करलेल्या मार्गांतील चूक त्याच्या गळीं उतरवून चिडून जाणें कसें अयोग्य आहे याची त्याला खात्री पटवून दिली पाहिजे. आत्म्याचा हा गुण आहे. अशी जाणीव असणें आणि बुद्धिपुरस्सर त्याचा अंमल करणें या योगें त्या मनुष्याचीच स्वतःची उंची वाढते असें नव्हे, तर भोवतालच्या वातावरणाची सुद्धां उंची वाढते. अर्थात् ज्याच्याजवळ तें प्रेम असेल तोच हें अंमलांत आणील. हें प्रेम सतत प्रयत्नानें अंगीं आणतां येतें यांत शंका नाहीं.

जें व्यक्तीच्या बाबतींत लागू तेंच राष्ट्राच्या बाबतींतहि. क्षमा कितीहि केली तरी ती थोडीच. दुर्बल माणूस कधींहि क्षमा करूं शकणार नाहीं. क्षमा हा वीरांचा गुण आहे.

## मी जातीयवादी नाहीं

मला हिंदू लोकांबद्दल जितकें प्रेम वाटतें तितकेंच मुसलमानांबद्दल वाटतें. हिंदूंइतकाच मुसलमानांबद्दलहि मला कळवळा वाटतो. माझें हृदय जर मला फाडून दाखवितां आलें, तर तुम्हांला असें आढळून येईल, कीं हिंदू-

करितां एक, मुसलमानाकरिता एक, अशा प्रकारे त्यांत निरनिराळे कप्पे राखून ठेवलेले नाहीत.

प्राचीन संस्कृतीमधील गुप्त ठेवा हुडकून काढण्याचा प्रयत्न करीत असताना प्राचीन हिंदु-संस्कृतीत जे कांही शाश्वत म्हणून आहे ते सर्व ख्रिस्त, बुद्ध, महंमद आणि झरतुष्ट्र यांच्या शिकवणुकीतहि आढळतें, असा अमोलिक शोध मला लागला.

जातीय सलोखा घडून यावा ही माझी तळमळ कधीहि थांबली नाही याची साक्ष मी जिवंत असतांना नाही, तरी मी मेल्यानंतर हिंदू आणि मुसलमान दोघेहि देतील, याची मला खात्री आहे.

हिंदु-मुसलमान-ऐक्याची अगदी किशोरावस्थेपासून मला तळमळ लागून राहिली आहे. काही अत्यंत थोर मनाचे मुसलमान मी माझ्या मित्रांत गणतो. पोटच्या मुलीहून जास्त असलेली अशी एक निष्ठावंत मुसलमान मुलगी माझ्याजवळ आहे. त्या ऐक्यासाठी तिचे जीवित आहे आणि त्यासाठी मरण देखील ती आनंदाने पत्करील. मुंबईच्या जुम्मा मशिदीच्या माजी मोअज्झीनचा मुलगा निष्ठावंत आश्रमवासी म्हणून माझ्यापाशी रहात असे.

## धर्मसिद्धान्त : : १९

काही विषय असे आहेत, की ज्यात बुद्धिवादाने फारसे काम भागत नाही आणि आपल्याला श्रद्धेवर विसंबून रहावे लागते. त्या ठिकाणी श्रद्धा ही बुद्धीला विरोधी अशी नसते, तर ती बुद्धीला ओलांडून पलीकडे जाते. श्रद्धा हे एक प्रकारचें सहावे इंद्रियच आहे, बुद्धीच्या टप्प्याबाहेरील क्षेत्रांत ती कार्य करते.

खवळलेल्या समुद्रातून श्रद्धाच आपल्याला तारून नेते. पर्वतांना ती हालवते आणि तीच समुद्र ओलांडून जाते. ही श्रद्धा म्हणजे दुसरें-तिसरें कांहीं नसून आपल्या हृदयस्थ ईश्वराची जिवंत, खडखडीत जागृत अशी जाणीव होय. ज्याला ती श्रद्धा प्राप्त झाली त्याला इतर कशाचीहि जरूर

भासत नाहीं. तो शरीरानें दुर्बल असला तरी आत्मिक दृष्ट्या तो बलवान् असतो. लौकिक दृष्ट्या गरीब असला तरी आध्यात्मिक संपत्तींत तो लोळत असतो.

श्रद्धा नसेल तर जग हे क्षणांत शून्य होईल. उपासना आणि तपश्चर्या यांच्या योगाने शुद्ध असे जीवन ज्यांनी घालविले आहे असें आपण मानतों, अशा लोकांचा बुद्धियुक्त अनुभव आत्मसात् करून घेणें याचें नांव खरी श्रद्धा. म्हणून पुरातन काळीं होऊन गेलेल्या ईश्वरी किंवा अवतारी पुरुषांवर विश्वास ही काही निरर्थक भोळी समजूत नव्हे; आंतरिक आध्यात्मिक गरजेची ती पूर्ती आहे.

श्रद्धा म्हणजे जराशा वादळी हवेने कोमेजून जाणारें नाजूक फूल नव्हे. सहसा ज्याच्यात फरक पडत नाहीं अशा हिमालय पर्वतासारखी श्रद्धा ही वस्तु आहे. हिमालयाला मुळापासून हालविण्याचे सामर्थ्य कसल्याहि झंझावातांत नाहीं. तुम्हीं प्रत्येकाने ईश्वर आणि धर्म यांच्याविषयीं अशा तऱ्हेची श्रद्धा बाळगून घ्यावी असे मी इच्छितो.

कदाचित् मी मागतो हे कोणाला तऱ्हेवाइकपणाचे वाटेल. परंतु माझा असा दृढ विश्वास आहे, कीं अगदीं उतारवयांत देखील जो एकादे कार्य ईश्वराच्या नांवाने आणि त्याच्यावर पूर्ण श्रद्धा ठेवून हातीं घेतो, त्याचे तें कार्य निरर्थक जात नाहीं आणि माझी अशी खात्री आहे, कीं मी जें कार्य अंगावर घेतलें आहे तें माझें नसून ईश्वराचेंच आहे.

## सर्व धर्म सत्य आहेत

निर्णय करीत असताना माझ्यामधील राजकारणी बुद्धीनें त्यावर कधीहि वर्चस्व गाजविलें नाहीं आणि राजकारणांत मी भाग घेतों आहें असें दिसलें, तर त्याचे कारण हेंच, कीं एकाद्या सापानें घातलेला विळखा सोडविण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी जसा तो सुटत नाहीं, तसा राजकारणानें आज आपणाभोंवती विळखा घातला आहे. या सापाशीं झगडण्याची माझी इच्छा आहे; तसा तर मी १८९४ सालापासून बुद्धिपुरस्सर आणि आज मला समजून आलें आहे त्याप्रमाणें, मला जाणीव आली त्या वयापासूनच न कळत त्याच्याशीं झगडत आलों आहें. आणि त्यांत मला थोडेंफार यशहि आलें

आहे. माझ्या सभोंवार प्रचंड गर्जना करणारें तुफान घोंघावत असतांना मला शांतिपूर्वक रहातां यावें या स्वार्थी इच्छेनें राजकारणांत धर्माला दाखल करून मीं स्वतःच्या आणि मित्रांच्या बाबतीत प्रयोग चालविला आहे. धर्म म्हणजे मी काय समजतो ते मला स्पष्ट केलें पाहिजे. मी धर्म म्हणतों तो हिंदुधर्म नव्हे, अर्थात् इतर धर्मापेक्षां हिंदुधर्म मला खात्रीनें लाख मोलाचा वाटतो. पण मी म्हणतो तो धर्म हिंदुधर्माच्याहि पलीकडचा आहे, तो धर्म माणसाच्या स्वभावांतच मुळी पालट करतो, तो अंतःस्थ सत्याशीं माणसाची अभेद्य गांठ मारून टाकतो आणि तो नेहमी माणसाला शुद्ध करतो. तो धर्म म्हणजे मनुष्यस्वभावातील एक नित्य तत्त्व आहे. स्वतःच्या पूर्ण प्रकटीकरणासाठी कोणतीहि किमत द्यावी लागली, तरी ती त्याला जास्त वाटत नाहीं. आणि आत्मसाक्षात्कार होईपर्यंत व विधात्याचें ज्ञान होऊन त्याच्यामध्यें आणि स्वतःमध्यें असलेल्या साम्याची गोडी चाखेपर्यंत तो धर्म जिवाला अत्यंत अस्वस्थ करून टाकतो.

तुरुगांतल्या धर्मासारखा माझा धर्म नाहीं. माझ्या धर्मात ईश्वराच्या अत्यंत कनिष्ठ सृष्टीला मुद्धां स्थान आहे. परंतु अहंकार आणि जात, धर्म, अथवा वर्ण यांविषयींचा अभिमान यांनीं तो धर्म कधीहि बाधित होत नाहीं.

हिंदुस्थानचा आणि मानवजातीचा मी स्वतःला एक नम्र सेवक समजतो. आणि या सेवेत राबत असतांनाच मरण यावें अशी माझी इच्छा आहे. एकादा संप्रदाय स्थापन करण्याची माझी इच्छा नाहीं. माझ्यामागें एकादा संप्रदाय चालू रहावा एवढ्याने समाधान होण्याइतकी माझी महत्त्वाकांक्षा तुटपुंजी नाहीं; कारण कोणतीच नवीं सत्यें मीं पुरस्कारलेलीं नाहींत. सत्य जे मला समजलें आहे त्याचें अनुसरण आणि पुरस्कार करण्याचा माझा प्रयत्न आहे. कित्येक जुन्या अशा अनेक सत्यांवर मी नवा प्रकाश टाकला आहे असें मात्र मी निश्चित म्हणतों.

माझ्या देशापेक्षांहि माझा धर्म मला अधिक प्रियकर वाटतो. आणि म्हणून मी प्रथम हिंदु आणि नंतर राष्ट्रवादी आहें असे ज्या वेळीं मी म्हणतों, त्या वेळी त्या विधानांत निःसंशय कांहीं अर्थ आहे. तेवढ्यामुळे कट्टर राष्ट्रवाद्यांहून मी कांहीं कमी राष्ट्रवादी होत नाही. त्याचा अर्थ इतकाच

घ्यावयांचा, की माझ्या देशाचे हित आणि माझ्या धर्माचें हित हीं दोन्हीहि एकच आहेत. याचप्रमाणें जेव्हां मी असें म्हणतों, की माझी स्वतःची मुक्ति मी इतर कोणत्याहि गोष्टीपेक्षां–हिंदुस्थानच्या मुक्तीपेक्षां सुद्धां–जास्त मोलाची समजतो तेव्हां त्याचा अर्थ असा नव्हे, की माझ्या स्वतःच्या मुक्तीसाठी हिंदुस्थानच्या राजकीय अथवा दुसऱ्या कोणत्याहि प्रकारच्या मुक्तीचा बळी दिला पाहिजे. परंतु त्याचा निश्चित अर्थ असा आहे, की माझी वैयक्तिक मुक्ति आणि देशाची मुक्ति हीं दोन्ही एकमेकांशीं संबद्ध आहेत.

जगांत एकच धर्म नांदू शकतो किंवा नांदेल या मताशीं मी सहमत नाहीं. म्हणून सर्व धर्मांमधील समानत्व शोधण्याची आणि परस्पर-सहिष्णुतेची वृत्ति लोकांत निर्माण करण्याची माझी धडपड आहे.

माझ्या कार्यावर आणि मानवजातीवर माझा पूर्ण विश्वास आहे. हिंदुस्थानांतील जनता ही कोठल्याहि इतर मानववंशापेक्षां कमी प्रतीची तर नाहींच, पण कदाचित् इतराहून ती अधिक चांगली आहे. खरें म्हणजे या कार्यांत मानवी स्वभावावरील विश्वास गृहीतच आहे. हा मार्ग अंधाराचा वाटला, तरी ईश्वराच्या मार्गदर्शनावर जर माझा विश्वास असेल आणि त्या अचूक मार्गदर्शनावाचून मी काय करणार असें मानण्याइतकी जर माझी वृत्ति नम्र असेल, तर ईश्वर माझा मार्ग उजळ करील आणि मला हातीं धरून चालवील.

ख्रिस्ती अथवा इतर कोणत्याहि धर्माची सत्यता व गरज ज्या क्षणीं मला भासेल त्या क्षणीं त्या धर्मावरील विश्वास उघड व्यक्त करण्याला मला परावृत्त करील अशी जगांत कोणतीहि शक्ति नाहीं. जेथें भीति आहे तेथें धर्म कसा असूं शकेल ? समजा, बायबलाचा अथवा कुराणाचा माझ्या समजुतीप्रमाणें अर्थ लावून मी स्वतःला जर ख्रिस्ती अथवा मुसलमान म्हटलें, तर तसें करण्यास कचरतां कामा नये. कारण मग हिंदु, मुसलमान आणि ख्रिस्ती या संज्ञा समानार्थींच होतील. माझा असा निश्चित विश्वास आहे, की परलोकीं हिंदु, खिश्चन अथवा मुसलमान असे भेद नाहींत. तेथें प्रत्येकाचा निवाडा होतो तो ते स्वतःला काय म्हणवून घेतात अथवा ते कोणत्या मताचे आहेत यावरून नव्हे, तर त्यांच्या कर्मांवरून होतो. मग ते आपलीं मतें कांहीं का सांगेनात. आपल्या ऐहिक जीवनांत मी आमक्या धर्माचा असें सांगावें लागणारच.

म्हणून जोंपर्यंत माझ्या वाडवडिलांचा धर्म माझी वाढ खुंटवीत नाहीं आणि इतरत्र आढळणाऱ्या सर्व चांगल्या गोष्टी . . . . करण्याला मला मना करीत नाहीं, तोंपर्यंत माझ्या वाडवडिलांच्या धर्माचेंच नांव स्वतःचा धर्म म्हणून कायम ठेवणें मला ठीक वाटतें.

माझा असा विश्वास आहे, कीं जगांतील सर्व महान् धर्म कमी-अधिक प्रमाणांत खरे आहेत. मी " कमी-अधिक प्रमाणांत " म्हणतो त्याचें कारण असें, कीं मानव हाच मुळांत अपूर्ण असल्यानें तो ज्या वस्तूला स्पर्श करतो ती ती वस्तु अपूर्ण बनते. पूर्णत्व हा सर्वस्वीं ईश्वराचाच गुण आहे आणि ते अवर्णनीय व अनिर्वचनीय असे आहे. ईश्वर जितका पूर्ण आहे तितके पूर्ण होणें मनुष्यमात्राला शक्य आहे. असा माझा निश्चित विश्वास आहे. आपण सर्वांनी पूर्णत्वाप्रत पोचण्याची धडपड करणें जरूर आहे; परंतु जेव्हां ती भाग्याची अवस्था प्राप्त होते तेव्हां मग तिचे वर्णन करणें किंवा तिची व्याख्या करणे शक्य होत नाही. म्हणून अत्यंत नम्रपणे मी कबूल करतों, की वेद, कुराण व बायबल ही देखील ईश्वराची अपूर्ण अशी वाणी आहे. आणि आपण अपूर्ण मानव अनेक विकारांच्या धक्क्यांनी हेलकावे खात असल्याकारणानें आपल्याला ईश्वराची ही वाणी संपूर्णपणें समजून घेणें देखील शक्य आहे.

मी सनातनी हिंदु आहे असे जेव्हां मी म्हणतों आणि सनातनी हिंदूच्या बाबतींत नेहमी समजले जाणारे गुण जेव्हां माझ्या मित्रांना माझ्यांत दिसत नाहीत, तेव्हां ते गोंधळून जातात हे मला माहीत आहे. पण त्याचे कारण असें, कीं मी अगदीं कट्टर हिंदु असलो तरी माझ्या धर्मश्रद्धेत ख्रिस्ती, मुसलमानी आणि झरतुष्ट्र धर्मातील उपदेशहि सामावूं शकतो, त्यामुळें माझा हिंदुधर्म कांहींना अनेक धर्मांचे कडबोळें आहेसें वाटतें. आणि काहींनी तर सर्वमत-संग्राहक म्हणून माझी पाठ थोपटली आहे. आतां एकाद्याला सर्वमत-संग्राहक म्हणणे म्हणजे त्याला स्वतःचा कांहीं धर्म नाहीं असें समजण्यासारखें आहे. पण माझा धर्म आहे तो विशाल आहे. त्यांत ख्रिश्चनाला अगदीं प्रॉटेस्टंट पंथाच्या अनुयायाला सुद्धां विरोध नाहीं. अत्यंत धर्मवेड्या मुसलमानालाहि विरोध नाही. हा धर्म अत्यंत उदार भावनेच्या सहिष्णुतेवर आधारलेला आहे. एकाद्या माणसानें धर्मवेडेपणाचीं कृत्यें केली म्हणून मी त्याला

नांवे ठेवणार नाहीं. कारण त्या कृत्यांकडे मी त्याच्या दृष्टिकोनांतून पाहण्याचा यत्न करतो. अशा विशाल धर्मभावनेमुळेंच मी टिकून राहिलों आहें. ही थोडीशी गोंधळून टाकणारी भूमिका आहे हें मला मान्य आहे; परंतु ती दुसऱ्यांना, मला नव्हे!

निरनिराळ्या धर्मांच्या– केवळ हिंदुस्थानांतीलच नव्हे, तर जगांतील सर्व लोकांनी परस्परांशी संबंध बांधून उन्नत व्हावे असे मला फार वाटतें. तसे जर झाले, तर आज आहे त्याहून आपले जिणे अधिक चांगले होईल. अत्यंत उदार भावनेची सहिष्णुता बाळगा, अशी माझी कळकळीची प्रार्थना आहे आणि ते साध्य साधण्याचा माझा प्रयत्न आहे. प्रत्येक धर्म त्या त्या धर्माच्या अनुयायांच्या दृष्टिकोनांतून तुम्ही तपासा असे माझे लोकाना सांगणें असतें. माझ्या कल्पनेतील आदर्श हिंदुस्थानांत एकच धर्म वाढावा– म्हणजे हिंदुस्थान हा सर्वस्वी हिंदूंचा, सर्वस्वी ख्रिश्चनांचा किंवा सर्वस्वी मुसल्मानांचा व्हावा– अशी माझी अपेक्षा नाहीं; हिंदुस्थानने आपल्या येथील धर्मांना परस्परांच्या सहकार्याने चालूं देण्याइतके सहिष्णु व्हावे अशी माझी इच्छा आहे.

बायबलातील गिरिप्रवचन आणि भगवद्गीता यांत मला कांहींहि भेद आढळून आलेला नाहीं. त्या प्रवचनांत जे वर्णनात्मक पद्धतीनें सांगितलें आहे तेंच भगवद्गीतेनें शास्त्रीय स्वरूपांत मांडलें आहे. आज ज्याला शास्त्रीय म्हटलें जातें तशा अर्थानें हा ग्रंथ कदाचित् शास्त्रीय नसेल· पण त्यांत प्रेमाचा सिद्धान्त— मी त्याला त्यागाचा सिद्धान्त म्हणेन— शास्त्रीय पद्धतीनें मुद्देसूदपणें मांडला आहे. गिरिप्रवचनांत हाच सिद्धान्त सुरेख भाषेत सांगितला आहे. "जुन्या करारां"तील कांहीं भाग वाचल्यानंतर माझ्या मनांत एक तिटकारा उत्पन्न झाला होता, पण त्यानंतर "नवा करार" माझ्या वाचनांत आल्यानें मला समाधान आणि अपार आनंद लाभला. समजा, आज माझ्याजवळची गीता कोणी काढून घेतली आणि त्यांतील सर्व मजकूर मी विसरून गेलों, पण माझ्याजवळ जर गिरिप्रवचनाची एकादी प्रत असेल, तर गीता वाचून जितका मला आनंद होईल तितकाच त्यानेंहि होईल.

माझ्या स्वभावांत एक गोष्ट आहे ती ही, कीं एकाद्या वस्तूची काळी

बाजू पाहण्यापेक्षां उजळ बाजू पाहणें मला आवडतें, आणि म्हणून कोणत्याहि थोर धर्माच्या, कोणत्याहि थोर ग्रंथापासून मला स्फूर्ति मिळूं शकते. मला गीतेंतील अथवा नव्या करारांतील एकहि श्लोक कदाचित् पाठ म्हणून दाखवितां येणार नाहीं. हिंदू मुलांना गीतेंतील किंवा खिस्ती मुलांना नव्या करारांतील श्लोक चांगल्या तऱ्हेनें पाठ म्हणतां येतील; परंतु त्या दोन ग्रंथांतील तत्त्वांचें जे सार मी आत्मसात् केलें आहे तें त्या हुषार मुलांना माझ्यापासून काढून घेतां येणार नाहीं.

प्रार्थनायुक्त अंतःकरणानें शोध व अभ्यास करून आणि जितक्या लोकांना भेटता येईल तितक्यांशीं चर्चा करून पुष्कळ वर्षांपूर्वी मी या निर्णयावर आलों, कीं सर्व धर्म खरे आहेत; त्याचप्रमाणें सर्व धर्मांत कांहीं ना कांहीं दोषहि आहेत. आणि माझ्या धर्माला मी चिकटून रहात असलों, तरी त्या धर्माइतकेच इतरहि धर्म मला प्रिय वाटले पाहिजेत. यावरून ओघानेंच असें येतें, कीं सर्वांनाच आपण आपल्या अगदीं जवळच्या आप्तांइतकेंच प्रिय समजलें पाहिजे. आणि त्यांच्यांत आपण कसलाहि भेदाभेद करतां कामा नये.

माझी पत्नी ही जशी मला जगांतील सर्व स्त्रियांहून अत्यंत सुंदर वाटते. तसाच अहिंसेचा संदेश देणारा हिंदुधर्म मला जगांत सर्वांहून गौरवशाली धर्म वाटतो; परंतु इतरांनाहि आपापल्या धर्माविषयीं तसेंच वाटणें संभवनीय आहे. ईश्वर एकच आहे अशी श्रद्धा ही सर्व धर्मांची कोनशिला आहे. परंतु सर्व पृथ्वीतलावर आचारांत फक्त एकच धर्म राहील ही गोष्ट माझ्या दृष्टिपथांत येत नाहीं. तात्त्विक दृष्ट्या, ईश्वर एकच आहे, तर धर्महि फक्त एकच असूं शकेल. परंतु व्यवहारांत कोणत्याहि दोन माणसाची ईश्वरा-विषयींची कल्पना एकच आहे असें मला आढळलेलें नाहीं. म्हणून निरनिराळ्या प्रकृतिधर्मानुसार आणि हवामानानुसार नेहमींच कदाचित् निरनिराळे धर्म रहातील.

जगांतील सर्व थोर धर्मांच्या मूलभूत सत्यावर माझा विश्वास आहे. मी असें मानतों, कीं ते सर्व धर्म ईश्वरप्रणीत आहेत आणि ज्या लोकांना त्या धर्मांचा साक्षात्कार झाला त्यांना त्यांचीच आवश्यकता होती. आणि मी असेंहि मानतों, कीं त्या त्या धर्मांच्या अनुयायांच्या दृष्टिकोनांतून जर आपणां

सर्वांना वेगवेगळे धर्मग्रंथ वाचतां आले तर ते सर्व धर्म मुळांत एकच आहेत आणि एकमेकाना साहाय्यक आहेत असेच आपल्याला आढळून येईल.

पाशवी शक्तीच्या जोरावर कोणताहि धर्म टिकवून धरतां येणार नाही अशी माझी पक्की खात्री झालेली आहे. उलट, जे शस्त्र हातीं धरतात ते नेहमी शस्त्रानेच नाश पावतात.

राष्ट्रांप्रमाणेंच धर्मांचीहि आज परीक्षा होत आहे. जो धर्म आणि जे राष्ट्र अन्याय, असत्य किंवा हिंसा यावर आपली भिस्त ठेवील, ते राष्ट्र आणि तो धर्म पृथ्वीतलावरून निःशेष होईल.

वस्तुतः जितक्या व्यक्ती तितके धर्म आहेत.

एकाच बिंदूप्रत पोंचणारे निरनिराळे मार्ग म्हणजे निरनिराळे धर्म होत. जोपर्यंत कोणत्याहि रस्त्याने साध्य एकच गाठलें जात आहे, तोपर्यंत आपले रस्ते भिन्नभिन्न असले म्हणून काय बिघडणार आहे ?

धर्म म्हणजे बाह्य आचाराचा किंवा रूढीचा धर्म मी म्हणत नाहीं, तर सर्व धर्मांच्या मुळाशीं असलेला, सृष्टिकर्त्याची प्रत्यक्ष भेट करविणारा असा धर्म मी म्हणतों.

## बुद्धीच्या मर्यादा

बुद्धीच्या कांहीं विशिष्ट मर्यादा आहेत हे जाणून घेण्याइतकी नम्रता अनुभवानें माझ्या ठिकाणीं आली आहे. ज्याप्रमाणें एकादी वस्तु अयोग्य ठिकाणीं ठेवली तर तिला कचऱ्याची किंमत प्राप्त होते, त्याप्रमाणें बुद्धीचा दुरुपयोग झाला तर तो वेडेपणा ठरतो.

बुद्धिवादी माणसाची वाहवा करावी, परंतु ज्या वेळीं बुद्धिवाद स्वतःला सर्वशक्तिमान समजतो, त्या वेळीं त्याला एकाद्या भयानक राक्षसाचें रूप प्राप्त होते. बुद्धीवर सर्व शक्तिमत्त्वाचें आरोपण करणें ही निर्जीव वस्तूंना ईश्वर मानून त्यांची पूजा करण्याइतकीच मूर्तिपूजकता आहे.

बुद्धीची गळचेपी करा असें मी सांगत नाहीं. पण खुद्द बुद्धीला पावित्र्य देणारें आपल्यात जे कांहीं आहे त्याची योग्य ती कदर करा, असें माझें सांगणें आहे.

शुद्ध आणि निष्कलंक बुद्धीला जी गोष्ट पटते त्या गोष्टीबद्दल दुसऱ्या

अधिकारी व्यक्तीकडे अथवा वस्तूकडे—मग तिची महति कितीहि असो—प्रामाण्य शोधण्याची गरज असूं नये, हें हातावरील आंवळ्याप्रमाणें मला स्पष्ट वाटतें.

माझ्यांत कसलाहि धर्मभोळेपणा नाहीं असें मी मानतो. सत्य केवळ तें पुरातन आहे म्हणून सत्य ठरत नाहीं. त्याचबरोबर, तें पुरातन आहे एवढ्याच-करितां त्याच्याकडे संशयानें बघण्याचेंहि कारण नाहीं. जीवनाचीं कांहीं मूलभूत मूल्यें अशीं आहेत, कीं तीं आपल्या जीवनांत उतरविणें कठिण असलें तरी त्यांना क्षुल्लक समजून सोडून देतां कामा नये.

मला वेद हे दैवी आणि अलिखित वाटतात. केवळ शब्दार्थानें नाश होतो. शब्दाच्या आंत लपलेलें तत्त्वच प्रकाश दाखवितें. आणि वेदांतील तत्त्व म्हणजे शुचिता, सत्य, निष्कपटीपणा, पावित्र्य, साधेपणा, क्षमाशीलत्व, ईश्वर-परायणता आणि स्त्री-पुरुषांना जें जे म्हणून उदात्त व शूर बनवील तें तें सर्व आहे.

वेदातच तेवढा ईश्वरी अंश आहे असें मी बिलकुल मानीत नाहीं. वेदां-सारखेच बायबल, कुराण आणि झेन्द-अवेस्ता हे ग्रंथ देखील ईश्वरप्रेरितच आहेत असा माझा विश्वास आहे. हिंदु-धर्मग्रंथावर माझा विश्वास आहे याचा अर्थ त्यांतील प्रत्येक अक्षर आणि प्रत्येक श्लोक ईश्वरप्रेरित आहे असें मी मानलें पाहिजे असा नाहीं. त्यावरील भाष्य कितीहि विद्वत्तापूर्ण असलें, तरी जर तें बुद्धीला किंवा नीतिभावनेला प्रतिकूल असेल, तर त्यानें बांधला जाण्याला मी बिलकुल तयार नाहीं.

शब्दाला चिकटून रहाणारा माणूस मी नाहीं. म्हणून मी जगांतील निरनिराळ्या धर्मग्रंथांतील भावार्थ समजून घेण्याचा प्रयत्न करतों. खुद्द या धर्मग्रंथांनींच प्रतिपादलेली सत्य आणि अहिंसा, यांची कसोटी मी त्यांचा अर्थ लावण्याच्या कामीं उपयोगांत आणतों. त्या कसोटीच्या दृष्टीनें जें विसंगत असेल तें मी टाकून देतों आणि सुसंगत असेल त्या सर्वांचा स्वीकार करतों.

म्हणून शेवटीं स्वतःच्या अनुभवाला वाटाड्या करूनच प्रत्येकानें चाललें पाहिजे. लिहिलेल्या वचनांची मदत होत नाहीं असें नाहीं; परंतु त्या वचनांचा देखील अर्थ लावून घ्यावा लागतो आणि ज्या वेळीं भिन्न

भिन्न अर्थ लावले जातात, त्या वेळी साधकानें स्वतःचाच अर्थ निर्णायक समजला पाहिजे.

सर्व काळी लागू पडणारी केवल शुद्ध नीति अशी कांही वस्तु नाही. परंतु एक सापेक्ष नीति आहे आणि ती आम्हां अपूर्ण अशा मानवांपुरती केवल शुद्ध अशीच आहे. उदाहरणार्थ, मद्य हे औषध म्हणून, औषधांत वापरून आणि वैद्यकीय सल्ल्याने घेतलें नसेल त्या वेळी पूर्णपणें अनैतिक आहे. त्याचप्रमाणे स्वतःच्या पत्नीखेरीज अन्य स्त्रीकडे विकारी नजरेने पहाणे पूर्णपणें चुकीचें आहे. या दोन्ही अवस्था अगदी भावनावश न होतां केलेल्या बुद्धि-वादानें सिद्ध झालेल्या आहेत. त्याच्या विरुद्ध बाजूचे युक्तिवादहि नेहमी पुढे मांडण्यांत येतात. तसे तर सत्स्वरूपी परमेश्वराच्या खुद्द अस्तित्वाच्या विरुद्धहि युक्तिवाद लढविले जातात. बुद्धीच्या अतीत असणारी श्रद्धा हाच आमचा मेरु आहे. माझ्या श्रद्धेनेच मला पूर्वी पतनापासून वांचविलें आहे आणि अजूनहि ती वाचवीत आहे. तिनें मला कधींहि दगा दिलेला नाहीं आणि तिने कोणालाहि कधी दगा दिल्याचें आढळांत नाही.

# माझा हिंदुधर्म संकुचित नाहीं : : १६

हिंदुधर्म हा माझ्यापुरता मला सर्व दृष्टींनीं पुरेसा वाटतो. त्याच्या उदंड समुदायात प्रत्येक प्रकारच्या मताला संरक्षण मिळतें.

माझ्या पत्नीबद्दलच्या भावना जशा मला वर्णन करून सांगतां येणार नाहीत, तशाच हिंदुधर्माबद्दलच्या माझ्या भावनाहि मला वर्णन करतां येणार नाहीत. जगातील अन्य कोणत्याहि स्त्रीपेक्षां माझी पत्नी माझें हृदय जास्त हालवून सोडते. तिच्यांत दोष नाहीत असें नाहीं. माझ्या डोळ्यांना दिसतात त्यापेक्षां किती तरी जास्त दोष तिच्यांत आहेत असें मी म्हणतों. असें असलें तरी तिच्या-माझ्यामध्ये असलेल्या अवर्णनीय बंधाची भावना कोठे जाईल? याचप्रमाणें हिंदुधर्माविषयी माझ्या मनांत भावना आहेत; मग त्यांत दोष आणि उणिवा किती कां असेनात.

हिंदुधर्म हा संकुचित धर्म नाही. त्यांत जगांतील सर्व धर्मपुरुषांच्या पूजेला वाव आहे. सर्वसामान्य अर्थानें तो प्रचारकी थाटाचा धर्म नाहीं. त्यानें अनेक जमातींना आपल्या पोटांत घेऊन जिरवून टाकलें आहे, ही गोष्ट खरी; परंतु ही जिरविण्याची क्रिया उत्तरोत्तर वाढत गेलेल्या अशा अदृश्य स्वरूपांत झालेली आहे. हिंदुधर्म प्रत्येकाला आपापल्या धर्मानुसार ईश्वराची उपासना करण्यास सांगतो, आणि अशा रीतीनें सर्व धर्मांशी सलोख्यानें तो नांदतो.

हिंदुस्थानच्या संस्कृतीला अत्यंत ठळक व सर्वांत मोठी हिंदुधर्माची देणगी अहिंसा-तत्त्व ही आहे. गेलीं तीनशेंहून अधिक वर्षे अहिंसेनें देशाच्या इतिहासाला एक विवक्षित वळण लावलें असून आजच्या हिंदुस्थानांतील कोट्यवधि लोकांच्या जीवनांत एक प्रभावी शक्ति म्हणून आजहि तिचें स्थान नष्ट झालेलें नाही. तें एक विकास पावणारें तत्त्व आहे. त्याचा संदेश अजूनहि दिला जात आहे. अहिंसेची शिकवण आम्हां लोकांच्या अंगीं इतकी भिनली आहे, कीं हिंदुस्थानांत सशस्त्र क्रांति होणें ही जवळजवळ अशक्य गोष्ट झाली आहे. याचें कारण, कांहीं लोक समजतात त्याप्रमाणें, आपली जातच शारीरिकदृष्ट्या दुबळी आहे हें नव्हे— कारण एकाद्याला गोळी घालण्यासाठीं बंदुकीचा चाप ओढण्याला फारशी शारीरिक शक्ति लागते असें नाहीं, त्याला सैतानी वृत्तीच असावी लागते— तर आपल्या लोकात अहिंसेच्या परंपरेची मुळें खोलवर रुजलेलीं आहेत हें त्याचें कारण आहे.

हिंदुधर्माला मुख्यतः जर कशामुळें किंमत असेल, तर तो जीवमात्र ( केवळ मानवी जीवच नव्हे, तर सर्वच सचेतन प्राणी ) एक आहे म्हणजेच जीवमात्र सर्व एकाच आदिशक्तीपासून उदित होत असतो अशी जिवंत श्रद्धा बाळगतो म्हणून आहे— मग त्या शक्तीला अल्ला म्हणा, गॉड म्हणा किंवा परमेश्वर म्हणा.

माझा हिंदुधर्म संप्रदायनिष्ठ नाहीं. इस्लाम, ख्रिश्चन, बौद्ध, किंवा झरतुष्ट्र या धर्मांतील ज्या ज्या म्हणून चांगल्या गोष्टी मला माहीत आहेत त्या सर्वांचा अंतर्भाव माझ्या हिंदुधर्मांत होतो. सत्य हा माझा धर्म आहे आणि अहिंसा हाच त्याची प्राप्ति करून घेण्याचा मार्ग आहे. हिंसावाद मी कायमचा टाकून दिला आहे.

# गीतामाई

सत्कार्य साधण्यासाठी गीता हिंसा करण्याची शिकवण देते, असें मी मानीत नाही. आमच्या हृदयांत नित्य चाललेल्या द्वंद्वाचेंच गीतेंत मुख्यत्वेकरून वर्णन आहे. त्या दैवी ग्रंथकर्त्याने जीव धोक्यांत घालून देखील स्वधर्म पार पाडण्याचा धडा मनावर बिंबविण्यासाठी एका ऐतिहासिक घटनेचा उपयोग करून घेतला आहे. फळाची अपेक्षा न बाळगता कर्तव्य बजवावे हे गीता मनावर बिंबविते. जड शरीराने मर्यादित असलेली आपण मर्त्य माणसें आपल्या स्वतःच्या प्रवृत्तीव्यतिरिक्त इतर प्रवृत्तींवर ताबा चालविण्यास असमर्थ आहोत. प्रकाश देणारी शक्ति आणि अंधार पसरविणारी शक्ति याच्यांत गीता भेद करते. आणि त्या एकमेकींशी कशा विसगत आहेत ते विशद करून सांगते.

स्वतःपुरतें बोलावयाचे, तर ज्या ज्या वेळीं मी अडचणींत सांपडतों त्या त्या वेळीं मी गीतामाउलीकडे धाव घेतों, आणि आतांपर्यंत तिच्याकडून मला सतत समाधान लाभत आलेलें आहे. गीतेपासून ज्यांना आश्वासन मिळतें, त्याना मी ज्या पद्धतीनें गीता समजून घेतों ती पद्धति समजून आली, तर त्याना त्यामुळें अधिक साह्य होईल आणि कांहीं अगदीं नवीन असें त्याना आढळून येईल.

मी ख्रिस्ती धर्मांतील बऱ्याच गोष्टींचा चाहता असलों, तरी सनातनी ख्रिस्ती धर्माशीं समरस होणें मला अशक्य आहे. मी जाणतों तो हिंदुधर्म माझ्या आत्म्याचें संपूर्ण समाधान करतो. माझें रोमरोम तो व्यापून टाकतो आणि मला बायबलांतील गिरिप्रवचनांतहि जी शांति लाभत नाहीं, ती भगवद्गीता आणि उपनिषदें यांतून मिळते. गिरिप्रवचनांत सांगण्यांत आलेला आदर्श मला मोलाचा वाटत नाहीं असें नाहीं. अथवा त्यांतील कांहीं बहुमोल उपदेशाचा माझ्या मनावर खोल ठसा उमटलेला नाहीं असें नाहीं; परंतु मला हे कबूल केलें पाहिजे, कीं जेव्हां संशयपिशाच्च मला ग्रासते, जेव्हां निराशा माझ्या डोळ्याला डोळा भिडवून उभी रहाते आणि जेव्हां क्षितिजावर आशेचा एकहि किरण मला दिसत नाहीं, तेव्हां मी भगवद्गीते-कडे वळतो. आणि समाधान करूं शकेल असा श्लोक मला त्यांत मिळतो;

आणि अपार दुःख होत असतांहि मी लगेच प्रफुल्लित होतों. माझें आयुष्य दुर्दैवी अशा बाह्य घटनांनीं भरून गेलें आहे; परंतु त्या घटनांचा दृश्य आणि वज्रलेप असा परिणाम माझ्यावर जर झालेला नसेल, तर त्याचें कारण भगवद्‌गीतेची शिकवणूक हेंच आहे.

आज गीता मला बायबल किंवा कुराणच नव्हे, तर त्याहूनहि अधिक झाली आहे. ती माझी आई आहे. मला जन्म देणारी पार्थिव आई मला सोडून गेल्याला पुष्कळ वर्षे झालीं; परंतु तेव्हांपासून या अमर मातेनें त्या आईची जागा अगदीं पुरेपूर भरून काढली आहे. तिच्यांत कधी बदल झाला नाहीं. तिनें मला कधीं अंतर दिलें नाहीं. दुःखांत किंवा संकटांत असलो, कीं तिच्या कुशीत मला आसरा मिळतो.

## ख्रिस्ताला मी काय समजतों ?

युरोपखंड आज ईश्वराचें वा ख्रिश्चन धर्माचें प्रतीक नसून सैतानाचें प्रतीक बनले आहे असें माझें निश्चित मत आहे. आणि सैतान जेव्हां देवाचें नांव मुखांत घेऊन येतो तेव्हां त्याचा जय फार मोठा समजावा. युरोप आज केवळ नांवाला ख्रिश्चन म्हणावयाचें. वास्तविक तें धनपूजक बनलें आहे. " उंटाला एक वेळ सुईच्या नेढ्यांतून जातां येईल, परंतु श्रीमंत माणसाला देवाच्या राज्यांत प्रवेश करतां येणार नाहीं," हें खरोखर येशू ख्रिस्ताचें वचन आहे. त्याचे अनुयायी म्हणवून घेणारे लोक मात्र आपल्या नैतिक उन्नतीचें मोजमाप आपल्या भौतिक संपत्तीवरून करीत आहेत !

हिंदुधर्माला जागें करून त्याला हालचाल करावयाला लावण्याला ख्रिश्चन धर्माचा अप्रत्यक्ष प्रभाव कारणीभूत झाला आहे; परंतु सर्वसामान्यपणें हिंदुस्थानावर झालेला त्याचा परिणाम हा आपल्यांत वावरणाऱ्या सर्वसामान्य ख्रिस्ती मनुष्याचे जीवन आणि त्याचा आपल्यावर झालेला परिणाम यांवरून ठरविला पाहिजे. हा परिणाम आश्चर्यकारक झाला आहे हें माझे मत नमूद करतांना मला खेद होतों.

इतिहासकालीं जो येशू होऊन गेला त्याच्यांत मला कधींच गोडी वाटली नाहीं असें म्हणतां येईल. येशू नांवाचा मनुष्य कधी अस्तित्वांतच नव्हता

आणि बायबलात जे काही वर्णन आहे तो लेखकाच्या कल्पनाशक्तीचा खेळ आहे असें जर कोणी सिद्ध केले, तर मला त्याचें कांहीं वाटणार नाहीं. कारण, तरी देखील गिरिप्रवचनाचें मोल मी आजच्याइतकेंच मानीन.

येशू हाच एक ईश्वरी पुरुष आहे असे मी म्हणूं शकणार नाही. कृष्ण, राम, महमद, किंवा झरतुष्ट्र याच्याइतकाच तो ईश्वरांश आहे. याचप्रमाणें वेदातील अथवा कुराणांतील शब्दन् शब्द ईश्वरप्रेरित आहे असे जसे मी मानीत नाहीं, तसाच बायबलमधीलहि मानीत नाही. या ग्रंथापैकीं प्रत्येकाचा साराश ईश्वरप्रेरित आहे यांत शंका नाहीं. परतु त्यातील पुष्कळ गोष्टी अलग अलग पाहिल्या म्हणजे मला त्यांत दैवी प्रेरणेचा अभावच दिसतो. गीता आणि कुराण याच्याइतकाच बायबल हा मी माझा धर्मग्रंथ मानतो.

साप्रदायिक अर्थानें मी ख्रिश्चन आहे असे जरी मला म्हणतां आलें नाहीं, तरी ऐहिक आणि प्रापचिक अशा माझ्या सर्व प्रवृत्तींवर ज्या अहिंसेचा प्रभाव आहे तिच्यावर माझी श्रद्धा अमरपणे बसविण्याला येशूनें भोगलेल्या दुःखाचा मोटा वाटा आहे.

येशूला मी काय मानतो ? मानवजातीला आजपर्यंत लाभलेल्या अत्यंत श्रेष्ठ जगद्गुरूंपैकी तो एक होता असे मी मानतों. त्याच्या अनुयायांना तोच "देवाला जन्मलेला एकुलता एक पुत्र" वाटत होता. ही त्यांची समजूत मी ग्राह्य मानली तरी व न मानली तरी येशूने माझ्या जीवनावर जो कांहीं परिणाम केला आहे, त्या परिणामांत त्यामुळे कमीजास्त फरक पडणे शक्य आहे काय ? त्याच्या उपदेशाची आणि सिद्धांतांची भव्यता अनुभवण्याला त्यामुळे मला प्रतिबंध होणार आहे काय ? मला तसे वाटत नाहीं.

'जन्मलेल्या' या शब्दाने 'आध्यात्मिक जन्म' असा अर्थ अभिप्रेत आहे असें मला वाटते. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें तर खुद्द येशूच्या जीवनांतच त्याच्या ईश्वरसान्निध्याची किल्ली आहे, असा मी त्याचा अर्थ करतों. इतर कोणापेक्षांहि ईश्वराचा भाव आणि त्याची इच्छा येशूनेच व्यक्त केली, याच अर्थानें मी येशूकडे पाहतों आणि त्याला देवाचा पुत्र म्हणून मान्य करतों.

जगांतील निरनिराळ्या धर्मांच्या गुणावगुणांची किंमत करणें अशक्य आहे असें मला वाटतें; शिवाय ते अनावश्यक असून तसा प्रयत्न करणें हें देखील हानिकारक आहे असेंहि मी मानतों. तथापि, माझ्या मनाचा निर्णय

असा होतो, की यांतील प्रत्येक धर्म एकाच हेतूनें प्राप्त झालेल्या शक्तीला दृश्यरूप देतो; ती शक्ति म्हणजे मानवी जीवन उच्च करण्याची आणि त्याला कांही ध्येय देण्याची इच्छा ही होय. आणि मीं ज्याचा आतां उल्लेख केला तें महत्त्व व श्रेष्ठत्व येशूच्या जीवनाला असल्यामुळें तो फक्त ख्रिस्ती समाजापुरताच मर्यादित नाही, तर तो सबंध जगाचा, सर्व मानववंशाचा व लोकांचा आहे. ते लोक मग कोणत्याहि निशाणाखाली कोणत्याहि नांवानें अथवा कोणत्याहि विधानांचा आधार घेऊन काम करोत, आपला अमुक धर्म म्हणून सांगोत किंवा आपल्या वाडवडिलांपासून चालत आलेल्या कोणत्याहि देवाची उपासना करोत; त्याला महत्त्व नाही.

## बुद्धाचा मार्ग

माझें पूर्ण विचारांती असे मत बनलें आहे, की बुद्धाच्या शिकवणुकीतील मुख्य भाग हा आता हिंदुधर्माचा अविभाज्य घटक बनला आहे. आज हिंदुधर्मीय हिंदुस्थानला मागें जाऊन गौतमाने हिंदुधर्मात घडवून आणलेल्या महान् सुधारणा पुसून टाकणे शक्य नाही. आपल्या अलोट त्यागानें, महान् संन्यासाने आणि आपल्या शुद्ध, निष्कलंक जीवनाने त्याने हिंदुधर्मावर आपला वज्रलेप ठसा उमटविला आहे. आणि हिंदुधर्म त्या महान् जगद्गुरूचा सदोदित कृतज्ञ राहील. आज बुद्धधर्म म्हणून समजल्या जाणाऱ्या ज्या गोष्टी हिंदुधर्मानें आत्मसात् केलेल्या नाहीत, त्या बुद्धाच्या जीवनाचा आणि त्याच्या शिकवणुकीचा महत्त्वाचा भाग नव्हत्या.

माझें असे निश्चित मत आहे, की बुद्धधर्माला किंवा त्यापेक्षां देखील बुद्धाच्या शिकवणुकीला हिंदुस्थानांतच पूर्ण सफलता मिळाली; व स्वतः गौतम हा कट्टर हिंदु असल्यामुळें ते अपरिहार्यच होतें. हिंदुधर्मात जें उत्तमोत्तम होतें तें सर्व त्याच्या अंगी पुरेपूर भरलें होतें, आणि जी कांही तत्त्वें वेदांत लुप्तप्राय झालीं होती व त्यांच्याभोंवती रान माजलें होतें अशा तत्त्वांना त्यानें पुन्हां सजीव केले. त्याच्यांतील महान् हिंदुवृत्तीनें वेदांतील सुवर्णमय सत्यांभोंवती पसरलेल्या शब्दजंजाळांतून—निरर्थक शब्दजंजाळांतून मार्ग काढला. त्यानें वेदांतील कांहीं शब्दांतून त्याच्या काळच्या लोकांना पूर्णपणें अपरिचित असलेला अर्थ काढला, आणि हिंदुस्थान ही त्याला एक अनुकूल भूमि आढळली. बुद्ध जेथें जेथें

जाई, तेथें तेथें त्याच्या मागोमाग आणि भोंवतीं अहिंदु नव्हेत तर वैदिक धर्म ज्यांच्यांत पूर्णपणे मुरला होता असे हिंदूच गोळा होत. परंतु बुद्धाची शिकवणूक त्याच्या हृदयाप्रमाणेंच सर्वांना मोकळी व सर्वांना कवळणारी अशी होती. आणि म्हणूनच तो गेला तरी ती मागें राहिली असून सबंध जगभर पसरली आहे. आणि कोणीं मला बुद्धानुयायी म्हटले, तरी तो धोका पत्करूनहि हे महत्कार्य म्हणजे हिंदुधर्माचा विजय होय असें मी म्हणतो. बुद्धानें हिंदुधर्माचा कधींहि त्याग केला नाहीं, तर त्यानें त्याचा पाया जास्त व्यापक केला. त्याने त्याच्यात नवीन प्राण ओतला व त्याची नवी मीमांसा लावली. परंतु, मला तुम्हाला असें नम्रपणें सांगावयाचे आहे, की बुद्धाचा उपदेश सिलोन काय, ब्रह्मदेश काय, किंवा चीन अथवा तिबेट काय, कोठेंच सर्वांशानें आत्मसात् केला गेला नाहीं.

बुद्ध ईश्वर मानीत नसे असा एक आक्षेप अनेक वेळां घेण्यांत येत असल्याचे मी ऐकलें आहे. त्याचप्रमाणें बौद्धधर्माचें तत्त्व प्रकट करतो म्हणणाऱ्या ग्रंथांतूनहि मी तसें वाचलें आहे. परंतु अशा तऱ्हेची समजूत ही, माझ्या अल्प मतीप्रमाणें बुद्धाच्या उपदेशातील रहस्यार्थाच्या मुळीं विरोधी आहे. त्याच्या काळीं ईश्वराच्या नांवावर खपणाऱ्या सर्व हीन गोष्टींचा त्यानें जो निषेध केला, आणि तो निषेध यथायोग्य होता, त्यामुळें हा गोंधळ निर्माण झाला आहे. ज्याला ईश्वर म्हटलें जातें तो द्वेषानें प्रवृत्त होतो, आपल्या कृत्याच्या त्याला पश्चात्ताप होतो, पृथ्वीवरील राजांप्रमाणें तो मोहवश होतो आणि लांचखाऊ असू शकतो आणि कांहीं लोकच त्याचे लाडकेहि असू शकतात, ही समजूत त्यानें त्याज्य मानली यांत शंका नाहीं. ईश्वर नांवाच्या प्राण्याला संतुष्ट करण्याकरितां त्याला त्यानेंच स्वतः निर्माण केलेल्या जिवंत प्राण्यांचें रक्त दिलें म्हणजे तो संतुष्ट होतो, या समजुतीची त्याला मनस्वी चीड येऊन त्याचा आत्मा बंड करून उठला. म्हणून त्याने ईश्वराची योग्य ठिकाणीं पुन्हां स्थापना करून कांहीं काळ त्याचें पवित्र सिंहासन बळकावून बसणाऱ्या उपटसुंभांना खालीं ओढलें. या विश्वाचें नियंत्रण करणाऱ्या नैतिक सत्तेच्या शाश्वत व कधींहि न बदलणाऱ्या अस्तित्वावर भर देऊन त्यानें तें पुन्हां घोषित केलें. जगावर सत्ता चालवणारें धर्मशासन हा साक्षात् ईश्वरच होय हें त्यानें न कचरतां सांगितलें.

ईश्वराचे नियम त्रिकालाबाधित व अपरिवर्तनीय असतात व ते प्रत्यक्ष ईश्वरापासून वेगळे करतां येत नाहीत. तसें नसेल तर ईश्वराची पूर्णताच मुळीं सिद्ध होणार नाही, आणि यामुळेंच बुद्ध हा ईश्वर मानीत नाही. फक्त नीतिधर्म तेवढा मानतो, अशा तऱ्हेचा विचाराचा मोटा गोंधळ माजला. आणि खुद्द ईश्वरासंबंधींच्याच या गोंधळामुळें 'निर्वाण' हा महान् शब्द यथार्थपणे समजावून घेण्याच्या कामींहि गोंधळ उडाला. 'निर्वाण' म्हणजे सर्वस्वी लोप खात्रीने नव्हे. बुद्धाच्या जीवनाचें प्रधान तत्त्व जें कांहीं मी समजूं शकलों आहे, त्याप्रमाणें निर्वाण म्हणजे आपल्यामध्यें जें कांहीं हीन आहे, दुष्ट आहे, जें कांहीं बिघडलेलें आणि बिघडण्याजोगे आहे, त्या सर्वांचा लोप. 'निर्वाण' हे थडग्यांतील काळ्याकुट्ट अचेतन शांतीसारखें नसून ती चिन्मय शांति आहे; स्वानुभूति झालेल्या आणि चिरंतनत्वाच्या गाभाऱ्यांत स्वतःचें निवासस्थान सांपडल्याची जाणीव झालेल्या आत्म्याचा चैतन्ययुक्त आनंद आहे.

बुद्धानें ईश्वराची त्याच्या शाश्वतस्थानी प्रतिष्ठापना करून मानवजातीवर महदुपकार केला. परंतु, माझ्या अल्प मतीप्रमाणें जीवमात्रांविषयीं, मग ते कितीहि नीच असोत, त्यानें जो स्नेहभाव बाळगावयाला लावला, तो त्याहूनहि मानवजातीवर त्यानें महान् उपकार करून ठेवला आहे.

## इस्लाम : शांतिधर्म

मी खिस्ती धर्म, बौद्धधर्म आणि हिंदुधर्म यांना ज्या अर्थानें शांतिधर्म मानतों, त्याच अर्थानें इस्लामलाहि शांतिधर्मच मानतो. प्रमाणांत फरक नाहीं असें नाहीं, परंतु शांति हेंच या सर्व धर्मांचें उद्दिष्ट आहे.

इस्लामचे अनुयायी सरसहा हिंसेचा उपयोग करतात, असें मत मीं व्यक्त केलें आहे. परंतु तो कुराणाच्या शिकवणुकीचा परिणाम नव्हे. माझ्या मतें ज्या परिस्थितीत इस्लामधर्माचा उदय झाला ती परिस्थिति त्यास कारण आहे. खिश्चन संप्रदायाचा इतिहास रक्तानें रंगलेला आहे. तो येशूच्या शिकवणुकींत दोष होते म्हणून नव्हे, तर ज्या परिस्थितीत तो धर्म प्रसृत झाला ती परिस्थिति त्याच्या उदात्त शिकवणुकीला अनुकूल नव्हती म्हणून.

धर्मपरिवर्तनासाठीं कुराणांत कोठेंहि जबरदस्तीचा उपयोग करण्यास

मान्यता दिलेली नाही. कुराण तर अत्यंत स्पष्ट शब्दांत सांगतें, की 'धर्मांत कसल्याहि प्रकारची जबरदस्ती येत नाही.' त्या ईश्वरी पुरुषाचें सारें जीवनच मुळीं धर्माचे बाबतीत सक्तीचा निषेध करणारें आहे. माझ्या माहितीप्रमाणें कोणत्याहि मुसलमानानें सक्तीला कधींहि मान्यता दिलेली नाहीं. आपल्या प्रसारासाठीं इस्लाम जर बळजबरीवर विसंबून राहिला, तर तो जागतिक धर्म कधींच बनणार नाही.

हिंदुस्थानच्या राष्ट्रीय संस्कृतींत इस्लामने टाकलेली ठळक भर म्हणजे, ईश्वर एक आहे ही त्याची निर्भेळ श्रद्धा आणि माणसें सारीं भाऊभाऊ आहेत या सत्याचा आचारांत विनियोग ह्या दोन गोष्टी होत. अर्थात् बंधुत्वाचा भाव नांवाला त्या धर्मानुयायांच्याकरितां लागू; वास्तविक तो साऱ्यांनाच लागू आहे. या दोन गोष्टींना मी 'ठळक भर' असें म्हणतो: कारण हिंदुधर्मांत बंधुभावनेला फारच तात्त्विक स्वरूप प्राप्त झालें आहे. याचप्रमाणें तत्त्वतः हिंदुधर्मांत एका परमेश्वराव्यतिरिक्त दुसऱ्या देवाला स्थान नसलें, तरी हिंदुधर्माच्या प्रत्यक्ष व्यवहारांत परमेश्वराव्यतिरिक्त दुसरा देव नाहीच, अशी इस्लामप्रमाणें आग्रही भूमिका घेतली गेलेली नाहीं, ही गोष्ट नाकबूल करता येणार नाहीं.

# मंदिरें आणि मूर्तिपूजा : : १७

मूर्तिपूजेवर माझा विश्वास नाहीं असें नाहीं. मूर्तीमुळें माझ्या मनांत कोणत्याहि प्रकारचा पूज्यभाव उत्पन्न होत नाहीं. मूर्तिपूजा ही मनुष्यस्वभावांतच आहे असें मला वाटतें. आपण प्रतीकांच्या मागें लागलेले असतों. एकाद्याला इतर कोणत्याहि ठिकाणांपेक्षां चर्चमध्यें जास्त शांति लाभते, ती कां? प्रतिमा ह्या उपासनेला साह्यभूत होतात. कोणीहि हिंदुमूर्तीला प्रत्यक्ष ईश्वर समजत नाहीं. मूर्तिपूजा हे मी पाप समजत नाहीं.

मूर्तिपूजक आणि मूर्तिभंजक या दोन वास्तविक शब्दांचे अर्थ जे मी समजतों, त्या अर्थानें मी दोन्हीहि आहे. मूर्तिपूजेच्या मुळाशी जी भावना

आहे ती मी मोलाची समजतों. मानवजातीचा उद्धार करण्यांत त्या भावनेचा अतिशय महत्त्वाचा भाग आहे. मी मूर्तिभंजक आहें तो अशा अर्थानें, की दैवताची उपासना करण्याचा आपला स्वतःचा जो विधि ठरला आहे त्या[illegible] अन्य कोणत्याहि विधीतील गुण जी धर्मांधता पहात नाही, अशा धर्मांधतेच्या स्वरूपांत असणारी सूक्ष्म प्रकारची मूर्तिपूजा मी मोडून काढतों. अशा प्रकारची मूर्तिपूजा ही एकाद्या लहानशा दगडाला किंवा सोन्याच्या प्रतिमेला देव करणाऱ्या उपासनेच्या दृश्य आणि ढोबळ प्रकाराहून अधिक सूक्ष्म आणि फसवी असल्यामुळे ती अधिक घातुक आहे.

मी मूर्तिपूजेला पाठिंबा देतों आणि तिला विरोधहि करितों. जेव्हां प्रतिमापूजा प्रतिमेतच गुरफटून जाऊन बिघडते आणि खोट्या समजुतींचे व खोट्या तत्त्वप्रणालींचे थर तिच्यावर सांचतात, तेव्हां एक महान् सामाजिक अरिष्ट म्हणून तिच्याशीं दोन हात करणें आवश्यक होऊन बसतें. उलटपक्षीं, स्वतःच्या आदर्शाला साकार रूप देणें या अर्थानें मूर्तिपूजा ही खुद्द मनुष्य-स्वभावांतच आहे आणि भक्तीला तिची मदत होते म्हणून ती मोलाचीहि आहे. आपल्याला पवित्र किंवा धार्मिक वाटणाऱ्या ग्रंथाला जेव्हां आपण नमस्कार करतों तेव्हां आपण मूर्तीचीच पूजा करतों. पावित्र्याच्या किंवा पूज्यतेच्या भावनेने आपण मंदिरांत किंवा मशिदींत जातों त्या वेळीं देखील आपण मूर्तीचीच पूजा करतों; आणि या सगळ्या गोष्टींत मला कांहींहि नुकसान वाटत नाहीं. उलट, मनुष्याला शांत आणि मर्यादित समजशक्ति मिळाली असल्यामुळें असें करण्याखेरीज त्याला जवळजवळ गत्यंतरच नसतें. याचप्रमाणें वृक्षपूजेत मूलतः अनिष्ट अथवा नुकसानकारक असें कांहीं वाटण्याऐवजी उलट मला त्यांत अतिशय करुण रस व काव्यात्मक सौंदर्य भरलेलें आढळतें. सगळ्या वनस्पतिसृष्टीविषयीं अंतःकरणपूर्वक वाटणाऱ्या पूज्यतेचें वृक्षपूजा हें एक प्रतीक आहे. सुंदर सुंदर आकार-प्रकारांच्या आपल्या अफाट दृश्याच्या द्वारा जणूं लाखों जीवांनीं, ही वनस्पतिसृष्टि ईश्वराची थोरवी आणि गौरव आपल्यापुढें गात असते. परंतु भक्तलोक झाडांपुढें जे नवस आणि याचना करतात तो प्रकार मात्र अगदी वेगळा आहे. स्वार्थी हेतूंनी केलेले नवस अगर याचना मग त्या देवळांत असोत, मशिदींत असोत, चर्चमध्यें, झाडापुढे अथवा क्षेत्राच्या ठिकाणीं, कोठेंहि केलेल्या

असोत, त्यास उत्तेजन देतां कामा नये. स्वार्थमूलक याचना किंवा नवस करण्याचा प्रतिमापूजेशीं कार्यकारण संबंध नाही. स्वार्थी हेतूंनी केलेली व्यक्तिगत भावना वाईटच. मग ती मूर्तीपुढें केलेली असो वा अदृश्य ईश्वरापुढे केलेली असो. मात्र यावरून मी सर्व सामान्यपणे वृक्षपूजेची तरफदारी करतों असे कोणी समजूं नये. वृक्षपूजेपासून ईश्वरभक्तीला अवश्य असलेली मदत प्राप्त होते म्हणून मी वृक्षपूजेची तरफदारी करीत नाही. तर त्याचें कारण हे की या विश्वात ईश्वर असंख्य रूपांनी प्रकट होतो हे मी जाणतों. आणि ईश्वराच्या त्या प्रत्येक आविष्काराविषयी माझ्या मनांत आपोआप पूज्यभाव उत्पन्न होतोच.

मूर्तिपूजेविषयी बोलावयाचें, तर या ना त्या स्वरूपांत मूर्तिपूजेशिवाय आपलें चालू शकणार नाही. मुसलमान ज्याला ईश्वराचे निवासस्थान मानतो, त्या मशिदीचे संरक्षण करण्यासाठी तो आपला जीवदेखील देण्यास कां तयार होतो? आणि ख्रिस्ती मनुष्य चर्चमध्ये जातो आणि शपथ घ्यावयाचा प्रसंग आला म्हणजे तो बायबल हातीं घेतो, याचें तरी कारण काय? माझी याला कांही हरकत आहे असे नव्हे. आणि मशिदी अथवा कबरी बांधण्यासाठीं जी अलोट संपत्ति दान केली जाते, ती मूर्तिपूजा नव्हे तर काय? तसेच रोमन कॅथॉलिकपंथी लोक "कुमारी मेरी" पुढें आणि संतांच्या पुढे गुढघे टेकून प्रार्थना करतात त्या वेळीं ते तरी काय करीत असतात? त्या देखील दगडाच्या केलेल्या अथवा कापडावर किंवा कांचेवर रंगविलेल्या काल्पनिक आकृतीच असतात.

त्याचप्रमाणे आम्ही उपासना करतो ती दगडाची नव्हे, तर दगडाच्या किंवा धातूच्या मूर्तीत असणाऱ्या ईश्वराची करतो. मग ती मूर्ति कितीहि ओबडधोबड असो.

## मंदिरें

देवळांचीं अस्तित्वें म्हणजे पाप अथवा धर्मभोळेपणा असें मी मानीत नाहीं. सामुदायिक उपासनेचा कांहीं ना कांहीं विधि आणि उपासनेची एक सार्वजनिक जागा ही एक मानवी गरज असावी असें वाटतें. मंदिरांत मूर्ती असाव्यात किंवा नसाव्यात हा स्वभावाचा आणि आवडीनिवडीचा प्रश्न

आहे. हिंदू अथवा रोमन कॅथॉलिक यांच्या उपासनामंदिरांत मूर्ती असतात हे हटकून वाईटच किंवा धर्मभोळेपणाचें आहे, आणि मशिदींत किंवा प्रॉटेस्टंट लोकांच्या उपसनामंदिरांत केवळ मूर्ती नसतात म्हणून तीं चांगलीं किंवा धर्मभोळेपणापासून मुक्त, असें मी मानीत नाहीं. क्रूसासारखें किंवा एकाद्या पुस्तकासारखें प्रतीक देखील मूर्तिपूजकतेंत सहज मोडूं शकेल व त्यामुळे तो देखील धर्मभोळेपणा होऊं शकेल. आणि बाळकृष्णाच्या अथवा कुमारी मेरीच्या प्रतिमेची पूजा देखील मनाला उदात्त करणारी आणि धर्मभोळेपणापासून मुक्त असूं शकेल. उपासकाच्या हृदयाच्या वृत्तीवर तें अवलंबून आहे.

पूजास्थानें म्हणजे निव्वळ दगडामातीच्या इमारती असें मला वाटत नाहीं. सत्यस्वरूपाच्या त्या केवळ छाया होत. जें जें चर्च, जी जी मशीद आणि जें जे देऊळ नष्ट केलें गेलें, त्याच्या जागीं तीं हजारोंनी उत्पन्न झालीं आहेत.

मला असा एकहि धर्म अथवा धर्मसंप्रदाय माहीत नाहीं, कीं ज्याचें स्वतःच्या मंदिरावांचून चालले आहे किंवा चालत आहे. यालाच कोणी देऊळ म्हणतात, कोणी मशीद म्हणतात, कोणी चर्च, कोणी सिनेगॉग (ज्यू-मंदिर) किंवा कोणी अग्यारी म्हणतात. होऊन गेलेल्या महान् समाजोद्धारकांनी– यांत येशूहि येतो– मंदिरें समूळ नष्ट केलीं अथवा त्याज्य ठरविलीं असेंहि निश्चितपणे म्हणतां येणार नाहीं. त्या सर्वांनी मंदिरांत त्याचप्रमाणे समाजांत माजलेल्या भ्रष्टाकारांचें उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला. मी कित्येक वर्षांपासून मंदिरांत जाणें सोडून दिलें आहे. परतु म्हणून मी स्वतःला पूर्वीपेक्षां श्रेष्ठ समजतो असें नव्हे. माझ्या आईची प्रकृति जोपर्यंत चांगली होती, तोपर्यंत तिनें देवदर्शनाला जाणें कधींहि चुकलें नाहीं. मी देवळांत जात नसलो, तरी माझ्यांत श्रद्धा आहे; पण माझ्या श्रद्धेहून तिची श्रद्धा फार मोठी असली पाहिजे.

देऊळ, मशीद किंवा चर्च या निरनिराळ्या देवस्थानांत मी कसलाच फरक करीत नाहीं. जशी धर्मभावना तसें त्या स्थानाचें स्वरूप. अदृश्य ईश्वराप्रत पोंचण्याची मानवाला जी तळमळ लागून राहिली आहे तिचें दृश्य स्वरूप म्हणजे हीं पूजास्थानें होत.

# माझे उपवास : : १८

जेव्हां जेव्हां दूर न करतां येण्याजोगे मनःक्लेश होतील, तेव्हां तेव्हां उपवास व प्रार्थना करावी असें माझा धर्म मला शिकवतो.

उपवास हे माझ्या जीवनाचेंच एक अंग आहे. उदाहरणार्थ, डोळ्यांवांचून माझें जितकें अडेल तितकेंच उपवासावांचूनहि अडेल. बाह्य जगासाठीं जो डोळ्यांचा उपयोग तोच अंतरातील जगासाठीं उपवासाचा.

माझ्या मतें स्वतःच्या आणि इतरांच्या शुद्धीसाठीं उपवास करणें ही युगानुयुगें चालत आलेली प्रथा आहे. आणि जोपर्यंत मनुष्याचा ईश्वरावर विश्वास आहे तोपर्यंत ती अस्तित्वांत राहील. उपवास म्हणजे तळमळ लागलेल्या अंतःकरणानें केलेली जगन्नायकाची प्रार्थना होय. म्हणून माझें आयुष्य उपवासाच्या अनेक प्रसंगांनीं भरलेलें आहे. प्रार्थनेचें तें अत्यंत कळकळीचें स्वरूप होय.

माझा असा विश्वास आहे, कीं उपवासाखेरीज प्रार्थना असू शकत नाहीं आणि प्रार्थनेशिवाय खरेखरीचा उपवास संभवत नाहीं.

संपूर्ण उपोषण म्हणजे संपूर्ण व अक्षरशः आत्मत्याग करणें; तीच सर्वांत खरी प्रार्थना होय. 'हे माझें जीवन तुझेंच आहे, तें सदैव तुझ्याच कारणीं लागो' असें म्हणणें हे निव्वळ वरवरचें किंवा अलंकारिक नाहीं, असतां कामा नये. हें आत्मसमर्पण मनांत कसलाहि किंतु न ठेवतां बेगुमानपणें व आनंदानें झालें पाहिजे. अन्नावांचून आणि पाण्यावांचून सुद्धां रहाणें ही नुसती सुरुवात आहे, आत्मसमर्पणाचा तो कमींत कमी भाग आहे.

ईश्वरी कृपेचा परिणाम म्हणून जर उपोषण झालेलें नसेल तर तें निरर्थकच नव्हे, तर त्याहूनहि वाईट होय.

शरीरवासना आपल्या विरुद्ध बंड करून उठते त्या वेळीं शरीरदमन करणें आवश्यक असतें. परंतु ज्या वेळीं शरीर आपल्या ताब्यांत आलें असेल आणि सेवेचें साधन म्हणून त्याचा उपयोग करणें शक्य असेल, अशा वेळीं दमन करणें हे पाप होय. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें झालें, तर खुद्द शरीरदमनांत अंगभूत असा कांहीं गुण नाहीं.

शरीराचें चोज न पुरविण्यांत कांहीं अर्थ आहे. देहदंड सोसल्याखेरीज ईश्वराचे प्रत्यक्ष दर्शन होणें शक्य नाहीं. शरीर ईश्वराचे मंदिर म्हणून त्याच्या ज्या गरजा असतील त्या भागविणें हें वेगळें आणि अस्थिमांसाचा गोळा म्हणून त्याच्या गरजा भागविण्याला नकार देणें हें वेगळे.

माझ्या स्वतःच्या आणि माझ्या बरोबरच्या माझ्याचसारख्या विक्षिप्त लोकांच्या भरपूर अनुभवांवरून मी बिनदिक्कत असे सांगतो कीं : (१) तुम्हांला बद्धकोष्ठ असेल, (२) रक्तक्षय झाला असेल, (३) ताप आल्या-सारखे वाटत असेल, (४) अपचन झालें असेल, (५) डोकेंदुखीची व्यथा असेल, (६) संधिवात झाला असेल, (७) वातरक्ताचा विकार झालेला असेल, (८) चीड आणि संताप आला असेल, (९) उदास वाटत असेल किंवा (१०) अत्यानंद झाला असेल तर उपवास करा. म्हणजे डॉक्टरांचे उंबरे झिजवावे लागणार नाहींत, किंवा औषधांच्या बाटल्या खरेदी करीत बसावे लागणार नाहीं.

प्रेम करणाऱ्या माणसाच्या बाबतींतच फक्त उपवास करतां येतो; आणि तेंहि त्याच्याकडून हक्काचें मुरगळून काढण्याकरितां नव्हे, तर त्याला सुधारण्याकरितां; उदाहरणार्थ, दारू पिणाऱ्या बापाला सुधारण्याकरितां मुलगा उपवास कारतो. माझा मुंबईचा आणि त्यानंतर बार्डोलीचा उपवास या स्वरूपाचा होता. माझ्यावर प्रेम करणारे जे लोक होते त्यांना सुधारण्यासाठीं ते उपवास मीं केले. परंतु जनरल डायरला सुधारण्यासाठीं मी उपवास करणार नाहीं. कारण त्याचे माझ्यावर प्रेम नाहीं. इतकेंच नव्हे, तर तो स्वतःला माझा शत्रु समजतो.

या उपवासांना करणीभूत मी नाहीं. माझ्या करमणुकीसाठीं मी ते अंगावर घेत नाहीं. कीर्तीच्या हव्यासानें कांहीं मी शरीराची छळणूक करणार नाहीं. उपवासानें होणाऱ्या भुकेच्या यातना आणि इतर अनेक कष्ट जरी मी आनंदाने सहन करीत असलों, तरी त्यापासून मला क्लेश होत नाहींत असे कोणी समजूं नये. हे उपवास मला सुसह्य होतात याचे कारण ऐवढेंच कीं ते एका महान् शक्तीकडून माझ्यावर लादले जातात. आणि ते सहन करण्याचें सामर्थ्य देखील ती शक्तीच मला देते.

उपवासाचे अस्त्र बेपर्वाईनें वापरतां येण्यासारखें नाहीं हे मला माहीत

आहे. त्या कलेंत निष्णात असलेल्या माणसाकडून जर तें उपयोगांत आणलें गेलें नाहीं, तर त्याला चटकन हिंसेचा वास येऊं लागण्याचा संभव असतो. या विषयातील मी तसा कलावंत आहें असें मी सांगतों.

मनुष्यानें उत्पन्न केलेल्या सर्व संस्थांप्रमाणेंच उपवास हा सुद्धां वाजवी रीतीनें आणि गैरवाजवी रीतीने उपयोगांत आणतां येईल. परंतु सत्याग्रहीच्या भात्यांतील हे एक महान् अस्त्र आहे. आणि त्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता आहे, एवढ्यासाठीं कांही त्याचा त्याग करतां येणार नाहीं.

## निर्भयतेचा धर्म : : १८

आध्यात्मिकतेसाठी पहिली आवश्यक गोष्ट निर्भयत्व ही आहे. भ्याड हा कधीं नीतिनिष्ठ असूं शकत नाहीं.

जेथे भय आहे तेथे धर्म नांदत नाही.

गीतेच्या प्रत्येक वाचकाला माहीत आहे, की सोळाव्या अध्यायांत जी दैवी संपत्तीचीं लक्षणे सांगितलेलीं आहेत, त्या सर्वांत निर्भयत्वाचें स्थान पहिले आहे. वृत्त जमण्यासाठीं म्हणूनच केवळ तसें करण्यांत आलें किंवा जाणूनबुजून निर्भयत्वाला तें मानाचे स्थान देण्यांत आले आहे, हे सांगणे माझ्या शक्ती-बाहेरचे आहे. तथापि, तेथे कदाचित् योगायोगानें निर्भयत्वाला जो पहिला नंबर देण्यांत आला आहे, तो माझ्या मतानें अगदीं योग्य आहे. निर्भयत्व हें इतर उदात्त गुणांच्या वाढीसाठीं अत्यावश्यक आहे. निर्भयत्वावाचून सत्याचा शोध किंवा प्रेमाची वाढ कशी करतां येईल? प्रीतमनें म्हटल्याप्रमाणे 'हरिनो मारग छे शूरानो, नहि कायरनुं काम जोने' या ठिकाणीं हरि म्हणजे सत्य, आणि शूर म्हणजे निर्भयत्वाने सज्ज झालेला असा अर्थ आहे; तलवार, बंदूक किंवा अशाच इतर घातक शस्त्रांनीं सज्ज असा अर्थ नाहीं. फक्त भ्याडच त्या शस्त्रांचा आश्रय करतात.

निर्भयत्व म्हणजे सर्व प्रकारच्या बाह्य भयापासून मुक्ति असा अर्थ आहे. रोगभय, दुखापतीचें किंवा मृत्यूचें भय, नागवणुकीचें भय, प्रिय सुहृज्जन

गमाविण्याचें भय, लौकिक नाहींसा होण्याचें किंवा कोणाच्या मनाला लागेल असे भय, इत्यादि हीं बाह्य भयें होत.

परमात्म्याचे ज्याला दर्शन झाले त्यालाच पूर्ण निर्भयत्व प्राप्त होणें शक्य आहे. कारण ते दर्शन म्हणजे पराकोटीची भ्रममुक्ति आहे. परंतु या ध्येयाकडे नित्य प्रगति करावयाची म्हणजे निश्चयपूर्वक सतत प्रयत्न पाहिजे आणि आत्मविश्वास वाढविला पाहिजे. अंतरांतील शत्रुसंबंधी बोलावयाचें, तर त्याचें सतत भय बाळगलें पाहिजे. काम-क्रोधादींची आपल्याला भीति वाटते ती योग्य आहे. एकदां या फितुरांना जिंकलें, कीं बाह्य भयें आपोआपच नाहींशीं होतात. सर्व भयें शरीराच्या भोंवतीं वावरतात, आणि म्हणून शरीराची आसक्ति सुटली, की तत्काळ तींहि लयाला जातात. अशा प्रकारें भय ही आमच्याच कल्पनेनें तयार केलेली निराधार वस्तु आहे असे दिसून येते. संपत्तीवरील, कुटुंबावरील आणि शरीरावरील आसक्ति झाडून टाकली, कीं भयाला आपल्या अंतःकरणांत जागाच रहात नाहीं. ‘ तेन त्यक्तेन भुंजिथाः ’ ( म्हणजे जगांतील नश्वर वस्तूंचा त्याग करून जगाचा उपभोग घ्या ) हा एक थोर आदेश आहे. संपत्ति, कुटुंब आणि शरीर हीं आहेत तशींच असतील. फक्त त्यांकडे बघण्याची आपली वृत्ति बदलावयाची. या सर्व गोष्टी आपल्या नव्हेत, ईश्वराच्या आहेत. या जगांतील कांहींहि खरोखर आपलें नाहीं, खुद्द आपणहि त्याचेच आहोंत, मग कां बरें आपण मनांत भीतीला थारा द्यावा ? म्हणूनच वस्तूंचा उपभोग घेत असतांना त्यांबद्दलची आसक्ति टाकून देण्याला उपनिषद् आपल्याला सांगते. याचाच अर्थ असा, की त्या वस्तूंकडे आपण मालक म्हणून न पाहतां त्यांचे विश्वस्त या नात्याने पाहिलें पाहिजे. ज्याच्या वतीनें त्या वस्तू आपल्या ताब्यांत आहेत, तोच आक्रमकांपासून त्यांचे रक्षण करण्याची अवश्य ती शक्ति व साधनें आपणांस देईल. अशा तऱ्हेने आपण स्वामी न राहतां आपल्या पायतळाच्या रजःकणाहूनहि लीन अशा सेवकाच्या दर्जाला पोंचूं, तेव्हां सर्व भयें धुक्यासरखीं कोठल्या कोठें पसार होतील. आपल्याला अनिर्वचनीय अशा शांतीचा लाभ होईल, आणि सत्यनारायणाचे साक्षात् दर्शन घडेल.

आपण संधिकालाच्या उंबरठ्यावर उभें आहोत. तो संधिकाल संध्येचा आहे की उषेचा आहे तें मात्र आपल्याला ठाऊक नाहीं. एका संधिकाला-

नंतर रात्रीला सुरुवात होते, तर दुसरा संधिकाल प्रभातकालाची तुतारी फुंकतो. संधिकालानंतर आपल्याला जर शोकयुक्त रात्रीऐवजीं उगवत्या दिनकराचें दर्शन व्हावें असें वाटत असेल, तर या संधिकालांतच सत्य ओळखून घेणें, कितीहि संकटें आलीं, तरी त्याला चिकटून राहणें आणि कांहीं झालें तरी न डगमगतां त्याचा आचार व प्रचार करणें हेंच योग्य होईल.

स्वातंत्र्याकडे जाण्यासाठीं आपण सत्य-अहिंसेचा पुरातन मार्ग पसंत केला आहे. "सत्याच्या बिकट वाटेनें जाणाऱ्यांना कधींहि शोक करावा लागणार नाहीं," या भगवंताच्या आश्वासनानें आपल्याला विश्वास येवो, आशा स्फुरो.

आपली आपणच गळचेपी करणाऱ्या आणि जवळजवळ भ्याडपणाचें रूप घेणाऱ्या या बुजऱ्या देशांत कितीहि शौर्य आलें, कितीहि आत्म-बलिदान झालें, तरी तें कमीच ठरेल. मला त्याहूनहि उच्च प्रतीचें शौर्य-नम्रता, सौजन्य आणि अहिंसा यांनी भरलेल्या माणसाचें शौर्य – असें शौर्य, कीं जें दुसऱ्याला दुखापत न करतां किंवा एकाहि जीवाला अपाय करण्याचा विचार मनांत न आणतां स्वतःच सुळावर चढेल – मला पाहिजे आहे.

कोणत्याहि पार्थिव सत्तेपुढें, मग ती कितीहि महान् असो, मान वांक-विण्याचें निश्चयपूर्वक नाकारणें आणि तेंहि मनांत कडवटपणा न आणतां व अशा पूर्ण श्रद्धेनें, कीं एक आत्मतत्त्वच अखंड राहतें, दुसरें कांहीं रहात नाहीं, याहून मोठें शौर्य दुसरें नाहीं.

आपण ईश्वराचें भय बाळगूं लागलों, कीं मानवाबद्दलची आपली भीति नाहींशी होईल.

# अपरिग्रहाचा सिद्धान्त : : १०

राजकारणाच्या चक्रव्यूहांत आपण ओढले गेलों आहोत असें जेव्हां मीं पाहिले, तेव्हां अनीति, असत्य, ज्याला राजकीय लाभ म्हणतात तो, या सर्वांपासून अगदीं अस्पृष्ट राहण्याकरितां मी काय करणें अवश्य आहे असा प्रश्न मीं माझ्या मनाला विचारला. सुरुवातीला हा झगडा बिकट असा होता व माझ्या पत्नीशीं, आणि अगदीं स्पष्टपणे मला आठवतें त्याप्रमाणे माझ्या मुलाशींहि तो झगडा मला करावा लागला. परंतु मी निश्चितपणे या निर्णयावर आलो, कीं कांहींहि होवो, ज्या लोकांशीं माझें जीवन निगडित झालें आहे आणि ज्यांचीं दुःखें मी रोजच्या रोज पहात आहे त्या लोकाची सेवा जर मला करावयाची असेल, तर साऱ्या संपत्तीचा आणि मालमत्तेचा मला त्याग केलाच पाहिजे.

ही श्रद्धा माझ्या ठिकाणीं निर्माण झाल्याबरोबर मी लागलीच सर्व गोष्टीचा त्याग केला असें मी सांगितलें, तर तें सत्याला धरून होणार नाहीं. मला हें कबूल केले पाहिजे, कीं सुरुवातीला माझी प्रगति फार हळूहळू झाली. आणि आज झगड्याचे ते दिवस जेव्हां मी माझ्या मनःचक्षूंपुढें आणतों तेव्हां मला आठवतें, कीं सुरुवातीला सुद्धां हा प्रयत्न दुःखकारक वाटत होता. परंतु जसजसे दिवस जात चालले, तसतसें मला असें दिसून आलें, कीं ज्या मी माझ्या समजत होतों अशा आणखीहि कित्येक गोष्टी मला सोडून दिल्या पाहिजेत; आणि अशी एक वेळ आली, कीं या गोष्टींचा त्याग करण्यांत मला खरोखर आनंदच वाटूं लागला. आणि मग एकामागून एक जवळजवळ भूमितिश्रेणीने माझ्या हातून वस्तूंचा त्याग होऊं लागला. हे अनुभव सांगत असतांना मी म्हणूं शकतो, कीं त्या वेळीं माझ्या खांद्यावरचें फार मोठें ओझें दूर झालें; आतां आपल्याला सुखानें चालतां येईल व आपल्या बांधवांच्या सेवेचें कार्महि आपल्याला अतिशय स्वस्थपणानें व त्याहूनहि अतिशय आनंदानें करतां येईल असें मला वाटूं लागलें. त्यानंतर कोणत्याहि गोष्टींचा परिग्रह मला त्रासदायक आणि ओझ्यासारखा वाटूं लागला. त्या आनंदाचें कारण जेव्हां मी शोधूं लागलों तेव्हां मला असें आढळून आलें, कीं जर

एकादी गोष्ट माझ्या मालकीची म्हणून मीं ठेवून घेतली, तर साऱ्या जगापुढें मला त्याचें समर्थन करावें लागेल. मला असेंहि दिसून आलें, कीं ज्यांना ती वस्तु हवी आहे पण मिळत नाही असे पुष्कळ लोक आहेत; आणि भुकेले, दुष्काळपीडित लोक, मी एकटा आहे असें पाहून जर त्या वस्तूंत वांटणीच नव्हे, तर तिची सबंध मालकीच मागूं लागले, तर मला पोलिसांची मदतहि घ्यावी लागेल. त्या वेळीं मीं स्वतःशीं विचार केला, कीं त्यांना ती वस्तु हवीशी वाटते आणि माझ्यापासून ते ती काढून घेतात यांत त्यांचा हेतु दुष्टपणाचा नसतो, तर त्यांची गरज माझ्या गरजेहून जास्त आहे म्हणूनच ते तसें करण्यास प्रवृत्त होतात.

आमची सुसंस्कृतता, आमची संस्कृति, आमचें स्वराज्य, आपल्या गरजा भरमसाट वाढविण्यावर– स्वैरभोगांवर– अवलंबून नसून आपल्या गरजा कमी करण्यावर– त्यागावर– अवलंबून आहे.

धट्टीकट्टी अशी एकहि स्त्री अथवा पुरुष जोपर्यंत बेकार अथवा उपाशी आहे, तोपर्यंत आराम करण्याची किंवा आकंठ जेवण करण्याची आपल्याला लाज वाटली पाहिजे.

धर्माची परिपूर्णता करण्याकरितां सर्व परिग्रहाचा त्याग करावा लागतो. आपला जीवनधर्म निश्चितपणें समजावून घेतल्यानंतर आपल्या शक्तीप्रमाणें तो आचरणांत आणण्याच्या प्रयत्नास आपण लागलें पाहिजे.

मी आपल्या सर्व मालमत्तेचा त्याग केला म्हणून जग मला खुशाल हसो. मला हा अपरिग्रह म्हणजे निश्चित लाभ वाटतो. माझ्या संतुष्टतेशीं लोकांनीं स्पर्धा करून पहावी. माझ्या मालकीचा सर्वांत मोटा हा ठेवा आहे. म्हणून मी दारिद्र्याची शिकवण देत असलो, तरी मी श्रीमान् माणूस आहे असें म्हणणें कदाचित् वाजवी ठरेल !

लाखों लोकांना जें मिळूं शकत नाहीं, तें घेण्याचें आपण निश्चयपूर्वक नाकारणें हा सर्वोत्तम नियम आहे. ही न घेण्याची शक्ति वरून कोठून तरी एकाएकीं आपल्यांत अवतरत नाहीं. पहिली गोष्ट म्हणजे बहुजनसमाजाला ज्या गोष्टी किंवा सवलती मिळत नाहींत त्या आपण घेणार नाहीं, अशी मनाची प्रवृत्ति अंगीं बाणवून घेणें, आणि त्याच्या मागोमाग लगेच दुसरी

गोष्ट म्हणजे त्या मनःप्रवृत्तीला अनुसरून शक्य तितक्या त्वरेनें आपल्या जीवनाची घडी बसविणें.

अपरिग्रहाला जोडूनच अस्तेय येतें. एकाद्या वस्तूची गरज नसतांनाहि जर कोणी ती जवळ ठेवीत असेल, तर मुळांत ती चोरीची नसतांना देखील चोरीच्या सदरांतच तिला घालावी लागेल. परिग्रहांत भविष्याची तरतूद अंतर्भूत असते. सत्याच्या शोधकाला, प्रेमधर्माच्या अनुयायाला, उद्यांकरितां म्हणून कांही ठेवतां येणार नाहीं. ईश्वर दुसऱ्या दिवसाकरितां कधींहि तरतूद करीत नाही. रोजच्या रोज जेवढ्याची गरज, त्याहून यत्किंचितहि अधिक ईश्वर कधीं निर्माण करीत नाहीं; म्हणून जर ईश्वरी कृपेवर आपली श्रद्धा असेल, तर तो दररोज आपल्याला आवश्यक तितके भरपूर देईलच अशी आपली खात्री असली पाहिजे. ज्या धर्माला अनुसरून ईश्वरानें मनुष्याला फक्त रोजचें त्याच्या पोटापुरतेंच दिले आहे, अधिक दिलें नाहीं, त्या ईश्वरी धर्माच्या बाबतीत आपण एक तर अज्ञानी आहोंत किंवा बेपर्वा आहोत, त्यामुळेच मानवसमाजांत अनेक प्रकारच्या असमानता आणि त्याचें मूळ म्हणून दुःख निर्माण होत असतें. धनिकांपाशी त्यांना न लागणाऱ्या वस्तूंचा वाजवीपेक्षां फाजिल कोठा असतो. त्यामुळें त्यांच्याकडे दुर्लक्ष होऊन त्या वायां जात असतात. उलट, लाखों लोकांची उपासमार·चाललेली असते व त्या वस्तू न मिळाल्या कारणानें टांचा घासून मरण्याचा त्यांच्यावर प्रसंग येतो. प्रत्येकानें आपल्याला गरज असेल त्याच वस्तूंचा फक्त संग्रह केला, तर कोणालाहि वाण पडणार नाही आणि सर्वजण सुखासमाधानानें राहतील. आज तर गरिबांइतकेच श्रीमंतहि असंतुष्ट आहेत. गरिबाला लक्षाधीश होण्याची इच्छा आहे आणि लक्षाधीशाला कोट्यधीश व्हावें असें वाटतें. गरिबांना फक्त पोट भरण्यापुरतेच मिळाले असतांना पुष्कळ वेळां समाधान वाटत नाहीं; परतु तेवढें मिळण्याचा त्यांचा हक्क आहे हें उघड आहे, आणि तें त्यांना मिळते की नाहीं हे समाजानें पाहिलें पाहिजे. समाधानाची वृत्ति सर्वत्र पसरावी ही दृष्टि ठेवून धनिकांनी या बाबतींत पुढाकार घेतला पाहिजे. त्यांनी आपली संपत्ति जर योग्य मर्यादेंत ठेवली, तर गरिबांचीं पोटें सहज भरतील आणि श्रीमंतांबरोबर तेहि समाधानी वृत्तीचा धडा शिकतील. अपरि-

ग्रहाचा आदर्श पूर्णपणें गांठण्यासाटीं माणसानें आपल्या डोक्यावर छप्पर उभारतां कामा नये, कपडा वापरतां कामा नये आणि दुसऱ्या दिवसाकरितां अन्नाचा सांठा करून ठेवतां कामा नये. पक्षी नाहीं का तसे रहात? त्यांना रोजच्या अन्नाची गरज तर पडणारच, पण त्याची तरतूद करण्याचें काम ईश्वराचें आहे, त्यांचें नव्हे. अर्थात् फारच विरळा पुरुषांना हा आदर्श साधणें शक्य आहे. आम्हां सामान्य साधकाना तो सतत आपल्या दृष्टीपुढेंच फक्त ठेवता येईल व त्याच्या अनुरोधानें आपल्या मालमत्तेची बारकाईनें तपासणी ठेवून रोजच्या रोज ती कमीत कमी करण्याचा प्रयत्न करता येईल. खऱ्या अर्थानें सुसंस्कृतता ही गरजा वाढविण्यांत नसून जाणूनबुजून आणि आपखुषीनें त्या कमी करण्यात आहे. त्यामुळेंच खरें सौख्य व समाधान प्राप्त होतें व सेवेची शक्ति वाढते. दीर्घ प्रयत्नाच्या योगानें आपल्याला आपल्या गरजा कमी करतां येतात आणि गरजा कमी झाल्या म्हणजे सौख्य, सुदृढ शरीर व मनःस्वास्थ्य प्राप्त होतें. शुद्ध सत्याच्या दृष्टीनें पाहिलें, तर शरीर हें सुद्धा जीवानें योग्य प्रयत्नांनीं संपादन केलेलें आहे. सुखोपभोगाच्या इच्छेच्या योगानें शरीराच्या रूपानें असणारें हें लोढणें आपणच उत्पन्न केलें आहे आणि तें टिकवून ठेवीत आहोत. ही इच्छा नष्ट झाली, कीं मग शरीराची गरज उरत नाहीं, आणि मनुष्य जन्ममरणाच्या दुष्ट फेऱ्यांतून सुटतो. आत्मा सर्वव्यापी आहे. त्यानें या पिंजऱ्यासारख्या शरीरात अडकून पडण्याची चिंता कां करावी, किंवा त्या पिंजऱ्याच्या मोहानें पाप तरी कां आचरावें आणि हाव तरी कां धरावी? अशा तऱ्हेनें आपण संपूर्ण त्यागाच्या ध्येयाशीं येऊन पोचतो आणि शरीराचें अस्तित्व आहे तोपर्यंत त्याचा सेवेप्रीत्यर्थ उपयोग करावयास शिकतो; इतका कीं अन्न नव्हे, तर सेवा हीच आमचा जीवनाधार बनते. आपण खातो, पितो, झोंपतो आणि उठतो तें सारें केवळ सेवेकरिताच. यामुळेंच आपल्याला खरें सुख लाभतें व काळाची घडी भरतांच मोक्षदर्शन घडतें. या दृष्टिकोनांतून आपण सर्वजण आत्मनिरीक्षण करूं या.

वस्तूंप्रमाणेंच विचारांनाहि अपरिग्रहाचें तत्त्व लागू करतां येण्यासारखें आहे, हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे. जो आपल्या मेंदूंत निरुपयोगी ज्ञान कोंबतो तो या बहुमोल तत्त्वाचा भंग करीत असतो. आपल्याला ईश्वरापासून दूर नेणारे किंवा ईश्वराकडे न नेणारे विचार हे आपल्या मार्गातील अडथळे

असून ते आपण तावडतोब दूर केले पाहिजेत. या अनुषंगानें गीतेच्या तेराव्या अध्यायांत दिलेली ज्ञानाची व्याख्या आपल्याला विचारांत घेतां येईल. त्या ठिकाणीं असें सांगितले आहे, कीं अमानित्व इ० हें ज्ञान होय आणि इतर सर्व अज्ञान होय. हें जर खरें असेल– आणि तें खरें आहे यांत शंकाच नाहीं– तर आज आपण ज्याला ज्ञान समजून उराशीं धरलें आहे तें केवळ अज्ञान आहे, त्याच्या योगानें कांहीं फायदा होण्याऐवजीं नुकसानच होतें. त्या योगानें मन भरकटूं लागतें व त्यांत शून्यताहि निर्माण होते, आणि [illegible] असंख्य फांटे फुटून असंतोष माजतो. निष्क्रियतेची तरफदारी करण्याच्या दृष्टीनें हें मी सांगितलेलें नाहीं हे सांगणे नकोच. आपल्या जीवनांतील प्रत्येक क्षण प्रवृत्तींत जावा, परंतु ती प्रवृत्ति सात्त्विक, सत्याकडे जाणारी अशी असावी. ज्यानें आपलें आयुष्य सेवेला वाहिलें आहे त्याला एक क्षणहि निष्क्रिय रहातां येणार नाहीं. परंतु आपण सत्प्रवृत्ति व असत्प्रवृत्ति यात भेद करण्यास शिकलें पाहिजे. ही भेद करण्याची शक्ति निष्ठापूर्वक सेवेला वाहून घेतल्यानेंच अर्थात् येते.

म्हणून सर्वांचा त्याग करा आणि तें ईश्वरार्पण करून मग जीवन घालवा. अशा तऱ्हेनें जगण्याचा हक्क त्यागातून प्राप्त होतो. 'ज्या वेळीं सर्वजण आपल्या वांट्याचें काम करतील, त्या वेळीं मी देखील माझ्या वांट्याचें करीन' असें त्याग म्हणत नाहीं. तो म्हणतो, 'दुसऱ्याची उठाठेव करूं नका. आपलें काम तुम्ही आगोदर करा, आणि बाकीचें ईश्वरावर सोंपवा.'

भौतिक वस्तू बाळगण्याचा अथवा वापरण्याचा तुम्हांला कदाचित् प्रसंग येईल, पण त्यांच्यावांचून चुकल्याचुकल्यासारखे न वाटणें यांतच जीवनाचें रहस्य आहे.

## दरिद्र-नारायण

येशू, महंमद, बुद्ध, नानक, कबीर, चैतन्य, शंकर, दयानंद, रामकृष्ण या सर्व विभूतींचा हजारों माणसांवर विलक्षण प्रभाव होता, आणि त्यांनीं त्यांच्या चारित्र्याला विशिष्ट वळण लावलें. अशा विभूती येथे जन्माला आल्यानें जग अधिक समृद्ध झाले आहे. आणि हे सर्व महापुरुष असे होते, कीं त्यांनीं जाणूनबुजून जन्मभर दारिद्र्य पत्करलें......आजचा भौतिकवादाचा हव्यास

जितक्या प्रमाणांत आपले साध्य बनला असेल, तितक्या प्रमाणांत प्रगति-पथावरून आपली घसरगुंडीच होत राहणार.

संपत्ति, सत्ता आणि प्रतिष्ठा ही माणसाला किती पापें आणि अन्याय करावयाला लावितात बरें!

गरिबाला अर्थ हेच अध्यात्म असते. लाखो भुकेकंगालांना तुमची दुसरी कसलीहि भाषा समजत नाही. ती त्यांच्यापुढे वायफळ ठरते. त्यांत तुम्ही त्यांच्यापुढे अन्न घेऊन जा, की ते तुम्हांला आपला देव मानू लागतील. दुसरा कसलाहि विचार करण्याची कुवतच त्यांच्यांत नसते.

मी या माझ्या हातानें त्यांच्या लक्तरांत घट्ट बांधून ठेवलेल्या मळक्या पया गोळा केल्या आहेत. त्यांच्यापाशीं आधुनिक प्रगतीच्या गप्पा मारा. त्यांच्यापुढे फुकट देवाचें नांव घेऊन त्याना खिजवा. तुम्ही-आम्ही जर त्यांच्यापुढे ईश्वरासंबंधी बोलू लागलो, तर ते तुम्हाला आणि मला पिशाच म्हणतील. जर त्यांना कोणी ईश्वर म्हणजे माहीत असलाच तर तो मृत्यूचा, सूडाचा ईश्वर, निर्घृण जुलमी ईश्वरच माहीत आहे.

ईश्वराला नांव देता येत नाही, मानवबुद्धीला त्याचा अंत लागत नाही. अशा ईश्वराला मानवसमाज ज्या असंख्य नावांनी ओळखतो त्यांतील दरिद्र-नारायण हें एक नाव आहे. आणि त्याचा अर्थ दरिद्र्यांचा देव, दरिद्र्यांच्या हृदयात दिसणारा देव असा आहे.

उपवास करून आत्महत्या करण्यापासून मी स्वतःला आवरूं शकलो आहे, ते एकाच कारणामुळे; ते हें, की हिंदुस्थान जागृत होणार, या भयाण दारिद्र्यावस्थेतून मुक्त होण्याच्या मार्गाला लागण्याची त्याच्यांत शक्ति आहे, अशी माझी श्रद्धा आहे. अशी शक्यता आहे यावर जर माझी श्रद्धा नसती, तर जगण्यांत काय मला गोडी वाटली असती?

# ब्रह्मचर्याचा सिद्धान्त : : ११

मानवसमाज हा अविरतपणें वाढत आलेला समाज आहे. आध्यात्मिक भाषेंत बोलावयाचें, तर स्वतःला हळूहळू ओळखीत गेलेला समाज आहे. तसें असेल, तर शरीराचे चोज पुरविण्यावर वाढत्या प्रमाणांत मर्यादा घालणें हेंच त्याचें अधिष्ठान असलें पाहिजे. असा विचार करतां लग्न हा वधूवरांवर शिस्तीचें बंधन घालणारा एक संस्कार मानला पाहिजे; त्या दोघांनी फक्त एकमेकांशींच संग केला पाहिजे आणि तो सुद्धां दोघांना संततीची इच्छा असेल आणि दोघे त्यासाठीं तयार असतील तेव्हां संततीकरितां म्हणूनच झाला पाहिजे. या मर्यादा त्यांच्यावर पडतात.

शारीरिक मीलनांतून आत्मिक मीलन व्हावें हा लग्नाचा उद्देश आहे. त्यामधून प्रतीत होणारें जें मानवप्रेम आहे त्याचें ईश्वरी अथवा विश्व-प्रेमांत रूपांतर होण्याच्या मार्गातील टप्पा म्हणून उपयोग व्हावा, हा त्यांत उद्देश आहे.

विवाह ही जीवनांतील एक अगदी नैसर्गिक गोष्ट आहे आणि ती कोणत्याहि प्रकारें कमीपणा आणणारी समजणें सर्वस्वीं चूक आहे....... विवाहाकडे एक पवित्र संस्कार म्हणून पाहणें व म्हणून वैवाहिक जीवन आत्मसंयमनपूर्वक घालविणें हा त्याचा आदर्श आहे.

समजूं लागल्यापासून माणूस आपलें आयुष्य सतत आत्मसंयमनपूर्वक घालवितो, हाच मनुष्य आणि पशु यांच्यामधील मुख्य फरक आहे. ईश्वरानें मनुष्याला बहीण, आई, मुलगी, यांच्यांतील फरक ओळखण्याचें सामर्थ्य दिलें आहे.

स्त्री-पुरुषांमधील संबंधाकडे जर आपण निरागस आणि शुद्ध दृष्टीनें बघूं लागलो व पुढील पिढ्यांचें नैतिक हित सांभाळणारे विश्वस्त म्हणून स्वतःला समजूं लागलों, तर आजकाल भोगावीं लागणारीं बरींचशीं दुःखें आपल्याला टाळतां येतील.

'जीवनांत संपूर्ण ब्रह्मचर्याचें काया-वाचा-मनानें पालन करणें आध्यात्मिक परिपूर्णता प्राप्त करून घेण्यासाठीं आवश्यक आहे असें माझें मत आहे. आणि

ज्या राष्ट्रांत अशा व्यक्ती नसतील त्या राष्ट्रांत या दृष्टीनें उणीव आहे असें म्हटलें पाहिजे.

संपूर्ण त्याग, संपूर्ण ब्रह्मचर्य ही आदर्श अवस्था होय. ते मनांत आणण्याचीहि तुमची छाती नसेल तर अवश्य विवाह करा; तरी त्यांत देखील संयमाचे जीवन घालवा.

मनूने पहिल्या मुलाला ' धर्मज '— कर्तव्याच्या जाणिवेंतून जन्मास आलेलें म्हणून संबोधले आहे. आणि पहिल्यानंतर जन्मास आलेल्या 'कामज'— कामेच्छेतून जन्माला आलेलें म्हटले आहे. यावरुन थोडक्यांत स्त्री-पुरुष-संबंधाचा नियम समजून येतो. आणि ईश्वर म्हणजे नियम नव्हे तर दुसरें काय ? ईश्वराची आज्ञा पाळणे म्हणजे या नियमाचे पालन करणेच होय.

कामेच्छा तृप्त करण्यासाठी शरीरसंग करणे म्हणजे फिरुन पशुकोटीकडे जाणे होय आणि म्हणून त्याच्या वर चढण्याचा माणसाचा प्रयत्न मानला पाहिजे. परंतु पति पत्नीमधील कामेच्छा नष्ट होऊ शकली नाही, तर तें पाप किंवा निंद्य कर्म मानतां येणार नाही. या जगांत असंख्य लोक आपली रसना तृप्त करण्यासाठीं खात असतात; त्याचप्रमाणे असंख्य पतिपत्नी केवळ आपली कामेच्छा तृप्त करण्यासाठी संभोगांत रममाण होतात, व होत रहातील, आणि मग निसर्ग आपले नियम मोडल्याबद्दल ज्या व्याधी आणतो त्याच्यारुपाने त्यांना कठोर शिक्षाहि भोगावी लागते. संपूर्ण ब्रह्मचर्याचा अथवा वैवाहिक ब्रह्मचर्याचा आदर्श हा आध्यात्मिक अथवा उच्च जीवन व्यतीत करण्याची जे आकांक्षा बाळगतात त्यांच्यासाठी आहे. अशा प्रकारच्या जीवनाला ते नितान्त आवश्यक आहे.

पत्नी म्हणजे नवऱ्याची दासी नव्हे; ती त्याची सहचरी, मदतनीस आणि त्याच्या सुखदुःखाची भागीदारीण आहे. स्वतःचा मार्ग निवडण्याला ती पतीइतकीच स्वतंत्र आहे.

तुमच्या पत्नीची अब्रू तुम्ही संभाळा आणि तिच्यावर सत्ता न गाजवतां तिचे सच्चे मित्र बना. तुम्ही तिचें शरीर आणि तिचा आत्मा पवित्र मानलात, कीं तुमचें शरीर व तुमचा आत्मा ती देखील पवित्र मानील असा मला विश्वास आहे. हें साधण्यासाठी उपासनापूर्वक कष्टाचें, साधेपणाचें आणि

संयमी जीवन तुम्हीं घालविलें पाहिजे. तुम्ही एकमेकांकडे भोग्य वस्तु म्हणून बघतां कामा नये.

## माझें ब्रह्मचर्य

प्रवृत्तीपर जीवन व्यतीत करीत असतांना देखील मी तिसांहून अधिक वर्षे बऱ्याच यशस्वी रीतीने ब्रह्मचर्याचे पालन केले आहे. ब्रह्मचारी म्हणून आयु य घालविण्याचे ठरविल्यानंतर पत्नीशी व्यवहार करण्याव्यतिरिक्त माझ्या बाह्य आचरणांत कसलाच फरक धडून आला नाही.

ग्रंथ वाचून माझे ब्रह्मचर्य आलेलें नाही. मी स्वतःच्या, व माझ्या विनंतीवरून माझ्या या प्रयोगांत सामील झालेल्यांच्या मार्गदर्शनाकरितां म्हणून स्वतःच कांही नियम बसविले. पुस्तकांत दिलेल्या मर्यादा जशा मीं पाळलेल्या नाहीत, तसेच स्त्री हे सर्व पापांचें व मोहांचे मूळ आहे, हें अगदी धर्मग्रंथातून आढळणारें वर्णनहि मी स्वीकारलेले नाही. माझ्यात जो कांहीं चांगुलपणा असेल त्याचे सर्व श्रेय माझ्या आईला असल्यामुळें मी कोणत्याहि स्त्रीकडे कामतृप्तीचे एक साधन म्हणून कधीहि पाहिलेले नाही; तर माझ्या आईइतक्याच पूज्य भावाने मी तिच्याकडे नेहमी पहात आलों आहें. पुरुष हा मोह उत्पन्न करणारा व आक्रमक आहे. स्त्रीच्या स्पर्शाने पुरुष भ्रष्ट होतो असे नसून तो स्वतःच तिला स्पर्श न करण्याइतका अशुद्ध असतो.

माझे प्रयोग चालले आहेत. माझ्या व्याख्येप्रमाणे मी पूर्ण ब्रह्मचारी झालो आहे, असें मी कधीहि म्हटलेलें नाही. अहिंसेचे संशोधन करण्याकरितां मला माझ्या विचारांवर ताबा ठेवण्याची गरज आहे. तो ताबा मला मिळालेला नाही. माझी अहिंसा जर स्पर्शजन्य व सांसर्गिक व्हावयाची असेल, तर मला माझ्या विचारांवर याहून जास्त ताबा मिळविला पाहिजे.

ज्या दिवशी मी ब्रह्मचर्यपालनास सुरुवात केली, त्या दिवसापासून आमच्या दोघांच्या स्वातंत्र्याला सुरुवात झाली. माझी पत्नी एक स्वतंत्र स्त्री बनली. तिचा स्वामी आणि धनी या नात्यानें असणाऱ्या माझ्या अधिकारां-तून ती मुक्त झाली आणि माझी जी वासना तिला भागवावी लागत असे त्या वासनेच्या गुलामगिरीतून मी मुक्त झालों. माझ्या पत्नीविषयीं मला ज्या प्रकारचें आकर्षण असें, तसें इतर कोणत्याहि स्त्रीबद्दल मला वाटलें नाहीं. पति

या नात्यानें मी तिच्याशीं इतका एकनिष्ठ होतों, त्याचप्रमाणें माझ्या आईपुढें घेतलेल्या शपथेला मी इतका जागत होतों, कीं मी दुसऱ्या कोणत्याहि स्त्रीचा दास झालों नाहीं; परंतु ज्या रीतीनें ब्रह्मचर्याचा विचार माझ्या मनांत आला त्या रीतीनेंच अनिवार्यपणें स्त्रीकडे मी मनुष्याची माता या नात्यानें ओढला गेलों. ती मला इतकी पवित्र वाटूं लागली, कीं कामविषयक प्रेमाची शक्यताच उरली नाहीं. आणि अशा रीतीनें प्रत्येक स्त्री चटकन मला बहीण अथवा मुलगीच वाटूं लागली.

# संतति-नियमन : : ११

संतति-नियमनाच्या आवश्यकतेबद्दल दुमत असणें शक्य नाहीं. परंतु त्यासाठीं पुरातन काळापासून चालत आलेला मार्ग म्हटला म्हणजे आत्मसंयमन किंवा ब्रह्मचर्य हा होय. जे त्याचा आचार करतात त्यांचें कल्याण करणारा तो अचूक असा सर्वोत्तम उपाय होय. आणि संततिनियमनाचीं कृत्रिम साधनें शोधून काढण्याऐवजीं डॉक्टर लोक जर आत्मसंयमनाचीं साधनें शोधून काढतील, तर मानवजात त्यांना दुवा देईल.

कृत्रिम साधनें वापरणें म्हणजे दुराचाराला मोकाट सोडणें आहे. त्यामुळें स्त्री-पुरुष अविचारी बनतात आणि या साधनांना जी प्रतिष्ठा मिळत आहे त्यामुळें लोकमतानें ज्या मर्यादा घातलेल्या आहेत त्या नाहींशा होण्यास वेळ लागणार नाहीं. संतति-नियमनाचीं कृत्रिम साधने वापरण्याचा परिणाम नेभळटपणा येण्यांत व मज्जातंतूंची ताकद क्षीण होण्यांत होणारच. या बाबतींत रोगापेक्षां इलाजच वाईट ठरल्याचें आढळून येईल.

आपल्या कृतींचे परिणाम चुकविण्यास पहाणें हें अयोग्य आणि अनैतिक आहे. अजीर्ण झालेल्या माणसाचें डोकें किंवा पोट दुखावें व त्याला उपास करावा लागावा हें योग्यच आहे. पण प्रथम आपली जीभ सैल सोडून नंतर त्यामुळें भोगावे लागणारे परिणाम चुकविण्यासाठीं शक्तिवर्धक अथवा इतर औषधें घेत बसणें हें वाईट आहे. आणि त्याहूनहि आपल्या पाशवी विकारांत

रममाण होऊन नंतर त्याचे परिणाम भोगण्याची वेळ आली म्हणजे त्यांतून सुटणें हें तर फारच वाईट. निसर्ग हा निर्दय असून अशा तऱ्हेनें त्याचें कायदे मोडले तर त्याबद्दल पुरेपूर सूड उगवल्याखेरीज तो राहणार नाहीं. नीतिनियमांची बंधनें पाळली तरच नैतिक परिणाम निपजतील. इतर सर्व प्रकारच्या नियंत्रणांमुळें त्या नियंत्रणाच्या मूळ उद्देशालाच मुळी हरताळ फांसला जातो.

जननक्रियेवर जगाचें अस्तित्व अवलंबून असतें, आणि जग ही ईश्वराची क्रीडाभूमि असल्यामुळें व त्याच्याच गौरवाचें तें प्रतिबिंब असल्यामुळें जगाची वाढ सुव्यवस्थितपणें होण्याकरितां जननक्रियेवर नियंत्रण घातलें पाहिजे.

मनुष्य हा निःसंशय कलावंत आहे, निर्माता आहे. त्याला सौंदर्याची आणि रंगाची प्राप्ति झाली पाहिजे खरी. आपल्या कलात्मक आणि सृजनशील स्वभावाच्या पूर्णावस्थेंत तो विवेक करावयास शिकला आणि रंगांची कशाहि प्रकारची गर्दी म्हणजे सौंदर्य नव्हे, किंवा सुखाची कसली संवेदना झाली की ती चांगलीच असते असें नव्हे, हें जाणण्याला शिकला. त्याच्या कलाशोधक दृष्टीने त्याला उपयुक्ततेत सुख पहाण्याला शिकविलें. अशा रीतीने आपल्या उत्क्रांतीच्या प्रथमावस्थेंतच 'खाण्याकरिता खावयाचें नाहीं' ( जें आजहि कांहीं लोक करतात ) तर 'जगतां यावें म्हणून खावयाचें' हें त्याला समजून आलें. यानंतरच्या अवस्थेंत केवळ जगण्याकरितां जगावयाचे यात सौंदर्य नाहीं, आनंदहि नाहीं, तर आपल्या बांधवांची आणि त्याच्याकरिता ईश्वराची सेवा करण्याकरितां आपल्याला जगावयाचें आहे हें तो आणखी शिकला. अशा प्रकारें जेव्हां त्यानें संगांत सुख भासतें ते कां याचा पुष्कळ विचार केला तेव्हां त्याला आढळून आलें, कीं इतर इंद्रियांप्रमाणेंच जननेंद्रियाचा सुद्धा सदुपयोग आहे, दुरुपयोगहि आहे आणि त्याचें खरे कार्य, त्याचा रास्त उपयोग त्यास उत्पत्ति करण्यापुरतें मर्यादित करणें हाच आहे. याव्यतिरिक्त दुसरा कोणताहि उपयोग त्याला विद्रूप वाटला; आणि पुढे त्याला असेंहि आढळून आलें, की अशा तऱ्हेच्या दुरुपयोगाचा भयंकर परिणाम व्यक्तीलाच नव्हे, तर समाजालाहि भोगावा लागतो.

जननेंद्रियाचें एकमेव आणि उदात्त कार्य प्रजोत्पादन हें आहे, ही कल्पना एकदां स्त्री-पुरुषांना आली म्हणजे मग दुसऱ्या कोणत्याहि हेतूनें एकत्र येणें

म्हणजे आपल्या वीर्याचा घोर दुरुपयोग करणें आहे. आणि त्याबरोबर आपल्यांत उत्पन्न होणारी उत्तेजितता ही बहुमोल अशा शक्तीचा अपव्यय आहे, असें त्यांना वाटूं लागेल.

संग हा भोगाकरितां नसून प्रजोत्पत्तीकरितां आहे आणि प्रजोत्पादनाची इच्छा नसतांना केलेला संग हा गुन्हा होय.

संतति नको असताना ती उत्पन्न करणे हे पाप आहे, परंतु आपल्या कृतीचे परिणाम चुकविणे हे त्याहूनहि मोठे पाप आहे असें मला वाटतें. त्यामुळे माणसाची माणुसकीच नाहीशी होते.

पाशवी विकारांत रममाण होणें आवश्यक असून त्यांत धोका अथवा पाप नाही असें आपण एकदा मानूं लागलों, म्हणजे विकारांना मोकाट सोडावे असें आपल्याला वाटूं लागेल. आणि त्यांचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य आपल्यांत उरणार नाही. उलट, अशा प्रकारचा स्वैरभोग हा नुकसानकारक, पापमय व अनावश्यक असून आपण त्याच्यावर ताबा मिळवूं शकतो असें मानण्याचें जर आपण स्वतःला वळण लावून घेतलें, तर आत्मसंयमन करणे सहज शक्य आहे असें आपल्याला आढळून येईल.

रात्री एकाच खोलींत किंवा एकाच शय्येवर निजावयाचे नाही आणि माणसाला काय किंवा पशूला काय ज्या एकमेव हेतूसाठीं शरीरसंग ठेवला आहे तो हेतु नसेल तर संग करावयाचा नाही, अशी प्रतिज्ञा प्रत्येक पति-पत्नीला करणें शक्य आहे. मानवेतर प्राणी या कायद्याचें निरपवादपणें पालन करतात.

माणसाला निवड करण्याचें सामर्थ्य असल्यानें अयोग्य निवड करण्याची घोडचूक त्याच्या हातून घडली आहे. स्त्री-पुरुष दोघांनी हें लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं कामेच्छा भागविण्यापासून अलिप्त राहिल्यामुळे रोग तर जडत नाहींच; तर उलट, जर मन आणि शरीर यांचें परस्पर सहकार्य असेल, तर आरोग्य आणि जोम प्राप्त होतो.

उन्नति अथवा अधोगति या दोहोंपैकीं कशाची तरी माणसानें निवड केली पाहिजे. परंतु त्यांच्यांत पशुवृत्तीहि नांदत असल्यानें उन्नतीच्या मार्गापेक्षां अधोगतीचा मार्ग—विशेषतः तो जेव्हां सुंदरपणे सजून त्याच्यापुढे येतो त्या वेळीं—तो चटकन तोच पसंत करतो. पाप हें सद्गुणांच्या रूपानें जेव्हां

माणसापुढें उभें केलें जातें, तेव्हां त्याला तो सहजासहजीं बळी पडतो. मेरी स्टोप्स् आणि इतर मंडळी आज हेंच करीत आहेत.

आपला हा लहानसा भूगोल म्हणजे कालपरवांचें खेळणें नव्हे. कोट्यवधि वर्षें लोटलीं तरी जादा लोकसंख्येच्या भारानें तो कधींच हैराण झालेला नाहीं. मग संतति-नियमनाच्या साधनांचा उपयोग करून जननसंख्येच्या प्रमाणावर जर नियंत्रण ठेवलें नाहीं, तर धान्याचा तुटवडा पडून जग नष्ट होण्याचा धोका आहे या गोष्टीचा अचानक कांहीं लोकांच्या डोळ्यांत प्रकाश पडला. हें होणें शक्य कसें आहे ?

कायदेशीररीत्या काढलेलें कर्ज फेडलेंच पाहिजे हें जसें बंधनकारक, तसें कामवासनेची तृप्ति करणें हें देखील एक पवित्र बंधन मनुष्यमात्रावर आहे. आणि ती तृप्ति न केल्यानें बुद्धि क्षीण होत जाते असें एकसारखें आपल्या कानांवर येऊन आदळत असतें. ही कामविषयक ओढ संततीच्या इच्छेपासून वेगळी काढली गेली असून कृत्रिम साधनांच्या पुरस्कर्त्यांकडून असें सांगि-तलें जात आहे, कीं गर्भधारणा ही एक उपाधि असून ज्या वेळीं पतिपत्नींची आपल्याला मूल व्हावें अशी इच्छा नसेल, त्या वेळीं गर्भधारणा होऊं देतां कामा नये. ही शिकवण अत्यंत भयानक आहे असें सुचविण्याचें मी धाडस करतो.

विज्ञानाच्या नांवाखालीं झालेली संतति-नियमनाच्या साधनाची सुरुवात, आणि प्रसिद्ध समाजधुरिणांनीं त्याला दिलेली संमति, यामुळें परिस्थिति अधिकच बिकट झाली असून सामाजिक जीवनांत शुद्धता आणण्यासाठीं झटणाऱ्या सुधारकांचें कार्य त्यामुळें अशक्यप्राय होऊन बसलें आहे.

कामेच्छा ही एक उत्तम व उदात्त गोष्ट आहे. त्यांत लाज वाटण्यासारखें कांहींहि नाहीं; परंतु प्रजोत्पादन हाच तिचा एकमेव हेतु आहे. त्याव्यतिरिक्त केलेला तिचा कोणताहि उपयोग हा ईश्वराच्या आणि मानवतेच्या विरुद्ध केलेला गुन्हा होय.

ज्या लैंगिक शिक्षणाचा मी पुरस्कर्ता आहें, त्याचा हेतु कामविकारांवर जय मिळविणें व त्याला उदात्त बनविणें हा असला पाहिजे. अशा शिक्षणानें मुलांना आपोआप मानव आणि पशु यांमधील मूलभूत फरक समजला पाहिजे, बुद्धि आणि भावना या दोन्ही शक्तींची देणगी मनुष्यालाच मिळाली आहे;

हा त्याचा विशेष मान आणि अधिकार आहे, याची त्यांना जाणीव झाली पाहिजे; आणि माणूस जितका भावनायुक्त तितकाच बुद्धियुक्त प्राणी आहे...... म्हणून आपल्यामधील विकारावरील बुद्धीचें सार्वभौमत्व सोडून देणें म्हणजे मनुष्यत्वाचें सर्वस्वच सोडून देण्यासारखें आहे, हें त्यांना कळलें पाहिजे.

## स्त्री ही अबला नाहीं : : २३

मी जर स्त्रीच्या जन्माला आलों असतों, तर स्त्री ही पुरुषाचें खेळणें होण्याकरितां म्हणून जन्माला आली आहे असें जें पुरुषजातीकडून भासविलें जातें, त्याविरुद्ध मी बंड पुकारलें असतें. स्त्रीच्या हृदयांत प्रवेश मिळावा म्हणून मी मनानें स्त्री झालो आहे. मी पत्नीला पूर्वी वागवीत होतों त्याहून निराळ्या रीतीनें वागविण्याचें जेव्हां ठरविलें, आणि पति या नात्यानें माझे हक्क म्हणून म्हटल्या जाणाऱ्या सर्व गोष्टींचा त्याग करून तिचे सर्व हक्क जेव्हां मी तिला दिले, तेव्हांच तिच्या अंतःकरणांत मला शिरतां आलें. आणि आज ती तुम्हांला माझ्याइतकीच साधीसुधी असल्याचें दिसत आहे. तिच्या अंगाखांद्यांवर कसलेंहि दागिने अथवा भपका तुम्हांला आढळणार नाहीं. तुम्ही ( स्त्रियांनी ) सर्वांनी तसें असावें अशी माझी इच्छा आहे. आपल्या लहरीच्या व कल्पनांच्या किंवा पुरुषांच्या दासी होण्याचें तुम्ही नाकारा. आपलें शरीर नटविण्याचें आणि अत्तरें व लव्हेंडरें वापरण्याचें सोडून द्या. जर तुम्हांला परिमलच पसरावयाचा असेल, तर तो तुमच्या हृदयांतून बाहेर पडूं द्या. म्हणजे मग केवळ पुरुषालाच नव्हे, तर मानवसमाजाला तुम्ही अंकित करून टाकाल. तो तुमचा जन्मसिद्ध हक्कच आहे. पुरुषाचा जन्म स्त्रीपासून आहे, तो तिच्याच हाडामांसाचा बनलेला आहे. तुम्ही स्वतःचे स्थान प्राप्त करून घ्या आणि पुन्हां तुमचा संदेश जगाला द्या.

आपण पुरुषाची भोग्य वस्तु आहोंत ही कल्पना स्त्रीजातीनें सोडून दिली

पाहिजे. त्याचा उपाय पुरुषापेक्षां स्त्रीच्याच हातांत अधिक आहे. तिला जर पुरुषाची समान जोडीदारीण होण्याची इच्छा असेल, तर पुरुषजातीकरितां नटण्याचें तिनें सोडून दिलें पाहिजे– मग तो पुरुष नवरा असला तरी काय झालें? शारीरिक आकर्षणानें रामाला खूष करण्यासाठीं सीतेनें एक क्षण कां होईना, कधीं वेंचला असेल अशी कल्पना देखील मला करवत नाहीं.

माणूस स्वतःच ज्या ज्या म्हणून पापांचा धनी झाला आहे, त्यांतील मानवसमाजाच्या उत्तमांशाची म्हणजे स्त्रीजातीची– अबलांची नव्हे– माझ्या दृष्टीनें त्यानें जी हेटाळणी चालविली आहे तिच्याइतकें हीन, किळसवाणें आणि पशुतुल्य पाप दुसरें कोणतेंहि नाहीं. स्त्री ही पुरुषापेक्षां अधिक थोर आहे. कारण आज देखील ती त्याग, मूक सोशिकता, नम्रता, निष्ठा आणि ज्ञान यांची साक्षात् मूर्ति आहे.

स्त्री ही आत्मत्यागाची साक्षात् मूर्ति आहे असें मी मानतों; परंतु दुर्दैवानें पुरुषावर आपले केवढें प्रचंड वजन आहे याची आज तिला जाणीव नाहीं. टॉल्स्टॉय म्हणतात त्याप्रमाणें त्या पुरुषांच्या मोहिनीच्या प्रभावानें भारल्याप्रमाणें झाल्या आहेत. त्यांना जर अहिंसेचें सामर्थ्य समजलें, तर त्या आपल्याला अबला म्हणवून घेण्यास कधींहि तयार होणार नाहींत.

स्त्रीला अबला म्हणणें म्हणजे तिची विटंबना करणें होय. पुरुषाचा हा तिच्यावर अन्याय आहे. शक्तीचा अर्थ पाशवी शक्ति असा असेल, तर स्त्री ही पुरुषापेक्षां खासच कमी पाशवी आहे. पण शक्ति म्हणजे नैतिक सामर्थ्य असा अर्थ असेल, तर स्त्री ही पुरुषापेक्षां अनंतपटीनीं श्रेष्ठ आहे. स्त्रीमध्यें पुरुषापेक्षां जास्त उपजतबुद्धि, जास्त त्यागवृत्ति व सोशिकपणाची शक्ति नाहीं का? तिच्यांत धैर्य अधिक नाहीं का? स्त्री नसेल तर पुरुषहि असणार नाहीं. अहिंसा हा जर जीवनधर्म असेल, तर भविष्यकाळ स्त्रियांच्या हातीं आहे....... हृदयाला स्त्रीपेक्षां जास्त परिणामकारकपणें कोण जागृत करूं शकेल?

आपल्या आंधळ्या स्वार्थपरतेनें पुरुषानें स्त्रीचा आत्मा चिरडून टाकला आहे व तसा तो टाकला नसता अथवा स्त्री ही भोगांना बळी पडली नंसती, तर तिनें आपल्यांतील अमर्याद अशा सुप्त शक्तीचा जगाला प्रत्यय आणून दिला असता. स्त्री जेव्हां पुरुषाच्या बरोबरीनें संधि प्राप्त करून घेईल आणि

एकमेकांना मदत व एकमेकांत मिसळून जाण्याची आपली शक्ति पूर्णपणें विकसित करील, तेव्हां जगाला तिच्या शक्तीची अद्‌भुतता व गौरव पहावयास मिळतील.

जीवनांत जे जे म्हणून शुद्ध व धार्मिक आहे ते सर्व स्त्रीच एक विशेषें- करून राखते. स्वभावानें ती जुन्याला चिकटून रहाणारी सनातनी असल्यामुळे ती जशी धर्मभोळ्या रूढी चटकन टाकून देत नाहीं, तशीच जीवनात जे जे कांही शुद्ध व उदात्त आहे तेंहि ती चटदिशी सोडून देत नाहीं.

स्त्रियांच्या हक्कांच्या बाबतींत मी कसलीहि तडजोड करण्यास तयार नाहीं. पुरुषावर नसलेले कायद्याचे कोणतेहि निर्बंध तिच्यावरहि असता कामा नयेत, असें माझें मत आहे. मुलांना आणि मुलींना पूर्ण समानतेच्या भूमिकेवरून मी वागवीन.

स्त्रियाना योग्य शिक्षण मिळालें पाहिजे यावर माझा विश्वास आहे. परंतु त्या जर पुरुषाची केवळ नक्कल करूं लागल्या किंवा त्याच्याशीं स्पर्धा करूं लागल्या, तर जगाला त्या कांहीएक देऊं शकणार नाहींत असेंहि मी निश्चितपणें मानतो. तिला पुरुषावरोबर स्पर्धा करता येणार नाहीं असें नाहीं; परंतु पुरुषाची केवळ नक्कल केल्यानें ज्या अत्यंत उच्च पदवीला पोहोंचण्याची तिच्यात शक्ति आहे, त्या पदवीला मात्र ती पोहोंचणार नाहीं. पुरुषांत नाहीं तें तिनें पूर्ण केलें पाहिजे.

## वेश्याव्यवसाय

वेश्याव्यवसाय हा जगाइतकाच पुरातन आहे; परंतु शहरी जीवनाचें आज तो जसें एक अंग बनून गेला आहे, तसा तो पूर्वी कधीं होता कीं नाहीं याबद्दल मला शंका आहे. कांहीहि असलें, तरी या अरिष्टाशीं झगडण्याकरिता आतां मानवसमाजानें उठलें पाहिजे आणि प्राचीन काळा- पासून आदरणीय वाटत असलेल्या अनेक दुष्ट रूढींचें त्यानें जसें उच्चाटन केलें, तसेंच वेश्याव्यवसायालाहि त्यानें भूतकालांत गाडून टाकलें पाहिजे.

# शरीरश्रमाचा सिद्धान्त : : १४

उपाशी पोटी व बेकार लोकांपुढें प्रकट होण्याचें धारिष्ट जर ईश्वर करूं शकला, तर काम व त्या कामाचा मोबदला म्हणून अन्नाची शाश्वति हेंच एक ईश्वराचें रूप लोक मान्य करतील.

दिवसाकांठी एक वेळचेंहि पोटभर जेवण ज्यांना मिळत नाहीं आणि ज्यांना भाकरीचा शिळा तुकडा व चिमूटभर मीठ यांवरच गुजारा करावा लागतो अशा लाखों श्रमजीवी व बेकार लोकांकरतां स्वराज्य मिळवावयाचें म्हणून मी झटत आहे.

ईश्वरानें माणसाला उत्पन्न केले आणि त्याला स्वतःच्या अन्नासाठीं काम करावयाला सांगितलें. जो श्रम न करतां खाईल तो चोर होय असें ईश्वराचें वचन आहे.

ज्यांच्या डोळ्यात कसलें तेज नाहीं आणि भाकरीचा तुकडा हाच ज्यांचा ईश्वर, अशा कोट्यवधि भुकेकंगालांपुढे ईश्वराचा संदेश सांगणें काय आणि कुत्र्याला तो ऐकवणें काय, दोन्ही एकच होत. त्यांच्यापुढें पवित्र कर्माचा संदेश घेऊन जाण्यानेंच ईश्वराचा संदेश मला त्याना देतां येईल. सुरेखशी सकाळची न्याहारी झाल्यानंतर......... त्याहूनहि सुरेखसें दुपारचें जेवण मिळण्याची वाट पहात असतांना......... ईश्वराच्या गप्पा मारणें ठीक आहे. परंतु ज्यांना रोज दोन वेळां जेवण मिळण्याची देखील भ्रान्त आहे, अशा जनतेशीं ईश्वरासंबंधीं मी बोलूं तरी कसें? ईश्वर त्यांना अन्नाच्याच स्वरूपात दिसणें शक्य आहे.

पूर्वी प्रजेसवें ब्रह्मा यज्ञ निर्मूनि बोलिला ।
पावा उत्कर्ष यज्ञानें हा तुम्हां कामधेनुची ॥

'हे यज्ञकर्म न करतां जो खातो, तो चोरीचें अन्न खातो' असें गीता सांगते. 'स्वतःच्या निढळाच्या घामानें आपलें अन्न मिळवा' अशी बायबलाची शिकवण आहे. यज्ञ अनेक प्रकारचे असूं शकतात. अन्नासाठीं श्रम करणें हा देखील एक यज्ञच होऊं शकेल. जर सर्वांनीं फक्त आपल्या अन्नापुरतेच श्रम केले, तर जगांत सर्वांना पुरेसें अन्न आणि पुरेशी फुरसद मिळू

शकेल. असें झालें म्हणजे मग फाजिल लोकसंख्येची ओरड, रोगराई आणि सभोंवतीं दिसणारी दैन्यावस्था रहाणार नाही. अशा तऱ्हेचे श्रम हें अत्यंत श्रेष्ठ स्वरूपाचें यज्ञकर्म होईल. माणसें त्याव्यतिरिक्त शारीरिक किंवा मानसिक कष्टांची इतर अनेक कामें करतीलच, पण ते सर्व प्रेमाचे कष्ट असतील. ते समाजाच्या हितासाठी म्हणून होतील. मग जगांत कोणी श्रीमंत, कोणी गरीब, कोणी उच्च, कोणी नीच, कोणी स्पृश्य, कोणी अस्पृश्य असें रहाणार नाही.

कदाचित् हा असाध्य आदर्श असेल: परंतु म्हणून कांही त्यासाठी प्रयत्न करण्याचें सोडून देतां कामा नये. यज्ञाचा संपूर्ण धर्म म्हणजेच आपल्या जीवनाचा धर्म, जरी आपल्याला पार पाडता आला नाही आणि आपण फक्त आपल्या रोजच्या निर्वाहापुरते शरीरश्रम केले, तरी आपण आदर्शाकडे बरीच मोठी मजल मारल्याचें श्रेय आपणांस मिळेल.

आपण जर असें केले, तर आपल्या गरजा कमीत कमी होतील, आपलें अन्न साधे होईल. मग आपण जगण्यासाठी आहार करूं, आहारासाठी जगणार नाही. या सिद्धान्ताच्या अचूकतेबद्दल ज्याला शंका असेल, त्यानें निढळाच्या घामानें निर्वाह करण्याचा प्रयत्न करून पहावा. आपल्या श्रमाच्या फळाची त्याला कमालीची खुमारी वाटेल. त्याची प्रकृति सुधारेल आणि आपण घेत असलेल्या पुष्कळ गोष्टी गैरवाजवी होत्या असे त्याला आढळून येईल.

श्रमावर जितका भर द्यावा तितका थोडाच. गीतेंत भगवंतांनी उपदेशिलेलें वचनच मी पुनः सांगत आहे. ते म्हणतात :

यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतंद्रितः ।
ममवर्त्मानुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥

( मी चि कर्मी न वागेन जरी आळस झाडुनी ।
सर्वथा लोक घेतील माझें वर्तन ते मग ॥ )

त्याच्या ( बुद्धा ) सारख्या विभूतीची प्रत्यक्ष गांठ-भेट होण्याचें सद्भाग्य जर मला लाभलें असतें, तर 'चिंतनाच्या सिद्धान्तापेक्षां श्रमाचा सिद्धान्त तुम्ही लोकांना कां शिकविला नाहीं' अशी पृच्छा केल्याशिवाय मी राहिलों नसतों.

( तुकाराम आणि ज्ञानेश्वर यांच्यासारख्या ) संतांच्या भेटीचा प्रसंग आला तर त्यांना देखील मी हेंच विचारीन.

## चरखा

माझा असा विश्वास आहे, की हिंदुस्थानला अहिंसेव्यतिरिक्त दुसरा कोणताहि मार्ग योग्य ठरणार नाहीं. हिंदुस्थानकरितां त्या धर्माचें प्रतीक चरखा हें आहे. कारण, तोच एक दुःखितांचा मित्र आणि दरिद्र्यांचा ऐश्वर्य-दाता आहे. प्रेमधर्म स्थलकालाच्या मर्यादा जाणत नाही. म्हणून माझें स्वराज्य हे भंगी, धेड, आदिवासी आणि जे कोणी सर्वांत अशक्त असतील त्यांचेच्चकडे लक्ष पुरवितें आणि या सर्वांना आपलेसे करणारी चरख्याशिवाय अन्य वस्तु मला माहीत नाही.

इद्रियाच्या भोगांचें आजचें कृत्रिम जीवन सोडून द्या आणि चरख्याच्या चिह्नानें व्यक्त होणाऱ्या साध्या राहणीकडे परत चला, असा मी लोकांना जर उपदेश करीत असलों तर त्याचें कारण हें आहे, की बुद्धिपुरस्सर आपण साध्या राहणीचा पुनः अंगीकार जर केला नाही तर आपली पशु-त्वाच्याहि खालीं अधोगति झाल्यावांचून रहाणार नाही.

मी कर्मयोगी आहें, कीं आणखी कसला योगी आहे तें मला माहीत नाही. मला कामावांचून रहातां येत नाही एवढें मला माहीत आहे. चरखा चालवितां चालवितां मृत्यु यावा हीच मला तीव्र इच्छा आहे. आपल्याला जर कोणत्या तरी एकाच्या साह्यानें ईश्वराशी अनुसंधान ठेवावयाचे असेल तर मग त्याला चरखा काय वाईट आहे? गीतेमध्यें भगवान् म्हणतातः—

अनन्य भावें चिंतूनी भजती भक्त जे मज।
सदा मिसळले त्यांचा मी योगक्षेम चालवीं ॥

माझ्या ईश्वराची स्वरूपें अनंत आहेत. कांहीं वेळां मला तो चरख्यांत दिसतो, तर कांहीं वेळां जातीय ऐक्यांत दिसतो. आणि कांही वेळां अस्पृश्यता-निवारणांत मला त्याचें दर्शन घडतें. आणि अशा रीतीनें जशी वृत्ति असेल तदनुरूप त्याच्याशीं मी अनुसंधान राखतों.

# वर्गविरोध : : १९

मी नेहमी असे सांगत आलो आहे, की भांडवल व श्रम यांनी परस्पराना पूरक बनून एकमेकास मदत करावी हा आदर्श आहे. एकोप्यानें आणि खेळीमेळीनें नादणारे असे त्याचे एक मोटे कुटुंब व्हावे. भांडवलदारांनीं कामगाराच्या भौतिक योगक्षेमाकडेच फक्त लक्ष न पुरवितां त्याच्या नैतिक योगक्षेमाचीहि काळजी वाहावी; कारण भांडवलदार हे त्यांच्या हातांखालच्या कामगारवर्गाचे हित-रक्षण करणारे विश्वस्त आहेत.

मी भांडवलाची शिवाशिव मानीत नाही. भांडवलदारीला मात्र माझा तीव्र विरोध आहे. भांडवलाचें केंद्रीकरण टाळावे, दुसऱ्या एका स्वरूपांत होणारी व अधिक भयानक स्वरूपाची यादवी टाळावी, असे पाश्चात्य राष्ट्रें शिकवीत आहेत. भांडवल आणि श्रम हे एकमेकांचे वैरी असण्याचें कांही कारण नाही. कोणीहि माणूस दुसऱ्यापेक्षां सधन असणार नाही, अशा काळाचें चित्र माझ्या डोळ्यापुढे येऊंच शकत नाही. परंतु धनवान् लोक गरिबाच्या जिवावर स्वतः गबर होणे तिरस्करणीय मानतील आणि गरीब लोक धनवानाचा हेवा करण्याचें सोडून देतील अशा काळाची कल्पना मात्र मला अवश्य येते. अगदी पूर्ण जगांत देखील आपल्याला विषमता टाळतां येणार नाही; परंतु झगडा आणि कटुता ही मात्र आपल्याला टाळतां येतील व आपण ती टाळलीहि पाहिजेत ?

मी जे स्वप्न सत्यसृष्टींत आणूं इच्छितों त्यांत खाजगी मालकीची मालमत्ता जबरीनें काढून घेणे येत नाही; पण सारें दारिद्र्य, त्यांतून उत्पन्न होणारा असंतोष आणि श्रीमंत व गरीब यांच्या राहणीत व परिस्थितीत आज आढळणारे भयानक विद्रूप अंतर हे उत्पन्न होऊं नये अशा रीतीनेंच त्या मालमत्तेचा उपयोग नियंत्रित करणें हें येतें. मालकाच्या इच्छेला येईल तेव्हां तो आपल्याला राबवूं शकेल आणि त्याच्या मनांत येईल त्याप्रसंगीं तो आपल्याकडून जुलमानें कांहीहि काढूं शकेल, असे आपण त्याचे गुलाम राहिलो नसून आपण त्याच्या बरोबरीचे भागीदार झालों आहों, असें गरिबांना वाटूं लागलें पाहिजे.

अहिंसा-मार्गानें आम्ही भांडवलदारांचा नाश करण्याचा प्रयत्न करीत नाहीं, तर भांडवलदारीचा नाश करण्याचा प्रयत्न करतों. भांडवल तयार होण्याकरितां, तें स्थिर रहाण्याकरितां व वाढण्याकरितां ज्यांच्यावर भांडवलदार अवलंबून आहेत त्यांचे आपण विश्वस्त आहों असें त्यानें स्वतःला मानावें हें आमचें त्याला सांगणें असतें. भांडवलदारांचे असें हृदयपरिवर्तन होण्याची कामगारानें वाट पहात बसण्याचेंहि कारण नाहीं. भांडवल ही जशी शक्ति आहे, तशीच श्रम ही देखील शक्ति आहे. यांपैकीं कोणत्याहि शक्तीचा विनियोग विनाशाच्या किंवा निर्मितीच्या दोन्ही दृष्टींनीं करून घेतां येईल. त्या दोन्ही शक्ती परस्परावलंबी आहेत. एकदां का कामगाराला त्याच्या शक्तीची जाणीव झाली, कीं लगेच तो भांडवलदाराचा गुलाम न रहातां भांडवलदाराचा भागीदार होण्याचें सामर्थ्य त्याला प्राप्त होतें. आपणच एकटे मालक व्हावें हें ध्येय जर तो ठेवील, तर सोन्याची अंडीं घालणाऱ्या कोंबडीला ठार मारल्यासारखी त्याची गत होईल.

पशुपक्ष्याच्या प्रमाणेच प्रत्येक मनुष्याला जीवनास लागणाऱ्या आवश्यक वस्तू मिळणें हा त्याचा हक्क आहे. आणि हक्क म्हटला, कीं त्याबरोबरच त्या विषयींचें कर्तव्य आणि त्या हक्काला प्रतिबंध झाला, तर त्यावरील उपाययोजनाहि येत असल्यामुळें ती प्राथमिक मूलभूत समानता प्रस्थापित करण्याकरितां हक्काच्या बरोबर येणारीं कर्तव्यें आणि उपाययोजना कोणत्या हे फक्त शोधून काढण्याचें काम रहातें. हक्काबरोबर येणारें कर्तव्य म्हणजे अंगमेहनत करणें आणि उपाययोजना म्हणजे त्या मेहेनतीचें फळ माझ्यापासून जो हिरावून घेतो त्याच्याशीं असहकार करणें, आणि मला जर भांडवलदार व कामगार यांच्यांतील मूलभूत समानतेची जाणीव झालेली असेल — आणि तशी ती झाली पाहिजे — तर मी भांडवलदाराचा नाश कसा होईल हें पहातां कामा नये. मी त्याचें हृदयपरिवर्तन करण्याची खटपट केली पाहिजे. माझ्या असहकारामुळें तो करीत असलेल्या अन्यायाची त्याला जाणीव होऊन त्याचे डोळे उघडतील.

भांडवलदाराचा नाश करण्यांत अंतीं कामगाराचाच नाश कसा होतो हें सहज दाखवितां येण्यासारखें आहे, आणि ज्याप्रमाणें कोणताहि मनुष्य सुधारणा होण्यास अशक्य इतका वाईट नसतो, त्याचप्रमाणें ज्याला तो

चुकीनें सर्वस्वी दुष्ट समजतो त्याचा नाशच केला पाहिजे असा अधिकार हातीं असण्याइतका कोणताहि मनुष्य पूर्ण नसतो.

समाजाविषयी माझी कल्पना अशी, की आपण जरी जन्मानें समान असलों, म्हणजे आपल्या सर्वांना समान संधि मिळण्याचा हक्क असला, तरी सर्वांची कुवत मात्र सारखीच असते असें नाही. स्वभावतःच तें अशक्य आहे. उदाहरणार्थ, सर्वांची उंची, वर्ण किंवा बौद्धिक दर्जा वगैरे सारखे असणे शक्य नाही. त्यामुळे साहजिकच कांहींच्या मध्यें कमाविण्याचे सामर्थ्य अधिक असेल, तर कांहींच्यांत कमी असेल. बुद्धिमान् माणसांना अधिक मिळेल व ते आपल्या बुद्धीचा उपयोग याच हेतूने करतील. जर ते आपली बुद्धि स्वभावपूर्वक उपयोगात आणतील तर ते राज्यसंस्थेचें काम पार पाडतील. अशी माणसें फक्त विश्वस्त म्हणूनच राहूं शकतात, इतर कोणत्याहि नात्यानें ती राहू शकत नाहीत. बुद्धिमान् माणसाला मी अधिक मिळविण्याला मुभा देईन, त्याची बुद्धि मी पागळी करणार नाही. परंतु ज्याप्रमाणें बापाच्या सर्व मिळविल्या मुलांची कमाई कुटुंबाच्या समाईक मिळकतीत जमा होते, त्याप्रमाणें या बुद्धिमान लोकांच्या जादा कमाईतील मोठा भाग देखील देशाच्या हितासाठीं खर्च झाला पाहिजे. आपल्या मिळकतीचे ते फक्त विश्वस्त म्हणून रहातील. हे सर्व अमलात येण्याच्या कामी मला परकाष्ठेचे अपयश येईल. परंतु माझी सारी धडपड यासाठीं आहे खरी.

कांही लोकांनीं मला आजच्या काळांतील सर्वात मोठा क्रांतिकारक म्हटले आहे. कदाचित तें खोटेंहि असेल, पण मी स्वतःला क्रांतिकारक—अहिंसक क्रांतिकारक—मानतों खरा. असहकार हे माझे साधन आहे. कोणत्याहि मनुष्याला संपत्ति साठवावयाची असेल, तर त्याच्याशीं संबंध येणाऱ्या लोकांच्या खुशीच्या अथवा सक्तीच्या सहकार्याखेरीज ते शक्य होणार नाही.

आज जे स्वतःला मालक समजतात त्यांनीं विश्वस्त म्हणून म्हणजे मालकच पण आपल्या मालकी हक्कानें नव्हे, तर ज्यांचा त्यांनी फायदा घेतला त्यांचा हक्क संभाळणारे मालक म्हणून वागावें असें माझे त्यांना सागणें आहे.

ज्या क्षणीं कामगारांना श्रमाच्या प्रतिष्ठेची जाणीव होईल त्याक्षणीं पैशाला त्याचें योग्य स्थान प्राप्त होईल. म्हणजेच कामगारांकरितां विश्वासानें ठेवलेला

निधि म्हणून तो समजला जाईल. कारण श्रमाची किंमत पैशापेक्षांहि अधिक आहे.

माझें असें मत आहे, कीं भांडवलदाराला जसा पैसा तसें कामगारवर्गाला निरनिराळ्या धंद्यांचें कामचलाऊ ज्ञान होय. कामगाराचें कसब हेंच त्याचें भांडवल होय. ज्याप्रमाणें भांडवलदाराला कामगारांच्या सहकार्याशिवाय आपल्या भांडवलापासून फळ काढतां येत नाही, त्याप्रमाणें भांडवलाचें सहकार्य मिळाल्याखेरीज कामगारांचे श्रमदेखील सफल होणार नाहींत. आणि जर कामगार व भाडवलदार या दोघांच्या ईश्वरदत्त बुद्धीचा सारखाच विकास झाला असेल आणि आपण दुसऱ्याकडून योग्य न्याय मिळवून घेऊं असा आपल्या कुवतीवर प्रत्येकाचा विश्वास असेल, तर ते एकमेकांकडे एकाच धंद्यांतील समान भागीदार म्हणून आदरानें बघूं लागतील, व एकमेकांना चाहूं लागतील. मुळांतच आपण एकमेकांचे हाडवैरी आहोंत असें त्यांनी मानण्याचे कारण नाहीं. परंतु अडचण अशी आहे, की आज ज्याप्रमाणें भांडवलदार संघटित आहेत आणि त्यांनीं आपल्या संरक्षणाची काळजी घेतली असल्याचें आढळतें, त्याप्रमाणें कामगारवर्गाची स्थिति नाही. आज कामगारांची बुद्धिमत्ता त्याला मिळालेल्या चैतन्यशून्य व यांत्रिक कामानें खुरटून जाते. आपल्या मनाचा विकास साधण्याला त्याला त्यांत यत्किंचित्‌हि वाव अथवा संधि मिळत नाहीं. त्यामुळें त्याला स्वतःच्या दर्जाची शक्ति आणि पूर्ण प्रतिष्ठा कळण्याला अडचण येते. आपल्या श्रमाची किंमत आपण म्हणतों ती मिळाली पाहिजे असें समजण्याऐवजीं ती भांडवलदारांनी ठरवून द्यावयाची आहे असें मानण्याला त्याला शिकविलेलें आहे. योग्य मार्गानें संघटित होऊन त्याची बुद्धि चलाख होऊं द्या, निरनिराळे व्यवसाय तो शिकूं द्या, कीं लागलीच मान ताठ करून चालण्याचें सामर्थ्य त्याला येईल. आणि निर्वाहाचें साधन आपल्या हातचें जाईल अशी भीति त्याला कधीहि भासणार नाही.

मला हिटलरी सत्ता नको आहे. स्वतंत्र शेतकऱ्याची सत्ता मला पाहिजे आहे. इतकीं वर्षें मी शेतकऱ्यांशीं एकरूप होण्याचा प्रयत्न करीत आहें, परंतु त्यांत मला यश आलेलें नाहीं. तथापि आज किसानांत आणि माझ्यांत जर कांहीं फरक असेल, तर तो हा, कीं तो आपल्या पसंतीनें किसान आणि मजूर झालेला नाहीं; तर परिस्थितीच्या दडपणामुळें झाला आहे. मला माझ्या

पसंतीनें किसान आणि मजूर व्हावयाचे आहे आणि जेव्हां त्यानें सुद्धां आपल्या पसंतीने किसान आणि मजूर बनावें अशी शक्ति मी त्याच्यांत आणूं शकेन, तेव्हां आज त्याला बंधनांत जखडणाऱ्या आणि धनी सांगतो ते करण्यास भाग पाडणाऱ्या त्याच्या हातांपायांतील बेड्या तोडून फेकून देण्याची शक्ति सुद्धां मला त्यांच्यांत आणतां येईल.

## मानव विरुद्ध यंत्र : : २६

यंत्रे नाहीशीं झालीं, तर मला यत्किंचित्हि दुःख वाटणार नाहीं; किंवा मोठी आपत्ति आली असेंहि वाटणार नाहीं. परंतु यंत्रे म्हणूनच त्यांच्यावर माझा विशेष डोळा आहे असेंहि नाहीं.

माझी हरकत आहे ती सर्वसामान्यपणे यंत्राला नसून यंत्राचें आजकाल जें वेड निर्माण झाले आहे त्याला. यंत्राचा हा हव्यास ज्याला श्रम वांचविण्याची यंत्रसामग्री म्हणतात त्यासाठीं आहे. हजारो लोक बेकार होऊन भुकेने मरणोन्मुख स्थितीत रस्तोरस्ती भटकूं लागले, तरी यांचे 'श्रम वांचविणें' चाललेंच असतं ! मला देखील वेळ आणि श्रम यांत बचत करावयाची आहे. पण ती मूटभर लोकांकरितां नसून साऱ्या मानवजातीकरितां करावयाची आहे. मला संपत्तीचा सांठा कांहीं मोजक्या लोकांच्या हातांत व्हावयास नको आहे, तर तो सर्वांच्या हातीं व्हावयास पाहिजे आहे. आज यंत्रामुळें फक्त कांहीं थोड्या लोकांना इतर लाखो लोकांवर सत्ता गाजविण्याची संधि मिळते. या सगळ्यांच्या मागें श्रम वांचावेत ही तळमळ नसून फक्त स्वार्थमूलक हांव असते. या असल्या परिस्थितीशींच मी माझी सर्व शक्ति एकवटून झगडा देत आहे.

मनुष्याला प्रधान समजून सर्व गोष्टी करावयाच्या आहेत. मनुष्याचे अवयव क्षीण करून टाकण्याची यंत्राची प्रवृत्ति असूं नये.

आदर्शाच्या दृष्टीनें म्हटलें, तर जसें मुक्ति मिळविण्याच्या कामीं हें शरीर उपयोगाला येत नसेल, तर तें मी त्याज्य ठरवीन आणि आत्म्याची संपूर्ण

मुक्तता मिळविण्याचा प्रयत्न करीन, तशींच मी सर्व यंत्रें त्याज्य ठरवीन. त्या दृष्टीनें मी सगळी यंत्रसामग्री टाकून देईन खरें, तरी यंत्रें हीं रहाणारच; कारण शरीराप्रमाणेंच तीं देखील अपरिहार्य आहेत. प्रत्यक्ष शरीर...... हें देखील अत्यंत शुद्ध असें एक प्रकारचें यंत्रच आहे; परंतु तें जर आत्म्याच्या अत्युच्च उन्नतीस अडथळा आणीत असेल, तर त्याचा देखील त्याग करावा लागेल.

मनुष्यस्वभावावर आपण श्रद्धा ठेवावी हें ठीक आहे. माझी तशी श्रद्धा आहे, म्हणूनच मी जगूं शकतो. परंतु त्यामुळें अंतीं सर्व शुभच आहे असें जरी असलें तरी व्यक्ति आणि राष्ट्र म्हणून म्हटले जाणारे समुदाय आजपर्यंत नष्ट झाले आहेत, ही ऐतिहासिक घटना डोळ्यांआड करतां येत नाहीं. राष्ट्रें पूर्वी नष्ट झालीं तीं आपल्या दुष्कृत्यांनीच याचा साक्षात् पुरावा म्हणजे रोम, बाबिलोन, ईजिप्त आणि इतर राष्ट्रें होत. युरोप आपल्या सूक्ष्म आणि शास्त्रीय बुद्धीच्या योगानें उघड असणारी गोष्ट ओळखून आपलें पुढें पडलेलें पाऊल मागें घेईल आणि नीतिभ्रष्ट करणाऱ्या कारखानदारींतून बाहेर पडण्याचा मार्ग शोधून काढील अशी आशा त्यानें दाखवावी. पाऊल मागें घेणें म्हणजे पूर्वीचा अगदीं साधेपणाच पत्करला पाहिजे असें नाहीं. परंतु ग्रामजीवनाला जास्त प्राधान्य आहे अशा प्रकारची पुनर्रचना मात्र करावी लागेल, आणि त्यांत आत्मिक बलाला प्राधान्य मिळून शरीरबलाला गौण स्थान राहील.

कांहीं थोड्या लोकांच्या हातांत संपत्ति आणि सत्ता याचें केंद्रीकरण होईल आणि बहुसंख्य लोकांची पिळवणूक करतां येईल अशाकरितां यंत्र-शक्तीची व्यवस्था लावणें हें सर्वथैव अयोग्य आहे असें मी मानतों. आजच्या काळांतील यंत्रशक्तीची बरीचशी संघटना ही अशाच प्रकारची आहे. यंत्राला एकांगी आणि पिळवणुकीच्या अवस्थेंतून काढून त्याला त्याचें योग्य स्वरूप प्राप्त करून देण्याचा संघटित प्रयत्न करणें हा चरख्याच्या चळवळीचा उद्देश आहे. म्हणून माझ्या योजनेमध्यें यंत्रसामग्री ताब्यांत असणारीं माणसें केवळ स्वतःपुरता अथवा स्वतःच्या राष्ट्रापुरता विचार करणार नाहीत, तर सबंध मानवजातीचा विचार करतील.

यंत्राचें एक विशिष्ट स्थान असून तें आतां कायम रहाणार आहे. परंतु आवश्यक असे मानवी श्रम काढून त्या जागीं यंत्राला येऊं देतां कामा नये. खेड्यांतील घरोघरचें यंत्र जो चरखा, त्यांत झालेल्या प्रत्येक सुधारणेचें मीं

स्वागत करीन; परंतु हस्तव्यवसाय काढून टाकून मोठ्या शक्तीवर चालणाऱ्या चातीचीं यंत्रें आणतांना त्याच वेळीं लाखों शेतकऱ्यांना त्यांच्या घरांत करतां येण्यासारखा दुसरा कांही उद्योग देण्याची तयारी नसेल, तर तो माझ्या दृष्टीनें गुन्हा आहे.

ज्या वेळी हिंदुस्थान हा इतर राष्ट्रांची पिळवणूक करूं लागेल – आणि हिंदुस्थानचें औद्योगीकरण झालें, कीं तसें होणें अपरिहार्य आहे – तर इतर राष्ट्रांचा तळतळाट त्याला पदरीं घ्यावा लागेल व जगाच्या दृष्टीनें हिंदुस्थान हे मोठे संकट होऊन बसेल. इतर राष्ट्रांना लुबाडण्यासाठीं हिंदुस्थानचें औद्योगीकरण करण्याचा विचार मी मनांत कां आणावा? आम्ही आमच्या देशांतील ३० कोटी बेकार जनतेला काम देऊं शकतों; परंतु इंग्लंडला त्याच्या देशांतील तीस लाख लोकांना तें देतां येत नाहीं व त्या देशातील अत्यंत बुद्धिमान् लोकांची देखील मति गुंग करून टाकणारी समस्या इंग्लंडपुढे आज निर्माण झाली आहे. ही विलक्षण परिस्थिति तुम्ही पहात नाहीं काय? आणि पाश्चात्य राष्ट्रांच्या दृष्टीनें जर औद्योगीकरणाचें भविष्य निराशामय असेल, तर हिंदुस्थानच्या दृष्टीनें तर तें अधिकच निराशामय नाहीं काय?

प्रचंड प्रमाणावरील उत्पादनांत गिऱ्हाइकांच्या खऱ्या गरजेकडे लक्षच दिलें जात नाहीं. प्रचंड प्रमाणावरील उत्पादन हें जर मुळांत सत्कर्म असतें, तर अनंतपटींनीं वाढत जाण्याचेंहि सामर्थ्य त्याच्यांत असतें. परंतु प्रचंड प्रमाणावरील उत्पादनाच्या कांहीं अंगभूत मर्यादा आहेत हें सहज दाखवून देता येण्यासारखे आहे. जर सर्वच देशांनीं अशा प्रकारच्या उत्पादन-पद्धतीचा अंगीकार केला, तर त्यांच्या मालाचा खप होण्याइतकी मोठी बाजारपेठच रहाणार नाहीं. आणि मग असें उत्पादन बंद पडण्याची वेळ केव्हां तरी येणारच.

प्रचंड प्रमाणावरील उत्पादनाचें खूळ हेंच जागतिक अरिष्टाचें मूळ आहे, अशी माझी खात्री असल्याचें मी ठामपणें सांगू शकतों. यंत्रांनीं मानव-समाजाच्या सर्व गरजा भागूं शकतील असें क्षणभर मानलें, तरी देखील त्यामुळें उत्पादन हें विशिष्ट क्षेत्रांतच केंद्रित होईल व त्यामुळें मालाची वाटणी नियमित करण्याचा पुनः द्राविडी प्राणायाम करावा लागणार. पण

तेंच जर वस्तूंची जेथें जेथें जरूर असेल त्या त्या ठिकाणीं त्याचें उत्पादन व वांटणी हीं दोन्ही घडून आलीं, तर वांटणीवर आपोआपच नियंत्रण पडेल आणि मग फसवणुकीला फारशी संधि रहाणार नाही, सट्टेबाजीला तर नाहीच नाही.

उत्पादन व खप ही दोन्ही जेव्हां एकाच क्षेत्रांत होऊं लागतात तेव्हां उत्पादन भरमसाट आणि वाटेल त्या किंमतींत वाढविण्याचा मोह नाहीसा होतो. आज आपल्या आर्थिक व्यवस्थेंतून निर्माण होणाऱ्या अनंत अडचणी व प्रश्न देखील मग नष्ट होतील......मूठभर लोकांचे खिसे अनैसर्गिक रीतीनें फुगणार नाहीत आणि विपुलता असूनहि विपन्नावस्था, अशी इतरांची स्थिति होणार नाही.

प्रचंड प्रमाणावरील उत्पादनाची कल्पना दृष्टीपुढें निःसंशय आहे. पण तें जबरदस्तीवर आधारलेलें उत्पादन नव्हे. शेवटीं चरख्याचा संदेश तरी दुसरा काय आहे ? तें प्रचंड प्रमाणावरील उत्पादनच आहे, मात्र तें लोकांच्या घरांत चाललेलें उत्पादन आहे. व्यक्तिगणिक होणाऱ्या उत्पादनाला लाखोंनी तुम्ही गुणलेंत, की प्रचंड प्रमाणावरील उत्पादन तुम्हांला मिळणार नाहीं काय ?

माझ्या योजनेमध्यें पैशाऐवजी श्रम हें चलनीं नाणें आहे. ज्या कोणा माणसाला आपले श्रम उपयोगांत आणतां येतात त्याला तें नाणें मिळतें, संपत्ति मिळते. तो आपल्या श्रमाचें रूपांतर कापडांत करतो. धान्यांत करतो, त्याला पॅरॅफिन तेल पाहिजे असेल आणि तें जर तो उत्पन्न करूं शकत नाही, तर आपलें वांट्याचें धान्य देऊन तो तें तेल घेतो. खुला, न्याय्य आणि समान संबंध ठेवून केलेला हा श्रमाचा विनिमय असल्यामुळें त्यांत चोरी नाही. 'ही तर वस्तुविनिमयाची जुनाट पद्धति पुन्हां आली' अशी हरकत तुम्ही घ्याल कदाचित्. परंतु सगळा आंतरराष्ट्रीय व्यापार त्याच तत्त्वावर आधारलेला नाहीं काय ?

जीं सार्वजनिक उपयोगी कामें शरीरश्रमानें करतां येण्यासारखी नसतील त्यांच्या बाबतीत मोठ्या यंत्रांचें साहाय्य घेतलेंच पाहिजे.

परंतु त्या सर्वांवर सरकारचा ताबा असेल आणि त्यांचा उपयोग केवळ जनतेच्या हितासाठींच केला जाईल. जीं यंत्रें अनेकांच्या जिवावर थोड्या लोकांना गब्बर करण्याच्या उद्देशानें किंवा उपयुक्त श्रम करणाऱ्या अनेकांना

विनाकारण काढून टाकण्याच्या उद्देशानें वापरली जातील, त्यांच्याबद्दल मला कसलीहि आस्था वाटणार नाही.

माझ्या कार्यावरील श्रद्धेमुळे मी टिकून राहिलो आहे. पण त्या श्रद्धेपुढें जणूं दंड थोपटून उभ्या राहिलेल्या इतर सर्व गोष्टींची धडगत नाही, या निष्ठेचीहि त्या श्रद्धेला जोड मिळाली आहे. हे यंत्रयुग माणसाला यंत्र बनविण्याच्या प्रयत्नात आहे, तर मी यंत्र बनलेल्या माणसाला फिरून त्याच्या मूळ अवस्थेला नेऊन ठेवण्याच्या प्रयत्नांत आहे, याची मला पुरती कल्पना आहे.

ज्या वेळी पूर्ण करावयाच्या कामाच्या मानानें कामगारांची संख्या अत्यंत थोडी असेल त्या वेळी यंत्रे उपयोगांत आणणें ठीक आहे; परंतु कामाला जरूर त्यापेक्षा कामगारांची संख्या मोठी असेल तेथें यंत्रें उपयोगांत आणणें हे अरिष्टच ठरेल. हिंदुस्थानांत तशी स्थिति आहे. आपल्या खेड्यापाड्यांत रहाणाऱ्या कोट्यवधि जनतेला फुरसद कशी मिळवून द्यावयाची हा आपल्या-पुढील प्रश्न नाही, तर त्यांच्या रिकाम्या वेळाचा उपयोग कसा करून घ्यावयाचा हा प्रश्न आहे; वर्षांतून सहा महिने कामाचे, तर तितकेच महिने त्याचे रिकामे जातात.

यंत्रयुगानें हे जे मिळविलें आहे, तें जेव्हां नाहीसें होईल तेव्हां हे आमचे हस्तव्यवसायच टिकून रहातील. जेव्हां सर्व प्रकारची पिळवणूक नाहीशी होईल तेव्हां सेवा व निढळाचे श्रमच मागे रहातील, अशी मला मनोमन खात्री आहे. ही माझी श्रद्धा मला टिकवून धरीत असल्यामुळेंच मी माझें कार्य चालू ठेवलें आहे......स्टीफन्सन् आणि कोलंबस यांच्यासारखी माणसें आपल्या कार्यावरील दुर्दमनीय निष्ठेमुळेच तग धरूं शकली. मी देखील माझ्या कार्यावरील श्रद्धेमुळेच टिकून राहिलो आहे.

कारखान्यामुळे कांही शेकडों लोकांना काम मिळत असते, तरी हजारों त्यामुळें बेकार होतात. मी तेलाच्या गिरणींतून टनावारी तेल काढीन कदाचित्, पण त्याचबरोबर हजारों तेल्यांना मी बेकार करून टाकतो. मी याला विनाशक शक्ति म्हणतों, पण लाखो लोकांनी केलेल्या श्रमामुळें जें उत्पादन होतें, त्याला विधायक व सर्वहितसाधक शक्ति म्हणतों. मोठ्या

शक्तीनें चालणाऱ्या यंत्रांच्या साहाय्यानें झालेले उत्पादन जरी राष्ट्रीय मालकीचें असलें, तरी देखील उपयुक्त ठरणार नाहीं.

पण लाखो लोकांचे श्रम वांचवून त्यांना आपल्या बौद्धिक विकासासाठीं जास्त फुरसद कां मिळवून देऊं नये, असें विचारण्यांत येतें. फुरसद ही एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच इष्ट व आवश्यक असते. मनुष्यानें स्वतःच्या निढळाचा घाम गाळून आपले अन्न मिळवावे असेच ईश्वराने त्याला निर्माण केलें. एकाद्या गारुड्याच्या पोतडींतल्या प्रमाणें जर उद्यां आपलें अन्न आणि इतर सर्व आपणांला लागणाऱ्या वस्तु 'छू' म्हणतांच निर्माण करण्याचें सामर्थ्य आपल्यांत आलें, तर काय होईल कोणास ठाऊक, अशी मला भीति वाटते.

यंत्रें ही सापाच्या बिळासारखीं आहेत. त्यांत एक साप असूं शकेल, शंभरहि असूं शकतील. यंत्रें आलीं कीं त्यांच्याबरोबर मोठमोठीं शहरें आलीं. मोठीं शहरें आलीं, कीं आगगाड्या आणि ट्रामगाड्या आल्याच आणि तेथेंच विजेचे दिवेहि दृष्टीस पडूं लागतात. सत्यवादी डॉक्टर लोक आपल्याला सांगतील, कीं जेथें कृत्रिम वाहतुकीचीं साधनें वाढलीं आहेत तेथील लोकांच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम झाला आहे. मला आठवतें, कीं युरोपमधील एका गांवांत ज्या वेळीं पैशाचा तुटवडा होता त्या वेळीं ट्रॅमचीं तिकिटें कमी खपलीं, वकील व डॉक्टर यांच्या कमाईत घट झाली आणि लोकांची प्रकृति सुधारली. यंत्रांच्या संबंधानें एकहि चांगली गोष्ट माझ्या डोळ्यांपुढें येत नाहीं.

हिंदुस्थानांतील सात लाख खेड्यांतून पसरलेल्या खेडुतांच्या रूपानें वावरणाऱ्या करोडो सजीव यंत्रांशी स्पर्धा करण्याला निर्जीव यंत्रें उभीं करतां कामा नयेत. यंत्रांचा योग्य उपयोग म्हणजे त्यानें मनुष्य-प्रयत्नाला हातभार लावला पाहिजे, ते हलके केले पाहिजेत. आज यंत्रांचा उपयोग करोडों स्त्री-पुरुषांच्या तोंडचा घांस काढून घेऊन आणि त्यांच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करून मूठभर लोकांच्या हातीं संपत्ति सांठविण्याकरितां अधिक अधिक होऊं लागला आहे.

# ही पिशाच-संस्कृति : : १७

आज युरोप हे ईश्वरत्व किंवा ख्रिस्ततत्त्व प्रकट करीत नसून पिशाचीपणा प्रकट करीत आहे, असें माझे ठाम मत आहे. आणि आपल्या मुखात ईश्वराचे नाव घेऊन जेव्हा पिशाच येतें, तेव्हां तर त्याचें यश सर्वात मोठें असतें. आज युरोप केवळ नाममात्र ख्रिश्चन आहे. वस्तुतः ते धनपूजकच बनले आहे.

पाश्चिमात्य देशांत चहूकडे रक्तपात, डावपेंच, आणि कपट प्रचंड प्रमाणावर अवलंबिले जात असतांनाहि सबंध मानवजात हळूहळू पण निश्चितपणें सत्ययुगाकडे चालली आहे, असा माझा विश्वास आहे.

जलद वाहतुकीची साधने अस्तित्वांत आलीं म्हणून जगांत कांही सुधारणा झाली काय ? या यंत्रांमुळे माणसाच्या आध्यात्मिक प्रगतीला कशी काय मदत होते ? शेवटी त्यांचा प्रगतीला अडथळाच होत नाहीं काय ? आणि माणसाच्या महत्त्वाकांक्षेला कांही मर्यादा आहे का ? एके काळी तासाला कांही थोडे मैल गतीनें आपले समाधान होत असे; आज तासांत शेंकडो मैल पालथे घालावेसे आपल्याला वाटते. एखाद्या दिवशी आपल्याला उडून सबंध आकाश ओलांडण्याची इच्छा होईल. शेवटी यांतून निष्पन्न काय होणार ? गोंधळच.

ही औद्योगिक संस्कृति म्हणजे एक रोग आहे. कारण ती सर्व बाजूंनीं पापमय आहे. घोषणांनी आणि गोड गोड वाक्यांनी आपण फसतां कामा नये. आगबोटी किंवा तारायंत्रे यांच्याशीं माझें भांडण नाही. कारखानदारीचा आणि तिने दर्शविलेल्या सर्व गोष्टींचा आधार नसतांना ती राहूं शकली तर राहोत बापडी. ती मिळालीं, की सर्व मिळालें असें कांहीं नाहीं. आगबोटी आणि तारायंत्रें यांच्यापायीं आपल्याला पिळवणूक सहन करावी लागूं नये. मानवजातीच्या शाश्वत कल्याणासाठी तीं अपरिहार्य आहेत असें मुळींच नाहीं. आपल्याला आतां वाफेचा व विजेचा उपयोग कळला आहे; वेळ येईल तेव्हां आणि कारखानदारी कशी टाळावी हें समजून आल्यानंतर आपल्याला त्यांचा उपयोग करता आला पाहिजे. म्हणून कांहीहि करून

कारखानदारीचा नाश कसा करावयाचा हा आपला विचाराचा विषय आहे. अंतर आणि काळ नष्ट करण्याचा, पाशवी क्षुधा वाढवून त्या तृप्त करण्यासाठी जगाचे कानेकोपरे धुंडाळण्याचा त्या पिसाट वासनेचा मला अंतःकरणापासून तिटकारा आहे. हें सर्व म्हणजे आधुनिक संस्कृति असें जर असेल – आणि ते तसें आहे असें मी समजतों आहे – तर मी तिला पिशाच-संस्कृति म्हणेन.

आगगाड्या किंवा रुग्णालयें नष्ट करणें माझें उद्दिष्ट नाही; मात्र तीं जरूर नसल्यामुळें आपोआप नष्ट झाली, तर मला तें स्वागतार्ह वाटेल यांत शंका नाही. आगगाड्या अथवा रुग्णालयें ही कांही शुद्ध आणि उच्च संस्कृतीचें गमक नव्हे, फार तर त्यांना आवश्यक अनिष्टें म्हणतां येईल. त्यांपैकीं कशानेंहि राष्ट्राचा नैतिक दर्जा रेसभरहि वाढत नाहीं. न्यायकोर्टे कायमचीं नष्ट करावींत हा उद्देश धरूनहि मी चाललेलों नाहीं. मात्र ती कमी कमी होत होत शेवटीं त्यांचा पूर्णपणें निकाल लागावा अशी मनापासून अपेक्षा बाळगण्याजोगी आहे. सर्व यंत्रांचा व गिरण्यांचा उच्छेद करण्याचा प्रयत्न, तर मी मुळींच चालविलेला नाही. मात्र त्यासाठीं लोकांची आजची जी साधेपणाची व त्याग करण्याची तयारी आहे, त्याहून अधिकाची जरूर आहे.

जे लोक आज आपल्या गरजा वाढविण्याच्या मागें पिसाटासारखे लागले आहेत आणि त्यामुळें आपण जगाच्या सत्तत्त्वांत, खऱ्या ज्ञानांत अधिक भर टाकीत आहों असें जे वृथाभिमानानें मानतात, त्यांना आपलें पाऊल मागें घेऊन 'आपण हें काय केलें' असें म्हणावयाला लागण्याची वेळ येणार आहे. संस्कृतींच्या लाटा आल्या आणि गेल्या, आपण आपल्या प्रगतीची कितीहि शेखी मिरविली, तरी मला पुन्हां पुन्हां असें विचारावेंसें वाटतें, कीं "या सगळ्यांतून आम्ही काय साधलें?" डार्विनचा समकालीन वॅलेस यानें देखील हेंच म्हटलें आहे. तो म्हणतो, कीं पन्नास वर्षांतील नामांकित शोधांनीं मानवसमाजाची नैतिक उंची एका इंचानेंहि वाढविलेली नाहीं. आणि टॉल्स्टॉयनें देखील हेंच सांगितलें आहे. आतां तुम्ही त्याला स्वप्नतरंगी म्हणत असलां, तर म्हणा वाटेल तर. येशूनें, बुद्धानें आणि महंमदानेंहि हेंच सांगितलें. पण त्यांचा धर्म आज त्यांच्याच देशांत अमान्य केला जाऊन खोटा पाडला जात आहे.

बायबलांतील गिरिप्रवचनांत जो अमृताचा झरा तुम्हांला दिलेला आहे त्याचे तुम्ही आकंठ पान अवश्य करा; पण मग तुम्हांला पश्चात्तापाची वृत्ति आपल्या अंगीं बाणवून घेतली पाहिजे. त्या प्रवचनांतील शिकवण आपणां प्रत्येकासाठीं म्हणून दिलेली होती. ईश्वर आणि धनतृष्णा या दोघाचीहि उपासना तुम्हांला करतां येणार नाहीं. कारुण्यपूर्ण आणि दयामय साक्षात् सहनशीलतेची मूर्तीच असा प्रभु धनतृष्णेला चार दिवस खेळ खेळूं देतो. पण मी तुम्हाला बजावून सांगतो, कीं धनतृष्णेच्या त्या आत्मविनाशी पण घातक आभासापासून दूर पळा.

पूर्वी ज्या वेळीं माणसांना एकमेकाशीं द्वंद्व युद्ध करावयाचें असे, त्या वेळीं ते परस्परांच्या शारीरिक बलाबलाची तुलना करीत; आता एकाद्या टेकडीवर तोफ ठेवून तिच्यामागे राहून काम करीत असलेला एकटा माणूस हजारों लोकांचे बळी घेऊं शकतो. ही काय संस्कृति म्हणावयाची? पूर्वी माणसें आपल्या मनाला येईल तितकाच वेळ आणि उघड्या हवेंत काम करीत. आता हजारो कामगार एकत्र येतात आणि चरितार्थासाठीं म्हणून कारखाने आणि खाणी याच्यामागच्या कोंदट जागीं राबत असतात. त्याची ही परिस्थिति पशूंपेक्षांहि वाईट आहे. त्यांना स्वतःचा जीव जोखमींत ठेवून अत्यंत धोक्याच्या व्यवसायात काम करणें भाग पडतें, आणि तें धनवंतासाठीं. ही संस्कृति अशी आहे, कीं आपण फक्त धीर धरला पाहिजे, कीं ती आपल्या आपण नाश पावेल.

मला वाढ हवी आहे, मला स्वयंनिर्णय पाहिजे आहे, मला स्वातंत्र्याची इच्छा आहे, परंतु हे सर्व मला आत्म्यासाठीं हवें आहे. पाषाणयुगांतून जग लोहयुगांत आलें ही प्रगति आहे किंवा काय याबद्दल मी साशंक आहें. पण मला त्याच्याशीं कर्तव्य नाहीं. आपली बुद्धि आणि आपल्या सर्व आंतरिक शक्ती सर्वस्वीं आत्म्याच्या विकासाकडे लाविल्या पाहिजेत.

यशाकडे नेणाऱ्या जवळच्या म्हणजे हिंसक मार्गावर माझा विश्वास नाहीं. योग्य हेतूबद्दल मला कितीहि सहानुभूति व गौरव वाटत असला, तरी अत्यंत उदात्त ध्येये साध्य करण्यासाठीं सुद्धां हिंसक मार्ग अवलंबिण्याला माझा तीव्र विरोध आहे. म्हणून हिंसावादी विचारसरणीच्या लोकांत आणि माझ्यांत कोठेहि खरोखर समान भूमिका नाही; परंतु माझें अहिंसेचें ब्रीद मला हिंसावादी व अराजक पंथाच्या लोकांशीहि संबंध ठेवण्यापासून परावृत्त करीत नाही. इतकेंच नव्हे, तर त्यांच्याबरोबर संबंध जोडण्यास तें मला भाग पाडतें. मात्र तो संबंध त्यांची मला जी चूक वाटते त्या चुकीपासून त्यांना परावृत्त करण्याच्याच हेतूने मी नेहमी ठेवीत असतों. कारण अनुभवाने माझी अशी खात्री झाली आहे, कीं शाश्वत कल्याण, असत्य आणि हिंसा यांच्यामधून कधींहि निघणार नाही. हा माझा विश्वास जरी एक बावळट भ्रम असला तरी तो मोह पाडणारा आहे हे कोणीहि कबूल करील.

मला हे कबूल केलें पाहिजे, कीं बोल्शेव्हिझमूचा संपूर्ण अर्थ अजूनपर्यंत माझ्या ध्यानात आलेला नाही. त्यासंबंधीची माझी जी काय माहिती आहे ती एवढीच, कीं खाजगी मालमत्तेची पद्धति नष्ट करणें हें बोल्शेव्हिझमूचें ध्येय आहे. याचाच अर्थ अपरिग्रहाचा नैतिक आदर्श आर्थिक क्षेत्रांत दाखल करणे असा आहे. आणि लोकांनीं आपण होऊन या आदर्शाचा अंगीकार केला अथवा त्यासाठीं शांततेच्या मार्गानें त्यांचें मन वळविण्यांत आलें, तर त्याच्याइतकी उत्तम गोष्ट दुसरी कोणतीहि नाहीं. परंतु माझ्या माहितीप्रमाणें बोल्शेव्हिझम् हिंसेचा अवलंब निषिद्ध मानीत नाहीं, इतकेंच नव्हे, तर खाजगी मालमत्ता हिसकावून घेऊन त्यावर सामुदायिक राज्यसंस्थेची मालकी स्थापन करण्याकरितां बळजोरीचा उपयोग करण्याला त्याची पूर्ण मुभा असते. हें खरें असेल, तर बोल्शेव्हिक राजवट आजच्या स्वरूपांत फार काळ टिकूं शकणार नाहीं असें मी बिनदिक्कत म्हणतों. कारण कोणतीहि चिरकाल टिकणारी गोष्ट अत्याचारावर आधारलेली कधींहि असूं शकत नाहीं, अशी माझी ठाम खात्री आहे. तें कसेंहि असो, एक गोष्ट निर्विवाद आहे ती ही, कीं बोल्शे-

व्हिझमच्या आदर्शामागें असंख्य स्त्री-पुरुषांचा अत्यंत शुद्ध स्वरूपाचा त्याग आहे. असंख्य स्त्री-पुरुषांनीं तत्प्रीत्यर्थ सर्वस्व अर्पण केलें आहे याविषयीं शंकाच नाहीं; आणि जो आदर्श लेनिनसारख्या महान् विभूतीच्या त्यागानें पुनित झाला तो व्यर्थ कसा जाईल? त्यांच्या त्यागाचें उदात्त उदाहरण सुवर्णाक्षरांत कोरलें जाईल आणि कालगतीबरोबर त्या त्यागाने तो आदर्श शुद्ध होत जाऊन अधिक लवकर साध्य होईल.

सरतेशेवटीं कम्युनिझम् (साम्यवाद) याचा तरी काय अर्थ होतो? त्याचा अर्थ वर्गविहीन समाज. ज्याच्यासाठीं धडपड करावी असें हें ध्येय आहे खरें. परंतु तें साध्य करण्यासाठी जेव्हां सत्तेचें साहाय्य घेतलें जातें, तेव्हां माझें त्याच्याशीं जमत नाहीं. जन्मानें आपण सर्वजण सारखे आहोत. परंतु आपण इतकीं शतके ईश्वराची इच्छा अमलांत येण्याला प्रतिबंध केला. असमानतेची, उच्चनीचपणाची कल्पना हें पाप आहे; परंतु दंडुक्याच्या जोरावर मानवी अंतः-करणांतून पाप काढून टाकण्यावर माझा विश्वास नाहीं. मानवी अंतःकरण जिंकून घेण्याच्या कामीं असें साधन उपयोगी पडत नाहीं.

जेथे कारखानदारीचे देव्हारे माजविण्यापर्यंत मजल गेली आहे अशा रशियाकडे जेव्हां मी बघतों, तेव्हां तेथील जीवन मला आकर्षक वाटत नाहीं.

बायबलाच्या भाषेत सांगावयाचें, तर 'मनुष्याला सबंध जगाचें राज्य मिळालें; परंतु त्याला त्याचा आत्मा गमवावा लागला, तर त्याचा उपयोग काय?' हेंच आधुनिक भाषेंत सांगावयाचें, तर स्वतःचे व्यक्तिमत्त्व गमावून यंत्राचा एक भाग होऊन बसणे हे मानवी प्रतिष्ठेला कमीपणा आणणारे आहे. प्रत्येक व्यक्तीनें समाजाचा जोमदार आणि पूर्ण विकसित असा घटक व्हावे, हें मला पाहिजे आहे.

रशियाच्या नमुन्याचा म्हणजे लोकांवर लादलेला कम्युनिझम् (साम्यवाद) हिंदुस्थानला तिटकारा आणणारा होईल. साम्यवाद जर कोणत्याहि प्रकारच्या हिंसेवांचून आला, तर त्याचे स्वागत होईल. कारण मग लोकांच्या वतीनें व लोकांकरितां याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याहि कारणासाठी कोणाच्याहि ताब्यांत मालमत्ता रहाणार नाहीं. क्रोडोपतींनीं आपले करोडों रुपये खुशाल आपल्याजवळ ठेवावेत, परंतु ते लोकांकरितां म्हणूनच त्यांच्या ताब्यांत

राहतील. ज्या वेळीं सरकारला सार्वजनिक कामासाठी जरूर लागेल, त्या वेळा सरकार त्या संपत्तीचा ताबा घेऊं शकेल.

भांडवलदार भांडवलाचा दुरुपयोग करतात असें आढळून आल्यामुळें कांहीं समाजवाद अस्तित्वांत आला नाहीं. मी पूर्वी म्हटल्याप्रमाणें समाजवाद, नव्हे, साम्यवाद देखील, ईशोपनिषदाच्या पहिल्या श्लोकांतच स्पष्टपणें सांगितला आहे. खरी गोष्ट अशी आहे, की ज्या वेळीं कांहीं समाजसेवकांचा हृदयपरिवर्तनावरील विश्वास उडाला त्या वेळीं ज्याला शास्त्रीय समाजवाद म्हणतात त्याचें तंत्र अस्तित्वांत आलें. शास्त्रीय समाजवाद्यांपुढे असलेला प्रश्न सोडविण्यांत मीहि गुंतलों आहे. तथापि हे खरें, की तो प्रश्न हाताळण्याची माझी पद्धति ही नेहमी फक्त निर्भेळ अहिंसेचीच असते.

खरा समाजवाद आपल्या पूर्वजांकडूनच आपल्याकडे चालत आलेला आहे. कारण त्यांची अशी शिकवण होती, की 'सबहि भूमि गोपालकी.' मग हद्द कोठें आणि कशी बांधणार? हद्द माणूसच घालतो आणि म्हणून तोच ती काढून टाकू शकतो. गोपाल याचा शब्दशः अर्थ गुराखी; ईश्वर असाहि त्याचा अर्थ आहे. आजच्या भाषेत त्याचा अर्थ राज्यसंस्था म्हणजेच जनता असा आहे. आज जमीन लोकांच्या मालकीची नाही हे खरें आहे; परंतु तो दोष त्या शिकवणुकीचा नाहीं. त्या शिकवणुकीप्रमाणें आपण वागलो नाहीं ही आपली चूक. कोणत्याहि राष्ट्राला– यांत रशियाहि येतो– जितका शक्य होईल तितका या शिकवणुकीचा आचार करतां येईल; आणि तोहि हिंसेचा अवलंब न करतां करतां येईल याविषयीं मला शंका नाहीं. जबरदस्तीनें मालमत्ता काढून घेण्याच्या ऐवजी दुसरा सर्वात प्रभावी मार्ग म्हटला म्हणजे चरख्याचा होय. अर्थात् त्याचे सर्व सहचारी भाव गृहीत आहेत. जमीन आणि सर्व मालमत्ता, जो त्यांत काम करतो त्याच्या मालकीची आहे. दुर्दैवानें या साध्या गोष्टीचें कामगारांना ज्ञान नाही किंवा त्यांना तें मिळूं दिले जात नाही.

## अर्थशास्त्र आणि नीतिशास्त्र

अर्थशास्त्र आणि नीतिशास्त्र यांत सूक्ष्म अथवा स्थूल असा कसलाच फरक

मी करीत नाही, हे मला कबूल केले पाहिजे. व्यक्तीच्या अथवा राष्ट्राच्या नैतिक स्वास्थ्यावर घाला घालणारें अर्थशास्त्र हे अनैतिक आणि म्हणून पापमय होय. या दृष्टीने जे अर्थशास्त्र एका देशाला दुसऱ्या देशाची लूट करण्याला परवानगी देते, ते अनैतिक होय. कमी मजुरी देऊन तयार झालेल्या वस्तू खरेदी करणे व वापरणे हें पाप आहे.

नैतिक आणि भावनात्मक गोष्टीकडे दुर्लक्ष करणारे अर्थशास्त्र हे मेणाच्या बाहुलीसारखे आहे. मेणाची बाहुली दिसावयाला जिवंत प्राण्यासारखी दिसते, पण जिवंतपणाची सजीवता तिच्यात नसते. आणिबाणीच्या प्रत्येक प्रसंगीं हे नवे घडविलेले आर्थिक सिद्धान्त व्यवहारांत कुचकामी ठरले आहेत. आणि ज्या व्यक्ती किंवा जी राष्ट्रं आपले मार्गदर्शक सिद्धान्त म्हणून तें अर्थशास्त्र मानतात त्याचा नाश झाल्यावाचून रहाणार नाही.

नैतिक मूल्यांकडे दुर्लक्ष करणारे किंवा ती लाथाडणारे अर्थशास्त्र मिथ्या होय. अर्थशास्त्राच्या क्षेत्रात अहिंसेचा कायदा लागू करणे याचाच अर्थ आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियमन करताना नीतिमूल्याचा एक आवश्यक भाग म्हणून अवलंब करणे होय.

आपल्याला आपल्या राष्ट्राची शक्ति संघटित करावयाची आहे. ही गोष्ट केवळ उत्पादनाचे उत्तमोत्तम मार्ग स्वीकारून साध्य होणार नाही; तर त्यासाठी उत्पादन आणि वाटणी या दोहोंच्याहि सर्वोत्तम मार्गाचे अवलंबन केले पाहिजे.

समान विभागणी हा माझा आदर्श आहे; परंतु तो अस्तित्वात येणे मला शक्य दिसत नाही. म्हणून मी न्याय्य विभागणीसाठी झटत आहे.

माझ्या मतें हिंदुस्थानची, किंवा तसें म्हटले तर जगाचीहि आर्थिक घटना अशी असावी, की त्यांत कोणालाहि अन्न-वस्त्राची वाण पडूं नये. किंवा निराळ्या शब्दात सांगावयाचें, तर प्रत्येकाला अन्न-वस्त्राची गरज भागण्याइतके काम मिळणे शक्य झालें पाहिजे. आणि जीवनाच्या प्राथमिक गरजा भागविणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनाची साधनें जनतेच्या ताब्यांत राहिली, तरच हे ध्येय सर्वत्र साध्य होऊं शकेल. ईश्वरनिर्मित हवा आणि पाणी जसें सर्वांना खुलें असतें किंवा असलें पाहिजे, त्याचप्रमाणे ही उत्पादन-साधनें देखील सर्वांना खुली असली पाहिजेत. दुसऱ्यांनी त्यांना व्यापाराचें

साधन बनवून लोकांची पिळवणूक करावी अशी परिस्थिति असूं नये. कोणत्याहि देशानें, राष्ट्रानें अथवा गटानें असा मक्ता घेऊन बसणें अन्याय्य होय. केवळ या दुर्दैवी देशांतच नव्हे, तर जगाच्या इतर भागांतहि आज जी कंगाली आपण पहात आहोंत तिचें कारण या साध्या तत्त्वाची होणारी हेळसांड हेंच आहे.

# स्वातंत्र्याचा सिद्धान्त : : २१

आपल्या स्वतःच्या दुर्बळपणाव्यतिरिक्त कोणीहि मनुष्य आपलें स्वातंत्र्य गमावीत नाहीं, अशी माझी पक्की खात्री आहे. कोणाहि गांजणाऱ्याला गांजलेल्याचें सहकार्य मिळाल्याखेरीज गांजणुकींत आजवर यश मिळालेलें नाही. मग तें त्याचें सहकार्य कदाचित् सक्तीचेंहि असूं शकेल. पुष्कळ वेळां तें सक्तीचेंच असतें. बहुतेक लोक जुलमाच्या प्रतिकाराचे परिणाम भोगण्यास तयार होण्यापेक्षां जुलूम करणाऱ्याच्या इच्छेपुढें मान वांकविण्याचें पसंत करतात. म्हणूनच दहशत दाखविणें हा जुलूम करणाऱ्यांचा ठराविक उपाय होऊन बसला आहे. परंतु जुलूम करणाऱ्याची इच्छा ज्याच्यावर तो जुलूम करतो त्याच्यावर लादण्यांत दहशतवादाला यश आलेलें नाहीं, अशींहि उदाहरणें इतिहासांत आहेत.

अत्यंत बेबंद असें सरकार देखील प्रजेच्या संमतीशिवाय टिकूं शकणार नाहीं; पुष्कळ वेळां ही संमति त्या बेबंद सरकारने जुलमानें मिळविलेली असते. ज्या क्षणी प्रजा जुलमी शक्तीविषयीची भीति सोडून देईल त्या क्षणापासून त्या जुलमी सत्तेचा लोप होईल.

आपल्याला जर स्वतंत्र स्त्री-पुरुष म्हणून जगतां येत नसेल, तर आपण मरण पत्करणें बरें.

हळूहळू स्वातंत्र्य मिळणें अशी कांहीं वस्तूच नाही. स्वतंत्र होणें हें जन्म होण्यासारखें आहे. आपण जोंपर्यंत पूर्णपणें स्वतंत्र झालों नाहीं, तोंपर्यंत आपण गुलामच आहोंत. जन्म होतो तो एका क्षणांतच होत असतो.

स्वाभिमानी माणसाला सोन्याच्या बेड्या लोखंडी बेड्याइतक्याच चीड आणतात. वेदना आहे ती बेड्यांत आहे; धातूंत नाही.

ज्याप्रमाणें प्रत्येक देश खाणे, पिणे व श्वासोच्छ्वास करणें याला लायक आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक राष्ट्र आपला कारभार आपण करण्याला लायक आहे: मग तो कारभार कितीहि अव्यवस्थित असो.

स्वतःच्या पारतंत्र्याबद्दल माणसानें स्वतःलाच जबाबदार धरले पाहिजे. स्वतंत्र होण्याची इच्छा होताच त्याला स्वतंत्र होतां येते.

## लोकशाहीचें सारभूत तत्त्व

शिस्तबद्ध आणि बुद्धियुक्त लोकशाही ही जगांत सर्वोत्कृष्ट होय. पूर्वग्रह दूषित, अज्ञानयुक्त, आणि भोळसट समजुतींवर आधारलेल्या लोकशाहीचा शेवट अदाधुंदींत होऊन ती कदाचित् आपली आपणच नष्ट होऊन जाईल.

आपली इच्छा अंमलात आणण्याकरिता लोकशाहीने शरीरबळाचा उपयोग करणे हे लोकशाहीसंबंधीच्या माझ्या कल्पनेशी सर्वस्वी विसंगत आहे.

जनसमुदायाला शिकवून तयार करण्याइतकी सोपी गोष्ट दुसरी कोणतीच नाही. कारण इतकेंच, कीं त्याला मन किंवा पूर्वसंकल्प मुळींच असत नाही. भावनावेशात त्याच्या हातून कृति घडते. त्याला पश्चात्तापहि तत्काळ होतो. लोकशाही तयार करण्यासाठींच मी असहकार उपयोगांत आणीत आहे.

आपण जनसमुदायाला शिकवून तयार केले पाहिजे. त्यांचे हृदय सोन्यासारखे आहे, त्याना देशाविषयीं तळमळ वाटते, आपल्याला कोणी शिकवावे आणि पुढे न्यावे अशी त्याना इच्छा आहे. पण त्यासाठीं कांही बुद्धिमान् कळकळीचे कार्यकर्ते पाहिजेत. कीं मग सबंध राष्ट्राने ज्ञानपूर्वक वागावे इतकी संघटना करता येईल आणि गोमगाल्याच्या अंमलांतून लोकशाहीला रूप आणता येईल.

सरकारचा अथवा लोकांचा दहशतवाद पसरलेला असतांना लोकशाहीची वृत्ति प्रस्थापित करणें शक्य नाही. कांही बाबतीत तर सरकारी दहशतवादापेक्षां लोकांचा दहशतवाद हा लोकशाहीची वृत्ति वाढण्याला

अधिक मारक होतो. कारण सरकारी दहशतवादामुळें लोकशाहीची वृत्ति बळकट होते, तर लोकांच्या दहशतवादानें ती मारलीच जाते.

स्वतःला जनतेचे प्रतिनिधी म्हणविणाऱ्या कांही थोड्या लोकांनी जरी जनतेच्या भावना, आशा-आकांक्षाबरोबर प्रदर्शित केल्या, तरी तें खऱ्या लोकशाहीशीं विसंगत नाहीं. जुलमी उपायांनी लोकशाही अस्तित्वांत आणणें शक्य नाही असें मी मानतों. लोकशाहीची वृत्ति ही बाहेरून लादतां येणार नाहीं; आंतूनच ती निर्माण झाली पाहिजे.

लोकशाहीचें अगदी सारभूत तत्त्व हे आहे, कीं प्रत्येक व्यक्ति ही राष्ट्र ज्या वेगवेगळ्या हितसंबंधांचें बनलें आहे त्या सर्वांचें प्रतिनिधित्व करते. विशिष्ट हितसंबंधांचे विशेष प्रतिनिधित्व लोकशाहीत वगळले जाते किंवा जावें असें नाहीं हें खरें. पण असें प्रतिनिधित्व हीच कांही लोकशाहीची कसोटी नव्हे, ती तिच्या अपूर्णत्वाचीच निशाणी आहे.

ज्या वेळी राजकीय सत्ता लोकांच्या हातांत येते, त्या वेळीं लोकांच्या स्वातंत्र्यांत अडथळा कमींत कमी होतो. निराळ्या शब्दांत सांगावयाचें, तर जें राष्ट्र असा सरकारचा अडथळा न येतां आपला कारभार सुरळितपणें व कार्यक्षम रीतीनें चालवितें, तेंच खरें लोकशाहीचें राष्ट्र होय. ज्या ठिकाणीं अशा तऱ्हेची परिस्थिति नसेल, तेथील सरकारचें स्वरूप केवळ नावाला लोकशाहीचें म्हणावयाचें.

लोकशाही आणि हिंसा ही कधींच एकत्र नांदूं शकत नाहींत. आज जीं राष्ट्रें नाममात्र लोकशाही स्वरूपाची आहेत, त्यांना उघड उघड एकतंत्री तरी बनलें पाहिजे, किंवा त्याना जर खरोखर लोकशाहीप्रधान व्हावयाचें असेल, तर त्यांनी निर्भयपणें अहिंसेचा अंगीकार तरी केला पाहिजे. अहिंसेचा अवलंब फक्त व्यक्तींनाच करतां येतो, व्यक्तींच्या मिळून बनलेल्या राष्ट्रांना तो कधीं करतां येणार नाहीं असें म्हणणें हा सत्यापलाप होय.

मानवसमाजांतील गरीबांतल्या गरीबांशीं संपूर्णपणें समरस होणें, ते ज्या हालांत दिवस काढतात तसेच काढण्याची तीव्र तळमळ बाळगणें आणि तिला अनुसरून त्यांच्या पातळीवर जाण्याचा यावत्शक्य बुद्धिपुरस्सर प्रयत्न करणें, यामुळें जर एकाद्याला लोकसत्तावादी म्हणतां येत असेल, तर मी लोकसत्तावादी आहें असें म्हणतों.

खरा लोकसत्तावादी तोच, की जो शुद्ध अहिंसक मार्गांनी स्वतःच्या स्वातंत्र्याचें आणि म्हणून स्वदेशाच्या आणि शेवटीं सबंध मानवजातीच्या स्वातंत्र्याचे रक्षण करतो.

## बहुमत प्रमाण

जेथे विवेकबुद्धीचे काम आहे अशा बाबतीत 'बहुमत प्रमाण' या कायद्याला स्थान नाही.

आदेशाप्रमाणे चालण्याच्या सिद्धान्ताची हास्यास्पद पराकाष्ठा करून बहुमतांनी केलेल्या ठरावांचे आपण गुलाम बनता कामा नये. तसें करणें म्हणजे पाशवी शक्तीचे अधिक जालीम स्वरूपांत पुनरुज्जीवन करणे आहे. अल्पसंख्याकांच्या हक्कांबद्दल आस्था बाळगावयाची असेल, तर बहुसंख्याकांनीं त्यांच्या मताबद्दल आणि वर्तनाबद्दल आदर व सहिष्णुता दाखविली पाहिजे... अल्पसंख्याकांचें म्हणणें नीटपणें ऐकून घेतलें जात आहे व त्यांचा अपमान केला जात नाही, याकडे लक्ष देणे हें बहुसंख्याकांचे कर्तव्य ठरते. व्यक्तींना आपला निर्णय बहुसंख्याकांपुढे सोडून देणे भाग पडत असेल, तर त्या स्वराज्याला कांही अर्थच उरणार नाही.

बहुमत प्रमाण या नियमाची व्याप्ति मर्यादित आहे; म्हणजे तपशिलाच्या बाबतीत बहुमताच्या निर्णयाला मान दिला पाहिजे. परंतु बहुमताचे निर्णय कांहीहि असले, तरी त्याला अनुकूल होणे ही गुलामगिरीच आहे. लोकशाही म्हणजे लोक ज्यांत मेंढरांप्रमाणे वागतात अशी अवस्था नव्हे. लोकशाही-मध्ये व्यक्तीच्या मतस्वातंत्र्याचें आणि आचारस्वातंत्र्याचें कटाक्षानें रक्षण केले जाते. म्हणून अल्पमतवाल्यांना बहुमतवाल्यांहून निराळ्या तऱ्हेनें वागण्याचा संपूर्ण हक्क आहे असें मी मानतो.

# राष्ट्रवाद वि. आंतरराष्ट्रवाद :: ३०

मला माझ्या देशाचें स्वातंत्र्य पाहिजे आहे, तें माझ्या स्वतंत्र देशापासून इतर देशांना कांहीं शिकतां यावें, माझ्या देशाची साधनसंपत्ति मानवजातीच्या कल्याणासाठी उपयोगांत आणली जावी, याकरितां पाहिजे आहे.

देशभक्तीचा धर्म आज ज्याप्रमाणें आपणांला असें शिकवितो, कीं व्यक्तीनें कुटुंबासाठी मरावें, कुटुंबानें गांवासाठी, गांवानें जिल्ह्यासाठीं, जिल्ह्याने प्रांतासाठी व प्रांतानें आपल्या देशासाठी नष्ट व्हावें, त्याचप्रमाणें देशाला जगाच्या हितासाठी जरूर तर मरतां यावें याकरितां देशाला स्वतंत्र झालें पाहिजे. म्हणून राष्ट्रवादाविषयींचें माझें प्रेम किंवा कल्पना अशी आहे, कीं माझा देश स्वतंत्र व्हावा आणि मानवजात टिकावी यासाठी जरूर तर त्याला प्राणार्पणहि करतां यावें. राष्ट्रवादाच्या माझ्या कल्पनेंत वंशद्वेषाला स्थान नाहीं. आमचा राष्ट्रवाद अशा प्रकारचा असूं दे.

माझ्या दृष्टीने देशभक्ति आणि मानवभक्ति एकच आहेत. मी देशभक्त आहें, कारण मी मनुष्य आहें आणि माझ्यांत माणुसकी आहे. माझी देशभक्ति माझ्या देशापुरती नाहीं. हिंदुस्थानची सेवा व्हावी म्हणून मी इंग्लंडला किंवा जर्मनीला दुखापत करणार नाही. देशभक्ताचा धर्म गृहस्थधर्माहून वेगळा नाहीं. आणि देशभक्त हा जर अर्धवट मानवधर्मी असला, तर त्याच्या देशभक्तींत तेवढा उणेपणा समजावा. व्यक्तिधर्म व राजकीय धर्म यांमध्यें कसलाहि विरोध असत नाहीं.

हिंदुस्थाननें जर हिंसा हें आपलें ब्रीद ठरविलें आणि त्या वेळी जर मी जिवंत असलों, तर हिंदुस्थानांत रहाण्याची मी पर्वा करणार नाहीं. मग त्याच्याबद्दल माझ्या मनांत कसलाहि अभिमान रहाणार नाही. माझा देशाभिमान माझ्या धर्माला साहाय्यक असा आहे. तान्हें मूल आईच्या स्तनाला बिलगतें तसा मी हिंदमातेला बिलगतों; कारण ती मला पाहिजे असलेलें आध्यात्मिक पोषण देते, हें मला जाणवतें. माझ्या अत्युच्च आकांक्षांना अनुकूल असें हिंदुस्थानचें वातावरण आहे. ज्या वेळीं माझी ही श्रद्धा नाहींशी होईल,

त्या वेळीं कसलाहि आधार मिळण्याची आशा समूळ खुंटलेल्या एखाद्या अनाथ बालकाप्रमाणें मला पोरकें वाटूं लागेल.

मला ईश्वराचें प्रत्यक्ष दर्शन घ्यावयाचें आहे. मी जाणत असलेला ईश्वर म्हणजे सत्य होय. ईश्वराला जाणण्याचें एकमेव खात्रीचे साधन माझ्या दृष्टीनें अहिंसा, प्रेम हेच आहे. मी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं जिवंत राहिलों आहे, आणि त्यासाठीच मी मरेन. कारण हिंदुस्थानचें स्वातंत्र्य हा सत्याचाच एक भाग आहे. फक्त स्वतंत्र हिंदुस्थानच खऱ्या ईश्वराची उपासना करूं शकेल. मी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं झटत आहे याचे कारण असें, की मी हिंदुस्थानांत जन्माला आलों असल्यानें आणि हिंदी संस्कृति माझ्यांत उतरली असल्यामुळे मी त्याची सेवा करण्यास अगदीं योग्य असून माझ्या सेवेवर पहिला हक्क त्याचा आहे, अशी माझ्या स्वदेशी-धर्माची मला शिकवण आहे.

सर्व जगाचें हित व्हावें यासाठीं मला हिंदुस्थानचा उदय हवा आहे. दुसऱ्या राष्ट्रांच्या माना मुरगाळून हिंदुस्थानचा उत्कर्ष व्हावा अशी माझी इच्छा नाहीं. म्हणून हिंदुस्थान जर शक्तिशाली व समर्थ असेल, तर तो जगाला आपलें बहुमोल कलाकौशल्य आणि आरोग्यदायी मसाल्याचे पदार्थ पाठवील; परंतु अफूच्या किंवा अशाच इतर मादक द्रव्यांच्या व्यापारानें त्याला पुष्कळ धनलाभ होण्यासारखा असला, तरी तीं द्रव्यें बाहेर पाठविण्यास तो नकारच देईल.

राष्ट्रवादी नसतांना आंतरराष्ट्रवादी बनणें अशक्य आहे. राष्ट्रवाद पुरतेपणीं रूढ होतो तेव्हां, म्हणजेच निरनिराळ्या देशांतील लोक आपापल्या देशांत संघटित होऊन एकजुटीनें काम करण्याला समर्थ होतात तेव्हांच, आंतर-राष्ट्रवादाची शक्यता निर्माण होते. राष्ट्रवाद अनिष्ट नाहीं, अनिष्ट आहे तो आजच्या राष्ट्रांचा हानिकारक बनलेला संकुचितपणा, स्वार्थीपणा आणि दुसऱ्याला सामावून न घेण्याची वृत्ति ही होय. प्रत्येक राष्ट्राला दुसऱ्याच्या जिवावर स्वतःचा फायदा करून घ्यावयाचा आहे, व दुसऱ्याचा घात करून स्वतःचा उत्कर्ष साधावयाचा आहे. हिंदी राष्ट्रवादानें यापेक्षां निराळा मार्ग काढला आहे. त्याला संघटित व्हावयाचें आहे किंवा स्वतःचा पूर्ण आविष्कार करा-वयाचा आहे. जगांतील मानवसमाजाचें हित आणि सेवा करतां यावी म्हणून

ईश्वराने हिंदी लोकांच्या सुखदु:खांशी मला निगडित केले असल्यामुळे मी जर त्यांची सेवा करण्यास चुकेन, तर मी ईश्वराचा द्रोह केल्यासारखे होईल. माझ्या देशबांधवांची सेवा कशी करावयाची हे जर मला समजले नाही, तर सबंध मानवजातीच्या उपयोगी कसे पडावें ते मला कधींच समजणार नाही. आणि माझ्या देशाची सेवा करीत असतांना जोपर्यंत मी इतर राष्ट्रांना इजा करीत नाहीं, तोपर्यंत माझा मार्ग चुकणे सहसा शक्य नाही. मी हिंदुस्थानपुढे फक्त एक नवे आणि बिनतोड असें शस्त्र ठेवले आहे; किंवा असेंहि म्हणतां येईल, कीं एक प्राचीन आणि अनुभव घेतले गेलेले शस्त्र व्यापक प्रमाणावर कसें लागू करावयाचे तेवढे मी दाखवून दिले आहे. मी एकट्यानें त्या शस्त्राचा उपयोग करून हिंदुस्थानचें काम भागणार नाही. मी स्वत:पुरता त्याचा उपयोग करूं शकतों, केलेला आहे, आणि त्यामुळे मला स्वतंत्र झाल्यासारखें वाटतें. इतरांनीहि तसेंच केले आहे व त्यांनाहि तसाच अनुभव आला आहे. जर सबंध राष्ट्रानें या शस्त्राचा अवलंब केला, तर ते राष्ट्र देखील स्वतंत्र होईल.

मला सबंध जगाच्या दृष्टीनें अवश्य विचार करावयाचा आहे. माझ्या देशप्रेमांत सबंध मानवजातीचें कल्याण अंतर्भूत असतें. म्हणून मी करीत असलेल्या हिंदुस्थानच्या सेवेंतहि मानवजातीच्या सेवेचा अंतर्भाव होतो. ... हिंदुस्थानच्या दास्यविमोचनाची सारी योजना ही आंतरिक शक्तीच्या विकासावर आधारलेली आहे. तो आत्मशुद्धीचा कार्यक्रम आहे. म्हणून पाश्चात्य देशांतील लोकांना या चळवळीच्या अंतर्मुखतेचा अभ्यास करण्याकरिता स्वतंत्र तज्ज्ञ माणसें पाठवून देऊन या चळवळीला जास्तीत जास्त मदत करतां येईल. त्या तज्ज्ञांनी हिंदुस्थानांत खुल्या मनानें आणि सत्याच्या साधकाला साजेशा विनीत भावाने यावें.

लिहिलेल्या अथवा बोललेल्या शब्दाच्या सामर्थ्यापेक्षां माझा विचारसामर्थ्यावर जास्त विश्वास आहे. आणि मी ज्या चळवळीचें प्रतिनिधित्व करूं पहात आहे, तिच्यात जर काही वीर्य असेल आणि तिला ईश्वराचा आशीर्वाद असेल, तर जगाच्या निरनिराळ्या भागांत मी शरीरानें गेलो नाही, तरी देखील ती चळवळ सबंध जग व्यापून टाकील.

माझ्या विधानामुळे माझ्या पदरीं अहंकाराचा दोष येणार नसेल आणि

नम्रतेला बाध येणार नसेल, तर मी असें सांगूं इच्छितों, कीं माझा संदेश आणि माझे मार्ग हे खरोखर मूलतः सबंध जगासाठीं आहेत. या संदेशाला पश्चिमेकडील बऱ्याच स्त्री-पुरुषांच्या हृदयांतून यापूर्वीच विलक्षण साथ मिळूं लागली आहे आणि अशा स्त्री-पुरुषांची संख्या रोज वाढत आहे, हें समजून मला अतिशय समाधान वाटतें.

माझ्या मर्यादांची मला खेदपूर्ण जाणीव आहे. त्या मर्यादा असूनहि कां कोण जाणे, पण मला असें वाटतें, कीं मी माझा प्रयोग छोट्याशा भागापुरताच मर्यादित केला पाहिजे. एका भागापुरतें जें सिद्ध झालें तेंच संपूर्ण क्षेत्रांतहि सिद्ध होण्याचा संभव आहे. सबंध जगाच्या साहाय्याची मला आस लागून राहिली आहे. तें साहाय्य येत असल्याचें मला दिसत आहे. परंतु सगळी घाण धुऊन नेऊन ताजेतवानें करणाऱ्या महापुराच्या लोंढ्यासारखें तें साहाय्य प्रचंड प्रमाणांत येण्यापूर्वीच आपली पात्रता वाढविली पाहिजे, हें मी जाणतो.

केवळ हिंदुस्थानांतील मानवसमाजांत बंधुभाव निर्माण करणें एवढेंच माझें कार्य नाहीं. आज माझा जवळजवळ सगळा वेळ आणि सगळें आयुष्य हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं खर्च होत आहे, यांत शंका नाहीं. तेंच केवळ माझें कार्य नाहीं. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या द्वारा सबंध मानवजातींत बंधुभाव निर्माण करण्याचें कार्य साधावयाचें व पुढें चालवावयाचें अशी मी आशा बाळगली आहे. माझी देशभक्ति या देशापुरतीच नाहीं. ती सर्वांना व्यापणारी आहे. इतर राष्ट्रांतील लोकांना पीडा देऊन किंवा त्यांची लूट करून स्वतः वरचढ होऊं पहाणाऱ्या देशभक्तीचा धिक्कार करणें मला योग्य वाटतें. वरचढ होऊं पहाणाऱ्या जगांतील मानवजातीच्या अत्यंत व्यापक कल्याणाशीं सदैव व अगदीं निरपवादपणें जर माझी देशभक्तीची कल्पना सुसंगत नसेल, तर ती तुच्छ आहे. एवढेंच नव्हे, तर माझा धर्म आणि त्यांतूनच उदित झालेली माझी देशभक्ति सबंध जीवमात्राला व्यापून टाकणारी आहे. मला केवळ मानव म्हटल्या जाणाऱ्या प्राण्यांशीच नव्हे, तर सबंध जीवमात्रांशीं जमिनीवर सरपटणाऱ्या जंतूंशी सुद्धां बंधुभाव प्रस्थापित करावयाचा आहे, एकरूप व्हावयाचें आहे. सरपटणाऱ्या जंतूंशी सुद्धां मी म्हणतों तेव्हां तुम्हांला धक्का बसेल कदाचित्; पण मी तुम्हांला सांगतों, की एकाच ईश्वरापासून आमची उत्पत्ति झाली आहे असें आपण म्हणतों, अर्थात् तसें

असल्यामुळें कोणत्याहि स्वरूपांतील दिसणारा जीव हा मुळांत एकच असला पाहिजे.

मी हिंदुस्थानचा एक नम्र सेवक असून हिदुस्थानची सेवा करण्याचा यत्न करीत असतांना सर्व मानवजातीचीहि मी सेवा करीत असतों.... जवळ-जवळ पन्नास वर्षांच्या सार्वजनिक जीवनानंतर आज मीं असें म्हणूं शकतों, कीं स्वराष्ट्राची सेवा ही जगाच्या सेवेशीं विसंगत असत नाही. या तत्त्वावरील माझा विश्वास वाढला आहे. तें उत्तम तत्त्व आहे. त्याचा स्वीकार केल्यानेंच जगाच्या परिस्थितीत स्वस्थपणा येईल आणि जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांत परस्परांत असणारा मत्सरभाव नष्ट होईल.

आपली पिळवणूक जशी आम्ही कोणालाहि करूं देणार नाही, त्याचप्रमाणें कोणाचीहि पिळवणूक आम्ही करणार नाही, असे असल्यामुळे आमचा राष्ट्रवाद इतर राष्ट्रांना दहशत दाखवणारा होणें शक्य नाही. स्वराज्य आल्यानें आम्ही सबंध जगाची सेवा करूं.

## स्वावलंबन कीं परस्परावलंबन ?

जगांतील राज्यसंस्थांचें ध्येय स्वतंत्रपणें एकाकी रहाणे हे नसून स्वेच्छेनें परस्परावलंबी बनणे हे आहे.

आज जगांतील शहाण्या माणसांची इच्छा परस्परांशी झगडत रहाणारीं अशी सर्वस्वी निरवलंबी राज्यें असावीत अशी नाहीं. तर मित्रत्वानें परस्परां-वर अवलंबून असणाऱ्या राज्यांचें एक संघराज्य व्हावें अशी आहे. ही घटना पूर्णपणें अस्तिवांत येणें कदाचित् फार लांबच्या कालाची गोष्ट असेल. याहूनहि कांही फार भव्य माझ्या देशाला साधावयाचें आहे असें मी म्हणत नाही. तरी निरवलंबी रहाण्यापेक्षां जगांतील सर्व राष्ट्रांच्या परस्परावलंबनाकरितां आम्ही अधिक तयार आहोंत हें व्यक्त करण्यांत कांही फार मोठें भव्य वा असंभाव्य असें मला वाटत नाहीं. आम्ही कोणावरहि अवलंबून नाहीं असें अट्टाहासानें न सांगतां सर्वस्वीं निरवलंबी होण्याची ताकद आमच्यांत असली पाहिजे असें मी इच्छितों. साम्राज्यांत राहून पूर्ण समानता हें हिंदुस्थान-विषयींचें आपलें अंतिम साध्य असल्याचें ब्रिटन जाहीर करीत आहे, पण

मी जी कोणती योजना आंखीन ती सख्यत्वाची असेल. सख्यत्वाविरहित निरवलंबीपणाची असणार नाहीं.

स्वयंपूर्णतेइतकेंच परस्परावलंबन हे देखील माणसाचें ध्येय असते, असलें पाहिजे. मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. समाजाशी परस्पर संबंध राखल्याखेरीज त्याला विश्वाशी असलेल्या त्याच्या एकरूपतेची अनुभूति होणार नाहीं, अथवा आपला अहंभाव दडपून टाकतां येणार नाही. समाजांत परस्परावलंबन असल्यामुळे त्याला आपल्या निष्ठेची कसोटी पहाता येते आणि वास्तवतेच्या निकषावर आपली लायकी सिद्ध करतां येते. माणसाला आपल्या इतर बांधवांवर अजिबात अवलंबून रहावे लागत नाहीं असे झाले किंवा अशी स्थिति प्राप्त करून घेणे शक्य झालें, तर तो इतका गर्विष्ठ आणि उद्दाम होईल, कीं जगाला खरोखर तो एक ओझें आणि त्रासच होऊन बसेल. समाजावर तो अवलंबून असल्यामुळेंच त्याला माणुसकीची शिकवण मिळते. माणसानें आपल्या बहुतेक सर्व प्राथमिक गरजा आपणच भागविण्याला समर्थ झाले पाहिजे हे स्पष्ट आहे. परंतु स्वयंपूर्णतेचा अतिरेक करून समाजापासून मनुष्य तुटून राहूं लागला, तर ते पापच होईल हेंहि तितकेंच स्पष्ट आहे. कापूस पिकाविण्यापासून त्याचें सूत तयार करण्यापर्यंतच्या निरनिराळ्या क्रिया घेतल्या, तरी त्या बाबतींत देखील माणसाला स्वयंपूर्ण बनणें शक्य नाहीं. त्याला कोणत्या ना कोणत्या तरी क्रियेंत आपल्या कुटुंबांतील मंडळींची मदत घ्यावीच लागते. आणि जर आपल्या घरच्या मंडळींची मदत घ्यावयाची, तर शेजाऱ्यांकडून ती कां घेऊं नये? नाहीं तर 'वसुधैव कुटुंबकम्' या महान् उक्तीला अर्थ तरी काय?

माणसाच्या समाजप्रिय स्वभावामुळें तो पशुकोटीहून निराळा म्हणून ओळखला जातो, हे आपण विसरतां कामा नये. निरवलंबी असणे हा जसा त्याचा अधिकार, तसें परस्परावलंबी असणें हें देखील त्याचें तितकेंच कर्तव्य आहे. मी दुसऱ्या कोणावरहि अवलंबून नाहीं असें फक्त अहंकारी मनुष्यच म्हणेल आणि तो एकलकोंडा बनेल.

असपासची माणसें दुःख भोगीत असतांना कोणाहि माणसाला आध्यात्मिक लाभ होऊं शकेल यावर माझा विश्वास नाहीं. मी अद्वैत मानतों,

मनुष्यमात्राच्या आणि तसेंच म्हटलें, तर सर्व जीवमात्राच्या मूलभूत ऐक्यावर माझा विश्वास आहे. म्हणून जर एका माणसाला आध्यात्मिक लाभ झाला, तर त्याच्याबरोबर सबंध जगाला तो होतो आणि जर एका माणसाचा अधःपात झाला, तर तितक्या प्रमाणांत सबंध जगाचें अधःपतन होतें असें मी मानतो.

केवळ व्यक्तीचे सुखस्वास्थ्य डोळ्यांपुढे ठेवणारा किंवा त्यांतच समाधान मानणारा एकहि सद्गुण नाही; याच्या उलट, असें एकहि दुष्कृत्य नाहीं, की ज्याची झळ प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें ते करणाऱ्याव्यतिरिक्त इतर अनेकांना लागत नाही. म्हणून व्यक्ति चांगली आहे कीं वाईट, हा फक्त त्या व्यक्तीपुरताच प्रश्न नसून तो सबंध समाजाचा, नव्हे सबंध जगाचा प्रश्न आहे.

नीतिनियमाने सर्वजण सारखेच बांधलेले आहेत म्हणून मानवजात ही एक आहे. ईश्वराच्या दृष्टीला सर्व माणसें समान आहेत. अर्थात् वंश, दर्जा अशा तऱ्हेचे भेद नाहीत असे नाही; परंतु जितका माणसाचा दर्जा उंच, तितकी त्याच्यावरील जबाबदारीहि जास्त.

# स्वराज्याचा माझा अर्थ : : ३१

'स्वराज्य' म्हणजे हिंदुस्थानच्या लोकांच्या संमतीनें चाललेलें राज्य असें मी समजतो; ही संमति स्त्री अथवा पुरुष, स्वदेशांत जन्म पावलेल्या अथवा येथें स्थायी झालेल्या, प्रौढ लोकांच्या मोठ्यांत मोठ्या संख्येनें दिलेली असेल, आणि या लोकांनी राज्याच्या सेवेंत आपल्या शरीरपरिश्रमानें भर टाकलेली असेल; तसेच त्यांनी मतदार म्हणून आपलीं नावें नोंदवून घेण्याची तसदीहि घेतलेली असेल.

खरेंखुरें स्वराज्य कांही थोड्या लोकांनीं सत्ता आपल्या हातीं घेतल्यानें येणार नाहीं. तर जेव्हां सत्तेचा दुरुपयोग होईल, तेव्हां तिचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य सर्वांनी प्राप्त करून घेतल्यानें तें येईल. निराळ्या शब्दांत

सांगावयाचे, तर सत्ताधाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याची व त्यांच्यावर ताबा चालविण्याची शक्ति आपल्यात आहे, याची जाणीव जनतेला करून देणारें शिक्षण देऊन स्वराज्य संपादन करावयाचें आहे.

स्वराज्य हा एक पवित्र शब्द आहे. तो वैदिक आहे. त्याचा अर्थ स्वतःचे राज्य, आणि स्वतःवर राज्य असा होतो. 'स्वातंत्र्य' या शब्दानें पुष्कळदां व्यक्त होणारी अनिर्बंधता 'स्वराज्य' या शब्दाच्या अर्थात होत नाही.

कित्येक वेळा आपण असें म्हटलेले ऐकतों, कीं 'एकदा हिंदुस्थानचें राज्य आपल्या ताब्यात येऊं द्या, की सर्व काही बरोबर होईल.' पण यापेक्षां अधिक भ्रामक अशी समजूत दुसरी कोणतीहि असूं शकणार नाही. कोणत्याहि राष्ट्रानें अशा तऱ्हेनें आपलें स्वातंत्र्य मिळविलेलें नाही. वसंत ऋतूचें सौंदर्य प्रत्येक झाडाझाडांतून व्यक्त होतें. त्या वेळीं सबंध पृथ्वी तारुण्याच्या टवटवीनें मुसमुसून जाते. त्याचप्रमाणें स्वराज्याची भावना जेव्हां साऱ्या समाजाच्या रोमरोमात खरोखर भिनून जाईल, तेव्हां अचानकपणें या देशात आलेल्या परक्या इसमाला आमच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत उत्साह संचरल्याचें आढळून येईल. राष्ट्राचे सेवक आपापल्या कुवतीप्रमाणें निरनिराळ्या अनेक सार्वजनिक कार्यात गढून गेलेले त्याला दिसून येतील.

माझ्या दृष्टीनें स्वराज्यासाठी जर कोणत्या शिक्षणाची जरूर असेल, तर ती फक्त सबंध जगापासून स्वतःचे संरक्षण करण्याचे सामर्थ्य मिळविण्याची. आणि आपलें स्वातंत्र्य दोषांनी भरलेले असले, तरी सध्या पूर्ण स्वतंत्र वृत्तीनें नैसर्गिक जीवन चालविण्याची स्वराज्याची तहान सुराज्यानें भागणार नाहीं.

प्रत्यक्ष ईश्वर देखील स्वराज्याचें दान देऊं शकत नाही असें म्हणण्याइतकी धिटाई माझ्यापाशीं आहे. आपण स्वतःच ते कमावलें पाहिजे. स्वराज्य हे कोणी देऊन कधीच येत नसतें, हा त्याचा स्वभावधर्मच आहे.

स्वराज्य म्हणजे मृत्यूच्या भीतीचा त्याग. जे राष्ट्र मृत्यूच्या भयाचा पगडा आपल्यावर बसूं देतें, त्या राष्ट्राला स्वराज्य कधींहि मिळवितां येणार नाहीं. आणि कसेंबसें मिळालेंच, तरी तें टिकवितां येणार नाही.

एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राला बहाल करतां येण्यासारखी स्वराज्य ही कांहीं एकादी देणगी नव्हे. राष्ट्राच्या उत्तमोत्तम रक्ताची किंमत देऊन

खरेदी करावयाचा हा बहुमोल ठेवा आहे. ज्या वेळीं आपण त्यासाठीं जबरदस्त किमत मोजूं, त्या वेळीं त्याला देणगीचें स्वरूप रहाणार नाहीं. अविरत कष्ट आणि अमर्याद क्लेश भोगल्यानंतरच स्वराज्याचें फळ पदरीं पडेल.

स्वराज्य म्हणजे माझ्या दृष्टीनें आमच्या क्षुद्रांत क्षुद्र देशबांधवाला सुद्धां स्वातंत्र्य. केवळ इंग्रजांच्या जोखडांतून हिंदुस्थानला मुक्त करणें यांत माझें समाधान नाहीं. हिंदुस्थानची कोणत्याहि प्रकारच्या जोखडांतून सुटका करण्याचा माझा निर्धार आहे. बेडकांच्या गोष्टीतल्या प्रमाणें राजा म्हणून बगळ्याऐवजीं ओंडका आणून बसविण्याची माझी इच्छा नाहीं.

आमच्या संस्कृतीची मूळ प्रकृति जशीच्या तशीच राखणें हें माझें 'स्वराज्य' आहे. मला पुष्कळ नवीन गोष्टी लिहावयाच्या आहेत पण त्या सर्व हिंदुस्थानच्या पाटीवर लिहिल्या गेल्या पाहिजेत. मी पाश्चात्यांकडून उसनवारी आनंदानें करीन, पण जेव्हां मला ती सव्याज फेडता येईल तेव्हाच करीन.

स्वराज्याची यात्रा हा कष्टाचा चढ आहे. त्यांत बारीकसारीक गोष्टीकडेहि लक्ष द्यावें लागतें. त्यात प्रचंड संघटनाचातुर्य येतें. खेड्यातील लोकांची सेवा करण्याच्या उद्देशानेंच केवळ खेड्यापाड्यातून शिरणें त्यांत येतें. निराळ्या शब्दात सांगावयाचें, तर त्यांत राष्ट्राचें शिक्षण म्हणजेच समाजाचें शिक्षण येतें. स्वराज्य म्हणजे बहुजनसमाजांत आपण राष्ट्र आहों अशा जाणिवेची जागृति निर्माण करणें. जादुगाराच्या आंब्याच्या झाडाप्रमाणें तें एकदम उत्पन्न होणार नाहीं; तर वटवृक्षासारखी जवळ जवळ अदृश्यपणें त्याची हळूहळू वाढ होत जाईल. रक्तपाताच्या क्रांतीनें ही किमया कधींहि घडून येणार नाहीं. या बाबतीत घाई अगदीं निकामी आहे.

स्वराज्य म्हणजे सरकारी नियंत्रणापासून मुक्त होण्याचा सतत प्रयत्न. मग तें सरकार परकीय असो, वा आपल्या देशाचें असो.

स्वराज्य हे आभाळांतून खचित पडणार नाहीं; दम, चिकाटी, अखंड श्रम, धैर्य आणि भोवतालच्या परिस्थितीचें बुद्धियुक्त आकलन या सर्वांचें ते फळ असेल.

माझें स्वराज्य हें...... दुसऱ्यांच्या खुनांतून निर्माण होणार नाहीं, तर

स्वेच्छेनें अविरत केलेल्या आत्मत्यागांतून तें निघणार आहे. माझें स्वराज्य म्हणजे रक्तपात करून दुसऱ्याचे हक्क बळकावून बसणें नव्हे. चांगल्या रीतीनें व प्रामाणिकपणे बजाविलेल्या कर्तव्याच्या अंतीं आपोआप आलेले सुंदर फळ असें त्या सत्तासंपादनाचें स्वरूप असेल. त्यांत अंतःकरणाला उद्दीपित करणारे प्रसंग पुष्कळ येतील, ते चैतन्यप्रभूला आले तसे येतील. नीरोला आले तसे नव्हे. क्षितिजावर जास्तींत जास्त गडद अंधकार दिसतो तेव्हां उदय होऊं शकतो, नव्हे, पुष्कळ वेळां त्याच वेळीं उदय होतो. परंतु त्यापूर्वीं राष्ट्राकरितां केवळ काम, काम आणि काम करण्यांतच ज्यांना भरपूर चेतना मिळेल अशा तरुण स्त्री-पुरुषांचा एक वर्ग उदयास येईल, हे मी बजावतो.

स्वार्थत्यागी आणि निग्रही कार्यकर्त्यांचें मोठें, अतिशय मोठें सैन्य नसेल, तर जनतेची खरी प्रगति होणें मला अशक्य वाटतें. आणि तशी प्रगति झाली नाहीं, तर 'स्वराज्य' नांवाची कांहीं वस्तूच अस्तित्वांत येणार नाहीं. गरिबांच्यासाठीं आपल्या सर्वस्वाचा त्याग करण्यास तयार असलेल्या कार्यकर्त्यांच्या संख्येत ज्या प्रमाणांत वाढ होत जाईल, बरोबर त्याच प्रमाणात स्वराज्याच्या मार्गावरील प्रगतीतहि वाढ होत जाईल.

स्वराज्याचा उद्देश जर आपल्याला सुसंस्कृत करणें आणि आपली संस्कृति शुद्ध करून तिला स्थैर्य आणणें हा नसता, तर त्या स्वराज्याला कांहीं अर्थच राहिला नसता. आम्ही आपल्या खाजगी आणि सार्वजनिक सर्व व्यवहारांत नीतिमत्तेला अग्रपूजेचा मान देतो, हे तर आपल्या संस्कृतीचें सारसर्वस्व आहे.

स्वराज्याच्या माझ्या — आपल्या — कल्पनेत वांशिक अथवा धार्मिक भेदांना स्थान नाहीं किंवा ते फक्त विद्वान् लोकांची किंवा सधन लोकांचीहि मिरासदारी असणार नाहीं. स्वराज्य हे या सर्वांकरितां आहे, या सर्वांत विद्वान् लोक असतीलच; पण त्यात लुळे, पांगळे, आंधळे व उपाशीपोटीं श्रमणारे अशा करोडो लोकांचा निश्चितपणें समावेश असेल यांत बिलकुल शंका नाहीं.

हिंदी स्वराज्य हें बहुसंख्य जमातीचें म्हणजेच हिंदूंचें राज्य होईल असें म्हटलें जातें. यापेक्षां जास्त मोटी चूक दुसरी कोणतीहि नाहीं. जर तसे घडणार असेल, तर मी स्वतः तरी निदान त्याला 'स्वराज्य' मुळींच म्हणणार

नाहीं. आणि माझी सर्व शक्ति एकवटून त्याविरुद्ध मी झगडेन. कारण माझ्या मतें 'हिंद स्वराज्य' म्हणजे सर्व जनतेचें राज्य, न्यायाचें राज्य होय. ह्या राजवटींत मंत्री हिंदू, मुसलमान वा शीख कोणीहि असले आणि कायदे-मंडळें फक्त हिंदू, मुसलमान किंवा इतर कोणत्याहि जातींच्या सभासदांनीं भरलेलीं असलीं, तरी त्यांना निःपक्षपाती न्यायाचाच अवलंब करावा लागेल.

सत्य व अहिंसा यांच्या द्वारा स्वराज्य प्राप्त करून घेण्याची जर आपली इच्छा असेल, तर क्रमाक्रमानें परंतु निश्चितपणें खालपासून वरपर्यंत विधायक कार्याच्या योगानें संघटना बांधीत जाणें हाच एक मार्ग आहे. जनतेमधून एकादा सत्ताधारी उदयास येऊन तो कठोरपणें सत्ता चालवील व अव्यवस्थे-मधून सुव्यवस्था निर्माण करील, या आशेनें प्रस्थापित व्यवस्था उखडण्या-साठी जाणूनबुजून अराजक परिस्थिति निर्माण करण्याच्या कल्पनेला हा मार्ग थारा देत नाहीं.

रामराज्य म्हणजे हिंदुराज्य असा माझा अर्थ नाही. 'रामराज्य' म्हणजे ईश्वरी राज्य असें म्हणण्याचा माझा उद्देश आहे. माझ्या दृष्टीनें राम आणि रहीम ही एकच देवता आहे. सत्य आणि सदाचरण या ईश्वराखेरीज दुसरा ईश्वर मी मानीत नाही. माझ्या कल्पनेंतील 'राम' या पृथ्वीवर कधी झालेला असो किंवा नसो, प्राचीन रामराज्याचा पुरातन आदर्श हा मात्र निर्विवाद-पणें खऱ्या लोकसत्तेचा आदर्श आहे यांत बिलकुल शंका नाही; या राज्यांत अगदीं सामान्यातल्या सामान्य नागरिकाला देखील, दीर्घसूत्री व खर्चिक पद्धतीत न शिरतां चटकन न्याय मिळण्याची खात्री असे. रामराज्यांत कुत्र्याला देखील न्याय मिळाल्याचें कवीनें वर्णन केलें आहे.

## माझी स्वदेशी ही पारिपत्याकरितां नाहीं

माझी स्वदेशीची व्याख्या सर्वश्रुत आहे. अगदीं जवळच्या शेजाऱ्याला बळी देऊन मी दूरच्या शेजाऱ्याची सेवा करतां कामा नये. माझी स्वदेशीची कल्पना कधींहि सूडाची अथवा पारिपत्याची नाही. माझ्या वाढीसाठीं लागणाऱ्या वस्तू मी जगाच्या कोणत्याहि भागांतून घेत असल्यामुळें माझी स्वदेशीची कल्पना कोणत्याहि तऱ्हेनें संकुचित नाहीं. माझ्या वाढीला अडथळा

आणणारी अथवा निसर्गानें ज्याची काळजी प्रथम घेण्याची जबाबदारी माझ्यावर टाकली आहे अशांना हानि पोंचविणारी वस्तु कितीहि सुबक आणि आकर्षक असली, तरी मी ती कोणाकडूनहि विकत घेणार नाहीं. उपयुक्त व हितकारी वाङ्मय मी जगाच्या कोणत्याहि भागांतील घेतों. शस्त्र-क्रियेची हत्यारें मी इंग्लंडकडून घेतों, टांचण्या आणि पेन्सिली ऑस्ट्रेलियाकडून घेतों आणि घड्याळें स्वित्झर्लंडकडून घेतों; परंतु इंग्लंडकडून, जपानकडून किंवा जगाच्या कोणत्याहि भागाकडून एक इंचभरहि कापड मी घेणार नाहीं. कारण त्यानें हिंदुस्थानांतील करोडों लोकांची अधिकाधिक हानि केली आहे, आणि वाढत्या प्रमाणांत ती चालू आहे. करोडों गरजू कंगालांनीं कांतलेलें आणि विणलेलें कापड घेण्याचें नाकारून हिंदी हातसुताच्या कापडापेक्षां विदेशी कापड अधिक चांगलें असलें, तरी तें खरेदी करणें हें पाप आहे, असें मी मानतों. माझी स्वदेशी मुख्यतः हातसुताच्या खादीभोंवतीं केंद्रित झाली असून हिंदुस्थानांत निर्माण होणाऱ्या आणि होऊं शकणाऱ्या प्रत्येक गोष्टीला तें तत्त्व लागू होऊं शकेल.

# हिंदुस्थानचें कार्य : : ३१

हिंदुस्थानापुढील कार्य हें इतरांपेक्षां निराळें आहे असें मला वाटतें. जगाचें धार्मिक नेतृत्व करण्यास हिंदुस्थान लायक आहे. हा देश स्वेच्छेनें ज्या आत्मशुद्धीच्या क्रियेंतून गेला आहे त्याला जगांत कोठेंहि तोड नाहीं. हिंदुस्थानला पोलादी शस्त्रास्त्रांची फारशी जरूर नाहीं, तो दैवी शस्त्रांनीं लढत आला आहे, आणि अजूनहि तो तसा लढूं शकेल. इतर राष्ट्रें पाशवी सामर्थ्याचीं पूजक आहेत. युरोपांत चाललेलें भयंकर युद्ध हें या विधानाच्या सत्यतेचें अगदीं ढळढळीत उदाहरण आहे. हिंदुस्थान हा साऱ्यांना आत्म-बळानें जिंकूं शकेल. आत्मिक शक्तीपुढें शरीरशक्ति कांहींच नव्हे, हें सिद्ध करणारे अनेक दाखले इतिहासांत सापडतात. कवींनीं त्या शक्तीचें गान केलें आहे आणि ऋषींनीं आपले अनुभव वर्णिले आहेत.

हिंदुस्थानांतील प्रत्येक गोष्ट माझ्या मनाला आकर्षित करते. उच्चतम आकांक्षा असणाऱ्या माणसाला जी जी गोष्ट हवीशी वाटेल ती ती येथे आहे.

हिंदुस्थान ही स्वभावतःच कर्मभूमि आहे, भोगभूमि नाही.

युरोपच्या पायाशी लोटांगण घालून पडलेलें हिंदुस्थान मानवजातीला काय आज्ञा देणार? जागृत आणि स्वतंत्र हिंदुस्थानजवळ मात्र विव्हळणाऱ्या जगाला देण्याला शांतीचा आणि सद्भावाचा संदेश आहे.

हिंदुस्थान हें भित्र्या लोकांचें राष्ट्र नाही, हे हिंदुस्थानच्या लढाऊ जातींतील लोकांच्या शौर्य-धैर्याने सिद्ध केले आहे– मग ते लोक हिंदू असोत, मुसलमान असोत, शीख किंवा गुरखे कोणीहि असोत. माझा सांगण्याचा मुद्दा हा आहे, की हिंदुस्थानच्या भूमीला मारामारीची वृत्ति अपरिचित आहे, आणि जगाच्या उत्क्रांतीत कदाचित् त्याला उच्चतर भाग बजावावयाचा असेल. त्याचें कार्य काय नेमलें आहे तें एक काळच दाखवूं शकेल.

मानवजातीकरितां मरण्याची आकांक्षा बाळगण्याची पात्रता येण्यापूर्वी हिंदुस्थानने प्रथम जगण्यास शिकलें पाहिजे.

जगाची स्थिति सुधारण्यासाठीं स्वेच्छेने स्वतःचे शुद्ध बलिदान व्हावें याकरिता मला हिंदुस्थान स्वतंत्र व बलवान् झालेला पहाण्याची इच्छा आहे. व्यक्ति शुद्ध असल्यामुळे कुटुंबासाठीं आत्मत्याग करते, कुटुंब गावाकरितां, गाव जिल्ह्याकरितां, जिल्हा प्रांताकरितां, प्रांत राष्ट्राकरितां आणि राष्ट्र सर्व जगासाठीं त्याग करतें.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याने शांति आणि युद्ध यांकडे बघण्याच्या जगाच्या दृष्टिकोनांत क्रांति घडून आल्याखेरीज रहाणार नाही. हिंदुस्थानचें दौर्बल्य सबंध मानवजातीला बाधक झाले आहे.

हिंदुस्थानचें भवितव्य हे पाश्चात्यांच्या रक्तपाताच्या मार्गानें येणार नाहीं, त्या मार्गाचा पाश्चात्यांनाच कंटाळा वाटत असल्याची चिन्हे दिसूं लागली आहेत; हिंदुस्थानचे भवितव्य शांतीच्या रक्तपातशून्य मार्गानें येणार आहे; हा शांतीचा मार्ग साध्या व ईश्वरपरायण जीवनक्रमाने प्राप्त होतो. हिंदुस्थान आपला आत्मा गमावील असा धोका दिसत आहे. आत्मा गमावून त्याला जिवंत रहातां येणार नाहीं. म्हणून हिंदुस्थाननें 'पाश्चात्यांचा हल्ला मला चुकविणें शक्य नाही' असें आळशीपणें आणि असहाय्यपणें म्हणतां कामा नये.

आपल्या स्वतःसाठीं त्याचप्रमाणें जगासाठीं त्याचा प्रतिकार करण्याइतकें त्यानें सामर्थ्य कमावले पाहिजे.

पाश्चात्यांकडे असे पुष्कळ आहे, कीं जे पचवून घेतल्याने आपल्याला लाभ होईल, हे कबूल करण्याइतकी नम्रता माझ्यात आहे. शहाणपणाचा कांहीं एकाच खंडाला किंवा एकाच जातीला मक्ता दिलेला नाहीं. माझा पाश्चात्य संस्कृतीला—म्हणजे आशियांतील लोक हे फक्त पाश्चात्यांकडून येणाऱ्या प्रत्येक गोष्टीचे अनुकरण करण्याच्याच लायकीचे आहेत अशी समजूत करून घेऊन पाश्चात्यांच्या संस्कृतीची जी अविवेकाने व अविचाराने नक्कल केली जाते. त्यालाच खरोखर विरोध आहे. हालअपेष्टांच्या अग्निदिव्यांतून जाण्याइतका आणि आपल्या संस्कृतीवर होणाऱ्या बेकायदेशीर आक्रमणाला प्रतिबंध करण्याइतका धीर जर हिंदुस्थानांत असेल, तर तो जगाच्या शांतीत आणि भरीव अशा प्रगतीत कायमची भर टाकूं शकेल असा मला पूर्ण विश्वास आहे. आमची संस्कृति अपूर्ण आहे खरी, तथापि काळाच्या तडाख्यांतून ती आतांपर्यंत टिकून राहिली आहे, यांत शंका नाहीं.

माझी महत्त्वाकांक्षा स्वातंत्र्यापेक्षा फार उच्च आहे. हिंदुस्थानच्या विमोचनाच्या द्वारा मी जगांतील दुर्बल म्हटल्या जाणाऱ्या जातींची पाश्चात्यांच्या पिळवणुकीच्या काचांतून मुक्तता करण्याचा प्रयत्न करीत आहें.

हिंदुस्थानने आपण होऊन दुसऱ्या कोणत्या राष्ट्रांशीं कधी युद्ध पुकारलेले नाहीं. त्यानें फक्त स्वसंरक्षणासाठीच कित्येक वेळां असंघटित किंवा अर्धवट संघटित असा प्रतिकार केला आहे. म्हणून शांतीला अनुकूल अशी मनोवृत्ति वाढविण्याची हिंदुस्थानाला कांहीं आवश्यकता नाहीं. त्याच्याजवळ ती भरपूर आहे: मग त्याची त्याला जाणीव असो अथवा नसो. आपल्या पिळवणुकीचा शांतियुक्त साधनांनीं प्रतिकार करणे व त्यांत यश मिळविणें या योगानेच तो शांतिकार्य पुढे नेऊं शकेल. याचाच अर्थ असा, कीं हिंदुस्थानला आपले स्वातंत्र्य शांतियुक्त साधनांनीच मिळवले पाहिजे. जर हे तो करूं शकला, तर जागतिक शांततेच्या प्रयत्नांत कोणत्याहि एका राष्ट्रानें घातलेली ही सर्वांत मोठी भर ठरेल.

स्वतंत्र हिंदुस्थानांत आपलें भवितव्य काय रहाणार याची चिंता लागून राहिलेले लोक बघितले, म्हणजे मला जसें दुःख होतें तसेंच आश्चर्यहि वाटतें.

मानवनिर्मित कृत्रिम सीमारेषेच्या क्षेत्रांत नव्हे, तर हिंदुस्थानच्या नैसर्गिक सीमांनी बद्ध झालेल्या क्षेत्रांत जन्म पावलेल्या हलक्यांतल्या हलक्या लोकांनाहि स्वातंत्र्याची हमी जो हिंदुस्थान देणार नाहीं तो माझ्या दृष्टीनें स्वतंत्र हिंदुस्थानच नव्हे. आमच्या मनांतील भीतीमुळे आमची विचारशक्ति लुळी बनत असली पाहिजे. नाहींपेक्षा स्वातंत्र्य म्हणजे प्रत्येक अब्रूदार स्त्री-पुरुषाला काहीं म्हटलें तरी, [illegible] कांहींतरी अधिक चांगली स्थिति, असें आपल्या एकदम लक्षांत आलें पाहिजे. स्वातंत्र्याच्या आगमनामुळे जर कोणाच्या मनांत धडकी भरणार असेल, तर ती पिळवणूक करणारे, पैसे खाणारे, चांचेगिरी करणारे अशांच्याच होय.

सत्य व अहिंसा यांच्या द्वारा जर हिंदुस्थान आपल्या ध्येयाप्रत पोचला, तर त्यामुळे ज्या जागतिक शांतीकरिता जगांतील सर्व राष्ट्रें तहानलेलीं आहेत, त्या शांतिकार्यांत काहीं कमी भर पडणार नाही. आणि तसें झाले, तर तींहि राष्ट्रें आज हिंदुस्थानला मुक्त हस्ताने जी मदत करीत आली आहेत तिची थोडीशी परतफेड हिंदुस्थानने केल्यासारखेंहि होईल, असे अत्यंत नम्रपणें सुचविण्याचें धाडस मी करतो.

हिंदुस्थानला सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून व आश्रितावस्थेतून मुक्त करणारी आणि जरूर तर पाप करण्याचा देखील अधिकार देणारी परिस्थिति प्राप्त करून घेण्यासाठी मी झटत राहीन. हा आमचा देश आहे, आणि तो बनविताना आमच्या शब्दाला किंमत दिली जात आहे, असें ज्या हिंदुस्थानांतील गरिबातल्या गरिबाला सुद्धां मनोमन वाटेल, ज्या हिंदुस्थानांतील लोकात उच्च आणि नीच असे वर्ग असणार नाहींत, ज्या हिंदुस्थानांत सर्व जातीजमाती गुण्यागोविंदानें नांदत असतील, असा हिंदुस्थान निर्माण करण्यासाठीं मी झटत राहीन. अशा हिंदुस्थानांत अस्पृश्यतेला किंवा मादक पेयांच्या व पदार्थांच्या दुर्व्यसनाला स्थान रहाणार नाही. स्त्रियांना पुरुषाप्रमाणेंच हक्क असतील. जगांतील इतर देशांबरोबर आमचे संबंध सलोख्याचे असल्यामुळे, आपण कोणाची पिळवणूक करीत नाहीं किंवा कोणाकडून पिळले जात नाहीं, अशी स्थिति असल्यामुळें आपलें सैन्य शक्य तितकें लहान असेल. करोडों मूक समाजाच्या हितसंबंधांशीं विरोधी नसतील अशा सर्व हितसंबंधांचें फार कसोशीनें रक्षण केलें जाईल. मग ते

हितसंबंध परकीयांचे असोत वा स्वकीयांचे असोत. एतद्देशीय व परदेशी असा भेद करणे व्यक्तिशः मला आवडत नाही. माझ्या कल्पनेतील हिंदुस्थान हा असा आहे. यात यत्किंचित्‌हि कमतरता झाली, तरी माझें समाधान होणार नाही.

जर मला माझ्या देशाचें स्वातंत्र्य हवे असेल, तर ते संबंध मानवसंख्येच्या पांचव्या भागाइतक्या असणाऱ्या माझ्या राष्ट्राने पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याहि दुसऱ्या मानववंशाला किंवा एका व्यक्तीलाहि लुबाडावे यासाठी मला नको आहे, हे मी मनापासून सांगतो. म्हणून माझ्या देशाला तसे स्वातंत्र्य हवे अशी माझी इच्छा असेल, तर मी दुसऱ्या प्रत्येक मानव-वंशाच्या—तो मग दुर्बळ असो वा सबळ असो—तितक्याच स्वातंत्र्याच्या हक्काची काळजी वाहिली पाहिजे. आणि तो हक्क संभाळला नाही, तर त्या स्वातंत्र्याला मी स्वतः लायक रहाणार नाही.

एक राष्ट्र मूठभर लोकांचे पण शूर आहे, शौर्यात त्याला कोणीहि कदाचित् मागे सारणार नाही असा त्याचा इतिहास आहे, गुलामगिरीशी झगडणारा असा त्याचा लौकिक आहे. आपण दुर्बळांचे रक्षण करतो असे त्याने अनेक वेळा निदान बोलून दाखविले आहे, असे एक राष्ट्र; आणि दुसरे अतिप्राचीन, कित्येक कोटी लोकसंख्येचे, ज्याचा इतिहास गौरवशाली आणि फार पुरातन काळापासूनचा, आज हिंदु आणि इस्लामी अशा दोन महान संस्कृतींचे दर्शन घडविणारे, आणि तसे म्हटले, तर ख्रिस्ती धर्माची लोकसंख्यासुद्धा कमी नव्हे, चांगली मोठी आहे. झरतुष्ट्राच्या सर्वच्या सर्व वैभवशाली अनुयायांचा, समाजसंख्येने जवळ जवळ तुच्छ वाटण्याजोगा पण दातृत्वात आणि व्यापारधंद्यात जवळ जवळ अतुलनीय, हार तर खात्रीनेच कोणाला जाणार नाही असा समाज ज्याने आपल्यांत सामावून टाकला आहे, असे हे दुसरे राष्ट्र. ही दोन राष्ट्रे काय करूं शकणार नाहीत? या सर्व संस्कृती हिंदुस्थानांत एकत्रित झालेल्या मिळतात.

माझ्या देशाचे स्वातंत्र्य रक्तपाताच्या साधनांनी मिळविण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां जरूर तर मी माझ्यापुरता युगानुयुगे देखील त्यासाठी वाट पहात राहीन. जवळजवळ पस्तीसांहून जास्त वर्षे अव्याहतपणे राजकारणाचा अनुभव घेतल्यानंतर अगदी हृदयापासून मला असे वाटूं लागलें आहे, की जगाला

रक्ताचा सडा शिंपण्याचा अगदीं मनस्वी तिटकारा आला आहे. जग त्यांतून बाहेर निघण्याचा मार्ग शोधीत आहे; आणि व्याकुळ झालेल्या जगाला यांतून बाहेर पडण्याचा मार्ग दाखवावयाचा विशेष अधिकार कदाचित् या प्राचीन भरतभूमीचाच असेल असें वाटून मला त्याबद्दल अभिमान वाटतो. म्हणून हिंदुस्थानला त्याच्या महान् लक्ष्यांत मनापासून सहकार्य द्या, अशी जगांतील सर्व बलाढ्य राष्ट्रांना विनंति करतांना मला कांहीहि दिक्कत वाटत नाहीं. राष्ट्राची प्रतिष्ठा आणि मान राखतां यावा याकरितां लक्षावधि लोक प्रत्याघात न करता आत्मक्लेश सहन करीत आहेत, हें दृश्य खरोखरी चिंतनीय आणि हृदयसंपुटांत साठवून ठेवण्यासारखें आहे.

सत्याचा बळी देऊन हिंदुस्थानने स्वातंत्र्य मिळविण्यापेक्षां तो नष्ट झालेला मी पत्करीन.

मी मेल्यानंतर हिंदुस्थान स्वतंत्र होईल, आणि फक्त हिंदुस्थानच नव्हे, तर सबंध जग स्वतंत्र होईल. इंग्रज किंवा अमेरिकन लोक स्वतंत्र आहेत असें मी मानीत नाहीं. जोंपर्यंत इतर वर्णांच्या राष्ट्रांना दास्यांत ठेवण्यासाठीं आपल्या शक्तीचा ते उपयोग करीत आहेत, तोंपर्यंत ते स्वतंत्र होणार नाहींत. माझें कार्य मला माहीत आहे. आणि स्वातंत्र्य म्हणजे काय तेंहि मी जाणतो. इंग्रज शिक्षकांनीं मला त्याचा अर्थ शिकवला आहे, आणि मला जें दिसतें व जें मी अनुभवलें आहे, त्याच्या अनुरोधानेंच त्या स्वातंत्र्याचा अर्थ लावणें मला भाग आहे.

स्वातंत्र्याच्या लढाया जबर किंमत मोजल्याखेरीज खेळतां येत नाहींत. ज्याप्रमाणें स्वतःच्या शरीराव्यतिरिक्त दुसऱ्या शरीरांत राहण्याचा विचार मनुष्य मनांत बाळगणार नाहीं, त्याचप्रमाणें राष्ट्रांनाहि इतर राष्ट्रांच्या अंमलाखालीं राहणें आवडणार नाहीं; मग तीं इतर राष्ट्रें कितीहि थोर आणि मोठीं असोत. स्वतःचें स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं प्रचंड त्याग करणाऱ्या इंग्रजांना हिंदुस्थानच्या वेदना कां कळूं नयेत ?

## मला सांस्कृतिक वेगळेपणा नको

आम्ही आमच्यापुरते रहावें किंवा भिंती निर्माण कराव्यात असा विचार-सुद्धां माझ्या मनाला शिवत नाहीं. परंतु इतर संस्कृतीविषयींची गुणग्राहकता

ही आपली स्वतःची संस्कृति आत्मसात् केल्यावर व तिची कदर उत्पन्न झाल्यावरच यथार्थपणे येऊं शकते. त्यापूर्वी कधींहि येऊं शकत नाहीं असें मात्र मला आदरभावपूर्वक म्हणावयाचे आहे. माझें असें ठाम मत आहे, कीं आमच्या संस्कृतीत आहे इतकी संपन्न गुणराशी दुसऱ्या कोणत्याहि संस्कृतीजवळ नाहीं. पण आपल्याला तिची ओळख झालेली नाहीं. एवढेंच नव्हे, तर अभ्यास करण्यालायक मुद्दां ती नाहीं, ती एक तुच्छ संस्कृति आहे असें आम्हांला मानावयाला लावले आहे. त्या संस्कृतीप्रमाणें जीवन घालविण्याचें तर आपण जवळजवळ टाकूनच दिले आहे. आचाराशिवाय केवळ अभ्यासू-वृत्तीनें ज्ञानग्रहण हें मसाला भरून ठेवलेल्या प्रेतासारखे आहे; ते दिसावयाला शुद्ध दिसेल कदाचित्; पण त्यांतून स्फूर्तिदायक अथवा उदात्त करणारें कांहीं मिळणार नाहीं. माझा धर्म ज्याप्रमाणे माझी स्वतःची संस्कृति आत्मसात् करून घेऊन तदनुरूप रहाण्याचा आग्रह धरतो, नाहींपेक्षां नागरिकजीवनाच्या दृष्टीने आत्मघाताची शिक्षा देतो, त्याचप्रमाणें तो इतर संस्कृतींना क्षुल्लक लेखण्यास किंवा त्यांचा अनादर करण्यास मना करतो.

'प्राचीन' या नावाखालीं खपणाऱ्या सर्वच गोष्टींची अविवेकानें व धर्म-भोळेपणानें पूजा करणारा मी नाहीं. जे वाईट किंवा अनैतिक आहे— मग ते कितीहि पुरातन असो— त्या सर्वांचा नायनाट करण्यास मी मागेंपुढे पहात नाहीं, मात्र अपवाद मी सांगितला तो. मी पुरातन संस्थांचा पूजक आहे, आणि आधुनिक गोष्टींच्या मागे पिसाटासारखे धांवणारे लोक आपल्या सर्व प्राचीन परंपरांचा तिरस्कार करतात आणि आपल्या जीवनांत त्यांकडे दुर्लक्ष करतात याचें मला दुःख होतें, हे मला कबूल केले पाहिजे.

पाश्चात्य संस्कृतीचें ऋण मी मोकळेपणानें कबूल केलें असलें, तरी मी असें सांगूं शकतो, कीं राष्ट्राची जी थोडीफार सेवा मी करूं शकलों आहे ती, पौरस्त्य संस्कृति जेवढी राखतां आली तेवढी राखल्यामुळेंच सर्वस्वीं करूं शकलों आहे. मी जर इंग्रजाळलों असतों, माझें राष्ट्रीयत्व गेलें असतें, सर्व-सामान्य जनतेचे मार्ग, संवयी, विचार आणि आकांक्षांविषयीं मला कांहीच ज्ञान नसतें, त्याची मला पर्वा नसती, नव्हे, कदाचित् त्यांचा मी तिरस्कार केला असता, तर जनतेच्या मी कसल्याहि उपयोगाचा राहिलों नसतों.

इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय व्यापार व राजकीय व्यवहार यांची भाषा आहे

असें मी मानतों. आणि म्हणून आपल्यापैकी कांहींना तिचें ज्ञान असणें आवश्यक आहे असें मला वाटतें. इंग्रजी भाषेंत विचार आणि वाङ्मय यांचा कांही उत्तमोत्तम सांठा असल्यानें ज्यांची बुद्धि भाषाविषयांत विशेष चालत असेल, त्यांनी तिचा काळजीपूर्वक अभ्यास करावा असें मी जरूर उत्तेजन देईन. आणि त्या भांडाराचें आपल्या राष्ट्राच्या उपयोगासाठी त्यांनीं आपापल्या मातृभाषांतून भाषांतर करावें अशी अपेक्षा मी त्यांच्यापासून बाळगीन.

हिंदुस्थानची सुसंस्कृतता हा वेगवेगळ्या धर्मांतून व्यक्त झालेल्या संस्कृतींचा संगम आहे आणि ज्या भौगोलिक व इतर परिस्थितीत त्यांचा मिलाफ झाला त्या परिस्थितींचा प्रभावहि त्या संस्कृतीच्यावर पडला आहे. अशा दृष्टीने पाहिलें, तर इस्लामी संस्कृति ही अरबस्तान, तुर्कस्तान, ईजिप्त आणि हिंदुस्थान या ठिकाणीं सारखीच नाही; तर त्या त्या देशांतील परिस्थितींचा परिणाम होऊन ती बनलेली आहे. म्हणून हिंदी संस्कृति ही हिंदीच होय. ती पूर्णपणें हिंदू नव्हे, इस्लामी नव्हे, अथवा अन्य कोणतीहि नव्हे. ती सर्व संस्कृतींचा एक संगम असून ती मुख्यतः पौरस्त्य आहे. आणि जे स्त्री-पुरुष स्वतःला हिंदी म्हणवून घेत असतील ते त्या संस्कृतीचें अवश्य जतन करतील, तिचे विश्वस्त बनतील, आणि तिच्यावर होणाऱ्या हल्ल्याचा प्रतिकार करतील.

युरोपीय संस्कृति ही युरोपियन लोकाकरितां योग्य आहे, यांत शंका नाहीं. परंतु तिची नक्कल करण्याचा आपण प्रयत्न करूं लागलो, तर त्यामुळें हिंदुस्थानचा नाश ओढवेल. याचा अर्थ असा नव्हे, की त्या संस्कृतीत जें चांगलें आणि आपल्याला घेतां येण्यासारखें आहे त्याचा आपण अंगीकार करूं नये किंवा तें आत्मसात् करूं नये. त्याचप्रमाणें त्याचा अर्थ असाहि नव्हे, की त्या संस्कृतींत ज्या ज्या अनिष्ट गोष्टी शिरल्या असतील त्यांचा युरोपियनांनीहि त्याग करूं नये. एकसारखें भौतिक सुखांच्या मागें लागून त्यांची वाढ करीत जाणें ही त्यापैकी एक अनिष्ट गोष्ट होय. आणि मी असें म्हणण्याचें धाडस करतों, कीं युरोपीय लोक ज्या सुखांचे गुलाम बनत आहेत त्यांच्या भाराखालीं जर त्यांना स्वतःचा नाश करून घ्यावयाचा नसेल, तर त्यांना स्वतःलाच आपल्या दृष्टीला नवीन वळण द्यावें लागेल. माझी कल्पना कदाचित् चुकीचीहि असूं शकेल; परंतु हिंदुस्थाननें या कांचनमृगाच्या मागें लागणें म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूला आमंत्रण देण्यासारखेंच आहे, एवढें मी जाणतों. ' साधी

राहणी आणि उच्च विचारसरणी' हे एका पाश्चात्य तत्त्वज्ञाचें वचन आपण आपल्या हृदयावर कोरून ठेवू या.

# मी ब्रिटिश-विरोधी नाहीं : : ३३

मी इंग्रजाचा शत्रु नाहीं. मी कोणत्याहि सरकारचा द्वेष्टा नाहीं· परन्तु असत्य, भोंदूगिरी आणि अन्याय याचा मात्र मी शत्रु आहे. जोपर्यंत सरकार अन्याय चालवीत असेल, तोपर्यंत सरकारने मला आपला शत्रु- अगदीं कडवा शत्रु- म्हणून खुशाल समजावें.

मानवी स्वभावावरील माझा विश्वास दुर्दम्य आहे, आणि अगदीं प्रतिकूल परिस्थितींत देखील इंग्रज लोकांना आपलें म्हणणें पटवून देतां येते व त्यांचें मन वळविता येते असें मला आढळून आलें आहे. आणि वस्तुतः ते अन्यायानें वागत असूनहि आपण न्यायी आहोंत असें वरून दाखविण्याची त्यांची नेहमीं इच्छा असल्यानें त्यांना लाजवून योग्य ती गोष्ट त्याच्याकडून करवून घेणें इतरांपेक्षा सोपें जातें.

माझा वैयक्तिक धर्म इंग्रजांना, किंवा तसेंच म्हटलें, तर इतर कोणालाहि न दुखविता माझ्या देशबांधवांची सेवा करण्याचें मला सामर्थ्य देतो. मी माझ्या सख्ख्या भावाच्या बाबतींत जी गोष्ट करण्यास तयार होणार नाहीं, ती मी इंग्रजाच्या बाबतींतहि करणार नाहीं. राज्य मिळत असलें, तरी देखील त्यासाठीं मी त्याला इजा करणार नाहीं. परंतु त्याच्याशीं असलेलें माझें सहकार्य अवश्य आलें, तर मी काढून घेईन. माझ्या भावाच्या (हल्लीं तो मयत आहे) बाबतींतहि जरूर पडली, तेव्हां मी तसेंच केलें होतें. साम्राज्यशाही करीत असलेल्या अन्यायांत सहभागी न होण्यानें मी साम्राज्याची सेवाच करतो.

माझी कोणत्याहि प्रकारें इंग्रजद्वेषी प्रवृत्ति आहे असा आरोप माझ्यावर कोणीहि करूं शकणार नाहीं. खरें म्हटलें, तर माझ्यांत असलेल्या तारतम्या-बद्दल मला अभिमान वाटतो. मी त्यांच्याकडून पुष्कळ चांगल्या गोष्टी

कृतज्ञतापूर्वक उचलल्या आहेत. नियमितपणा, मितभाषित्व, सार्वजनिक आरोग्य, स्वतंत्र विचार, मनाला जें योग्य वाटेल त्याचा आचार, इत्यादि अनेक गोष्टी मला त्यांच्या संगतींतून मिळाल्या आहेत.

इंग्रजांवर विपत्ति आली, तर त्याचें मला कांहींच वाटूं नये किंवा त्यांच्या विपत्तीचा मी आनंद मानवा इतका संकुचित माझा राष्ट्रवाद नाहीं. दुसऱ्या कोणत्याहि देशाच्या सुखाचा बळी देऊन मला माझ्या देशाचें सुख नको आहे. माझ्या ठिकाणीं कसलीहि कटुता नाहीं. अगदीं नीचांतल्या नीच प्राण्याशीं देखील माझा बंधुभाव आहे असें मी म्हणतो. मग एका शतकाहून अधिक काळ बरा-वाईट किंवा कसाहि ज्या इंग्रजांशीं आपला संबंध बांधला गेला आहे, आणि ज्यांच्यात माझे कांहीं अत्यंत जिवलग स्नेही आहेत, त्या इंग्रजांशीं का नाहीं मी बंधुभाव जोडणार ? तुम्हा इंग्रजांना मी कांहीं कोडें वाटूं नये. माझा पुढें केलेला हात जर तुम्हीं झिडकारलात, तर मी दूर जाईन, पण मनात द्वेष ठेवून नव्हे; तर अजून तुमच्या अंतःकरणांत थारा मिळण्याइतका मी शुद्ध झालों नाहीं या जाणिवेनें.

हिंदुस्थानचा मोठ्यात मोठा गौरव म्हणजे इंग्रज हे आपले कडवे शत्रू आहेत, संधि मिळताच हिंदुस्थानांतून घालवून देण्याच्या लायकीचेच ते आहेत असें मानण्यांत नसून जगातील दुर्बल अथवा मागासलेल्या राष्ट्रांच्या व मानव-जातीच्या पिळवणुकीवर आणि म्हणून पाशवी सामर्थ्यावर आधारलेलें त्यांचें साम्राज्य नष्ट करून त्याऐवजी त्यांना राष्ट्रांच्या नव्या बंधुसंघा-(कॉमनवेल्थ) मधील भागीदार आणि आपले मित्र बनवणें यांतच तो गौरव आहे.

ब्रिटिश लोकांबद्दल मला माझ्या देशबांधवाइतकेंच प्रेम वाटतें. त्याबद्दल माझी वाहवा करण्याचें कारण नाहीं. कारण यच्चयावत् मानवजातीबद्दल निरपवादपणें मला सारखेंच प्रेम वाटतें. त्या प्रेमाला परतफेडीची अपेक्षा नाहीं. अवघ्या जगात मी कोणालाहि शत्रु मानीत नाहीं. तें माझें ब्रीदच आहे.

'अपीजमेंट' (शांति-स्वस्ति) या शब्दाला इंग्रजी भाषेत एक निंदास्पद अर्थ आला आहे. त्या 'शांति-स्वस्ति'करणाविषयीं मी कधींहि माझा पक्षपात असल्याचें मान्य केलेलें नाहीं. सर्व मानवजातींत सलोखा नांदावा असें मला जरूर वाटतें; परंतु काय वाटेल तें करून तो सलोखा आणावा असें मला वाटत नाहीं आणि आक्रमकाला खूष करून

किंवा आपल्या प्रतिष्ठेला काळिमा आणून तो सलोखा नांदावा, असें तर मला मुळीच वाटत नाही. म्हणून या दोहोंपैकी एकहि दुर्गुण माझ्यामध्यें आहे असे जे समजतात, ते आपल्या पुढच्या तांतडीच्या कामाला धक्का पोंचवितील.

एकाद्याला बंडखोर बनविण्यास देखील सहज कारणीभूत झाली असती अशी परिस्थिति असूनहि एकोणतीस वर्षांच्या सार्वजनिक आयुष्यांत मी ब्रिटिश-सरकारला अव्याहतपणे जितकें सहकार्य देत आलों आहें, तितकें दुसऱ्या कोणत्याहि हिंदी गृहस्थानें दिलेलें नाही.

साम्राज्याकरितां मी चार वेळा माझें आयुष्य धोक्यांत घातलें आहे. एकदां बोअर-युद्धाचे वेळीं; त्या वेळीं शुश्रूषा-पथकाचें नेतृत्व माझ्याकडे होतें; या पथकाच्या कामासंबंधीं जनरल बुलरच्या पत्रांतून उल्लेख आले आहेत. दुसऱ्यादा नाताळ येथील झुलू-बंडाचे वेळीं. त्या वेळींहि अशाच पथकाचा मी मुख्य होतों. तिसरी खेप म्हणजे गेल्या महायुद्धाच्या सुरुवातीच्या वेळीं. त्या वेळीं मी शुश्रूषा-पथक उभारलें होतें. आणि त्यात शिक्षण घेत असतां अतिशय ताण पडल्यामुळें मला प्ल्यूरसी झाली होती. आणि शेवटीं म्हणजे लॉर्ड चेम्सफर्ड याना दिल्ली येथील युद्धपरिषदेंत दिलेला शब्द खरा करण्या-करितां मी खेडा जिल्ह्यात रिक्रूट-भरतीची जोराची मोहीम काढली होती. त्या वेळीं मला इतकी दूरदूरची व ताण देणारी चाल पडली, कीं त्यामुळें मला अतिसाराचा विकार जडला व त्यांतून मी मरता मरता वांचलों. हें सर्व मी असा पूर्ण विश्वास मनांत बाळगून केलें, कीं अशा स्वरूपाच्या कृत्यांनी माझ्या देशाला साम्राज्यांत बरोबरीचा दर्जा प्राप्त होईलच.

ब्रिटिश लोकांबद्दल प्रेमभाव बाळगणाऱ्या माझ्यासारख्या माणसाविषयीं दाखवण्यांत येणारा हा अविश्वास आणि विपर्यास हें मला एक कोडें वाटतें. माझी प्रगाढ श्रद्धा मला शरीर-सामर्थ्याचा अवलंब करण्यास मना करीत असल्यामुळें मी ईश्वराची प्रार्थना करतों, कीं आत्यंतिक स्वरूपाच्या एकवट-लेल्या क्लेशांचा असा शेवटचा मार्ग मला शोधून दे आणि ते सहन करण्याची शक्तीहि मला दे. अशी वेळ येईल, तेव्हां जरूर तर त्याचा होणारा परिणाम प्रत्येक ब्रिटिश घरांत जाऊन पोहोंचेल याची मला खात्री आहे.

# आश्रमांतील व्रतें : : ३४

[ १६ फेब्रुवारी १९१६ रोजीं मद्रास येथील वाय्. एम्. सी. ए. च्या सभागृहामध्यें दिलेल्या व्याख्यानांत साबरमतीच्या सत्याग्रहाश्रमांतील लोक जीं व्रतें पाळतात, त्यांचे केलेलें स्पष्टीकरण. ]

मनुष्य कितीहि मोठा असो; त्यानें केलेल्या कामाला धर्माचा पाठिंबा नसेल, तर ते कार्य खरोखरी सफल होणार नाही, या जीवनविषयक सिद्धान्ताचा मी अंगीकार केलेला आहे. पण धर्म म्हणजे तरी काय ? मी माझ्यापुरतें या प्रश्नाचे उत्तर असें देईन : जगांतील धर्मग्रंथांच्या पठणानें तुम्हांला अवगत होतो तो धर्म नव्हे. खरोखर बुद्धीनें आकलन होणारी ही गोष्ट नाहीं; हृदयानेच ग्रहण करण्याची ती गोष्ट आहे. धर्म ही वस्तु आपल्यापासून वेगळी नाही. परंतु त्याचा विकास आपल्यामधूनच व्हावयाचा आहे. तो सदैव आपल्या अंतरांत आहे. कांहींना त्याची जाणीव असते, कांहीना नसते. परंतु त्याचा वास हा आहेच. आणि तुम्ही बाह्य मदतीच्या द्वारा आपल्यांतील ही धर्मविषयक उपजत प्रेरणा जागृत करा, किंवा आपल्या आंतरिक विकासाच्या द्वारा करा, तो गौण प्रश्न आहे. इतकें खरे, कीं जर आपल्याला योग्य तऱ्हेनें आणि चिरकाल टिकण्यासारखी कोणतीहि गोष्ट करावयाची असेल, तर ती धर्मविषयक उपजत प्रेरणा आपण जागृत करणेंच भाग आहे.

आपल्या धर्मग्रंथांतून जीवनविषयक सिद्धान्त म्हणून कांहीं नियम सांगून ठेवले आहेत; आणि ती स्वयंसिद्ध सत्यें आहेत असें आपण धरून चाललें पाहिजे. माझ्या आयुष्यांतील इतकीं वर्षे त्यांवर मी गाढ विश्वास ठेवीत असल्यानें व ते नियम आचरणांत आणण्याचा प्रत्यक्ष प्रयत्न करीत आलों असल्यानें ही संस्था ( सत्याग्रहाश्रम ) स्थापन करण्याचे कामीं जे माझ्याशीं सहमत आहेत त्यांचें साह्य मिळविणें मला आवश्यक वाटलें. आश्रमासाठीं तयार करण्यांत आलेले व आश्रमाचा सभासद होऊं इच्छिणाऱ्या प्रत्येकानें पाळावयाचे नियम खालीलप्रमाणें आहेत :

## सत्याचें व्रत

आपण नेहमीं सामान्यपणें समजतों तें सत्य नव्हे; किंवा 'प्रामाणिकपणा हें सर्वांत लाभकारी धोरण होय' या म्हणीला शोभणारें तेवढेंच सत्य नव्हे. कारण, जर तें सर्वांत लाभकारी धोरण ठरलें नाहीं, तर आपण खुशाल तें सोडून द्यावें असा त्यांतून अर्थ निघतो. येथें सत्याची जी कल्पना केली आहे त्याचा अर्थ असा, कीं कांहींहि होवो, आपण या सत्याच्या कायद्याचीच सत्ता आपल्या जीवनावर चालवावयाची आहे; आणि ही व्याख्या पुरी करण्याकरितां मी प्रल्हादाचें प्रसिद्ध चरित्र उदाहरण म्हणून घेतलें आहे. सत्यपालनासाठीं प्रत्यक्ष बापाला देखील विरोध करण्यास तो भ्याला नाहीं. आणि बापापासून त्यानें स्वतःचा बचाव केला, तो बापाच्या अत्याचारांवर उलट अत्याचार करून नव्हे. उलट, त्याला समजलेल्या सत्याची बाजू सांवरण्यासाठीं बापाकडून किंवा बापाच्या आज्ञेनें ज्यांच्याकडून त्याला मार मिळाला, त्यांना परत मारण्याचें मनांत सुद्धां न आणतां मरण पत्करण्यास तो तयार झाला. इतकेंच काय, पण त्यानें त्याच्यावर होणारे वार तर चुकवले नाहींतच; पण उलट, हंसतमुखानें जो जो त्याचा अमर्याद छळ झाला तो तो त्यानें सहन केला; व त्यामुळें शेवटीं सत्याचा विजय झाला. आपल्या हयातींतच केव्हां ना केव्हां तरी सत्याच्या कायद्याची अमोघिता आपल्याला दाखवून देतां येईल असें समजून त्यानें सर्व छळ सहन केला असें नव्हे. तसें घडलें हें खरें; परंतु छळ सोशीत असतांनाच तो मेला असता, तरी देखील त्याची सत्यावरील निष्ठा अबाधित राहिली असती. मला ज्या सत्याचें पालन करावयाचें आहे तें सत्य हें होय. आपल्या मनांत जेव्हां 'नाहीं' म्हणावयाचें असेल तेव्हां 'नाहीं' असेंच आपण म्हटलें पाहिजे, मग परिणाम कांहींहि होवो, असा आम्हीं आमच्या आश्रमांत नियम केला आहे.

## अहिंसेचा सिद्धान्त

अहिंसा याचा शब्दशः अर्थ 'हत्या न करणें' असा होतो. परंतु माझ्या दृष्टीनें त्यांत अपार अर्थ भरला आहे; आणि एका उच्चतर—अनंतपटींनी उच्चतर वातावरणात त्यापुढें मी जातों. वस्तुतः अहिंसा याचा अर्थ आपण कोणालाहि दुखवूं नये, कोणाहिबद्दल, अगदी स्वतःला जो आपला शत्रु समजत असेल

त्याच्या बाबतीत सुद्धां अनुदार विचाराला मनांत थारा देऊं नये, असा होतो. या तत्त्वाचा जे अंमल करतात त्यांना शत्रूच मुळी असूं शकत नाही. परंतु स्वतःला त्याचे शत्रु समजणारे लोक असूं शकतील. म्हणून म्हटलें आहे, की अशा माणसांच्या बाबतीत देखील आपण दुष्ट विचाराना थारा देता कामा नये. वाराला प्रतिकार केला, तर आपण अहिंसा तत्त्वापासून च्युत होतो. मी तर त्याच्याहि पुढें जातो. मित्राच्या किंवा शत्रु म्हटल्या जाणाऱ्याच्या एखाद्या कृत्याचा आपल्याला संताप आला, तरी देखील आपण या तत्त्वाला अपुरे पडलो असे होईल. परंतु आपण संतापता कामा नये असे मी म्हणतो, तेव्हा त्या कृत्याला आपण संमति द्यावी असा माझ्या म्हणण्याचा आशय नाही. 'संताप' म्हणजे शत्रूला कांही तरी इजा व्हावी, अगर मार्गांतून त्याचा कांटा काढला जावा, आपल्या हातूनच नव्हे, तर इतर कोणाच्याहि हातून म्हणा किंवा दैवी घटनेनें म्हणा काढला जावा अशी इच्छा बाळगणे. अशा विचाराला जरी आपण जागा दिली, तरी देखील आपल्याकडून या अहिंसा-तत्त्वाचा भंगच होतो. जे आश्रमात दाखल होतात, त्याना अक्षरशः हा अर्थ स्वीकारावा लागतो.

याचा अर्थ असा नव्हे, की त्या तत्त्वाचे अगदी संपूर्ण आचरण आमच्याकडून होत असतं. हा आदर्श आम्हाला गांठावयाचा आहे. शक्य तर अगदीं या क्षणी देखील तो गांठण्याची आमची इच्छा आहे. परंतु तो कांहीं भूमितीतील एखादा सिद्धान्त नव्हे; उच्च गणितशास्त्रांतील अवघड उदाहरणें सोडविण्यासारखी ती गोष्ट नव्हे. त्यापेक्षां देखील ते अनंतपटीनीं अवघड आहे. ती उदाहरणे सोडविण्याकरितां आमच्यापैकी अनेकांनी जागून रात्रीचे तेल जाळले आहे. परंतु या तत्त्वाचे आचरण करावयाचे असेल, तर नुसतें जागून रात्रीचे तेल जाळून चालणार नाही. कित्येक रात्री तुम्हांला झोंपेवांचून तळमळत काढाव्या लागतील आणि मनाच्या यातना सहन कराव्या लागतील. तेव्हां कुठे तुम्हांला या आदर्शाच्या किंचित् जवळ सरतां येईल. धर्मयुक्त जीवन म्हणजे काय हे आपल्याला समजून घ्यावयाचें असेल, तर हेंच ध्येय आपल्याला गांठले पाहिजे. याहून यत्किंचित्‌हि कमी चालावयाचे नाही.

या तत्त्वाच्या सामर्थ्यावर ज्याचा विश्वास आहे त्याला ध्येयाप्रत पोंचण्याच्या

अगदीं बेतांत असतांना शेवटच्या टप्प्याला सारें जग आपल्या पायाशीं आहे, असें आढळून येते. शत्रु म्हटल्या जाणाऱ्या माणसावर अगदीं वज्रलेप छाप पडेल अशा पद्धतीनें जर तुम्ही आपलें प्रेम — अहिंसा — व्यक्त केलें, तर त्याच्याकडून तुम्हांला उलट प्रेम मिळालेंच पाहिजे. या नियमांत संघटित कत्तली, उघडपणें केलेले खून किंवा देशाकरितां अथवा आपल्या पालकत्वाखालीं असलेल्या जिवलगांच्या अब्रूचें रक्षण करण्याकरितां सुद्धां कसल्याहि प्रकारची हिंसा करण्याला स्थान नाहीं. त्यांच्या अब्रूचा हा बचाव शेवटीं दुबळाच ठरेल. हे तत्त्व आपणांला असें सांगतें, कीं आपल्या पालकत्वाखालीं असणाऱ्याच्या अब्रूचें रक्षण ती भ्रष्ट करणाऱ्याच्या हातीं आपलें जीवप्राण अर्पण करून आम्हीं करावें; आणि त्याला ठोसे देण्यापेक्षां पुष्कळच अधिक धैर्य लागतें. आपण उलट आघात केले नाहींत, तर ज्यांचें आपण रक्षण करीत आहोत, त्यांच्या व हल्ला करणाऱ्यांच्यामध्ये आपण खंबीरपणे उभे राहून फक्त आघात होतील ते सहन करीत राहिलो, तर काय घडून येतें? मी खात्री देऊन तुम्हांला सांगतो, कीं त्यांच्यांतील सर्व हिंसा आपल्यावर खर्च होऊन जाईल आणि आपल्या माणसांच्या केसालाहि धक्का लागणार नाहीं. अशा प्रकारच्या जीवनयोजनेत आज युरोपांत दृष्टीस पडणाऱ्या युद्धांचें समर्थन करणाऱ्या देशाभिमानाची कल्पना बसत नाहीं.

## ब्रह्मचर्य-व्रत

ज्यांना देशाची सेवा करावयाची असेल किंवा खऱ्या धर्मप्रवण जीवनाची चमक पहावयाची असेल, त्याचा विवाह झाला असो अथवा नसो, त्यांनीं ब्रह्मचर्याचें जीवन घालविलें पाहिजे. विवाहानें स्त्री पुरुषाच्या जास्त जवळ येते इतकेंच. आणि तीं दोघे एका विशिष्ट अर्थानें म्हणजे जन्मजन्मांतरीं एक-मेकांना अंतर न देणारे असे परस्पर-मित्र बनतात. परंतु आमच्या विवाहाच्या कल्पनेत आमच्या वासना घुसडाव्यात असें मला वाटत नाहीं. ते कसेंहि असो; आश्रमांत येणाऱ्यापुढें तरी, निदान ही कल्पना मांडण्यांत येते. याचा मी अधिक विस्तारानें येथे विचार करीत नाहीं.

## अस्वाद-व्रत

ज्याला आपल्या पाशवी विकारावर ताबा मिळवावयाचा आहे, त्यानें जर

आपल्या जिभेवर ताबा मिळवला तर तें सहज साध्य होतें. हें व्रत पाळावयाला सर्वांत अवघड आहे अशी माझी समजूत आहे. उत्तेजक, उष्णतावर्धक व उद्दीपक अशा मसाल्यांच्या पदार्थांचा त्याग करण्याला जर आपण तयार नसूं, तर पाशवी विकाराच्या फाजिल, अनावश्यक व उत्तेजक प्रवृत्तींवर ताबा ठेवणें मुळींच शक्य होणार नाही. तें जर आपण केलें नाहीं, तर शरीराचा जो पवित्र ठेवा आमच्याकडे विश्वासानें देण्यांत आला आहे त्याचा आपण दुरुपयोग करण्याचा संभव आहे; आणि खाणे, पिणें, यांत व पशूंच्या सारखेच जे विकार आपल्या वांट्याला आले आहेत त्यांतच स्वैरपणें रमणारे आपण, पशु आणि इतर प्राणी यांच्याहूनहि हीन होऊं. पण घोडा अथवा गाय ही आमच्याप्रमाणें जिभेचे लाड करण्यांत गुंगलेली कधी आपल्याला दिसली आहेत काय? आपण आहोंत कोठें याचें सुद्धां भान न राहण्याइतपत आपण आपल्या खाद्यपदार्थांची वाढ करीत जावी, मिष्टान्नांच्या जाहिराती देणारी वर्तमानपत्रें धुंडाळावी, हें संस्कृतीचें—खऱ्या जीवनाचें—द्योतक आहे, अशी का तुमची समजूत आहे?

## अस्तेयव्रत

मी असें म्हणतों, कीं एका अर्थानें आपण सर्व चोरच आहोंत. मला या क्षणीं उपयोग करण्याकरितां ज्या वस्तूची गरज नाहीं अशी कोणतीहि वस्तु मी जर घेतली आणि स्वतःजवळ ठेवली, तर ती मी दुसऱ्या कोणाकडून तरी चोरून घेतली असा त्याचा अर्थ आहे. निसर्गाकडून आपल्या दैनंदिन गरजा भागवण्यापुरतें उत्पादन होतें, हा निसर्गाचा अपवादरहित असा मूलभूत नियमच आहे. जर प्रत्येकानें आपल्याला लागेल तेवढेंच घेतलें, त्याहून अधिक घेतलें नाही, तर या जगांत दारिद्य राहणार नाहीं आणि कोणावरहि उपासमारीनें मरण्याची पाळी येणार नाहीं. मी कोणी समाजवादी नाही; आणि ज्यांच्याजवळ मालमत्ता आहे, त्यांच्याजवळून मला ती काढूनहि घ्यावयाची नाहीं. परंतु मी असें मात्र जरूर म्हणतों, कीं आपल्यापैकीं ज्यांना व्यक्तिशः अंधारांतून प्रकाश दिसावा अशी इच्छा असेल, त्यांना या नियमाचें पालन करणें भाग आहे. मला कोणाचीहि मालमत्ता काढून घ्यावयाची नाहीं;

कारण, त्यामुळे मी अहिंसा-व्रतापासून च्युत होईन. माझ्यापेक्षां जर कोणा-जवळ अधिक संपत्ति असेल, तर ती असो बापडी. परंतु मला माझें स्वतःचें आयुष्य नियंत्रित करावयाचें असेल, तर मला जरूर नसलेली कोणतीहि गोष्ट मीं जवळ ठेवण्याचें साहस करतां कामा नये. हिंदुस्थानांत असे पुष्कळ लोक आहेत, कीं ज्यांना दिवसाकांठीं जेमतेम एका जेवणावर समाधान मानावें लागतें; आणि तें जेवण म्हणजे देखील कोरडी भाकरी आणि चिमूटभर मीठ एवढेंच असतें. या करोडो लोकांच्या अन्न-वस्त्राची तरतूद होईपर्यंत आपल्या-जवळ असलेल्या वस्तूवर आपला वस्तुतः कांहींहि हक्क नाहीं. तुम्हां-आम्हां-सारख्या ज्यांना जास्त अक्कल असली पाहिजे अशा लोकांनीं त्यांना अन्न-वस्त्र आणि पोषण मिळावें म्हणून आपल्या गरजा कशा तरी भागवून घेतल्या पाहिजेत; नव्हे, खुषीनें त्याच्या अभावीं हाल सोसण्यासहि तयार असलें पाहिजे.

## अपरिग्रहव्रत

हें व्रत अस्तेयव्रताच्या मागोमाग आपोआपच येतें.

## स्वदेशी

स्वदेशी हें अत्यंत आवश्यक असें व्रत आहे. आपल्या गरजा भागवण्या-करितां आपला शेजार सोडून देऊन आपण दुसरीकडे कोठें तरी जातों, त्या वेळीं आपण आपल्या जीविताच्या एका पवित्र नियमाचा भंग करीत असतों. एकादा मनुष्य मुंबईहून तुमच्याकडे आला आणि माल तुम्हांला देऊं लागला, तर तुमच्या येथें मद्रासमध्येंच जन्माला आलेला आणि वाढलेला व्यापारी तुमच्या अगदीं दाराशीं असतांना त्या मुंबईच्या व्यापाऱ्याला तुम्हीं आश्रय देणें समर्थनीय ठरणार नाहीं.

'स्वदेशी'संबधींचें माझें मत हें असें आहे. तुम्ही आपल्या खेड्यांत तुमच्या खेड्यांतल्या न्हाव्यालाच आश्रय देणें तुमचें कर्तव्य आहे. मद्रासहून अगदीं आपल्या कसबांत निष्णात असलेला न्हावी तुमच्याकडे आला, तरी त्याला तुम्ही वगळलें पाहिजे. तुमच्या खेड्यांतला न्हावी मद्रासच्या न्हाव्याच्या तोडीचा होणें आवश्यक आहे असें तुम्हांला वाटलें, तर तुम्ही त्याला शिकवून आणूं शकतां. तो आपल्या धंद्यांत वाकबगार व्हावा म्हणून वाटल्यास तुम्ही त्याला मद्रासला अवश्य धाडा. तसें तुम्ही करीत नाहीं, तोंपर्यंत दुसऱ्या

न्हाव्याकडे जाणे केव्हांहि समर्थनीय ठरणार नाही. यालाच स्वदेशी-व्रत म्हणावयाचें. अशा रीतीने बऱ्याच गोष्टी हिंदुस्थानात मिळत नाहीत. अशा बऱ्याच ज्या गोष्टी आहेत असे जेव्हा आपल्याला आढळून येते, तेव्हा आपण त्यांच्याशिवाय भागवून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पुष्कळ गोष्टींवाचून आपल्याला भागविता आलें पाहिजे; पण मी खरेंच सांगतो, की अशा प्रकारची तुमच्या मनाची तयारी जेव्हा होईल तेव्हा आपल्या डोक्यावरचें एक मोठें थोरलें ओझें दूर झाल्यासारखे तुम्हाला वाटेल. 'पिल्ग्रिम्स् प्रोग्रेस' ( यात्रेकरूचा प्रवास ) या इंग्रजी पुस्तकात वर्णिलेल्या यात्रेकरूनें आपलें ओझें असेंच दूर केलें. अशी एक वेळ आली, की ज्या वेळी तो यात्रेकरू आपल्या खांद्यावर जें प्रचंड ओझें वाळगीत होता तें त्याला नकळत गळून पडलें; आणि त्याने प्रवास सुरू केला त्या वेळेपेक्षा त्याला अगदी मोकळें मोकळें वाटू लागलें. त्याचप्रमाणें तुम्ही जर या स्वदेशी व्रताचा तावडतोब अंगीकार कराल, तर तुम्हाला देखील असेंच आतापेक्षा अधिक मोकळें वाटू लागेल.

## निर्भयता

हिंदुस्थानातील माझ्या भटकण्यात मला असें आढळून आलें, की माझ्या देशाला अशा एका भयानें ग्रासलें आहे की तो निश्चेष्ट बनला आहे. तोंड उघडून जाहीर रीतीनें आम्ही एक शब्दहि बोलू शकत नाही. आपली मतें बोलावयाची ती फक्त गुप्त रीतीनें बोलावयाची. आपल्या घराच्या चार भिंतीआड आपण काय वाटेल तें करावें, परंतु तें लोकांच्या आचाराकरिता मात्र नमते.

आपण मौनव्रत घेतलें असतें, तर माझें काही म्हणणें नव्हतें. मी तुम्हाला सांगून ठेवतो, की ज्याची भीति बाळगली पाहिजे असा एकच आहे; आणि तो म्हणजे ईश्वर. आपण ईश्वराचें भय बाळगलें म्हणजे माणसाचें भय बाळगण्याचें कारणच उरत नाही; मग तो कितीहि उच्च पदावर असेना का. आणि आपल्याला जर सत्याच्या व्रताचें पालन करावयाचें असेल, तर निर्भयता ही अत्यंत आवश्यक आहे. हिंदुस्थानचें साध्य प्राप्त करून घेण्याची आकांक्षा धरण्यापूर्वी प्रथम आपण ही निर्भयतेची सवय लावून घेतली पाहिजे.

## अस्पृश्यांसंबंधींचें व्रत

हिंदुधर्माला आज कधींहि पुसून टाकतां न येण्यासारखा कलंक लागलेला आहे. तो कालिमा अगदी प्राचीन काळापासून तसाच चालत आला आहे यावर माझा विश्वास नाही. मला असें वाटते, कीं 'अस्पृश्यपणा'ची ही दुःखदायक, भिकार, आणि गुलाम करणारी वृत्ति ज्या वेळी आमचा पुरता अधःपात झाला होता, त्याच वेळी उदित झाली असावी. त्या वेळे-पासून हें पाप आम्हांला चिकटलें असून अजून तें तसेंच आहे. तो आम्हांला मिळालेला शाप आहे असें मला वाटते, आणि जोपर्यंत तो तसाच राहील, तोपर्यंत या पवित्र देशाला होणारी सर्व प्रकारची पीडा म्हणजे आपण जो गुन्हा पक्का करून ठेवला आहे त्याबद्दल मिळणारें ते अगदी योग्य शासन होय, असें आपण मानले पाहिजे असे मला वाटते. कोणत्याहि माणसाला त्याच्या धंद्यामुळें अस्पृश्य समजण्यांत यावे ही गोष्ट मला समजतच नाही; आणि जे तुम्ही विद्यार्थी आज हें सर्व आधुनिक शिक्षण घेत आहांत, त्या तुमचा जर हा गुन्हा करण्यात भाग असेल, तर त्यापेक्षां तुम्हांला अजिबात कसलेच शिक्षण मिळाले नसते, तर बरें झालें असते.

## मातृभाषांच्या द्वारा शिक्षण

युरोपांत प्रत्येक सुसंस्कृत माणूस केवळ स्वतःचीच भाषा नव्हे, तर इतरहि भाषा शिकतो.

हिंदुस्थानांतील भाषेचा प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही आश्रमांतील लोकांनी हिंदुस्थानांतील शक्य तितक्या अनेक भाषा शिकण्याचा निर्धार केला पाहिजे. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविण्याच्या मानाने त्या भाषा शिकण्यांतील त्रास अत्यल्प आहे. बालपणचें आपले आयुष्य स्मरणांतून पुसून टाकणे आपल्याला कसें शक्य आहे? परंतु परकीय भाषेच्या माध्यमाच्या द्वारा ज्या वेळी आपण आपले पुढचे आयुष्य सुरू करतों, त्या वेळीं आपल्या हातून नेमकें तेंच घडत असते. यामुळें मागचें आयुष्य व पुढचें आयुष्य यांमध्यें एक मोठें खिंडार पडतें आणि त्याबद्दल आपल्याला फार मोठा दंड सोसावा लागणार आहे. आणि शिक्षणाचा प्रसार झाला असतांहि अस्पृश्यता टिकून राहिली आहे. शिक्षणानें आपल्याला हा भयंकर

गुन्हा दिसतो, परंतु आपण भीतीने झपाटले गेलो आहोत, त्यामुळे हे तत्त्व आपण आपल्या घरापर्यंत पोचवूं शकत नाही.

## खादीचें व्रत

तुम्ही असें विचाराल, की आम्ही आमचे हात कां म्हणून झिजवावेत? तुम्ही म्हणाल की 'जे निरक्षर आहेत त्यांनीच शारीरिक कष्टाचीं कामें करावयाचीं आहेत; मी फक्त वाङ्मय किंवा राजकारणाचे ग्रंथ वाचीत असेन.' पण आपण श्रमाची प्रतिष्ठा ओळखली पाहिजे. एखादा न्हावी अथवा चांभार जरी कॉलेजात जाऊं लागला, तरी त्याने आपला धंदा सोडता कामा नये. अशा प्रकारचे धंदे हे वैद्यकीय धंद्याइतक्या योग्यतेचे आहेत, असे मी मानतो.

## धर्मबुद्धीनें राजकारण

वरील सर्व नियमांचा अंगीकार केल्यानंतर शेवटीं आपण राजकारण कसें करावें याकडे येतो. धर्मापासून फारकत झालेल्या राजकारणाला कांहींहि अर्थ नाहीं. हिंदुस्थानांतील विद्यार्थीवर्ग या देशांतील राजकारणाच्या व्यासपीठावर जर गर्दी करूं लागला, तर तें राष्ट्राच्या वाढीचें हितकारी चिन्ह आहे असेंच कांहीं म्हणतां येणार नाहीं. मात्र याचा अर्थ असा नव्हे, की विद्यार्थी असतांना तुम्ही राजकारणाचा अभ्यास करूं नये. राजकारण हा आपल्या जीवनाचाच एक भाग आहे. आपल्या राष्ट्रीय संस्थांचें आपल्याला ज्ञान असलें पाहिजे. आपल्याला अगदीं लहानपणापासून देखील हें करतां येईल. आमच्या आश्रमांतील प्रत्येक मुलाला आपल्या देशांतील राजकीय संस्थांचें ज्ञान करून घेण्यास आणि नव्या भावना, नव्या आकांक्षा आणि नवें जीवन यांनीं देश कसा थरारून जात आहे तें समजून घेण्यास शिकविलें जातें. परंतु त्याचबरोबर आपल्याला स्थिर प्रकाश, धार्मिक श्रद्धेचा अमोघ प्रकाश पाहिजे, ही श्रद्धा केवळ बुद्धीला पटवून देणारी नव्हे, तर आपल्या हृदयावर कायमची कोरली गेलेली श्रद्धा पाहिजे. प्रथम आपल्यांत असलेली धार्मिक जाणीव आपण अनुभवली पाहिजे. ती अनुभवतांच जीवनाचें सगळें दालन आपल्याला खुलें होतें; आणि मग त्याचा पवित्र लाभ सर्वांनाच व्हावा. जेव्हां लहान मुलें मोठीं होतील, तेव्हां जीवनसंगर चालविण्याची त्यांची चांगली तयारी झालेली असेल. आज असें होत आहे, की पुष्कळसें राजकीय जीवन हें विद्यार्थी

असेपर्यंतच राहते; परंतु विद्यार्थीदशा संपल्याबरोबर त्याचा मागमूसहि रहात नाही. कसल्या तरी दरिद्री नोकऱ्यांच्या मागे ते लोक लागतात. ईश्वराविषयीचा त्यांना गंधहि नसतो. ताजी हवा, तेजस्वी प्रकाश किंवा खरेखुरें जोमदार स्वातंत्र्य, जें आज मी तुमच्यापुढे मांडलेल्या नियमांच्या पालनांतून उत्पन्न होतें, त्याला ते पारखे होतात.

# स्फुट वचनें : : ३९

## गाय

मानवेतर प्राण्यामध्ये गाय हा अत्यंत शुद्ध जातीचा प्राणी आहे. मानव हा सर्व प्राण्यांत श्रेष्ठ आहे, त्याच्या हातून आपल्याला न्याय मिळावा अशी गायीची आमच्यापाशी कळकळीची मागणी आहे. 'आम्हांला मारून आमचें मांस खाण्यासाठी किंवा इतर रीतींनी आम्हांला वाईट वागविण्यासाठी तुमची योजना झालेली नाही; तर आमचे मित्र आणि पालक बनण्यासाठी तुमची योजना झालेली आहे' असेंच ती जणूं आपल्या डोळ्यांच्या द्वारा आम्हांला सांगत असते.

गाय म्हणजे करुणरसाने भरलेले काव्य आहे असें मला वाटते. मी तिची पूजा करतो आणि सबंध जग जरी विरुद्ध गेलें, तरी मी तिच्या पूजेचें समर्थन करीन.

## मृत्यु

मृत्यु म्हणजे एक महान् जीवनांतर आहे, दुसरे काही नाही; आणि तो येईल तेव्हां त्याचे स्वागतच करावे, हा विचार पुष्कळ वर्षे माझ्या बुद्धीनें ग्राह्य मानला आहे. माझ्या अंतःकरणांतून मृत्यूसकट सर्व प्रकारची भीति काढून टाकण्याचा मी मुद्दाम होऊन पराकाष्ठेचा प्रयत्न केलेला आहे. पुष्कळ दिवसांपासून हरपलेल्या मित्राला भेटावयाला मिळणार या विचारानें जसा आनंद व्हावा, तसा मृत्यूच्या आगमनाच्या विचारानें मला आनंद झाल्याचे

अनेक प्रसंग माझ्या आयुष्यांत आलेले मला आठवतात. सामर्थ्यवान् बनण्याचा पुष्कळ प्रयत्न करून देखील मनुष्य पुष्कळ वेळां दुर्बलच रहातो आणि ज्ञान अंतःकरणांत न उतरतां डोक्यांतच थाबून रहातें; त्यामुळे त्याचा जीवनांतील आणिबाणीच्या प्रसंगी कांहीहि उपयोग होत नाही. शिवाय, मनुष्य जेव्हां बाह्यशक्तीची मदत शोधतो व घेतो, त्या वेळी त्याच्या अंतरांतील आत्मबळ प्रायः उडूनच जातें. म्हणून सत्याग्रह्याने अशा प्रकारच्या मोहापासून सदैव सावध राहिलें पाहिजे.

मृत्यु टाळण्याकरितां जर एकाद्याने मला या वर्षाच्या अखेरीपर्यंत हिमालयांत जाऊन रहा असे सांगितलें, तरी मी तें ऐकणार नाही. कारण, मला ठाऊक आहे, की आपण मरण टाळण्याची खूप सावधगिरी घेतली आहे असा भ्रम माणसाने जरी बाळगला, तरी तें चुकत नाही. आपलें आरोग्य कसें राखावें हे हिंदुस्थानांतील सार्वजनिक कार्य करणाऱ्या ज्या अत्यंत थोड्या लोकांना माहीत आहे, त्यांच्यापैकीच मी एक आहे, याचें महत्त्व तुम्ही बरोबर जाणता असें मला वाटतें. माझ्याकडून काय काम करून घ्यावयाचें तें ईश्वराला माहीत. आपल्या कामासाठी माझी जेवढी गरज आहे त्याहून एक क्षणभर देखील तो मला या जगांत राहूं देणार नाही.

## आहार

'माणूस जें खातो, तसा बनतो' या म्हणींत बराच सत्यांश आहे. अन्न जितकें ओबडधोबड तितकेंच शरीरहि ओबडधोबड.

सामान्यपणे मानवी प्राण्यांना जगतां येणाऱ्या कोठल्याहि अवस्थेंत किंवा हवामानात मांसाहार करण्याची आवश्यकता आहे, असें मला वाटत नाही. मानवजातीला मांसाहार मानवण्याजोगा नाही असें माझें मत आहे. मानवेतर प्राणि-सृष्टीहून आपण जर वरचढ असूं, तर त्यांची नक्कल करण्यांत आपली चूक होत आहे.

माणसाने मांस, अंडी किंवा तत्सम पदार्थ खाऊं नयेत, हा माझ्या धर्मश्रद्धेचाच एक भाग आहे. मग तो चुकीचा असो वा बरोबर असो. स्वतःला जिवंत ठेवण्याच्या साधनांना देखील कांहीएक मर्यादा असली पाहिजे. जीव जगविण्यासाठी देखील कांही गोष्टी आपण करतां कामा नयेत.

असंख्य बिया, पानें आणि फळें हीं मनुष्याला शक्य तितकें पोषण देण्याच्या बाबतींत कितपत उपयोगी पडतात हें शास्त्रज्ञांनीं अजून शोधलेलें नाहीं, असें माझें नम्र मत आहे. याचें एक कारण असें, की मांसाहारावरील विश्वासाभोंवती जें प्रचंड स्वार्थाचें जाळें वाढलें आहे, त्या योगानें वैद्यकीय धंद्यांतील लोकांना या प्रश्नाकडे निःपक्षपातीपणानें पाहण्याला प्रतिबंध होत आहे.

माझी पक्की खात्री आहे, की मनुष्य लहानपणीं आईचें दूध घेतो तद्-व्यतिरिक्त दूध घेण्याची त्याला अजिबात गरजच नाहीं. त्याच्या आहारांत सूर्याच्या उष्णतेनें पक्व झालेलीं फळें व कवचींचीं फळें यांव्यतिरिक्त कांहींहि असण्याची जरूर नाहीं. त्याला द्राक्षासारखीं फळें किंवा बदामासारखीं कवचींचीं फळें यापासून पेशी व मज्जातंतू या दोहोंसहि पुरेसें पौष्टिक अन्न मिळूं शकेल. अशा अन्नावर राहणाऱ्या माणसाला काम आणि इतर विकार ताब्यांत ठेवणें सोपें जातें.

जीवनसत्त्वांसंबंधीं झपाट्यानें होणारे शोध आणि त्यांपैकीं अत्यंत महत्त्वाचीं जीवनसत्त्वें सरळ सूर्यापासून मिळण्याची शक्यता, यांमुळें अन्नासंबंधींच्या वैद्यकीय शास्त्रांतील आजपर्यंतच्या बऱ्याच सिद्धान्तांत व समजुतींत क्रांतिकारी बदल घडून येण्याचा फार मोठा संभव निर्माण झाला आहे.

वनस्पति-सृष्टींत मनुष्याला जास्तींत जास्त काळपर्यंत जगविण्याची अमर्याद शक्ति आहे. या क्षेत्राचें आधुनिक वैद्यक-शास्त्राकडून अजून संशोधनच झालेलें नाहीं. संवयीच्या जोरामुळें तें खाटीकखान्यावर किंवा फार झालें, तर दूध व दुधापासून तयार होणारे पदार्थ यांवरच विसंबून रहातें. ज्या प्रसिद्ध वैद्यकीय शास्त्रज्ञांची परंपरा शाकाहारी आहे, त्यांच्यावर या संशोधनाची जबाबदारी आहे.

माझी सहजप्रवृत्ति आणि मला मिळालेलें शिक्षण याच्यायोगानें मी व्यक्तिशः शुद्ध शाकाहाराच्या बाजूचा असून कित्येक वर्षें मी प्रकृतीला अनुकूल असे शाकाहारी भोजन शोधून काढण्याचे प्रयोग करीत आहें. परंतु मला दुग्धविरहित आहाराचें समर्थन करणारा भरपूर पुरावा मिळेपर्यंत माझ्या दुधाविरुद्ध असलेल्या ओरडीला भिण्याचें कारण नाहीं. मी स्वतः दूध घेत नसतांनाहि हिंदुस्थानांत निर्माण होणाऱ्या कोणत्याहि दुधापेक्षां

शुद्धता आणि चरबीचें प्रमाण यांत सरस असलेलें गायीचे दूध निर्माण करणारी एक आदर्श गोशाळा मी चालवीत आहें, ही देखील माझ्या जीवनांतील अनेक विसंगतीपैकींच एक विसगति आहे.

......मांसाहार वर्ज्य केल्याने आत्म्याच्या विकासाला फार मोठी मदत होते हे निश्चित; परंतु मांसाहार वर्ज्य केला की झाले, असे नाही. मासाहार करतात, परंतु ईश्वराला भिऊन राहतात अशी अनेक माणसें, कडक सोवळे-पणानें मांसाशन व इतर अनेक वस्तूपासून दूर राहणाऱ्या पण आपल्या प्रत्येक आचरणांत ईश्वराची कुचेष्टा करणाऱ्या माणसाहून आपल्या मुक्तीच्या अधिक सन्निध जातात.

माणसाने जिभेच्या तृप्तीसाठी न खातां केवळ शरीर टिकविण्यासाठीच खाल्लें पाहिजे. जेव्हा प्रत्येक अवयव शरीराला आणि तद्द्वारा आत्म्याला साहाय्य करूं लागतो, तेव्हा त्याची खास आवडनिवड नाहीशी होते आणि मगच निसर्गाने त्याला ज्या उद्देशाने निर्माण केले त्या उद्देशाने त्याचे कार्य सुरू होते. निसर्गाशी अशा तऱ्हेने तादात्म्य पावता यावे म्हणून कितीहि प्रयोग केले किंवा केवढाहि त्याग केला, तरी तो अगदी क्षुल्लकच ठरेल.

## डॉक्टर

डॉक्टरलोकांच्यामुळे आपल्याला मन मानेल तसे वागण्याचा मोह होतो, आणि त्याचा परिणाम असा झाला आहे, की आपला स्वतःवरचा ताबा सुटला आहे आणि आपण नामर्द बनलो आहोत. ही वस्तुस्थिति नाकारता येणार नाही.

सर्वसामान्य वैद्यकीय व्यवसायात असलेल्या मंडळींशी माझे भांडण हे आहे, की ते आत्म्याकडे अजिबात दुर्लक्ष करतात आणि शरीरासारख्या तकलादी हत्यारालाच केवळ टाकटीक करण्याचा प्रयत्न करण्यासाठी जिवापाड मेहनत करतात. अशा तऱ्हेने आत्म्याकडे दुर्लक्ष करून हे लोक माणसांना आपल्या मर्जीप्रमाणे वागावयाला लावतात आणि मानवाची प्रतिष्ठा आणि आत्मसंयम कमी करण्यास मदत करतात. पाश्चात्य देशात आज अशा एका विचारसरणीचे लोक हळूहळू पण निश्चितपणे उदयाला येत आहेत, की ते विकृत शरीराला दुरुस्त करताना आत्म्याकडे लक्ष

पुरवतात आणि त्यामुळे रोग बरा करण्याचें साधन म्हणून ते औषधापेक्षां निसर्गावर अधिक विसंबून रहातात, याचा मला फार आनंद होतो.

शरीरापेक्षां आत्म्याला बरें करणाऱ्यांची जास्त जरूर आहे. रुग्णालयांची आणि वैद्यकीय धंदा करणाऱ्यांची भाराभर वाढ होणें हे खऱ्या संस्कृतीचें द्योतक नव्हे. आपण आपल्या शरीराचे जितके कमी लाड करूं, तितके आपलें आणि जगाचें भलें होईल.

ईश्वराचे मंदिर म्हणून शरीराचा उपयोग न करतां स्वेच्छाचाराचे साधन म्हणून आपण त्याचा उपयोग करतों आणि स्वेच्छाचाराची वाढ करून हें पार्थिव मंदिर भ्रष्ट करण्याकरितां डॉक्टरलोकांकडे धांव घेण्याची आपल्याला शरमहि वाटत नाही.

माणसाला औषधे घेण्याची गरज नाही असे मी मानतों. हजारांतील ९९९ रोगी नियमित आहार, पाणी व माती यांचे उपचार, आणि अशाच प्रकारचे घरगुती उपाय यांच्या योगानें बरे करतां येणे शक्य आहे.

## मादक पेयें

मद्यपान हे व्यसन नसून एक रोगच आहे. मला अशीं कित्येक माणसें माहीत आहेत, की त्याचा इलाज चालला तर ते आनंदानें मद्यपान करण्याचे सोडून देतील. या मोहापासून आम्हांला वाचवा, असें म्हणणारेहि कांही लोक मला माहीत आहेत. त्याच्या विनंतीला अनुसरून त्यांच्यापसून तो मोह दूर केला, तरी देखील ते पुन्हां चोरून मद्यपान करीत असल्याचे मला आढळून आले आहे. रोगी माणसांना त्याच्या मर्जीविरुद्ध देखील मदत केलीच पाहिजे.

## शिक्षण

मुलामध्यें त्याच्या हातांची, मेंदूची आणि त्याच्या आत्म्याची मी वाढ करीन. आज त्याचे हात जवळजवळ उपयोगांतून गेल्यामुळे खुरटून गेल्यासारखे झाले आहेत आणि आत्म्याकडे तर अजिबात दुर्लक्ष झाले आहे.

निरनिराळ्या शास्त्रांतील शिक्षणाला मी महत्त्व देतो. आपल्या मुलांना रसायनशास्त्र अथवा पदार्थविज्ञानशास्त्र याचे कितीहि शिक्षण दिलें, तरी तें अपुरेच ठरेल.

माझ्या योजनेमध्ये अक्षरे काढण्यापूर्वी अथवा गिरविण्यापूर्वी हात प्रथम अवजार चालवितील. जगांतील इतर वस्तू जसजशा मुलांना आयुष्यांत समजूं लागतील, तसतसे त्यांचे डोळे अक्षरांच्या व शब्दाच्या चित्रावरून अर्थ समजून घेऊं लागतील आणि कान वस्तूंची नांवे आणि वाक्यांचे अर्थ झटकन पकडतील. ही सबंध तालीम निसर्गाला धरून, संवादी आणि म्हणून जगांत सर्वांहून अत्यंत अल्प काळांत फलदायी होणारी व अत्यंत स्वस्त अशी असेल. हाताच्या आगोदर डोळे, कान आणि जीभ यांचा संबंध येतो. लेखनापूर्वी वाचनाचा आणि मूळाक्षरें गिरवून काढण्यापूर्वी रेघा काढण्याचा नंबर लागतो. या नैसर्गिक क्रमानें गेलें, तर मुलाचें शिक्षण मूळाक्षरापासून सुरू करण्यानें त्याची समजशक्ति जी दडपली जाते, ती तशी दडपली न जाता तिची वाढ होण्याला पुष्कळ वाव सांपडेल.

## थोरपणा

माणसाच्या हयातींत त्याच्या सुखाची व्याख्या करणें सॉलोमनला अवघड वाटलें; मग माणसाच्या थोरपणासंबंधीचा निर्णय देणें किती कठिण असेल बरें? जगांतला खरा थोरपणा हा कांहीं तमासगिरांनीं पहावा म्हणून टेकडीच्या माथ्यावर जडवून ठेवलेला असत नाहीं. उलट, माझ्या सत्तर वर्षांच्या अनुभवानें मला असें शिकविलें आहे, कीं खरे थोर पुष्कळ वेळा तेच असतात, कीं ज्यांच्याविषयीं आणि ज्यांच्या थोरपणाविषयीं जगाला त्यांच्या हयातींत कांहीं सुद्धां माहिती असत नाहीं. खऱ्या थोरपणाची पारख एका ईश्वरालाच होते, तो माणसाचें हृदय जाणतो.

## माझे गुरु

गोखल्यांना मी माझे राजकीय गुरु म्हटलें आहे. परंतु मला सांगावयाला वाईट वाटतें, कीं आध्यात्मिक बाबतींत मात्र ज्याला मी सर्वस्वी शरण जाऊं शकेन, आणि राजकारणांत जसें मी गोखल्यांचें मत शिरोधार्य मानलें, तसें आध्यात्मिक बाबतींत ज्याचें मत मी शिरोधार्य मानूं शकेन असें कोणीहि मला अजून मिळालें नाहीं. कदाचित् आध्यात्मिक गुरु भेटण्याइतकी माझी अजून तयारीहि झाली नसेल; कारण माझ्या असा विश्वास

आहे, की गुरु मिळावा इतकी आपली तयारी झाली, की आध्यात्मिक गुरु आपण होऊन आपल्याकडे चालून येतो; नव्हे, तो आपल्याला शोधून काढतो.

परंतु अशा तऱ्हेनें माझें हृदयसिंहासन जरी रिकामें राहिलें असलें, तरी ज्या तीन आधुनिक विभूतींनी माझ्या जीवनावर आध्यात्मिक दृष्ट्या फार मोठी छाप पाडली आहे, त्यांपैकी कै. राजचंद्र यांच्यानंतर टॉल्स्टॉय यांचा नंबर लागतो आणि तिसरी व्यक्ति म्हणजे रस्किन ही होय. चाळीस वर्षांपूर्वी मी संशयवादाच्या प्रचंड भोंवऱ्यांत सांपडलों असतांना टॉल्स्टॉयचे ‘ दि किंग्डम् ऑफ् गॉड इज वुइदिन यू ’ ( देवाचें राज्य तुझ्या हृदयात आहे ) हे पुस्तक माझ्या वाचनांत आलें आणि त्या पुस्तकाचा माझ्यावर फार परिणाम झाला. त्या वेळीं माझा हिंसेवर विश्वास होता. त्या पुस्तकानें माझ्यांतील संशयवाद नाहीसा झाला आणि मी कट्टा अहिंसावादी बनलों. टॉल्स्टॉयच्या जीवनांतील कोणती गोष्ट मला सगळ्यांत आवडली असेल, तर ती ही, की टॉल्स्टॉयनें जी शिकवणूक दिली ती त्यानें प्रत्यक्ष आचरणात आणली आणि सत्याच्या साधनेपुढें त्यानें कशाचीहि तमा बाळगली नाही.

## सौख्य

सौख्य म्हणजे मनुष्याच्या प्रतिष्ठेची ज्ञानाला अनुभूति आणि स्वतंत्रते-बद्दल त्याला लागलेली भूक होय. आपल्या वैयक्तिक सुखचैनीच्या व भौतिक गरजांच्या स्वार्थी पूर्तीपेक्षां ही स्वतंत्रता माणसाला अधिक मोलाची वाटते, आणि ती सुरक्षित राहावी म्हणून तो आपल्या सुखचैनीचा व भौतिक गरजांचा त्याग करण्याला आनंदानें व तत्काळ तयार होतो.

सौख्य प्रत्येक माणसाच्या अंतरांत आणि पूर्णत्वाच्या व सत्याच्या साधनेंतच वसत असतें.

[ प्रश्नः—पूर्णत्वाची साधना करणें सर्वांना शक्य आहे काय ? ]

होय; पूर्णत्व तर त्याच्यापाशीच असतें.

## अमरता

माझी अशी समजूत आहे, की निरोगी शरीरांत निरोगी आत्मा निवास

करीत असला पाहिजे. त्यामुळें ज्या मानाने आत्म्याची निरोगिता आणि विकारांपासून अलिप्तता वाढत जाईल, त्या मानानें शरीराचाहि तसा विकास होत जाईल. याचा अर्थ असा नव्हे, की निरोगी शरीर धष्टपुष्ट असलेच पाहिजे. पुष्कळ वेळां हिंमतवान् आत्मा फाटक्या शरीरांत वास करीत असतो. कांही एका अवस्थेनंतर आत्म्याच्या विकासाच्या प्रमाणांत शरीर कृश होत जाते. पूर्ण निरोगी शरीर अगदी कांटकुळें असू शकेल. पिळदार शरीर हे पुष्कळदां अनेक आजारांना बळी पडते. वरून जरी ते रोगमुक्त दिसत असले, तरी स्पर्शजन्य, संसर्गजन्य किंवा अशाच रोगापासून ते सर्वथैव अलिप्त नसतें. उलट, पूर्णपणे निरोगी असलेल्या शरीराला अशा कोणत्याहि रोगांची बाधा होऊं शकत नाही. न बिघडण्याची शक्ति असलेल्या रक्तात संसर्गाचा प्रतिकार करण्याचा गुण निसर्गतःच असतो.......

अशा तऱ्हेची समतोल अवस्था प्राप्त करून घेणें खरोखर फार कठिण आहे. नाहीपेक्षा मला ती केव्हांच प्राप्त झाली असती. कारण, ही पूर्णावस्था पाप्त करून घेण्यासाठी कोणतेहि क्लेश सोसण्याचें मी बाकी ठेवणार नाही, याची साक्ष माझा आत्मा देऊ शकेल. कोणताहि बाह्य अडथळा ती स्थिति प्राप्त करण्याच्या आड येऊं शकणार नाही. परंतु मागचे संस्कार पुसून टाकणें सर्वांनाच सहजासहजीं साधेल असें नाही; निदान मला तरी तें साधत नाही. परंतु विलंबाने मी थोडा देखील निराश झालेलो नाही. कारण, त्या पूर्णा-वस्थेचें चित्र माझ्या मनापुढे उभें आहे. एवढेंच नव्हे, तर मला त्या अवस्थेचें अंधुक असें दर्शन देखील झालेले आहे. आजपर्यंत झालेल्या माझ्या प्रगतीनें मला निराशा न वाटतां खूप आशा वाटूं लागली आहे. परंतु ती आशा फलद्रूप होण्यापूर्वीं जरी माझे हे शरीर गळून पडले, तरी देखील मला अपयश आलें असें मी मानणार नाही. कारण, माझा या जन्मावर जितका विश्वास आहे, तितकाच पुनर्जन्मावरहि आहे. म्हणून त्या दृष्टीने केलेला थोडकासा प्रयत्न देखील वायां जाणार नाही, याची मला जाणीव आहे.

आत्म्याच्या अमरपणावर माझा विश्वास आहे. या बाबतींत सागराचें उदाहरण देतां येण्यासारखें आहे. सागर हा पाण्याच्या लहानलहान थेंबांचा बनलेला असून त्यांतील प्रत्येक थेंबाला आपापल्यापरी स्वतंत्र अस्तित्व असतें, आणि तरीहि तो पूर्णाचा एक अंश असतो. आपण देखील या जीवन-सिंधूतील

लहानलहान बिंदू आहोंत. जीवनाशीं–प्रत्येक जीवमात्राशीं– एकरूप झालें पाहिजे, ईश्वराच्या सान्निध्यांत जीवनाचें ऐश्वर्य मी सर्वांबरोबर उपभोगलें पाहिजे, असा माझ्या सिद्धान्ताचा अर्थ आहे. या जीवनाचें सार ईश्वर हेच आहे.

## विमा

आयुष्याचा विमा उतरण्यांत भय आणि ईश्वरावरील श्रद्धेचा अभाव दिसून येतो, असें मला वाटते. माझ्या आयुष्याचा विमा उतरण्यानें मीं माझ्या बायकामुलांचें स्वावलंबन हिरावून घेतलेलें असतें. ते स्वतःची काळजी घेतील अशी अपेक्षा कां करूं नये? जगांतील असंख्य दरिद्री कुटुंबाचें काय होत असेल? मी स्वतःला त्यांच्यापैकींच एक कां समजूं नये? इतरांपेक्षां मृत्यु माझ्यावरच आधीं झडप घालील असें मानण्यास मला काय आधार आहे? सरते शेवटी (माझ्या कुटुंबाचा) खरा पालनकर्ता मी किंवा माझा भाऊ नसून तो सर्वशक्तिमान् परमेश्वरच होय.

## वकील

माझ्या सबंध वकिली व्यवसायांत मी अगदीं कांटेकोर सत्य आणि प्रामाणिकपणा यांपासून एकदाहि ढळलों नाहीं.

वकिलाचें कर्तव्य नेहमीं न्यायाधिशापुढे सत्य काय आहे तें ठेवणें आणि त्यांना सत्य शोधून काढण्यास मदत करणें हें आहे; दोषी माणूस निर्दोषी आहे हें सिद्ध करणे नव्हे.

## साधनें आणि साध्य

माझ्या जीवनविषयक तत्त्वप्रणालीमध्यें साधन हें साध्य होतें, आणि साध्य हे साधन होऊं शकतें.

असे म्हटले जाते की 'साधनें ही अखेर केवळ साधनेंच होत.' पण मी म्हणेन की 'साधनें हेंच अखेर सर्व काही आहे.' जशीं साधनें, तसें साध्य. हिंसामय साधनांनी स्वराज्यहि हिंसामयच मिळणार. तसलें स्वराज्य हे साऱ्या जगाला आणि खुद्द हिंदुस्थानला देखील संकट होऊन बसेल. फ्रान्सनें आपलें स्वातंत्र्य हिंसामय साधनांनी प्राप्त करून घेतले, त्या हिंसेची फळें फ्रान्सला अजूनहि भोगावी लागत आहेत... साधनें आणि साध्य यांना

अलग करणारी भित नाही. खरोखर, विधात्याने आपल्याला साधनावर ताबा दिलेला आहे. (आणि तो देखील अगदीं मर्यादितच आहे.) साध्यावर आपला कसलाहि ताबा नाहीं. ज्या प्रमाणांत साधनांची सिद्धता, तितक्याच प्रमाणांत साध्य सिद्ध होतें. या सिद्धान्ताला अपवाद नाही, असा विश्वास असल्याकारणाने जीं निव्वळ 'शांततामय' आणि 'न्याय्य' साधनें आहेत, त्यांनाच चिकटून राहावे असा माझा प्रयत्न असतो.

## औषध

मी पाश्चात्य औषधांविरुद्ध आपले मत प्रकट केले आहे: त्या औषधांना मी जादूटोण्याचा गाळीव अर्क असे म्हणतो. हे माझे मत माझ्या अहिंसे-तूनच निर्माण झाले आहे. कारण विच्छेदनाचा मला अतिशय तिटकारा आहे. मी विचार करतो की जो क्रूरपणा मी स्वतःवर कधींहि करून घेणार नाही, तो खालच्या प्राण्यावर आपण का करावा? परंतु, सर्व प्रकारच्या वैद्यकीय उपचारांचा मी तिरस्कार करीत नाही. आपल्याला पाश्चात्यापासून सूतिकाशास्त्र व बालसंगोपन याबाबत पुष्कळ गोष्टी शिकतां येतील याची मला जाणीव आहे. आपल्याकडे मुले कशी तरी जन्माला येतात आणि आपल्यांपैकी बहुतेक स्त्रियाना बालसंगोपनशास्त्र माहीत नसते. या बाबतींत आपण पाश्चात्याकडून पुष्कळ धडे घेऊ शकू.

परंतु पाश्चात्य लोक मनुष्याचे आयुष्य वाढविण्यावर अवास्तव भर देतात. माणसाला अगदी शेवटच्या क्षणापर्यंत मारखी औषधे पाजण्यांत येतात; नव्हे, टोचूनहि घालतात. लढाईत आपले प्राण देताना जी बेपर्वाई ते दाखवितील, त्याच्याशी हे मला विसंगत वाटते.

## निसर्गाचा प्रकोप

(बिहार भूकंपासारख्या) आपत्ती या माणसांनी केलेल्या पापांचें शासन म्हणून येतात; जगांतील सुसंस्कृत व असंस्कृत लोकाच्या या मताशी मी सहमत आहे. अशी खात्री ज्या वेळी हृदयाला पटते, त्या वेळी लोक पश्चात्ताप करतात, प्रार्थना करतात व आत्मशुद्धि करून घेतात... ईश्वराच्या उद्दिष्टांचें मला फारच थोडे ज्ञान आहे. असल्या आपत्ती ही कांहीं केवळ निसर्ग-देवतेची लहर नव्हे. ग्रहगोल ज्या ठरलेल्या नियमांना अनुसरून चालतात

त्याच नियमांना अनुसरून या आपत्तीहि येतात यांत शंका नाहीं. फक्त आपल्याला या घटनांच्या मागें असलेले नियम माहीत नसतात; आणि म्हणून केवळ आपण त्यांना आपत्ती किंवा उत्पात म्हणतो.

प्रत्येक भौतिक आपत्तीमागें कांहीं तरी ईश्वरी हेतु असतो. ग्रहण केव्हां लागणार हें जसें शास्त्रे आज आपल्याला आधी सांगूं शकतात, त्याप्रमाणें भूकंप केव्हां होणार हे देखील पूर्णावस्थेस पोहोचलेली शास्त्रे अगोदर वर्तवूं लागतील हे अगदी शक्य आहे. तो मानवी बुद्धीनें मिळविलेला आणखी एक विजय ठरेल. परंतु अशा तऱ्हेच्या शोधांत अनंतपटींनी जरी वाढ झाली, तरी त्यामुळें आत्मशुद्धि मुळी देखील होऊं शकणार नाहीं आणि आत्मशुद्धीखेरीज कशालाच महत्त्व नाहीं.

ज्यांना आंतरिक शुद्धीची आवश्यकता पटलेली आहे, त्याना माझें सांगणे आहे, की निसर्गप्रकोपामागील ईश्वरी हेतु आम्हांला कळून त्याच्या योगानें आमच्यांत नम्रता येवो व जेव्हां केव्हां ईश्वराची हांक येईल तेव्हां त्याच्या-पुढे उभें राहण्याची आमची तयरी होवो; आणि आपल्या बांधवांच्या—मग ते कोणीहि असोत— क्लेशांत सहभागी होण्यास आमची सदैव सिद्धता असो, अशी त्यांनीं माझ्याबरोबर ईश्वराची प्रार्थना करावी.

आपले या पृथ्वीवरचें आयुष्य स्त्रियांच्या हातांतील कांचेच्या बांगड्यांपेक्षां देखील ठिसूळ आहे. त्या बांगड्या जर तिजोरीत घालून ठेवून दिल्या आणि त्यांना कधींच हात लावला नाहीं, तर त्या हजारों वर्षे देखील रहातील. परंतु आपलें या लोकींचें अस्तित्व इतकें चंचल आहे, की निमिषमात्रांत तें नाहीं-सेंहि होईल. म्हणून आपल्याला मध्यंतरी जी थोडी सवड सांपडली आहे, तेवढ्यांत आपण श्रेष्ठ आणि कनिष्ठ अशा भेदांपासून मुक्त होऊं या, स्वतःचीं अंतःकरणें शुद्ध करूं या; आणि जेव्हां धरणीकंप अथवा अशीच एकादी नैसर्गिक आपत्ति किंवा मृत्यु आपल्यावर झडप घालील, त्या वेळीं परमेश्वरा-पुढें उभें राहण्याची आपली तयारी ठेवूं या.

## गुप्तता

**गुप्तता हें पाप आहे असें मी मानूं लागलों आहें......आपण जें जें कांहीं बोलतों आणि करतों तें ईश्वर पहातच असतो, याची जर आपणांस जाणीव**

झाली, तर जगांत आपणांला कोणापासून कांहीहि दडवून ठेवावें लागणार नाहीं. कारण, विधात्यासमोर आपण अशुद्ध विचार मनांत आणणार नाहीं; मग ते बोलण्याची तर गोष्टच नको. अशुद्धतेमुळें गुप्ततेचा आणि अंधाराचा आश्रय घेण्याची बुद्धि होते. माणसाची प्रवृत्ति घाण दडवण्याकडे असते. आपल्याला गलिच्छ वस्तू पाहाव्याशा वाटत नाहींत किंवा त्यांना हात लावावासा वाटत नाहीं; त्या नजरेआड कराव्यात असे आपणांस वाटत असतें. मी असे सुचवीन, की जे विचार आपणांला जगापासून दडवून ठेवावेसे वाटतात त्यांना आपण मनांत देखील थारा देऊं नये. सर्व गलिच्छ कामे गुप्तपणेंच केलीं जातात. ईश्वर आपल्या विचारांचा सुद्धां साक्षी आहे असे ज्या क्षणी आपण जाणूं, त्या क्षणीं आपण बंधमुक्त होऊं.

## आत्मशुद्धि

सर्व जीवमात्रांशी एकरूप होणें हे आत्मशुद्धीशिवाय अशक्य आहे. आत्मशुद्धीशिवाय अहिंसा-धर्म अमलांत आणणें केवळ स्वप्नवतच होय. ज्याचें हृदय शुद्ध नाहीं, त्याला ईश्वराची अनुभूति कधींहि होणार नाहीं. म्हणून आत्मशुद्धि म्हणजे जीवनाच्या सर्व क्षेत्रांत शुद्धि झाली पाहिजे. आणि शुद्धता ही अतिशय सांसर्गिक असल्यामुळे स्वतःची शुद्धता आपल्या भोंवतालचें वातावरण सुद्धा शुद्ध करण्याला कारणीभूत होतेच.

परंतु शुद्धीचा मार्ग अत्यंत कठिण आणि चढणीचा आहे. पूर्णपणें शुद्ध व्हावयाचें तर विचार, उच्चार व आचार हे संपूर्णपणें विकाररहित असले पाहिजेत, प्रेम आणि द्वेष, आसक्ति आणि तिटकारा या परस्परविरोधी भावनांच्या पार झालें पाहिजे. मी अविरतपणें प्रयत्न करीत असूनहि अजून मी काया–वाचा–मनानें शुद्ध झालेलों नाहीं, याची मला जाणीव आहे. त्यामुळेंच जगानें केलेल्या स्तुतीनें मी भाळून जात नाहीं. उलट, कित्येक वेळां मला ती बोचते. सूक्ष्म विकारांना जिंकणें हें शस्त्रास्त्रांच्या बळानें स्थूल जग जिंकण्यापेक्षां अतिशयच कठिण आहे, असें मला दिसून येत आहे.

## पापें आणि पापी

माझ्या पापाच्या परिणामांतून निसटून जाण्याची माझी इच्छा नाहीं; पापापासून किंवा पाप करण्याच्या विचारापासूनच माझी सुटका व्हावी, अशी

माझी इच्छा आहे. जोपर्यंत मला ती अवस्था प्राप्त होत नाही, तोंपर्यंत अस्वस्थतेतच मी समाधान मानीन.

ईश्वराच्या दृष्टीने सत आणि पापी हे दोघेहि सारखेच आहेत. दोघांनाहि सारखाच न्याय मिळेल आणि प्रगति किंवा परागति करून घेण्याची संधीहि दोघाना सारखीच प्राप्त होईल. दोघेहि ईश्वराची लेकरे आहेत. ईश्वरानेच त्यांना निर्माण केले आहे. जो साधु स्वतःला पापी माणसापेक्षां श्रेष्ठ समजतो, तो आपले साधुत्व गमावून बसतो, आणि पाप्यापेक्षाहि पापी बनतो. कारण, अहंकारी साधूला आपण काय करीत आहोत याचे ज्ञान असते. पण पाप्याला ते नसते.

माझ्या अनेक पापांची मी जास्तीत जास्तपणे कबुली दिलेली आहे. परंतु त्याचे ओझे मात्र मी माझ्या खांद्यावर वागवीत नाही. ईश्वराकडे जाण्याची जर माझी गति असेल—आणि ती तशी आहे असे मला वाटते—तर मी सुरक्षित आहे. कारण, मला त्याच्या सान्निध्याची ऊब भासते. उपासतापास, व्रते-वैकल्ये आणि प्रार्थना ही मला सुधारतील असे म्हणून जर मी त्यांवर विसंबून राहिलो, तर त्यांना काही किंमत नाही याची मला जाणीव आहे. परंतु विधात्याच्या मांडीवर आपले संत्रस्त डोके ठेवण्याची आत्म्याची तळमळ जर त्याच्या द्वारा व्यक्त होत असेल—आणि तशी ती व्यक्त होते अशी आशा मी बाळगतों—तर त्याचे महत्त्व अपार आहे.

चुकीची कबुली ही कचरा झाडून टाकून जमीन पहिल्यापेक्षां स्वच्छ करणाऱ्या केरसुणीसारखी आहे.

ज्याच्यापुढे पाप उघडे करावे अशा अधिकारी व्यक्तीपुढें जेव्हां आपण अंतःकरण उघडे करून त्याची कबुली देतों आणि ते पुनः न करण्याचे वचन देतो, तेव्हा तो अत्यंत शुद्ध प्रकाराचा पश्चात्ताप समजावा.

ज्यानें आपले पूर्वीचे आचरण पूर्णपणे बदलून टाकलें आहे, तो एक निराळाच मनुष्य बनतो. आपली पूर्वीची पापे कबूल करण्याला त्याला शरम वाटत नाही. याचे कारण इतकेंच, की ती पापें आतां त्याला मुळी देखील स्पर्श करीत नाहीत.

रोगी माणसाला स्वतःचा रोग दडवून ठेवून चालणार नाही. तो जर तसें करील तर स्वतःच्याच पायावर धोंडा पाडून घेईल.

## निंदा

निंदा आणि हेतुविपर्यास हे सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या पांचवीलाच पुजलेले आसतात. विरोधकांवर मात करण्याचा मार्ग म्हटला म्हणजे अप्रतिकार हा होय...म्हणून सर्वसामान्यपणे मी असा सल्ला देतों, की आपल्यावर लादण्यांत आलेल्या निराधार आणि मत्सरयुक्त आरोपांकडे आपण लक्ष देऊं नये. उलट, निंदकाची कींव करावी आणि त्याच्या अंतः-करणात अंती परिवर्तन होईल अशी सतत अशा ठेवावी व त्यासाठीं प्रार्थना करावी.

आपण स्वतःशीं प्रामाणिक असलो म्हणजे झाले; मग अफवाचा गढूळ प्रवाह वाहत राहिला, तरी आपण सुरक्षित राहतों.

## धूम्रपान

मला मद्याप्रमाणेच धूम्रपानाचीहि शिसारी आहे. धूम्रपान हें दुष्ट व्यसन आहे असे मी मानतो. त्यामुळे माणसाची सदसद्विवेकबुद्धि बधिर होते, आणि त्या व्यसनाचे कार्य अदृश्यपणे घडत असल्यामुळे पुष्कळ वेळां ते दारूपेक्षांहि घातक असते. एकदां माणसाला धूम्रपानाची संवय जडली म्हणजे ती सोडणें फार कठिण जाते. धूम्रपान हे खर्चिक व्यसन आहे. त्यामुळे श्वासाला घाण येते, दातांचा शुभ्रपणा नाहीसा होतो, आणि काही वेळां त्यामुळे कॅन्सरचा देखील रोग जडतो. धूम्रपान ही एक गलिच्छ संवय आहे. धूम्रपान हा एकपरी मद्यपानाहूनहि भयकर असा शाप आहे. कारण, धूम्रपान करणाराला त्यांतील धोका वेळेवर ध्यानांत येत नाही. धूम्रपान हे रानटीपणाचे द्योतक समजले जात नाहीं; एवढेच नव्हे, तर सुसंस्कृत मंडळीकडून त्याचा उदोउदो देखील केला जातो. मी इतकेंच म्हणेन, की ज्यांना शक्य असेल त्यांनीं धूम्रपान सोडून देऊन इतरांना धडा घालून द्यावा.

## मृतात्मवाद

मला मृताच्या आत्म्याकडून कधींहि संदेश येत नाहींत. अशा तऱ्हेचे संदेश येण्याच्या शक्यतेवर अविश्वास दाखविण्यासारखा कोणताहि पुरावा माझ्यापाशी नाही. परंतु अशा तऱ्हेतें मृत आत्म्याशीं बोलणे किंवा

बोलण्याचा प्रयत्न करणे मला पूर्णपणें नापसंत आहे. पुष्कळ वेळां असले प्रकार फसवे आणि कल्पनाशक्तीचे खेळ असतात. अशा तऱ्हेनें संदेश मिळणें शक्य आहे असें मानले, तरी ज्याच्याशी बोलावयाचें ते मृतात्मे आणि ज्याच्यामार्फत बोलावयाचें ते माध्यम या दोघांनाहि ते अपायकारक आहे. त्यामुळें अशा रीतीनें बोलावलेला आत्मा जगाकडे ओढला जातो व बांधला जातो. वास्तविक त्याचा प्रयत्न जगापासून अलिप्त होऊन त्याहून उन्नत होण्याचा असला पाहिजे. मृतात्मा विदेही असला, तरी तेवढ्यानें तो जास्त शुद्ध असतोच असे नाही. शरीरात वास करीत असतांना तो ज्या दोषांना पात्र होता ते बहुतेक दोष आपल्या बरोबर घेऊन तो जातो. म्हणून त्याने दिलेली माहिती अथवा सल्ला खरा अथवा समर्पक असेलच असें नाही. मृतात्म्याला पृथ्वीवरील लोकांशी दळणवळण ठेवावेसें वाटतें ही कांही समाधानाची गोष्ट नाही. उलट, अशा तऱ्हेच्या अधर्म्य आसक्तीपासून त्याला परावृत्त केलें पाहिजे. हें झालें मृतात्म्याला होणाऱ्या हानीसंबंधी.

आतां मृतात्म्याशीं बोलणाऱ्या माध्यमासंबंधानें बोलावयाचें, तर माझ्या आढळांत आलेल्या अशा लोकांपैकी सर्वजण भ्रमिष्ट झाल्याचें किंवा त्यांचे मेंदू अधू झाल्याचे आणि ते मृतात्म्याशीं बोलत असतांना किंवा बोलत आहेत अशा समजुतीत असतांना, त्यांच्या ठिकाणी नेहमीचे काम करण्याची ताकद राहात नसल्याचें मला प्रत्यक्ष माहीत आहे. मृतात्म्याशी अशा तऱ्हेचें दळणवळण ठेवणाऱ्या मित्रांपैकी एकाचाहि कांही फायदा झाल्याचें मला स्मरत नाही.

## अस्पृश्यता

मला पुनर्जन्म घेण्याची इच्छा नाही. परंतु तो येणारच असेल, तर मला अस्पृश्याचा जन्म यावा, म्हणजे त्यांची दुःखे, त्यांचे क्लेश आणि त्यांचा केला जाणारा अपमान यांत मला सहभागी होतां येईल; आणि त्यामुळे मी स्वतःला आणि त्यांना त्या केविलवाण्या परिस्थितीतून सोडविण्याचा प्रयत्न करूं शकेन; म्हणून मी करुणा भाकली, की मला जर पुनर्जन्म यावयाचा असेल, तर तो ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र यांपैकी कोणाचा न येतां अतिशूद्राचा यावा.

लोकांबद्दल वाटणाऱ्या प्रेमामुळे अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे लहानपणींच माझें लक्ष गेलें. माझी आई म्हणाली, 'या मुलाला शिवूं नको, तो अस्पृश्य आहे.' 'कां नाहीं शिवायचें ?' मी उलट प्रश्न विचारला, आणि त्या दिवसापासून माझें बंड सुरू झालें.

माझें लग्न होण्याच्याहि आधीपासून अस्पृश्यता घालवण्याच्या कार्याशीं मी सहलग्न झालो होतो. माझ्या वैवाहिक जीवनांत अस्पृश्यासाठीं कार्य करणें किंवा पत्नीच्या सहवासांत राहणें यापैकीं एकाची निवड करण्याचे दोन प्रसंग माझ्यावर आले होते. त्या वेळीं मी पहिल्याचीच निवड केली असती. परंतु माझ्या सज्जन पत्नीच्या कृपेनें ते प्रसंग निभावले. माझ्या आश्रमांत–आणि आश्रम हेंच माझें कुटुंब आहे–अनेक अस्पृश्य आहेत आणि एक गोड परंतु खोडकर अशी अस्पृश्य मुलगी आहे; ती माझी मुलगीच बनली आहे.

आपण हिंदुस्थानातील एकपंचमांश जनतेला कायमचें दास्यात ठेवण्याची इच्छा धरूं आणि आपल्या राष्ट्रीय संस्कृतीचा त्यांना जाणूनबुजून लाभ मिळूं देणार नसूं, तर आपल्या स्वराज्याला कांहीं अर्थच नाहीं. आत्मशुद्धीच्या या महान् चळवळीला ईश्वराचें सहाय्य मिळावें म्हणून आपण एकीकडे खटपट करीत आहोत, तर दुसरीकडे ईश्वराच्या लेकरांपैकीं जे सर्वांत जास्त लायक आहेत त्यांना मानवतेचा हक्क आपण नाकारीत आहोत. आपण स्वतःच असे अमानुष असतांना दुसऱ्याच्या [illegible] आपली मुक्तता कर, अशी आपल्याला ईश्वराजवळ कशी याचना करता येईल ?

अस्पृश्यता टिकून राहण्यापेक्षा हिंदुधर्म लयाला गेला तरी मला चालेल.

अस्पृश्यतेविरुद्ध लढा देण्यांत आणि त्या कार्यार्थ स्वतःला वाहून घेण्यांत मानवजातीचें संपूर्ण पुनरुज्जीवन करणें हीच एकमेव महत्त्वाकांक्षा माझ्यासमोर आहे. कदाचित् समुद्रांतील शिंपतल्या रुप्याइतकेंच मायारूप असे ते केवळ स्वप्नहि असूं शकेल. पण जोपर्यंत तें स्वप्न टिकून आहे, तोपर्यंत मी त्याला स्वप्न मानणार नाहीं. आणि रोमां रोलांच्या शब्दांत मांगावयाचें, तर 'यश हें ध्येयाच्या प्राप्तीत नसून त्यासाठीं केलेल्या कठोर साधनेंत असतें.'

# आमचें प्रकाशन

( शिल्लक नसलेल्या पुस्तकांची किंमत दिलेली नाहीं. )

* १-२ सत्याचे प्रयोग ( द्वितीयावृत्ति ) : म. गांधी
* ३ खादी-मीमांसा ( द्वितीयावृत्ति ) : बाळूभाई मेहता
४ स्वराज्य-शिप्राई : म. गांधी
५ संयम कीं स्वैराचार ? ( खंड १ ला ) : म. गांधी
६ हिंडलग्याचा प्रसाद : काका कालेलकर
* ७ हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें व पुनर्घटना ( द्वितीयावृत्ति )
लेखक : एस्. राधाकृष्णन् २-८-०
* ८ उपनिषदांतील दहा गोष्टी ( तृतीयावृत्ति )
लेखक : शंकरराव देव ०-१२-०
* ९ विद्यार्थी-जीवन ( द्वितीयावृत्ति )
लेखक : श्री. स. महाजन
*१० फिलिपाइन्सच्या स्वातंत्र्याचा इतिहास
लेखक : त्र्यं. र. देवगिरीकर १-४-०
११ काँग्रेसचा इतिहास ( द्वितीयावृत्ति )
लेखक : डॉ. पट्टाभिसीतारामय्या
१२ समाजवादच कां ? ( द्वितीयावृत्ति )
लेखक : जयप्रकाश नारायण २-०-०
१३ खानबंधू : महादेवभाई देसाई
१४ जवाहरलाल नेहरू : आत्मचरित्र ( द्वितीयावृत्ति ) पं. नेहरू १२-८-०
*१५ विश्राम ( पंचमावृत्ति ) : साने गुरुजी १-८-०
*१६ भारतीय संस्कृति ( चतुर्थावृत्ति ) : साने गुरुजी ३-०-०
१७ प्रसाददीक्षा : म. गांधी
१८ भिल्ल साधु गुलामहाराज : शं. वि. ठकार
*१९ आधुनिक भारत : आचार्य जावडेकर
*२० हिमालयांतील प्रवास ( तृतीयावृत्ति )
लेखक : काका कालेलकर २-४-०
२१ गांधीजींचें विविध दर्शन ( द्वितीयावृत्ति )
संकलनकार : एस्. राधाकृष्णन् २-८-०

*२२ **जिवंत व्रतोत्सव** ( द्वितीयावृत्ति ) : काका कालेलकर ३-१२-०
२३ **गांधी-विचार-दोहन** : किशोरलाल मश्रूवाला
२४ **सत्याग्रही महाराष्ट्र** : प्रेमा कंटक ३-०-०
*२५ **अर्थशास्त्र कीं अनर्थशास्त्र?** ( द्वितीयावृत्ति )
लेखक : जॉन रस्किन २-०-०
*२६ **जीवन-दर्शन** ( तृतीयावृत्ति )
लेखक : महाकवि खलिल जिब्रान १-१२-०
२७ **ग्रामोद्योगाचें अर्थशास्त्र** : जे. सी. कुमारअप्पा
२८ **बापू** : घनश्यामदास बिडला
२९ **संस्कृतीचें भवितव्य** (द्वितीयावृत्ति) : एस्. राधाकृष्णन् १-४-०
३० **महात्मा गौतमबुद्ध** : एस्. राधाकृष्णन् १-०-०
३१ **जीवन आणि साहित्य** : आचार्य स. ज. भागवत २-८-०
३२ **प्राचीन साहित्य** : कविसम्राट् रवींद्रनाथ ठाकुर १-८-०
३३ **संयम कीं स्वैराचार?** ( खंड २ रा ) : म. गांधी १-१२-०
३४ **हिंदु-मुसलमान-ऐक्य** : आचार्य जावडेकर ३-०-०
३५ **गीता-हृदय** ( तृतीयावृत्ति ) : साने गुरुजी ०-१२-०
३६ **हिंदूंचें समाजकारण** : काका कालेलकर २-४-०
३७ **द्विखंड हिंदुस्थान** : डॉ. बाबू राजेंद्रप्रसाद ११-०-०
३८ **काँग्रेस-कथा** ( द्वितीयावृत्ति ) : गो. आ. देशपांडे ४-८-०
३९ **भगवान् बुद्धासाठीं** : शंकरराव देव ३-८-०
४० **आचार्य कृपलानी** : निवडक लेख व भाषणें ३-०-०
४१ **वाल्मिकी-आश्रमांतील प्रवचनें** : आचार्य जावडेकर १-०-०
४२ **संपूर्ण स्वदेशी** : म. गांधी २-४-०
४३ **प्रवासी** : महाकवि खलिल जिब्रान २-०-०
४४ **ज्ञानेश्वरी-अंतरंग** : डॉ. रा. द. रानडे २-४-०
४५ **गांधीजींचें मानस** : म. गांधी ४-०-०

---

* हीं पुस्तकें मुंबई, मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील सरकारी विद्यालयांनीं शाळांतील वाचनालयांकरितां व बक्षिसांकरितां मंजूर केलीं आहेत.

# आमच्याकडे सोल-एजन्सीनें असलेलीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | राजनीतिशास्त्र-परिचय : आचार्य जावडेकर | ३-०-० |
| २ | महायुद्ध आणि राष्ट्रसभा : ,, ,, | ०-६-० |
| ३ | आधुनिक राज्यमीमांसा (भाग १ व २) : ,, ,, | २-८-० |
| ४ | पुरोगामी साहित्य : ,, ,, | २-०-० |
| ५ | महाराष्ट्र व हिंदी राजकारण : ,, ,, | १-०-० |
| ६ | समाईक सहकारी स्वराज्य : ,, ,, | ०-४-० |
| ७ | भारतीय क्रांति व राष्ट्रसभा : ,, ,, | ०-१२-० |
| ८ | लो. टिळक व म. गांधी : ,, ,, | २-०-० |
| ९ | विनोबाजी भावे : साने गुरुजी | १-०-० |
| १० | देशबंधु दास : ,, ,, | ०-१४-० |
| ११ | स्वराज्यसंस्थापक श्रीशिवराय : साने गुरुजी | ०-४-० |
| १२ | रामाचा शेला : ,, ,, | ३-०-० |
| १३ | पत्री : साने गुरुजी | ३-८-० |
| १४ | दरबार गोपाळदास : ह. मो. जोशी | ०-२-० |
| १५ | जीवनयोग : ना. ग. जोशी | ०-१२-० |
| १६ | पाकिस्तान : ॲड्. ग. वा. जोशी | १-०-० |
| १७ | कारागृहाच्या भिंती : ना. ग. गोरे | ३-०-० |
| १८ | त्रिमंत्रि-योजना (भाग १ व २) | २-८-० |
| १९ | हिंदी रेल्वे-कामगार : वि. न. साने | ०-१२-० |
| २० | कॉंग्रेसचीं साठ वर्षे : रा. प्र. कानिटकर | ०-८-० |
| २१ | डॉ. सन्यत्सेन : वि. म. भुस्कुटे | ३-०-० |
| २२ | साजचा साळी : सुशील परभृत | ३-०-० |
| २३ | भ्रान्त जीवन : प्रेमा कंटक | २-४-० |

सर्व प्रकारच्या पुस्तकांकरितां प्रथम आमच्याकडे चौकशी करा.

**सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : : टिळक रोड, पुणें २**